
एका
यक्षाचे
अविनाश टिळक
अक्षयगान

# एका यक्षाचे अक्षयगान

(‘स्वर्गस्थ’ पत्नीसमवेतचा पतीचा अभूतपूर्व ‘संवाद’)

अविनाश टिळक

ग्रंथाली

ग्रंथाली प्रकाशन क्रमांक ३५०

**एका यक्षाचे अक्षयगान**

पहिली आवृत्ती १७ सप्टेंबर २००६

© अविनाश टिळक
१/८ राजवाडा, सांगली ४१६४१६
फोन (०२३३) २३२३१३८

प्रकाशन
ग्रंथाली,
इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, ऑफ गोखले रोड (उ),
दादर (प), मुंबई ४०० ०२८.
फोन (०२२) २४४७४८४३
ग्रँटरोड कार्यालय २३८७५४८१ / २३८९२४४५
ई-मेल granthali01@rediffmail.com

मुखपृष्ठ
सतीश भावसार

अक्षरजुळणी
डॉट कॉम, विद्याविहार, मुंबई ४०० ०७७

मुद्रण
जयमल्हार प्रिंटिंग प्रेस,
२१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट,
गोखले रोड (द.), दादर, मुंबई ४०० ०२५

मूल्य १६० रुपये



दादा,
तुमच्यामधील दैवत्वास,
आपल्या जीवनसहचरीबद्दलच्या
लोकविलक्षण निष्ठेस
आणि
अलौकिक मित्रभावनेस....

- अविनाश



कै. आई-दादा कुटुंबीयांसमवेत (१९६७)
उभे - अविनाश टिळक, रवींद्र टिळक
बसलेले (डावीकडून) कु. माणिक कुळकर्णी, श्रीमती सुमतीबाई कुळकर्णी,
श्रीमती गंगुताई ब्रह्मनाळकर, सौ. इंदुमती टिळक, रा.वा. टिळक,
कु. मंजिरी टिळक, सुमन टिळक

## दोन म्हणजे दोनच शब्द!

खरं तर, हे पुस्तक माझं नाही. हे पुस्तक आहे माझ्या वडिलांचं. जो अस्ताला गेला तो सूर्य होता, हे मला फार फार उशिरा कळलं!

आपल्या मृत पत्नीशी 'संवाद' साधणारं असं अलौकिक प्रेम अपवादानेसुद्धा आढळायचं नाही. रोजच्या रोज एका लिखित पानाची समिधा टाकत चार हजारांहून अधिक दिवस दादांनी जो महायज्ञ केला, स्मृतियज्ञ चालवला त्या यज्ञाला कुंड बांधण्याचं काम फक्त मी करत आहे.

केवळ तांत्रिक दृष्ट्या मी लेखक. एरवी निव्वळ संकलक!

- लेखक

## प्रस्तावना

कै. इंदुमती टिळक व कै. रामकृष्ण टिळक हे अविनाश टिळक यांचे आई-वडील म्हणजेच पुस्तकातील आई-दादा होत.

धनवंत घरात जन्मलेली परंतु नंतर विपन्नावस्था आलेली आई आणि साधारणत: जन्मापासून त्याच अवस्थेत वाढलेले दादा यांचा १७ जानेवारी १९३६रोजी विवाह झाला. स्वभाव, शिक्षण, व्यक्तिमत्त्व, एकूणच जीवनमान यांत टोकाचा विरोधाभास असूनही अडतीस-एकोणचाळीस वर्षांचे त्या दोघांचे वैवाहिक जीवन हे सामंजस्यपूर्ण सहजीवनाचा आदर्श होते.

१९७२ मध्ये सेवानिवृत्त झालेली आई, कर्करोगाशी धैर्याने झुंज देऊन, निवृत्त जीवनाचा आनंदही न उपभोगता १७ सप्टेंबर १९७४ला कालवश झाली. कुटुंबातील इतर कोणाहीपेक्षा, दादांसाठी ती सर्वाधिक धक्कादायक गोष्ट होती. अकरा वर्षांनंतर, म्हणजे २१ जुलै १९८५ला दादाही गेले. दादांनी स्वत:चा मृत्यू होईपर्यंत, स्वर्गस्थ पत्नीशी रोजच्या रोज जो एकतर्फी लिखित संवाद केला त्याचे मूर्त रूप म्हणजे हे पुस्तक होय.

दादांच्या मृत्यूनंतर अठरा वर्षांनी त्या चोवीस डायऱ्यांना 'मोक्ष' मिळाला! जुलै २००३ मधल्या 'कालिदास दिना'च्या आदल्या दिवशी, डायऱ्यांविषयी काहीतरी करावे ही भावना लेखकाला व्हावी हा एक योगायोगच! कारण कालिदासानेच अज

राजाचा विलाप आणि यक्षाने आपल्या दुरावलेल्या पत्नीला पाठवलेले विरह-संदेश अजरामर केलेले आहेत. पत्नीच्या पश्चात 'दादा' नामक यक्षाने विरहाच्या त्याच वेदना पुन्हा एकदा चिरंतन केल्या आहेत. वर्ष आईच्या नावे सांगलीच्या नगर वाचनालयात भरवल्या जाणाऱ्या भावगीत गायन स्पर्धांचेही रौप्यमहोत्सवी वर्ष २००३ हे असावे हा आणखी एक योगायोग!

दादांच्या धाकट्या सुनेच्या प्रथम पुण्यतिथीचे औचित्य साधून, २ ऑक्टोबर २००३ रोजी त्यांच्या ज्येष्ठ चिरंजीवाने 'पुत्र सांगे' नामक छोटेखानी पुस्तक प्रकाशित केले. दादांच्या विलक्षण डायऱ्यांची ओळख सर्वांना व्हावी हा हेतू त्यामागे होता. पण त्याचबरोबर, आपल्याप्रमाणे इतरांची प्रतिक्रिया कशी असेल हे अजमावावे असे औत्सुक्यही होते. लेखकाच्या हेतूला वाचकांकडून अनपेक्षित आणि भरघोस प्रतिसाद मिळाला. 'स्वर्गस्थ पत्नीशी संवाद' या शीर्षकांतर्गत, ३१ जानेवारीच्या 'लोकसत्ते'तील सुधीर जोगळेकरांचा लेख हे त्याचेच एक प्रातिनिधिक उदाहरण म्हणता येईल आणि त्या असंख्य वाचकांचा रेटा म्हणजेच प्रस्तुत पुस्तकाची निर्मिती होय.

साधी, सोपी पण ओघवती भाषा, मोजक्या पण परिणामकारक शब्दांतील मांडणी यांच्या साहाय्याने मुळातच हृद्य आणि लोकविलक्षण असलेला असा या पुस्तकाचा गाभा, एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवण्यात टिळक यशस्वी झाले आहेत. मूळ गाभ्याला पोषक असे आणखी काही लेख - ज्यात आपल्या स्वर्गस्थ माता-पित्याची माहिती आणि महती; तसेच त्यांचे सहजीवन सांगणारी स्वतंत्र प्रकरणे, वडिलांचे इच्छापत्र, हा लिखित भाग प्रकाशात आणण्यामागची भावना स्पष्ट करणारे प्रकरण - समाविष्ट केलेले आहेत.

इंग्रजी हा दादांच्या आवडीचा विषय. त्यांनी इंग्रजी भाषेतील संवाद-लेख लिहिले. त्यांची झलक पुस्तकात सादर केली आहे.

काही काही अनुभव हे स्वतःच घ्यायचे असतात. दादांच्या या लोकविलक्षण प्रेमाच्या स्मृतियज्ञाचा अनुभवही प्रत्येकाने स्वतः

घ्यावा असा आहे. लौकिक अर्थाने जगलेले अडतीस-एकोणचाळीस वर्षांचे सहजीवन, आणि त्यानंतरचे संवाद वह्यांच्या माध्यमातील अकरा वर्षांचे अलौकिक सहजीवन अन्यत्र आढळणे कठीण आहे. लेखकाच्या, कवयित्री मैत्रिणीने याबाबत दिलेली ही, प्रतिक्रिया पुस्तक वाचल्यानंतर बव्हंशी वाचकांची प्रातिनिधिक प्रतिक्रिया असेल यात शंका नाही.

पुस्तकवाचन संपल्यावर असाही एक विचार मनात येऊन गेला, की उतारवयात जोडीदार सोडून गेल्यानंतर मागे राहिलेल्याने, गत जीवनातील आपल्या सहजीवनाला अशाच प्रकारे उजाळा द्यायला काय बरे हरकत आहे?

**सुषमा लाड**
घाटकोपर, मुंबई.

## वज्राघात !

एक बुद्धिवादी गृहस्थ. निदान तसं स्वत:ला समजणारा. तसा अभिमान बाळगणारा. वय वर्षं चौसष्ट. पत्नी नुकतीच नोकरीतून निवृत्त झालीय. दोघंही शिक्षक-पेशाचे. या पती-पत्नीनी आपलं उमेदीचं आयुष्य हालअपेष्टात घालवलंय. आता कुठे सुख डोळ्यांसमोर दिसायला लागलंय. दोन्ही मुलं चांगली आहेत. एक मुंबईला रिझर्व्ह बँकेत, तर धाकटा आपल्याजवळच राहतोय. त्याला सांगलीच्या स्टेट बँकेत नोकरी आहे. आता मनसोक्त भटकायचं. आनंद-पर्यटन करायचं. नाटकं बघायची. कधी या मुलाकडे तर कधी त्या मुलाकडे. दोन्ही सुना म्हणजे दोन कन्याच. नातवंडांत रमायचं. याहून महत्त्वाचं म्हणजे मनात खूप दिवस रुजत असलेल्या शैक्षणिक प्रकल्पांची पूर्तता करायची...

या सुखस्वप्नात दंग असतानाच पत्नीवर कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाचा घाला पडतो. वर्ष-सव्वा वर्षाचं यातनामय आजारपण पती पाहतो. क्षणाक्षणाला जवळ येणारा मृत्यू त्याला समोर दिसतो... आपण हतबल आहोत या जाणिवेनं पतीचं हृदय विदीर्ण झालंय. डॉक्टरांच्या चेहऱ्याकडे बघितलं की कळतंय की त्यांचाही निरुपाय आहे. पती रोज पहाटे ज्ञानेश्वरीचा पाठ वाचताना, देवाची- होय, आता बुद्धिवादी मनाला तोच आधार!- विनवणी करतोय. बाबारे, सोडव माझ्या बायकोला या यमयातनांतून...

एक दिवस ते निरांजन शांत होतं...

पती अचानक शुद्धीवर येतो. अरे देवा, कसलं भलतं मागणं मागितलं मी? आणि देवानंही किती झटकन ते ऐकलं!

पतीवर तो वज्राघातच होता.

पतीला त्याच्यावर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगराची हळुहळू जाणीव होऊ लागली. गृहिणी, सखी, सचिव, नव्हे माता, पिता अशी सारी नाती त्याच्यासाठी आपल्या पत्नीच्या ठायी एकवटली होती. आयुष्यभर त्याच्यासाठी तो एकमेव आधार होता. लहानपणी पितृछत्र गमावलेल्या, लग्नाआधी मातृछत्राला पारख्या झालेल्या, सख्खे भाऊ-बहीण नसणाऱ्या त्या पतीसाठी, त्याची पत्नी हे केवळ एकमात्र दैवत होतं.

हो, दैवतच!

त्या दैवताची पूजा बांधणं, अहर्निश तिच्या स्मृतीचा जप करणं एवढंच त्याच्या हाती होतं.

त्यानंतर पतीचा एक यज्ञ सुरू होतो- रोजच्या रोज पत्नीची आठवण जागवायची. कशी? तर रोज एक पानभर मजकूर लिहायचा आणि तिला अर्पण करायचा. रोजच्या रोज तिच्याशी बोलायचं, संवाद साधायचा. भूतलावरील आपल्याला कळलेल्या साऱ्या घटना तिला सांगायच्या. ती जणू काय रोजच्यासारखी आपल्या समोर बसलीय असे कल्पून!

आपण नेहमीप्रमाणे तिच्याशी वेगवेगळ्या विषयांवर बोलतोय. रोजच्या घडामोडी सांगतोय. आपल्या लेखांविषयी, अग्रलेखांविषयी काही ठासून सांगतोय, त्यावर आलेल्या लोकांच्या प्रतिक्रिया वाचून दाखवतोय, ज्ञानेश्वरीच्या एखाद्या ओवीचा आजवर न जाणवलेला एक वेगळाच अर्थ जाणवला. तुला सांगायला आलो आणि... आणि तू नव्हतीस! तू स्वर्गात आहेस आणि मी भूतलावर, तुझ्याविना खितपत पडलोय हे विसरूनच गेलो होतो, असं सांगतोय अशा थाटाचं हे लेखन आहे.

आपल्या 'स्वर्गस्थ' पत्नीबरोबरचा पतीचा असा एकतर्फी 'संवाद' किती दिवस चालावा? अकरा वर्षं म्हणजे जवळ जवळ

चार हजार दिवस! एखादं व्रत अंगीकारल्यासारखं आपल्या पत्नीचं स्मरण रोजच्या रोज जागतं ठेवायचं ही गोष्ट किती लोकविलक्षण! बरं, त्यातून काही साधणार नाही हे माहीत आहे. परमेश्वर प्रसन्न होऊन आपल्या पत्नीला भूतलावर पाठवील ही आशा नाही. अत्यंत निरपेक्ष मनानं आपल्या पत्नीचा असा स्मृतियज्ञ आपल्या आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत जागता ठेवणारा पती, मनाच्या केवढ्या विलक्षण उंचीवर वावरत असला पाहिजे!

ती 'उंची' कळायला माझ्या आकलनशक्तीला तब्बल अठरा वर्षं लागली. ती थोर पती-पत्नी म्हणजे माझे आई-दादा. त्या चार हजार पानांच्या समिधा म्हणजे आमच्या दादांच्या डायऱ्या.

त्या डायऱ्यांचीच ही कथा!

**– अविनाश टिळक**

## अंतरंग

इच्छापत्र / १
माझी आई / ६
दादा / १७
आई-दादांचं समंजस सहजीवन / २५
दादांचं डायरी-लेखन / ३२
डायरी-लेखनाचा खटाटोप कशासाठी? / ३८
डायऱ्या - बुद्धिवादी मनाची कुतरओढ / ४८
सहजीवनाचे उमासे - इंदुविलाप / ६०
सहज लेखक - रसिक वाचक / ११४
महाबळेश्वरची संगत - बीबीसीची सोबत / १४२
डायऱ्यांचा वनवास / १५२

## इच्छापत्र

माझ्या वडिलांचं, दादांचं निधन २१ जुलै १९८५ रोजी डोंबिवलीतील डॉ. राव यांच्या हॉस्पिटलमध्ये झालं. त्यावेळी त्यांचं वय पंच्याहत्तर वर्षांचं होतं. सतत पंधरा वर्षं छळणारा खोकला, छातीच्या बरगड्यांमध्ये तयार झालेला न्युमोनियाचा पॅच, प्रोस्टेट ग्लॅण्डचा त्रास अशा व्याधींनी जेरीस आलेले शरीर मृत्यूच्या स्वाधीन झालं. अर्थात, तो होता त्यांचा शारीरिक मृत्यू. त्यांचा मानसिक मृत्यू त्याआधी अकरा वर्षांपूर्वीच झाला होता. माझ्या आईचं कॅन्सरच्या दुर्धर आजाराने १७ सप्टेंबर १९८५ रोजी निधन झालं. तो दादांसाठी वज्राघात होता. त्यानंतर त्यांचं केवळ शरीर जिवंत होतं, म्हणून ते जीवित होते एवढंच म्हणायचं.

माणसांचा ओघ रात्री बाराच्या सुमारास संपला. दादांच्या मृत्यूची बातमी संध्याकाळी साडेसातच्या 'मराठी बातम्यां'मध्ये 'मुंबई दूरदर्शन'वरून देण्यात आली होती, त्यामुळे समाचाराला येणाऱ्यांची गर्दी वाढली होती. थोडं स्थिरस्थावर झाल्यावर, निजानीज होण्यापूर्वी माझ्या पत्नीने, सुमनने दादांच्या ट्रंकेतून त्यांची एक छोटी काळी बॅग काढली. त्यातून एक बंद लिफाफा माझ्या हाती दिला. मी प्रश्नार्थक मुद्रेनं तिच्याकडे बघितलं.

ती म्हणाली, "हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होण्यापूर्वी दादांनी काही गोष्टी माझ्या स्वाधीन केल्या होत्या. त्यात हे इच्छापत्र होतं."

मी- अवी आणि माझा धाकटा भाऊ रवी अशा, आम्हां दोघांना

उद्देशून त्यांनी पत्र लिहून ठेवलं होतं. ते लाडानं आम्हांस आल्या, लल्या किंवा अवल्या, लवल्या म्हणत.

त्यांच्या लेटरहेडवर पत्र होतं; पण तारीख नव्हती. पत्र असं होतं :

चि. अवल्या व लवल्या यांना,

दिवसेन्दिवस माझी प्रकृती क्षीण होत चालली आहे. या पुढे मी निरोगी अवस्थेत जगेन असे वाटत नाही. देह इतका कृश झाला आहे की केव्हा काय होईल याचा नेम नाही. म्हणून मी पूर्ण शुद्धीत असताना, माझ्या शेवटच्या इच्छा काय आहेत ते थोडक्यात तुम्हांस लिहितो.

प्रथमपासून, मुलांची लग्ने रजिस्टर करावीत या मताचा मी होतो. पण तुमच्या आईला ही गोष्ट मान्य नव्हती. तिचे सर्व आयुष्य संघर्षात गेले. निदान मुलांच्या लग्नाच्या वेळी तरी आपणास वरमाय म्हणून मिरवता यावे, आपली सगळी हौस व्हावी असे तिला वाटे. अर्थात, तिच्या या इच्छेविरुद्ध घरात असंतोष माजवावा असं मलाही वाटेना. याचा परिणाम म्हणजे तुमच्या लग्नाच्या वेळी मला हुंडा घेणे भाग पडले. हुंडा घेणे ही गोष्ट मला मनापासून आवडत नव्हती, पण लग्न थाटामाटात करायचे, सुनेच्या अंगावर दोन दागिने घालायचे, इतकी माझी सांपत्तिक स्थिती नव्हती. यामुळे नाईलाजाने हुंडा घेणे भाग पडले. पण मनात हे शल्य कायम घर करून राहिले. त्याच वेळी निश्चय केला, की जास्तीत जास्त शिकवण्या करायच्या. त्यातील बराच भाग शिल्लक टाकायचा व हुंड्याची रक्कम परत करायची. त्याप्रमाणे गेली पंधरा वर्षे, नित्याच्या खर्चात काटकसर न करता मी प्रामाणिकपणाने राबून चार पैसे राखून ठेवले. आता तुम्हांस मोठ्या अभिमानाने सांगतो, की हुंड्याची रक्कम तुम्ही दोघे आपापल्या सासऱ्यांना परत करा; मात्र यात एक 'पण' आहे. कदाचित माझ्या आजारपणात तुम्हाला फार खर्च आला तर ती रक्कम देणं तुमच्या मर्जीवर राहील.

अवी, रवी, इंदू गेल्यानंतर तुमचा माझा 'सुसंवाद' फारसा झाला

नाही. त्यामुळेच माझ्या मनात कोणते विचार घोळत आहेत याचा थांगपत्ता तुम्हास लागला नाही! तसे मोकळेपणाने बोलण्याचे प्रसंग थोडेच आले, म्हणून मी माझ्या मृत्यूनंतर काय करावे म्हणजे मला बरे वाटेल ते थोडक्यात सांगतो. अर्थात, तुम्ही तसे केलेच पाहिजे असा माझा आग्रह नाही. अपेक्षित गोष्टी अशा आहेत -

१. तुम्ही दोघांनी अप्पांना व चारूच्या वडिलांना प्रत्येकी तीन हजार रुपये (हुंड्याची रक्कम) परत करावेत. तुम्ही म्हणाल की माझी एवढी तीव्र इच्छा होती तर मीच ते पैसे परत का केले नाहीत? त्याचा थोडक्यात खुलासा असा, की उगीच फुकटचा मोठेपणा मिळवण्याची माझी इच्छा नाही. जिवंतपणी आपली कीर्ती कानाने ऐकण्याची कल्पनासुद्धा मला तिरस्करणीय वाटते. Fame is the food that dead men eat.

२. तुम्ही दोघानी प्रत्येकी दहा हजार रुपये वडलांचा वारसा म्हणून घ्यावेत.

३. नाना व ताई यांना माझी आठवण म्हणून प्रत्येकी एकेक हजार रुपये द्यावेत.

४. मृत्यूनंतरच्या क्रिया शक्य तो काहीही करू नयेत. माझा त्यावर बिलकुल विश्वास नाही.

५. जमल्यास नगर वाचनालयाच्या सेवकवर्गाला एकहजार रुपये व इंदुमती टिळक काव्यगायन स्पर्धेला एक हजार रुपये द्यावेत. कसे द्यायचे ते सर्व तुम्ही ठरवायचे आहे.

| | | |
|---|---|---|
| कलम एक | - रु. | ६००० |
| कलम दोन | - रु. | २०००० |
| कलम तीन | - रु. | २००० |
| कलम पाच | - रु. | २००० |
| | | ३०००० |

असे एकूण तीस हजार रुपये तुम्ही खर्चायचे आहेत. एवढी रक्कम 'अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, सांगली' या संस्थेत मी ठेव रूपाने ठेवली आहे. रक्कम थोडी जास्त असेल, पण कमी निश्चित

नाही. ठेवीच्या मुदती भिन्न-भिन्न आहेत. तथापि, पाच वर्षांच्या कालावधीत ही सर्व रक्कम व्याजासकट तुम्हांस मिळेल. एवढा वेळ वाट पाहणे शक्य नसेल तर व्याजाची इच्छा न करता तुम्हास ती लागलीच मिळेल.

अल्या-लल्या, तुमची आई निधन पावल्यानंतर पंधरा एक दिवसांपासून दररोज तिच्या स्मृतीप्रीत्यर्थ मी वहीचे एक पान लिहीत असे. त्या वह्यांचा लेखक मी व वाचकही मीच. जोपर्यंत माझी स्मरणशक्ती सचेत आहे तोपर्यंत मी हा क्रम चालवणार आहे. माझ्यानंतर त्या वह्या वाचण्याची जिज्ञासा तुम्हांला वाटली तर त्या ट्रंकेत क्रमवार लावून ठेवलेल्या आहेत. एकदा वाटले, की न जाणो त्या आत्मनिवेदनात तुम्हांविषयी एखादा कमी-अधिक शब्द लिहिला गेला असला तर! उगीच तुमची हळुवार मने उदासीन व्हायची. म्हणून सर्व वह्या रद्दीत देऊन टाकाव्यात असे वाटे. 'दक्षिण महाराष्ट्र'मध्ये संपादकीय मजकूर मी खूप लिहिला, पण तो सर्व रद्दीत घालून टाकला; वह्या मात्र घालण्याचे मनोधैर्य होईना.

इंदू गेल्यापासून जगण्याची मनीषा नष्ट झाली. कोणत्याच गोष्टीत मी रस घेईनासा झालो. मनातील या खळबळी मी कोणास सांगणार? त्यामुळे जगण्याचे एक प्रकारचे नाटक चालू होते. हे नाटक अजून किती वेळ चालू राहील हे त्या मृत्युदेवालाच माहीत. तथापि, मला काय वाटत होते याची अस्पष्ट कल्पना मरणानंतर तुम्हांस या पत्रावरून व मी लिहिलेल्या स्मृतिसंवादावरून येईल. असो.

अधिक लिहून तुम्हांस भावविव्हल करत नाही. पुढे कसे वागावे याचा अनाहूत सल्ला देण्याचा विचारसुद्धा माझ्या मनात येत नाही. तुम्ही दोघे समंजस, सुज्ञ व व्यवहारनिपुण आहात. तुमच्या आईची स्मृती सतत जागृत ठेवा. सुमन व चारू, मंजा, लालू, मंदार व मधुरा यांना सोडून जाण्यात दुःख वाटणारच, पण जे होते ते सर्व निसर्गाला धरून आहे. मग त्याविरुद्ध तक्रार करण्यात काय अर्थ? तुम्ही सर्व एकोप्याने, सुखाने व गोडीगुलाबीने राहून संसार नेटका करावा एवढीच इच्छा.

तुमचेच दादा,

*Let there be no moaning of the bar*

*When I put out to sea.*

ता. कः वरील इच्छेप्रमाणे सर्व गोष्टी अक्षरशः तुम्ही पाळल्या पाहिजेत असे तुम्हांवर नैतिक वा कायदेशीर बंधन नाही. अवी, रवी, चारू, सुमन यांनी एकत्र विचारविनिमय करून काही निराळी व्यवस्था केलीत तर माझी काही हरकत नाही. जे करायचे ते एकोप्याने व प्रसन्न मुद्रेने करा. मात्र भडाग्नीविना माझे इतर कोणतेही और्ध्वदैहिक संस्कार होऊ नयेत ही इच्छा आहे. अर्थात, इच्छा आहे आज्ञा नाही.''

पत्रवाचन संपताच आम्ही सर्वजण दिङ्मूढ झालो, सुन्न झालो. सुमनला पत्र वाचतानाच भावनावेग आवरला नव्हता. डोळ्यांतून पाणी येत होतं. त्यामुळे ती किंचित काळ थांबत-थांबतच वाचत होती. आमची अवस्थाही फारशी वेगळी नव्हती.

दादांचा मृत्यू जरी डोंबिवलीत झाला असला तरी त्यांचा सारा जीव सांगलीत गुंतला होता. आपला शेवट सांगलीत व्हावा अशी त्यांची इच्छा होती. आईने आणि त्यांनी मिळून मोठ्या कष्टानं जी वास्तू बांधली होती त्या वास्तूत आणि ज्या जागेवर आपल्या प्रिय पत्नीने अखेरचा श्वास घेतला त्याच ठिकाणी आपला अंत व्हावा असं त्यांना स्वाभाविकपणे वाटत होतं. तथापि, सांगलीत त्यांचं करायला कोणी नव्हतं; म्हणून काहीही कुरकूर न करता, त्रागा न दाखवता, ते शांतपणे डोंबिवलीतील माझ्या बिऱ्हाडी शेवटची दोन वर्षं येऊन राहिले होते.

त्यांची फारशी इच्छा नव्हती तरी आम्ही आमच्या कमकुवत, भित्र्या मनाला समाधान वाटावं म्हणून सांगलीत जाऊन त्यांचे दिवस केले. ज्येष्ठांनी सांगितलेली धार्मिक कृत्यं केली आणि नित्यकर्माला लागलो.

❐

## माझी आई

दादांचं निधन झाल्यानंतरच्या वर्षभरात, त्यांचा ज्येष्ठ पुत्र या नात्यानं, त्यांनी इच्छापत्रात व्यक्त केलेल्या सर्व अपेक्षांची पूर्तता मी केली. मात्र, त्यांनी लिहिलेल्या डायऱ्यांविषयी नेमकं काय करावं याचा मी काहीच विचार केला नव्हता. तो विचार ठळकपणानं केव्हा मनात रुजला याविषयी नंतर सांगणारच आहे. तथापि, आपल्या मृत पत्नीबरोबर एक नाही, दोन नाही तर अकरा वर्षं विलक्षण सातत्यानं संवाद साधावा असं दादांना का वाटलं असावं? त्यांचं आणि आईचं परस्परांच्या गाढ प्रेमाचे स्नेहरज्जू एवढे बळकट आणि अतूट का बनले असतील? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी त्यांच्या अडतीस-एकोणचाळीस वर्षांच्या सहजीवनाचा मागोवा घ्यायला हवा, तरच दादांच्या लोकविलक्षण डायरीलेखनाची पूर्वपीठिका ध्यानी येईल.

इंदुमती रामकृष्ण टिळक ही माझी आई. तिचा जन्म १८ ऑगस्ट १९१४चा. आजकाल लागलेल्या नव-नवीन शोधांमुळे सर्वसामान्य माणसांची आयुर्मर्यादा वाढली आहे. पंच्याहत्तर-ऐंशीच्या घरातील माणसं बऱ्यापैकी कार्यक्षम अवस्थेत आपण अवतीभवती पाहतो, पण तसं सुख आमच्या आईच्या नशिबी नव्हतं. तिला अवघ्या साठ वर्षांचं आयुष्य लाभलं. शाळेतून निवृत्ती पत्करल्यावर थोडं सुखाचं जीवन जगावं असं तिच्या मनात यावं आणि तेवढ्यात वरचा निरोप यावा ही किती क्लेशकारक बाब! पण दुदैवानं, तीच तिच्या नशिबी आली.

माझ्या आईचा जन्म चांगल्या सधन घरात झाला. तिचे वडील विष्णू सावळाराम हेबाळकर हे मोठे अडत व्यापारी होते. तसेच, ते सांगली नगरपालिकेचे सदस्य होते. आई सहा भावंडांमध्ये तिसऱ्या नंबरची. सांगलीच्या तत्कालीन वखार भागात वास्तव्य असल्यानं आईला शिक्षणाची संधी मिळाली. तिचं प्राथमिक शिक्षण जैन महिलाश्रमात झालं. तिथंच तिची राजमतीबाई पाटील या, कालांतरानं 'सांगली भूषण' म्हणून गौरवल्या गेलेल्या, जैन समाजातील थोर व्यक्तिमत्त्वाबरोबर दृढ मैत्री झाली आणि ती अखेरच्या श्वासापर्यंत टिकली. जैन समाजातील राजमती आणि ब्राह्मण समाजातील इंदुमती यांची विलक्षण मैत्री हा त्या काळातील सुरुवातीला कुतूहलाचा आणि नंतर कौतुकाचा विषय होता. वडिलांची व्यापारी पेढी आणि राहते घर एकत्र असल्याने आईसह सर्व भावंडं, लहानपणी पेढीवर बसून मुठी-मुठीनं नाणी मोजत. पुढे, कधी बोलण्याच्या ओघात, आई ज्यावेळी अगदी अभावितपणे ही गोष्ट मला सांगत असे, त्यावेळी प्रत्यक्षात आमच्या घरात मात्र नोटांचा दुष्काळ आणि नाण्यांची चणचण होती! आई नंतर सांगली हायस्कूलमध्ये होती. त्या काळी म्हणजे ऐंशी-पंच्याऐंशी वर्षांपूर्वी इंग्रजी शाळेत (म्हणजे आताच्या माध्यमिक) शिकणाऱ्या मुली हाताच्या बोटांवर मोजाव्यात इतक्याच असत. आईचे वडील नुसते प्रागतिक विचारांचे नव्हते तर त्या काळी सांगलीतील सामाजिक व राजकीय चळवळींचे उगमस्थान असलेल्या युनिनन क्लबचे सभासद होते. त्यामुळेच आई इंग्रजी शाळेत जाऊ शकली. सांगली हायस्कूलमध्ये असताना, आईला विमल ठोंबरे, (तत्कालीन सांगली संस्थानचे दिवाण रावबहाद्दूर ठोंबरे यांची कन्या), गजरा ठाकूर (सोलापूरचे गाजलेले काँग्रेस नेते छन्नुसिंग चंदेले यांच्या पत्नी) अशा तिच्यावर शेवटपर्यंत अकृत्रिम प्रेम करणाऱ्या मैत्रिणी लाभल्या. त्यात पुढे शांती कोल्हटकर, चिंगी पटवर्धन यांची भर पडली. या सर्व मैत्रिणी एकजात स्वरूपसुंदर होत्या.

पुढे, आईला रंगी काळे नावाची आणखी एक मैत्रीण भेटली. ती मात्र आडनावाप्रमाणे काळी होती. ती आणि आमची आई अशा दोघीजणी सांगली हायस्कूलमध्ये असताना मधल्या सुट्टीत शेजारच्या आमराईत

जाऊन बसत. देवाने आपल्या दोघींनाच रूप दिलं नाही म्हणून गळ्यात गळे घालून रडत असत! रडून मन हलकं झाल्यावर दोघी चेहरा धुऊन शाळेत तासाला जाऊन बसत. एका गोष्टीची मला गंमत वाटे. आमची आई तशी मितभाषी आणि सकृद्दर्शनी तरी गंभीर वाटावी अशी होती, पण तिच्या स्वभावात, वागण्या-बोलण्यात असं काही अगम्य रसायन होतं, की त्या सगळ्या मैत्रिणी अगदी अखेरपर्यंत तिच्यावर उत्कट आणि उत्स्फूर्त प्रेमाचा वर्षाव करत राहिल्या. आईला पुढे विपन्नावस्था आली. परिस्थितीमुळे तिला प्राथमिक शिक्षिका बनावं लागलं, तरी मैत्रिणींचं प्रेम रतीभरही कधी आटलं नाही. शाळेचे दिवस मजेत चालले होते. घरी वडिलांचे प्रेम आईवर जरा जास्तच होतं. याची कारणं दोन. एक म्हणजे आईचा गोड गळा आणि दुसरं म्हणजे आईच्या हातचा चविष्ट स्वयंपाक, विशेषत: कर्नाटकी पद्धतीची खमंग आमटी. एखाद्या वेळी ही आमटी अन्य कुणी केली असेल तर ते अण्णांच्या, आईच्या वडिलांच्या लगेच लक्षात येई. आईच्या बहिणींपैकी, कधी सोनी तर कधी अक्का वगैरेंपैकी कुणी तरी आमटी केलेली असे. अण्णा जेवता-जेवता सांगत, ''सोनीला सांगा की आमटी चांगली झालीय पण पुन्हा कधी करू नका म्हणावं.''

पण हे सुखाचे दिवस एकदम सरले. आई हायस्कूलमध्ये असतानाच अण्णांचं निधन झालं आणि त्यांचं निधन सर्वांना निर्धन करून गेलं! आईचा थोरला भाऊ माधव हा त्या काळचा पदवीधर होता. हुशार होता, पण व्यापाराला कच्चा ठरला. वडिलांच्या आकस्मिक मृत्यूनं तो कदाचित भांबावला असेल. त्या काळी चालणारे व्यापारी सट्टे एका रात्रीत रावाला रंक आणि रंकाला राव बनवून टाकत. आईच्या आणि सर्व भावंडांच्या दुर्दैवानं माधवला सट्ट्यात ठोकर बसली. त्याला तो आघात सहन न झाल्यानं त्यानं आत्महत्या केली आणि अशा वेळी नेहमी जे होतं तेच झालं. देणेकऱ्यांचे तगादे सुरू झाले. कोर्ट-कचेऱ्या झाल्या. जप्तीवॉरंट आलं. अशा कठीण प्रसंगी सांगलीच्या राणीसाहेबांनी (श्रीमंत सरस्वतीदेवी पटवर्धन) मदत केली. सगळ्यात थोरल्या बहिणीचं लग्न होऊन ती सासरी होती. त्यापाठची सोनी म्हणजे गंगुताई ब्रह्मनाळकर ही बालविधवा होती. राणीसाहेबांच्या कृपेमुळे शाळेत नोकरीला होती. पगार केवळ वीस

रुपये. घरात विधवा आई, विधवा भावजय, इंदू, वसंत आणि सुशीला... अशी धाकटी भावंडं. अशा निराधारांचा संसार आमच्या मावशीने (गंगूताई ब्रह्मनाळकर) मोठ्या नेकीनं आणि जबाबदारीनं सांभाळला. तिची दमछाक बघून आईने आपलं शिक्षण गुंडाळलं. राणीसाहेबांची आमच्या मावशीवर मर्जी होती. त्यामुळे आईला प्राथमिक शाळेत शिक्षिकेची नोकरी मिळाली. रूपवान, धनवान मैत्रिणींना सोडून आई निमूटपणे आपल्या प्राक्तनाला सामोरी गेली. अचानक बदललेल्या परिस्थितीमुळे आईमध्ये मोठ्या प्रमाणावर न्यूनगंड निर्माण झाला होता. शिक्षण अपुरं, रूपसंपदा यथातथा. हुंड्यानं शिक्षण आणि रूपाची भरपाई करावी तर ती आर्थिक बाजू अधिकच लंगडी. थोरल्या ताईप्रमाणे (ताई बालविधवा होती. त्याकाळी पुनर्विवाह होणं अवघड होतं.) कुटुंबाचा गाडा ओढण्यातच आपला जन्म जाणार अशा नैराश्यावस्थेत असतानाच, आमच्या दादांच्या रूपानं तिच्या जीवनात प्रथमच आशेची पहाट फुलली!

दादा म्हणजे रामकृष्ण वासुदेव टिळक. कोकणस्थ ब्राह्मण, गोरा वर्ण, बुद्धिमत्ता अफाट, पण पित्याचं छत्र हरपलेलं. मूळच्या सुस्थितीतून त्यांच्या वडिलांच्या अकाली निधनानंतर त्यांची आई मुंबई सोडून आपल्या छोट्या रामकृष्णाला घेऊन त्यावेळी कोल्हापूरला असलेल्या टिळकांच्या चुलत घराण्यात आश्रयाला आली, पण मानी स्वभावाच्या रामकृष्णाला तिथं आश्रिताचं जिणं जगणं परवडेना. दादांनी मॅट्रिक होताक्षणी कोल्हापुरातून गाशा गुंडाळला. ते आपल्या आईला घेऊन, कुणी ओळखत नाही अशा ठिकाणी जायचं म्हणून सांगलीला आले. सांगली संस्थानात मिळालेली नोकरी पत्करून आईबरोबर मीठभाकरच पण ती हक्काची, स्वकमाईची खाऊ लागले, पण ते सुखही त्यांच्या नशिबी नव्हतं. अनेक वर्षं आबाळ झालेली, प्रकृतीची हेळसांड झालेली अशी त्यांची आई थोड्या आजारानंतर मृत्युमुखी पडली. असे दादा आणि तिकडे जवळपास तशाच अवस्थेत असलेली आई. दोघांनाही ओळखणाऱ्या तात्या कुलकर्णी मास्तरांनी मध्यस्थी केली. आईकडची भावंडं आणि दादांच्या बरोबर दोन शिक्षक, अशा मोजक्या आठ-दहा जणांनी नरसोबाच्या वाडीला जाऊन आई-दादांचं लग्न लावलं. तो

दिवस- १७ जानेवारी १९३६ हा. तेवढ्यातही देशस्थ-कोकणस्थ विवाह म्हणून अनेकांनी नाकं मुरडली. पुराच्या लोंढ्यात सापडलेल्या संकटग्रस्तांनी कुठल्यातरी खडकाच्या आधारे एकमेकांना धरून राहावं तसं आई आणि दादा यांचं झालं होतं. तथापि, दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकलेल्या दोघा समानधर्मीयांचं लग्न मात्र उभयपक्षी फलदायी झालं.

सांगली संस्थानचा काही भूभाग त्या काळी कर्नाटकातील बेळगावजवळील शहापूर भागात होता. लग्नानंतर आई-दादांना त्या भागात नोकरीसाठी जावं लागलं. शहापूरला असताना मला एक थोरली बहीण झाली होती. गोरीपान आणि फुलासारखी छान. खूप चुणचुणीत आणि हुशार होती. मला हे सगळं आई, दादा आणि मामा-मावशींकडून नंतर कळलं. कारण ती अवघी चार वर्षांची असताना गेली! तिला शहापूरची हवा मानवली नाही. आईलाही हवेचा त्रास होत असे, म्हणून बदलीचे प्रयत्न चालू होतेच. त्याप्रमाणे तिची सांगलीला बदली झाली.

आई-दादा १९४१-४२ मध्ये शहापूर-बेळगावमधून सांगलीत आले. वास्तविक, दोघांनी मिळून वेगळे बिऱ्हाड मांडून राहणं हे स्वाभाविक होतं. पण आईच्या माहेरी म्हणजे हेबाळकर कुटुंबाला मनुष्यबळाची आणि थोडीफार अर्थबळाचीही आवश्यकता होती. आमचे दादा एकटेच; सख्खी भावंडं वगैरे कोणीच नाही, म्हणून आईच्या प्रस्तावास होकार देऊन दादांनी हेबाळकर कुटुंबाला वाहून घेतलं. टिळक, हेबाळकर, ब्रह्मनाळकर एकत्र राहू लागले. प्रत्येक कुटुंबात थोड्याफार कुरबुरी असतात. तशा त्या टिळक-हेबाळकर-ब्रह्मनाळकरांमध्येही असतीलच, पण तरीसुद्धा ही विभिन्न कुटुंबीयाची मोट अखेरपर्यंत टिकली. नव्हे, एकमेकांना घट्ट धरून राहिली ही गोष्ट विलक्षणच म्हटली पाहिजे. याचं मोठं श्रेय आमच्या आईला द्यायला हवं. मात्र या गोष्टीची थोडीफार किंमत आमच्या दादांनाही मोजावी लागली. ''तू आता टिळक राहिलासच कुठे? तू तर आता पूर्ण हेबाळकर झालास?'' अशी कुत्सित बोलणी त्यांना इतरांकडून ऐकून घ्यावी लागत. मला आठवतंय, माझ्या बालपणी प्राथमिक शाळेच्या कालावधीत, 'तू अर्धवट आहेस' (म्हणजे अर्धा

देशस्थ आणि अर्धा कोकणस्थ) असं मला ऐकावं लागत असे. पन्नास-साठ वर्षांपूर्वीच्या काळात जाती-जातींमधील (म्हणजे खुद्द ब्राह्मणांच्या पोटजातीतच) कंगोरे एवढे धारदार होते, की अशी कुत्सित टवाळकी क्षम्यच मानायला हवी.

दादांशी विवाह झाल्यानंतर मात्र एक झालं, आईच्या ठायी असलेला न्यूनगंड जवळपास नाहीसा झाला. ती दादांच्या प्रोत्साहनानं आणि शिकवण्यानं मॅट्रिक झाली. तिने त्या काळी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या मुलकी परीक्षेत सुयश संपादन केलं. तिने कोल्हापूर केंद्रात पहिला क्रमांक पटकावला. सुरुवातीला, ती सांगलीच्या राणीसाहेबांच्या दयेपोटी शिक्षिका बनली होती. संस्थान विलीन झाल्यावर तिला ट्रेंड शिक्षिका होणं आवश्यक होतं. त्यानुसार वखारभागातील कस्तुरबा ट्रेनिंग कॉलेजमधून तिने दोन वर्षांचा ट्रेनिंग कोर्स पूर्ण केला. ती सिनिअर ट्रेनिंगची परीक्षा प्रथमवर्गात पास झाली. पुण्यात जाऊन सुप्रसिद्ध नाट्य-दिग्दर्शक के. नारायण काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तिने नाट्यकलेचं प्रशिक्षण घेतलं. औदुंबरच्या शिबिरात दोन महिने राहून तिने शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण केला.

या सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे संगीतशिक्षण. मुळात तिला आवाजाची देणगी होतीच. माझ्या वडिलांना संगीतातील ओ का ठो कळत नसे, पण आपल्या बायकोमधील संगीताला पद्धतशीरपणे विकसित केलं पाहिजे याची पहिली क्रियाशील जाणीव त्यांना झाली. थोडी सुस्थिती प्राप्त झाल्यावर, त्यांनी आईसाठी सांगली संस्थानचे राजगवई दिनकरबुवा गोडबोले (रंगभूमीवरील गायक-नट उदयराज गोडबोले यांचे वडील) यांची आणि नंतर चिंतुबुवा म्हैसकर यांची शिकवणी ठेवली होती. गांधर्व महाविद्यालयाच्या पन्नास रागांच्या परीक्षेच्या वेळी पंडित विनायकबुवा पटवर्धन आले होते. आईचा आवाज आणि तयारी बघून ते फारच खूश झाले होते. त्यांनी आईला पुण्यात येऊन शिकण्याचा आग्रह केला. नेमकी अशीच सूचना मा. कृष्णराव फुलंब्रीकर, 'वंदे मातरम्'ची नवीन चाल शाळाशाळांतून शिकवण्यासाठी आले होते तेव्हा त्यांनी तिला केली होती. अर्थात ही गोष्ट शक्य नव्हती. कारण बऱ्याच कालावधीनंतर आईने पुन्हा

गाणं शिकावयास सुरुवात केली तेव्हाच ती चाळिशीच्या उंबरठ्यावर होती. आईची तयारी मात्र खूपच चांगली आणि झपाट्यानं झाली. ती स्वतंत्रपणे ख्याल मांडू शकत होती. त्यावेळी सांगली नभोवाणी केंद्र सुरू व्हायचं होतं. पुणे नभोवाणी केंद्रावरील ऑडिशन टेस्टमध्ये आई पास झाली होती. सांगली जिमखाना, सांगली नगरवाचनालय आणि अन्यत्र तिने गाण्याच्या काही मैफली केल्या होत्या, पण मग आईला कानाच्या दुखण्याने खूप सतावलं. त्यामुळे आईच्या संगीत शिक्षणात वारंवार खंड पडू लागला आणि अखेरीस, ते बंदच करावं लागलं; अर्थातच डॉक्टरांच्या सल्ल्यावरून. त्याच काळात आईच्या उपजत काव्यशक्तीचीही मार्गक्रमणा मूकपणे चालू होती. आम्हां कोणाला त्याचा पत्ता नव्हता.

आईने या बाकी अभ्यासाचा शालेय जीवनातील नोकरीसाठी पूर्णपणे उपयोग करून घेतला. संस्थानी काळात अनेक ठिकाणी नोकऱ्या करत तिची बदली राजवाडा चौकातील मुलींची शाळा नंबर एकमध्ये झाली. तिथं तिला आश्चर्याचा एक सुखद धक्का बसला. तिची बालमैत्रीण आणि आता त्या शाळेची मुख्याध्यापिका असलेली राजमती पाटील शाळेच्या प्रवेशद्वारात तिच्या स्वागताला उभी होती. दोघी खूप सुखावल्या. आईच्या कर्तृत्वाला खरे धुमारे फुटले ते या राजमतीमुळे. हजार-हजार मुलींची कवायत आई अगदी आरामात घेत असे. शाळेच्या वार्षिक निवडणुका घेताना, तिने त्या निवडणुका विधानसभेच्या निवडणुकांची रंगीत तालीमच वाटावी अशा थाटात घेतल्या. त्या काळात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निवडणुका फार रुजलेल्या नव्हत्या. त्यामुळे लोकशिक्षणाचा हा अभिनव उपक्रम पाहून वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण थक्क झाले होते. त्या दोघांसह असलेला आईचा फोटो दादांनी कौतुकाने आमच्या घरात लावलेला होता. मात्र सांगलीच्या शैक्षणिक जगतात आईचे नाव सर्वतोमुखी झाले ते तिने अविश्रांत परिश्रमाने बसवलेल्या राष्ट्रगीताच्या कार्यक्रमामुळे. एक हजार विद्यार्थिनींनी गायलेलं राष्ट्रगीत तिने एका तालात, एका सुरात सादर केलं तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. तत्कालीन गृहमंत्री कै. बाळासाहेब देसाई यांनी आईच्या उपक्रमावर मुक्त कंठाने स्तुतिसुमनं उधळली होती.

आमच्या आईमध्ये उपजत काव्यगुण होतेच. दादांमुळे तिची साहित्यदृष्टी

विकसित झाली. ती चांगल्या कविता करते याचा थांगपत्ताच आम्हाला नव्हता, पण राजमतीला होता. 'गुणी गुणं वेत्ति' हेच खरं. इतस्तत: विखुरलेल्या आईच्या कविता एकत्र करून त्यांचा 'गीतरेखा' नावाचा एक काव्यसंग्रह राजमतीबाईंनी स्वत: प्रकाशित केला. प्रकाशनसोहळा समारंभपूर्वक थाटामाटात साजरा झाला. त्या दोघींच्या फावल्या वेळातील गप्पांचा विषयही शाळेचाच असे. मग शाळेच्या वेळात त्या दोघी काय-काय करत असतील याची कल्पना करता येईल. शाळेचा निकाल प्रतिवर्षी अधिकाधिक चांगला लागावा यासाठी दोघींची सतत धडपड असे. राजमतीला आई सोडायची नव्हती आणि आईला राजमती सोडायची नव्हती. पण शिक्षणखात्याला ते कसं परवडणार? जेव्हा नोकरीतील शेवटच्या चार-पाच वर्षांसाठी सांगलीवाडीच्या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून आईची नेमणूक झाली तेव्हा दोघींच्या अश्रूंना खळ पडत नव्हता. इलाजच नव्हता. योगायोग कसा असतो बघा. राजवाडा चौकातील शाळेत आईची नोकरी होती तेव्हा आमचं राहतं घर दूर शिवाजीनगर भागात म्हणजे सध्याच्या दडगे हायस्कूलजवळ होतं. आई तेथून पायपीट करत शाळेला यायची. १९६४-६५ मध्ये, मोठ्या जिद्दीने राजवाडा वसाहतीत आई-दादांनी स्वत:चं छोटंसं घरकुल उभं केलं. आता आईला शाळा अगदी कोपऱ्यावरच म्हणून आम्ही आनंदलो; आणि नेमक्या त्याच वेळी आईची बदली लांब, आयर्विन पुलापलीकडील सांगलीवाडी भागात झाली. म्हणजे तिची पायपीट काही चुकली नाही!

सांगलीवाडीची शाळा शहरापासून थोडी बाजूला आणि खेडेगावी वातावरणातील असल्यानं, आईला एक प्रकारे ते आव्हानच होतं; आणि ते आव्हान म्हणूनच आईने स्वीकारलं हे आईचं वैशिष्ट्य. एरवी, आता शेवटची चार वर्षं काढायची आहेत तर कशाला जिवाचा आटापिटा करायचा असा 'सोयीचा' विचार केला असता तर ते तिला क्षम्य ठरले असते. पण तसं कधी झालंच नसतं. पहिल्या दिवसापासून आईने कंबर कसली. त्यासाठी तिने आधी  मुलींच्या आयांना हाताशी धरलं. शेतातून राबणाऱ्या त्या स्त्रिया. त्यांचं लक्ष मुलींच्या शिक्षणाकडे कसं जाणार? आईने गोड-गोड बोलून त्या बायाबापड्यांना आपलंसं केलं. बेंदूर

(पोळा), नागपंचमीसारखे त्यांना जवळचे असणारे सण शाळेत साजरे केले. झिम्मा-फुगडीचे खेळ शिकवले, ते शाळेत कार्यक्रमासाठी बसवले. नागपंचमीची गाणी शिकवली. वटपौर्णिमेला वडाभोवती फेर धरून त्या बायांबरोबर गाणी म्हटली. ही 'बामणीण' आपल्यात इतकी मिसळते हे बघून त्या बायांना ते एक आक्रितच वाटलं. त्यांनी आपल्या मुलींना शाळेत पाठवण्यास सुरुवात केलीच, पण त्या स्वत: आईने सुरू केलेल्या प्रौढ साक्षरता वर्गात येऊ लागल्या. फणी घेऊन मुलींचे केस कसे विंचरावेत, स्वच्छता कशी राखावी याची प्रात्यक्षिकं, आईने गटागटाने शाळेत सर्वांना दाखवली. त्यामुळे त्या बाया आपापल्या मुलींच्या मागे लागून त्यांना शाळेत पाठवू लागल्या.

ही एक अबोल क्रांतीच होती. कुणी दखल घ्यावी अशा अपेक्षेनं आई अशा गोष्टी कधीच करत नव्हती. तो तिचा सहजधर्म होता, पण सुगंध न सांगतासवरता आसमंतात पसरतोच. आईने मेहनत घेऊन शाळेच्या विद्यार्थिनींना अनेक विषयांची गोडी लावली. त्या विद्यार्थिनींनी वक्तृत्वस्पर्धेत, क्रीडास्पर्धेत, नाट्यस्पर्धेत पारितोषिकं मिळवली. शाळेला ढाली मिळवून दिल्या आणि नैमित्तिक, क्रमिक अभ्यासात पीएससी परीक्षेचा उत्कृष्ट निकाल लावून दाखवला याबद्दल सांगली नगरपालिकेने विशेष ठराव करून आईचं अभिनंदन केलं. पण त्यापेक्षाही खरी पोचपावती, सांगलीवाडीच्या गावकऱ्यांकडून मिळाली. ग्रामीण वातावरणातील शाळेला एवढ्या ऊर्जिताव्यस्थेला आणलं याबद्दल गावकऱ्यानी कृतज्ञताबुद्धीने १९७२ साली, आई त्या शाळेतून सेवानिवृत्त झाली तेव्हा मोठा भावपूर्ण निरोप समारंभ करून आईला मोठीच मानवंदना दिली. इतकेच नव्हे तर सांगलीवाडीच्या शाळेचा शताब्दी महोत्सव झाला तेव्हा आई सेवानिवृत्त झाली होती तरी मुद्दाम पाचारण करून त्या महोत्सवात तिला गौरवपूर्वक पद्धतीनं समाविष्ट करून घेतलं.

त्यानंतर आईच्या आयुष्यातील अखेरचं पर्व सुरू आणि ते अत्यंत क्लेशकारक ठरलं. ती १९७२ साली सेवानिवृत्त झाली. त्याच वर्षी मी डोंबिवलीत ओनरशिप ब्लॉक खरेदी केला. आम्ही सर्व कुटुंबीय (त्यात अर्थात गंगूताई ब्रह्मनाळकर, वसंतराव हेबाळकर आलेच. आमची पुण्याची

मावशी-सुशीला अडके पण मुद्दाम आली होती.) दिवाळीनिमित्त माझ्या घरी एकत्र जमलो. आईच्या हातची खुसखुशीत चकली मनसोक्त खाल्ली. चिरोटे हा पदार्थ घरी सर्रास केला जात नाही. आमची आई अतिशय सुरेख चिरोटे करत असे. अगदी मस्का खारी बिस्किट वाटावं असा अनेक पदरी खुसखुशीत चिरोटा करावा तो आमच्या आईनंच. असे चिरोटे आणि कुरकुरीत अनारसे भरपूर खाऊन एकत्रित साजरी झालेली ती आम्हां कुटुंबीयांची शेवटची दिवाळी ठरली.

एप्रिल-मे १९७३ पासून आईला घशाचा त्रास सुरू झाला. घास गिळणं त्रासदायक होऊ लागलं. जूनमध्ये कॅन्सरचं निदान झालं. टाटा हॉस्पिटलच्या फेऱ्या झाल्या. डॉक्टरानी स्पष्ट सांगितलं की ऑपरेशन कठीण आहे. पेशंटला झेपणार नाही. काही इंजेक्शनं दिली. अगदीच उपासमार होऊ लागली. तोंडावाटे काहीच जाईनासं झालं, तेव्हा आईच्या पोटाला ऑपरेशन करून छोटंसं छिद्र पाडलं. त्यातून शहाळ्याचं पाणी, दूध असा अन्नपुरवठा सुरू झाला, पण असं किती काळ चालणार? या दुखण्यानंच १७ सप्टेंबर १९७४ रोजी तिचा अंत झाला.

मला आठवतंय तशी आईची प्रकृती सुदृढ अशी कधी नव्हतीच. माझ्या धाकट्या भावाच्या, रवीच्या जन्मानंतर तर तिच्या पायातील ताकद जवळपास गेली होती. नोकरीवर हक्क राहवा म्हणून ठरावीक मुदतीने तिला टांग्यातून (तोवर सांगलीत रिक्षांचा जन्मही झाला नव्हता.) नोकरीच्या ठिकाणी सही करण्यापुरतं न्यावं लागे. अक्षरश: उचलूनच. हेच दुखणं तिला बराच काळ छळत होतं. नंतर किरकोळ आजार असले तरी तशी ती चांगली 'ॲक्टिव्ह' होती. तिला १९५७-५८ पासून किंवा त्याच्या थोड्या मागेपुढे कानाचा खूप त्रास झाला. प्रसिद्ध समाजसेवी धन्वंतरी डॉ. एस.बी. कुलकर्णी यांनी सांगलीच्या हरभट रोडवर सुरुवातीला ईएनटी स्पेशॅलिस्ट म्हणून दवाखाना थाटला तेव्हा आईच्या कानाच्या दुखण्याचं निदान झालं, पण तसं दुखणं पूर्णपणे कधी बरं झालं नाही. ते डॉक्टरी उपचारांमुळे आटोक्यात राहिलं इतकंच. कान खूप प्रमाणात दुखे. चेहरा सुजून जाई. वेळी-अवेळी ठणक्यांचा त्रास होई. डॉक्टरांनी खूप प्रयत्न केले. अनेक तज्ज्ञांचा सल्ला घेतला पण काही फरक पडला

नाही. या प्रकारात तिचं लाडकं गाणं मात्र कायमचं बंद पडलं. ऐन तारुण्यात मानसिक तणाव, आर्थिक ओढाताणी, नोकरीची दगदग यामुळे शंभर टक्के तंदुरुस्ती तिला कधी लाभली नाही. तिच्या कॅन्सरच्या दुखण्याच्या आधी काही दिवस राजमतीबाईंच्या यजमानांना, नेमगौडदादांना कॅन्सर झाला. नेमगौडदादा राजमतींचे पती, पण मुळात नात्यानं मामा होते. लहानपणी आई वखारभागातच राहत असल्यानं ती, राजमती आणि नेमगौडदादा एकत्र खेळत. मेळ्यात कामं करत. बँडपथकात एकत्र असत. त्यामुळे त्या तिघांमध्ये अत्यंत स्नेहमय बंधुभावाचं नातं होतं. नेमगौडदादांना कॅन्सर झाला तेव्हा आईसुद्धा मुळापासून हादरून गेली. राजमतीला वेळोवेळी जाऊन धीर देणं, त्या उभयतांचं दु:ख कमी व्हावं म्हणून हसत-खेळत बोलणं अशा गोष्ट आई करत असे. यामुळे स्वत:ला कॅन्सर झाला तेव्हा आपण कोणत्या 'स्टेज'ला आहोत याची तिला अचूक जाण होती. केवळ दादांकडे पाहून ती औषधोपचार करून घेत होती; त्यातला फोलपणा माहीत असूनही. आपल्या दुखण्यानं इतरांच्या आनंदाला मर्यादा घालायच्या नाहीत असा दंडकच तिने स्वत:साठी घालून घेतला असावा. घशातून असंख्य काटे एकाच वेळी टोचावेत अशा वेदना होत, पण मनाच्या विलक्षण निग्रहानं ती सर्व सहन करे. आजच्यासारखी परिणामकारक औषधं, पेनकिलर्स नसताना तिने असामान्य विलक्षण धैर्यानं कॅन्सरचा सामना केला.

❐

# दादा

दादांविषयी लिहिताना माझ्या मनात करुणा दाटून येते आणि बऱ्याच वेळा अपराधी असल्यासारखे वाटते. दादांच्या बालपणाविषयी आम्हाला काही म्हणजे काही माहीत नाही. आई इथली सांगलीतीलच होती. तिची भावंडं होती. तशी दादांची कुणीच माणसं आम्ही बघितली नाही. त्यांचे वडील दादांच्या लहानपणीच वारले. त्यांचं मुंबईतील गिरगाव भागात कुठेतरी दुकान होतं. त्यांना दुकानात खूप नुकसान सोसावं लागलं. त्यापायीच, त्यांचा अकाली मृत्यू झाला असावा. दादांची आई त्यानंतर आपल्या एकुलत्या एक मुलाला घेऊन कोल्हापूरच्या शुक्रवार पेठेतील मोठ्या दगडीवाड्यात आली. (तो दगडीवाडा माझ्या लहानपणी मी एकदाच बघितला होता.) तिथे टिळकांचं एकत्र कुटुंब होतं. दादांचे एक चुलते कोल्हापूर संस्थानात न्यायाधिकारी होते. त्यांना न्यायला, आणायला संस्थानची बग्गी येत असे. त्यांना रावबहादूर किताब होता. दादांच्या आईला माहेरचाही भक्कम आधार नसावा. टिळकांच्या एकत्र कुटुंबात आश्रिताचं जिणं तिला नक्कीच मानवत नसणार, पण निरुपाय होता. दादा शालेय जीवनात कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांना इंग्रजी विषयाची आवड होती. दादांना मॅट्रिकच्या परीक्षेत त्या विषयातील 'दादासाहेब पावगी' पारितोषिक मिळालं होतं; मात्र प्रतिष्ठेचं असलेलं 'चॅटफिल्ड प्राईज' केवळ एका मार्कानं हुकलं होतं. त्याबद्दलची हळहळ त्यांच्या तोंडून बऱ्याचदा व्यक्त होई. बस, इतकंच. त्यापलीकडे आपल्या

बालपणीच्या जीवनाचा कोणताही उल्लेख सहसा त्यांच्या तोंडून कधी ऐकायला मिळाला नाही. आम्ही पण असे करंटे, की आम्हीही त्यांना त्याबद्दल कधी काही विचारलं नाही. आम्ही आमच्यातच इतके मश्गुल होतो की त्यांच्या मोठेपणाची पहिली प्रकर्षाने जाणीव आम्हाला त्यांच्या मृत्यूनंतरच झाली; 'मुंबई दूरदर्शन'ने संध्याकाळच्या 'मराठी बातम्या'त त्यांच्या दु:खद मृत्यूची बातमी सांगितल्यावर!

दादा मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर, कोल्हापूरच्या एकत्र कुटुंबातून आपल्या आईला घेऊन बाहेर पडले ते सांगलीत आले. सांगली संस्थानात, त्यांना प्रथम प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळाली. आपल्या आजारी आईची सेवा करत ते दिवस काढू लागले, पण आई फार काळ जगली नसावी. दादा त्यांच्या लग्नाच्या वेळी एकटे होते. त्यांनी स्वत:ला आपली शाळा आणि आपले वाचन यांमध्येच कोंडून ठेवलं होतं. गरिबीमुळे, त्यांची आई आणि दादा अशा दोघांमध्येही एक प्रकारची न्यूनत्वाची भावना आलेली असावी. त्यापोटीच त्यांनी पुण्या-मुंबईकडे असलेले सुस्थितीतील नातेवाईक वा अन्य परिचित यांच्याकडे कधी चुकून बघितलं नाही. संपर्क साधला तर 'आला मदत मागायला' असा चुकीचा ग्रह कुणी करून घेतला तर काय घ्या? असाही विचार दादांच्या मनात येत असावा. त्यातून आईसारख्या देशस्थाच्या मुलीशी लग्न झाल्यानंतर दादा आपल्या नातेवाईकांपासून आणखी बाजूला पडले असतील किंवा दादांनी मुद्दाम स्वत:ला बाजूला ठेवलेलं असावं. याच कारणामुळे उन्हाळ्याच्या सुटीत कुणा नातेवाईकांकडे जाण्यापेक्षा दादा आम्हाला माथेरान-महाबळेश्वरला परवडेल अशा हॉटेलात किंवा हॉलिडे कॅम्पमध्ये घेऊन जात असत. आम्हाला मात्र सांगत, ''आई वर्षभर काम करून दमते. कोणाच्या घरी जाऊन राहिलं तर आईला रीतीनुसार तिथं थोडंफार काम करावं लागेल. म्हणून आपण हॉटेलात राहायचं.'' त्या सांगण्यामध्ये तथ्य निश्चितच होतं.

नोकरीनिमित्त, मी मुंबईला स्थायिक झाल्यानंतर मात्र दादांच्या नातेवाईकांशी आमचे संबंध नव्यानं जुळून आले आणि उभयपक्षी जिव्हाळ्याचे झाले.

दादांनी संस्थानी काळात कौलापूर, कवठेमहांकाळ आदी ठिकाणी नोकरी केली. त्यांची हुशारी पाहून सांगली संस्थानचे तत्कालीन मंत्री श्री. महिषी यांनी दादांना एसटीसी (सेकंडरी टीचर्स सर्टिफिकेट) होण्याचा सल्ला दिला. त्यानंतर दादांची बदली हायस्कूलकडे झाली. बेळगाव-शहापूर भागांत काही वर्षं काढल्यावर, त्यांनी मराठीचे अध्यापक म्हणून सांगलीच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये काही काळ काम केलं. त्यानंतर त्यांची सांगली हायस्कूलमध्ये बदली झाली. तिथे, त्यांनी १९६८ मध्ये निवृत्त होईपर्यंत काम केलं. ते सर्व भाषाविषयच काय पण अंकगणितही शिकवत. काही काळ, सांगली हायस्कूलमध्ये अर्धमागधी विषय (हा संस्कृतला पर्यायी विषय होता) शिकवण्यासाठी कोणी शिक्षक उपलब्ध नव्हते. तत्कालीन हेडमास्तर अमलाडी यांची दादांवर विशेष मर्जी होती. त्यांच्या शब्दासाठी दादांनी अर्धमागधीचा अभ्यास केला आणि संस्कृत न घेणाऱ्या मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना ते अर्धमागधी शिकवू लागले! सगळे विषय शिकवून झाले तरी दादांची पहिली आवड इंग्रजी हीच होती. इंग्रजी वाङ्मयाचं त्यांचं वाचन होतंच, पण गंमत म्हणजे इंग्रजी ग्रामर हा त्यांच्या आवडीचा विषय होता! एखादी आवडती कादंबरी वाचावी इतक्या अधीरतेनं त्यांचं ग्रामरचं वाचन चाले.

त्यांच्या मृत्यूनंतर एका शिक्षक बांधवानं आठवण सांगितली, की त्यांनी एकदा इंग्रजी ग्रामरमधील काही शंका दादांना विचारली. दादांनी ताबडतोब त्यांच्या शंकेचं निरसन केलं. इतक्या सहजपणे केलं की थोडा वेळ त्या शिक्षकाचा विश्वास बसेना. मग दादांनी नेसफिल्डच्या ग्रामरच्या पुस्तकात अमुक पानावर अमुक परिच्छेद वाचा म्हणजे तुमच्या शंकेचं निवारण होईल असं त्या शिक्षकास सांगितलं आणि अगदी तसंच होतं! त्यांच्या संग्रही पंचवीस-तीस तरी उत्तम अशी ग्रामरची पुस्तकं होती. पुणे विद्यापीठाची बहि:शाल योजना सुरू झाली. कॉलेजला न जावं लागता बाहेरून पदवी परीक्षेला बसण्याची अनुमती मिळाल्यावर वयाची पन्नाशी आली असताना दादांनी बाहेरून बी.ए. केलं व नंतर एम.ए. केलं.

दादांना सामाजिक कामांची आवड होती. सहकार हा त्यांच्या खास आवडीचा विषय. त्यावर त्यांनी बरंच स्फुट लेखनही केलं. सांगलीच्या

'शिक्षक सहकारी पतपेढी'च्या आद्य संस्थापकांपैकी ते एक प्रमुख सदस्य होते. अनेक वर्षं ते त्या संस्थेचे कार्याध्यक्ष होते. ते 'सांगली शहर माध्यमिक शिक्षक संघटने'चेही अध्यक्ष होते. संस्थानकालीन सांगली जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे ते एक संचालक होते. ते 'सांगली (जिल्हा) नगरवाचनालया'च्या कार्यकारिणीवर चुरशीची निवडणूक लढवून निवडून आले होते. ते त्या संस्थेचे कार्यवाह आणि नंतर अध्यक्ष होते. ग्रंथालय परिषदेचे सांगलीत यशस्वी आयोजन करण्यात त्यांचा मोठा सहभाग होता. 'सांगली नगरवाचनालय' ही संस्था आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावी यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. या संस्थांवर त्यांचं प्रेम होतं. संस्थेच्या सेवकांना मिळणारं वेतन पुरेसं नाही याची त्यांना नेहमी खंत वाटे, पण त्यासाठी वैयक्तिकपणे आपण काही करू शकत नाही याची त्यांना जाणीव होती. आपल्या मनाची बोच त्यांनी आपल्या मृत्युपत्रामध्ये व्यक्त केली आणि आपल्या भावनेचं प्रतीक म्हणून एक अल्पशी देणगी नगरवाचनालयाच्या सेवकांसाठी मृत्युपत्रात ठेवली होती. अखेरच्या काळात, त्यांचा एक आजीव सभासद आणि अहर्निश वाचक या नात्यानंच संस्थेशी संबंध असला तरी संस्थेच्या कोणत्याही कामासाठी ते मदतीचा हात सदैव पुढे करत असत. संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभाच्या वेळी आपले सहकारी मित्र मा.स. मराठे आणि के.बा. दीक्षित यांच्या सहकार्यानं संस्थेचा इतिहास लिहिताना त्यांनी खूप परिश्रम घेतले होते. संस्थेवरील प्रेम दर्शवणारी त्यांची एक हृद्य आठवण आहे. संस्थेला एके प्रसंगी काही आर्थिक अडचण होती. वसंतदादा पाटील हे त्यावेळी मुख्यमंत्री होते. ते आमच्या दादांचे प्राथमिक शाळेतील विद्यार्थी होते आणि मुख्य म्हणजे त्यांना आमच्या दादांविषयी आदर होता. नगरवाचनालयाच्या संचालक मंडळींनी दादांना गळ घातली, की त्यांनी वसंतदादांकडे शब्द टाकावा. हे जरा कठीण होतं. कारण दादा आपल्या कोणत्याही कामासाठी कधीही त्यांच्याकडे जात नसत, पण संस्थेच्या कामासाठी जाणं आवश्यक आहे हे जाणवल्यावर दादांनी होकार दिला. ही घटना आहे १९८४च्या एप्रिलमधली. दादांचं १९८५ मध्ये निधन झालं. पण दादा नगरवाचनालयाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर वसंतदादांना

भेटण्यास महाबळेश्वरला गेले. (त्यांना सांगलीत वा मुंबईत भेटणं किती अवघड असे हे जाणकारांना माहीत आहेच.) त्यांनी वसंतदादांना संस्थेची सर्व परिस्थिती सांगितली. त्यांनी ताबडतोब कारवाई केली हे सांगायला नकोच; पण दादांची अस्थिपंजर अवस्था पाहून ते हेलावून गेले. ते कळवळून दादांना म्हणाले, ''गुरुजी, कशाला एवढी दगदग केलीत? नुसती चिठ्ठी पाठवली असतीत तरी चाललं असतं.''

दादा १९६८ मध्ये निवृत्त झाले. सांगलीच्या 'दक्षिण महाराष्ट्र' साप्ताहिकाचे संपादक गं.गो. बिनिवाले हे दादांचे जुने स्नेही. त्यांच्या स्नेहाखातर दादा साप्ताहिकात नियमितपणे लिहू लागले. काही वर्षे, त्यांनी मुख्य संपादक म्हणून काम केले; एरवी, सहसंपादक म्हणूनही तेच अग्रलेख लिहीत. या कामानं त्यांना खूप आनंद दिला. त्यांची भाषा डौलदार पण जुन्या वळणाची होती. त्यांचे अग्रलेख गाजले. मोठमोठ्या पुढाऱ्यांना, सामाजिक-शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांना त्या अग्रलेखांची दखल घ्यावीशी वाटे. अनेक प्रतिष्ठितांच्या पत्रांवरून ही गोष्ट स्पष्ट होते. महाराष्ट्रातील एका प्रतिष्ठित कविवर्यांनी हिंदू देवतांचा अवमान करणारी एक कुप्रसिद्ध कविता लिहिली. त्याबद्दल दादांनी खरमरीत टीका केली होती. सांगलीच्या गणेशभक्तांनी दादांना जोरदार पाठिंबा दिला. निषेधाच्या पत्रांचा पाऊस पडला आणि अखेर त्या कविश्रेष्ठांना दिलगिरी व्यक्त करावी लागली. सांगलीच्या गणपतिमंदिर परिसरातील केंगणेश्वरी परिसरात सिनेमा थिएटर उभारण्याची योजना संबंधितांनी आखली तेव्हा या गोष्टीला दादांनी 'दक्षिण महाराष्ट्र'मधून कडाडून विरोध केला, वाचकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागृती केली आणि अखेरीस ती योजना बासनात बांधली गेली. त्यांचे साहित्य आणि साहित्यिकांविषयीचे अग्रलेख विशेष बोलके असत. दादा लेख लिहिण्यापूर्वी खूप कष्ट घेत. संदर्भ गोळा करत. त्यांना त्यासाठी घराजवळ असलेल्या 'सांगली नगरवाचनालया'चा फायदा होई. दादा काही कारणाने पुणे-मुंबई, डोंबिवली वगैरे ठिकाणी गेलेले असले तरी 'दक्षिण महाराष्ट्रा'साठी वेळेवर लेख पाठवण्यात तत्पर असत. त्यांनी त्या कामात कधीही खंड पडू दिला नाही. आमचे एक नातेवाईक आणि पुण्याच्या 'केसरी'चे सहसंपादक मा.वि. साने (ते अखिल भारतीय

श्रमिक पत्रकार संघटनेचे अध्यक्षही होते) एकदा मला गहिवरून म्हणाले, ''तुझ्या रामकृष्णाकडे फार मोठी पोटेन्शिअल होती. पुण्या-मुंबईकडे असता तर त्याला अधिक मानमरातब लाभला असता.'' दादांच्या मृत्यूनंतर वृत्तपत्रांतून आलेल्या लेखांत अशा प्रकारचीच भावना व्यक्त झाली होती.

माझ्या आईच्या १९७४ मध्ये झालेल्या मृत्यूनंतर दादांचा जीवनरस जणू काही आटून गेला होता. त्यांनी बरेच सामाजिक व्याप कमी केले. ते आपल्याच भावविश्वात वावरत होते. माझी भावजय कै. चारूने त्यांची फार चांगली सेवा केली. माझी पत्नी सुमन आणि चारू, या दोघींनी सख्ख्या मुली काय करतील अशी त्यांची सेवा केली. माझ्या धाकट्या भावाची, रवीची नागपूरजवळील ब्रह्मपुरी येथे १९८३ मध्ये बदली झाली. सांगलीच्या घरात माझी थोरली मावशी होती. तिने वयाची सत्तरी पार केली होती. मामा म्हणजे नाना. (वसंतराव हेबाळकर, ज्यांनी सांगलीतील मुलींचे दडगे हायस्कूल नावारूपाला आणले) त्यांनी पण वयाची साठी पार केली होती. त्यामुळे दादा शेवटची दोन वर्षं माझ्याकडे डोंबिवलीला येऊन राहिले होते. आम्हां सर्वांचे बहुतेक सर्व सणवार एकत्र होत. उन्हाळ्याच्या सुटीला वा दिवाळीच्या सुटीतही आम्ही एकत्र जमत असू. दादा डोंबिवलीत येत तेव्हा आठ-पंधरा दिवस किंवा फार फार तर एखादा महिना राहात. कायम वस्तीसाठी असे रवीचे सांगलीचे बिऱ्हाड ब्रह्मपुरीला गेल्यावरच आले. त्यांचं मन डोंबिवलीला रमत नसे. आमचं मुंबईचं जीवन धकाधकीचं. घड्याळाच्या काट्यावर चालणारं. दादांशी रविवारशिवाय इतर दिवशी गप्पागोष्टी होत नसत, पण दादांची तक्रार नव्हती. त्यांना मात्र सांगलीसारखं मनमोकळं जीवन जगता येत नाही याचं आम्हालाच वाईट वाटे. सांगलीचं नगरवाचनालय नाही, करमरकर सराफांकडील किंवा प्रतापसिंह उद्यानातील मित्रांबरोबरचा गप्पांचा अड्डा नाही, परिचित माणसांची नेहमीची वर्दळ नाही, त्यामुळे त्यांची होत असलेली कुंचबणा आम्हाला व्यथित करत असे. त्यांची दृष्टी अधू बनल्यानं मनासारखं त्यांचं वाचनही होत नसे.

दादांना १९८३ पासून प्रोस्टेट ग्लँडचा त्रास होता. खोकल्याची व्याधी

तर त्यांना शेवटची बरीच वर्षे त्रास देई. नंतर, छातीतील बरगड्यांमध्ये न्युमोनियाचा पॅच तयार झाला होता. त्यांना सांगलीला डॉ. पुरोहित आणि डोंबिवलीला डॉ. राव यांच्या हॉस्पिटलमध्ये एक-दोनदा अॅडमिट केलं होतं, पण ऑपरेशन करून या दुखण्यांवर इलाज करणं त्यांच्या एकूणच खंगलेल्या शरीरप्रकृतीच्या दृष्टीनं कठीण होतं आणि त्यापेक्षा खरं म्हणजे दादांनाच ते नको होतं. स्ट्राँग अँटिबायोटिक्स आणि इंजेक्शनचा मारा यांवरच त्यांची शेवटच्या दीड-दोन वर्षांतील वाटचाल चालू होती. दादांनी १४ सप्टेंबर १९८४ रोजी पंच्याहत्तरीत प्रवेश केला तेव्हा सकाळी त्यांची आवडती चाफ्याची फुलं आणि पुष्पगुच्छ घेऊन मी, सुमन, माझी मुलं-मंजिरी आणि मकरंद त्यांच्या अभीष्टचिंतनासाठी उभे होतो. आम्ही नमस्कार केला तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहत होते. आमची आई करायची तसा खरपूस केक सुमनने बनवला होता. दादांनी तो थरथरत्या हातांनी कापला. माझ्या सोसायटीत राहणारे माझे एक पत्रकार मित्र दादा पांडे यांनी डोंबिवलीतील काही पत्रकार मित्रांना सकाळी घरी बोलावलं होतं. त्यांच्याबरोबर दादांशी पत्रकारितेसंबंधात दिलखुलास चर्चा झाली.

तोच त्यांच्या आयुष्यातील अखेरचा वाढदिवस.

त्यानंतर त्यांची प्रकृती खालावत गेली. मुंबईत त्या वर्षीच्या जुलैमध्ये पावसाचा नेहमीपेक्षा अधिकच जोर होता. एका संध्याकाळी चिंब भिजून मी घरी आलो तेव्हा दादा अगदी अस्वस्थ होते. फॅमिली डॉक्टर नवरे यांनी दादांना हॉस्पिटलमध्ये अॅडमिट करण्यास सांगितलं. दादा जवळपास कोमात होते. त्यांना खुर्चीत बसवून जिन्यातून खाली आणावं लागलं. डॉ. राव यांच्या हॉस्पिटलमध्ये नेल्यानंतर पाच दिवस त्यांच्या तब्येतीच्या दृष्टीनं चढउताराचे गेले. डॉक्टरांनी सांगितलं म्हणून सांगलीला नाना-ताईला, ब्रह्मपुरीला रवीला आणि पुण्याच्या सुशामावशीला निरोप दिले. दिनांक २१ जुलै हा चिंब पावसाळी दिवस. सकाळी सातच्या सुमारास सुमनने दादांना चहा-बिस्किटं भरवण्याचा प्रयत्न केला. चहा त्यांच्या पोटात गेला पण बिस्किट गिळणं काही त्यांना जमलं नाही. त्यांनी अत्यंत क्षीण आवाजात ''रवी आला का? नाना आला का? चारू आली का?'' अशी पृच्छा केली. त्यानंतर मात्र ते पूर्णपणे ग्लानीत गेले. श्वास मंद मंद

होऊ लागला. जवळ जमलेल्या नातेवाईकांपैकी माझ्या आत्यानं आणि तिच्या भाचीनं (ती स्वत: नर्स होती) सकाळी दहाच्या सुमारास मला दादांचं मस्तक मांडीवर घेण्यास सांगितलं तेव्हा अशुभाची कल्पना येऊन मला भडभडून आलं. घरातून आणून ठेवलेलं थोडंसं गंगाजळ तोंडात घालण्याचा प्रयत्न केला. नर्स तिथं होतीच. तिने बरोबर दहा वाजून पाच मिनिटांनी, दादांचे अर्धवट ग्लानीत असलेले डोळे पूर्णपणे मिटले आणि सर्व काही संपलं आहे अशा अर्थाची खूण केली.

रविवार असल्यानं माझी मित्रमंडळी, नातेवाईक जमले होतेच. संध्याकाळपर्यंत नागपूर मेलची वाट पाहण्याचं ठरलं होतं. अनेक अडथळ्यांना तोंड देत देत रवी-चारू आणि मंदार-मधुरा दुपारी आली. त्यामुळे त्यांना दादांचं अत्यंदर्शन तरी घेता आलं. दादांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील माखजनजवळील आंबवचा, बालपण कोल्हापुरात, कर्मभूमी सांगली आणि त्या कशाचाही संबंध नसलेल्या डोंबिवलीत त्यांना अखेरचा श्वास घ्यावा लागला.

एक अध्याय संपला.

❑

# आई-दादांचं समंजस सहजीवन

सर्वसामान्य लोकांचा जो जीवनपट असतो तसाच तो माझ्याही आई-वडिलांचा होता; तथापि, आमच्या दादांना आमच्या आईच्या मृत्यूनं अंतर्बाह्य होरपळून टाकलं. ती होरपळ, ती वेदना, ते दुःख, त्यांना तब्बल अकरा वर्षं म्हणजे त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत पहिल्या इतक्याच तीव्रतेनं जाणवत राहावं हे विलक्षण आहे. आपल्या प्रिय पत्नीच्या स्मृतीचा नंदादीप त्या माणसानं अखेरपर्यंत विझू दिला नाही, रोज एका पानाची समिधा टाकत-तेवत ठेवला ही वस्तुस्थिती त्यांचा मुलगा म्हणून नाही तर एक 'त्रयस्थ' म्हणून ही मला अतिशय अपवादात्मक वाटते, आईने अशी कोणती किमया केली होती, कोणत्या प्रकारच्या प्रेमरज्जूंनी आमच्या दादांना मृत्यूनंतरही 'बांधून' ठेवलं होतं याचा शोध घ्यावासा वाटला.

इथं मला प्रकर्षाने जाणवले ते त्या उभयतांचे समंजस सहजीवन.

सर्वसामान्य परिस्थितीत एकमेकांकडे जाऊन, पत्रिका जुळवून लग्नाचे प्रयत्न झाले असते तर आई आणि दादा ह्यांचं लग्न जुळलं नसतं. म्हणजे देशस्थ-कोकणस्थ हा त्या काळचा जातीचा अडसर होताच, पण त्यापेक्षा त्या उभयतांमध्ये अनेक तफावती होत्या. दादा अगदी गोरेपान, धारदार नाकाचे आणि प्रथमदर्शनी छाप पडावी अशा व्यक्तिमत्त्वाचे होते. आई अगदी उलट. स्वभावानं, दादा (त्यानीच एका लेखात लिहिल्याप्रमाणे) सुरुवातीला तरी फटकळ, वृत्तीनं तुसडे, व्यवहारशून्य आणि माणूसघाणे

होते. आई मितभाषी, समन्वयवादी आणि कमालीची सोशीक होती. त्यांची भेट 'यथा काष्ठं च काष्ठं' मध्ये वर्णन केलेल्या प्रवाहातील दोन ओंडक्यांप्रमाणे झाली. दोघांची गरिबी एकमेकांस 'पुरून' उरणारी होती. प्राक्तनाचा तडाखा बसल्यानं दोघंही भुईसपाट झाले होते. दैवगतीनंच, त्या दोघांना एका समान पातळीवर आणून ठेवलं होतं. अशा वेळी, आजुबाजूच्या शिक्षक मंडळींनी त्या दोघांची गाठ घालून दिली. नियती कुजबुजली असेल, की आता एकमेकांचा आधार घ्या. त्यातच तुमचं कल्याण आहे.

संस्थानी काळात पगार फार तुटपुंजे होते. आई-दादांना थोडंफार आर्थिक स्वास्थ्य मिळू लागलं ते स्वातंत्र्योत्तर काळात. सुरुवातीच्या काळात त्यांना शहापूर (बेळगाव), कवठेमहांकाळ अशा ठिकाणी नोकऱ्या कराव्या लागल्या. माझ्या थोरल्या बहिणीच्या मृत्यूनंतर, आई-दादांना सांगलीत बदली मिळाली. वास्तविक, त्या वेळी दोघांना सांगलीत वेगळं बिऱ्हाड मांडून राहणं अशक्य नव्हतं. पण त्यावेळी आईच्या माहेरी दयनीय अवस्था होती. व्यापारात बसलेल्या फटक्यानंतर त्या कुटुंबावर कोर्ट-जप्तीची साडेसाती मागे लागली होती. सर्वत्र बेअब्रू झाली होती. त्या मानसिक आणि आर्थिक घालमेलीच्या काळात त्या कुटुंबाला पुरुषमाणसाच्या सोबतीची, आधाराची नितांत आवश्यकता होती. आईची आई वृद्ध होती. खचली होती. आईची थोरली बहीण ताईही बालविधवा. तिच्या एकटीवर सर्व कुटुंबाचा भार होता. आईचा धाकटा भाऊ नाना (वसंत हेबाळकर) आणि त्याच्याखालची सुशीला आणखी लहान होती. दादांना त्यांचे स्वतःचे असे नातेवाईक कोणी नव्हते ही गोष्ट खरी असली तरी त्यांना स्वतंत्रपणे राहायला नक्कीच आवडलं असतं! पण दादांनी आईची सुखदुःखं तीच आपली सुखदुःखं मानली आणि हेबाळकर-ब्रह्मनाळकरांच्या मोडतोड झालेल्या वाहनाचं चालकत्व कर्तव्यबुद्धीनं पत्करलं!

आई-दादांच्या सहजीवनातील हे विचारी सामंजस्य होतं. आईला त्यामुळे मोठाच आधार मिळाला, दिलासा लाभला आणि आपल्या नवऱ्याच्या समजूतदारपणाची जाण अखेरपर्यंत तिच्या मनात सजग राहिली. आईच्याच का तर सर्व भावंडांच्या मनात दादांबद्दल कृतज्ञतेची भावना निर्माण झाली. ताई मावशी दादांना भाऊ मानू लागली. दादा तिला

भाऊबीज घालू लागले. आमच्या घरी माझ्या फार लहानपणापासून 'स्त्री' मासिकाचा अंक दर महिन्याला येत असे, तो दादांच्या भाऊबीजेतून हे मला नंतर कळालं.

ताईला नवरा काळा की गोरा हे कळायच्या आधीच त्याचं निधन झालं. तिच्या सासरचा जमीनजुमला मोठा होता. कायद्याप्रमाणे त्यातील काही वाटा रास्तपणे तिला मिळायला हवा होता. तसा तो मिळता तर सर्वांचंच दैन्य दूर झालं असतं. दादांनी वकिलामार्फत कोर्टकचेऱ्या केल्या पण वकिलाची फी आणि मनस्ताप याखेरीज त्यांच्या पदरी काहीच पडलं नाही. नाना आणि सुशामावशी तर दादांना पितृस्थानी मानत. दादांच्या अखेरच्या दिवसांत नानाने त्यांची मनोभावे आणि मुलांपेक्षा जास्त सेवा केली. दादांनी आपल्या डायऱ्यांमध्ये तसे उल्लेख केलेले आहेत. डोंबिवलीच्या हॉस्पिटलमध्ये दादा आसन्नमरण असताना त्यांच्या तोंडी 'नाना आला का?' 'सुशा आली का?' अशीच विचारणा असे. सुशा-मावशीने पण दादांविषयी कृतज्ञता म्हणून वाईजवळील आसरे गावच्या शाळेला देणगी दिली होती.

आमच्या लहानपणी आमच्या घरातील संसार सहकारी तत्त्वावर होता. प्रत्येक महिन्याला येणारा खर्च आई, दादा, नाना व ताई असा सर्वांमध्ये समप्रमाणात विभागाला जायचा. मी आणि माझा भाऊ- रवी, ही दोन्ही मुलं सर्वांचीच म्हणून 'कॉमन' धरली जायची! वास्तविक ताई, दादा, नाना व आई यांच्याकडे, प्रत्येकाकडे येणारे पाहुणे, परिचित मित्रगण भिन्न होते. पण सर्वांचं स्वागत, या आगळ्या-वेगळ्या एकत्र कुटुंबपद्धतीत समान पातळीवर होई. सख्ख्या भावंडांची एकत्र कुटुंबपद्धत मोडकळीस येत असणाऱ्या कालखंडात, आमच्या घरातील हा 'संसार' नमुनेदार होता. आम्ही शिवाजीनगर भागातील पटवर्धन बंगल्यात राहत असताना, त्या भागातील आजुबाजूच्या रहिवाशांना या गोष्टीचं कौतुक होतंच, पण त्या काळातील पत्रकार, सांगली नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष बापुसाहेब दप्तरदार ह्या कौतुकाचे मोठे उद्गाते होते. अनेकांना ते या एकत्र कुटुंबाचं उदाहरण देत असत. अर्थात याचं पूर्ण श्रेय आमच्या आईचं होतं.

आई-दादांच्या सहजीवनाचा मला जाणवणारा आणखी एक विशेष म्हणजे त्या उभयतांमध्ये वसत असलेला एकमेकांमधील गुणांचा आदर. आईचा न्यूनगंड कसा निघून गेला आणि दादांच्या सहवासात आईचं व्यक्तिमत्त्व कसं विकसित होत गेलं याचा उल्लेख यापूर्वी आला आहेच. दादांना स्वत:ला शास्त्रीय संगीतात अजिबात रस नव्हता, पण आपली पत्नी त्यात चांगली रुची बाळगून आहे; नव्हे, त्यात तिला चांगली गती आहे हे जाणवल्यावर, दादांनी पुण्याहून तिच्यासाठी हार्मोनियम आणणं, तंबोरा आणणं, तिला नियमित शिकवणी ठेवणं या सर्व गोष्टींमध्ये मनापासून रस घेतला.

आईच्या ठायी वाङ्मयीन जाण दादांमुळे विकसित झाली. दादांचे आवडते कवी केशवसुत, बालकवी, तांबे, माधव ज्यूलियन, रे. टिळक असे होते. दादा आईला त्यांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये असलेल्या कवितांचे मर्म समजावून सांगत. एकूण काव्याविषयीही सांगोपांग माहिती सांगत. कदाचित, आईमधील सुप्तावस्थेतील काव्यगुणांना त्यामुळेच खतपाणी मिळालं असेल. शिक्षकी पेशा हे दोघांचं समान व्रत होतं आणि त्या धाग्यानं ती दोघं एकमेकांशी घट्ट बांधली गेली होती. परिस्थितीमुळे त्या दोघांना शिक्षकी पेशा पत्करावा लागला होता ही गोष्ट खरी; पण विद्यार्थ्यांच्या सहवासात त्या दोघांचं भान हरपून जायचं. ती दोघं आपापल्या शालेय जीवनातील अनुभवांची देवाणघेवाण करताना कमालीची रंगून जात. आईला दादांमधल्या सुप्त लेखनगुणांची कल्पना होती. तिनेच त्यांना 'दक्षिण महाराष्ट्र'त नियमितपणे लिहिण्यासाठी राजी केलं; त्यांचे लेख वाचून योग्य टीका-टिप्पणीसह प्रोत्साहित केलं. आपलं लिखाण तिला मनापासून आवडतंय ह्या वस्तुस्थितीमुळे दादांना आनंद होई आणि त्या उत्साहाच्या भरातच ते पुढचा लेख लिहायला सरसावून बसत. पुढे, मान्यवरांनी त्यांच्या लेखनाची दखल घेतली, वाचकांची पत्रं येऊ लागली तेव्हा आपली पत्नी आपल्याला खोटं प्रोत्साहन देत नव्हती याची त्यांना खात्री पटली आणि मुख्य म्हणजे एक लेखक म्हणून त्यांना स्वत:ची ओळख पटली!

'काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्' या उक्तीनुसार रसिकतेनं

जीवनाकडे पाहण्याची दृष्टी दादांमुळे आईला लाभली. एखादा दिवाळी अंक आलाय. त्यातील उत्तम कथा, लेख वा कविता दादा मोठ्यानं वाचून दाखवत आहेत आणि आई, ताई-नानांसह ते तन्मयतेनं ऐकत आहे असं दृश्य आमच्या घरी अनेकवार दिसत असे. एखादं उत्तम व्याख्यान, सुंदर नाटक यावर आमच्या घरी नेहमीच चर्चासत्रं झडत. त्यामुळे उत्तम साड्या वा दागदागिने या स्त्रीसुलभ आकर्षणांच्या गोष्टींकडे आईचं लक्ष फारसं नसे. सुरुवातीला गरीबीमुळे आणि सुस्थिती आल्यानंतर त्यातील वैय्यर्थ जाणवल्यामुळे. आईला चारच सोन्याच्या बांगड्या होत्या. आई त्या अडीअडचणीच्या वेळी नेहमी पुढे करत असे. मदतीचा हात तर सदैव पुढे केलेला असे, पण बांगड्यांचा हात पुढे होणं हे विशेष होतं. घराच्या बांधकामाच्या एका अडचणीच्या प्रसंगी त्या चार बांगड्यांची १९६४ मध्ये आहुती गेली ती गेलीच. माझ्या लग्नाच्या वेळी १९६६ मध्ये माझ्या काकूंनी आणि आत्याबाईने, वरमाईच्या अंगावर 'काही' नाही हे बरं दिसत नाही म्हणून बळेबळे आमच्या आईच्या अंगावर चार दागिने चढवले. त्यांचं मन मोडायचं नाही म्हणून आईने ते अंगावर घातले आणि काम संपताक्षणी चटकन उतरवले!

आई-दादांच्या सहजीवनाचा मागोवा घेताना एक गोष्ट मला विशेष वाटली. ती म्हणजे त्या दोघांमध्ये असलेली एक विशेष मैत्री. त्या काळाचा विचार करता पती-पत्नीच्या नात्यापलीकडे त्यांच्यामधील 'मित्रभाव' मला फार लोभस वाटतो. सांगलीसारख्या, तुलनेनं अप्रगत गावातील गोष्ट म्हणून ती जरा जास्त वैशिष्ट्यपूर्ण वाटते. आईची गाण्याची शिकवणी चालू असताना वाड्यातील मुलं खेळता-खेळता उगीचच खोलीत येत. त्यामुळे शिकवणुकीत व्यत्यय येई, तेव्हा शिकवणी चालू झाल्यावर खोलीला आतून कडी घालून घे असं दादांनी सांगणं हे विशेष होतं. आईला अर्थातच ती गोष्ट मानवली नाही. मग पाहरा करण्याचं काम माझ्याकडे लागलं. मी मुलांना हुसकावून लावत असे. तसंच, सांगलीतील म्युझिक सर्कलमध्ये भीमसेन, बसवराज, मल्लिकार्जुन मन्सूर, फिरोज दस्तूर अशा कोणाच्या मैफली असल्या तर रात्री परत येताना सोबतीचा प्रश्न असे. दादा बिनदिक्कत सांगत, की अमक्याची सोबत आहे,

तमक्याची सोबत आहे, पण आई मला बरोबर घेऊनच त्यांच्या सोबतीनं परत येई. मला त्या सर्वांचा आपसूक एक फायदा झाला. मी चांगला श्रवणभक्त बनलो. अगदीच एखादा अनवट राग सोडला तर बहुतेक सर्व राग मला ओळखता येऊ लागले. पुढे, तंबोरा घरी आल्यावर दादा पहाटे पाच-साडेपाचला स्वत: चहा करत. आई त्यांच्याबरोबर चहा घेई. थोड्या गप्पा होत. आई तंबोऱ्यावर बसे. दादा त्यांच्या आवडत्या ज्ञानेश्वर-तुकारामाच्या भजनी लागत. आईच्या शाळेचा काही कार्यक्रम असला, ताई यायची असली तर दादा स्वत: पाटपाणी घेत. अगदी वेळप्रसंगी भात-आमटी किंवा त्यांना 'एकमेव' येणारी बटाट्याची भाजी करत. (मात्र, घरात प्रचंड पसारा मांडून ठेवत!) दादा निवृत्त झाल्यावर पुढे तीन-चार वर्षं आई सांगली-वाडीच्या शाळेत नोकरीसाठी जाई तेव्हा दादा चक्क तिला 'सोबत' म्हणून आयर्विन पुलापर्यंत गप्पागोष्टी करत-करत जात आणि मग एकटेच परत येत. त्या काळात सांगलीत हे जरा नवलाचंच होतं. थोडी चेष्टा होई, पण दादांचं तिकडे लक्ष नसायचं.

दादांची पहाटे चहा करून (स्वत:) घ्यायची सवय अखेरपर्यंत होती. त्यावेळी त्यांना कोणाची तरी 'कंपनी' लागे. आई गेल्यानंतर सांगलीत असल्यावर नाना आणि डोंबिवलीतील मुक्कामी मी व सुमन अशी कंपनी देत असू. आईला कॅन्सर झाला तेव्हा मुंबईला टाटा हॉस्पिटलमध्ये तिला नेलं होतं. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी कॅन्सरसंबंधात आजच्याइतकी प्रगत अवस्था नव्हती. टाटामधील डॉक्टरांनी मला बाजूला बोलावून सांगितलं, ''ऑपरेशन झेपणार नाही. आजार फार पुढे गेलाय. तुमच्या आग्रहापोटी ऑपरेशनला घेतलं तर कदाचित टेबलावरच... ...''

मी झटकन तोंड फिरवलं. कन्सल्टिंग रूमबाहेर बसलेल्या माझ्या आईला आणि माझ्या दादांना मी काय सांगू? कसं सांगू?

परिस्थिती माणसाला बरंच काही शिकवते. अभिनयाचा गंध नसतानासुद्धा मी उत्तम अभिनय वठवत म्हटलं, ''अगं आई, डॉक्टर म्हणाले की ऑपरेशनची अजिबात गरज नाही. मी काही औषधं आणि इंजेक्शनं देतो. त्यानं बरं वाटेल.''

आईच्या 'भाबड्या' चेहऱ्यावरचा आनंद बघून मला बरं वाटलं, पण

ते खोटं होतं. आईचा 'अभिनय' अधिक श्रेष्ठ होता. कारण तो अधिक सात्त्विक होता. निर्मळ होता. आपल्या हळव्या मनाच्या नवऱ्याला आपल्या जीवघेण्या, दुर्धर रोगाची तीव्रता उमगू नये म्हणून तिने केलेला तो अभिनय होता.!

आणि असा अभिनय करण्याची गरज आईला वर्षभराच्या कॅन्सरच्या झुंजीत अनेकदा पडली.

आईच्या आजाराची तीव्रता वाढली तशा पहाटे चहाच्या वेळी होणाऱ्या दादांच्या बरोबरच्या तिच्या गप्पा कमी होऊ लागल्या. घशावाटे पोटात काही जाण्याचा मार्ग, गिळण्याची क्रिया जवळजवळ बंद झाली. मात्र ती पहाटेच्या चहाचा घोट तसाच घशात ठेवी आणि हळूच, वॉशबेसिनमध्ये चूळ टाकून देई!

असं विलक्षण होतं त्या दोघांचं भावजीवन! खरं तर, निवृत्तीनंतर त्यांचं भावजीवन खऱ्या अर्थानं फुलायचं, पण परिस्थितीची अनुकूलता आली तेव्हा आईला जगाचाच निरोप घ्यायची वेळ आली. दादा लहानपणापासूनच पोरके. ना भावंडांचं प्रेम ना बहिणीची माया, ना पैशांचं पाठबळ. आई भेटली तेव्हा परमेश्वरानं 'सगळं' काही भरभरून दिलं अशीच त्यांची भावना झाली आणि आईनं ती सर्वार्थ सार्थ केली. त्यामुळेच आईचा मृत्यू हा त्यांच्यासाठी वज्राघात होता!

नंतरचं त्यांचं जगणं हे खरं जगणं नव्हतंच. तिच्याशी होणारा रोजचा एकतर्फी संवाद आणि त्यांचं लेखन एवढंच त्यांचं भूतलावरील 'जगणं' होतं!

❐

## दादांचं डायरी-लेखन

आईचं निधन १७ सप्टेंबर १९७४ रोजी झालं. त्यांनतर बरोबर पंधरा दिवसांनी दादांनी त्यांच्या डायरी-लेखनाला सुरुवात केली. बरोबर आहे. आईच्या मृत्यूनंतर जी कोणी माणसं शोक-समाचारानिमित्तानं जमा झाली होती ती पंधरवड्यात एकेक करून पांगली. आपापल्या कामाला लागली. त्यात आम्ही मुलंही आलो. त्यामुळे त्यानंतर आईच्या मृत्यूचं दुःख दादांच्या हातात गोळा झालं होतं. दोन हातांमध्ये न मावणाऱ्या त्या दुःखाचं निवारण कसं करावं याचा प्रश्न त्यांना पडलां असेल. शरीरावरच्या जखमा दृश्यमान असतात; कुठे झाल्या आहेत त्या कळतात, त्यावर मलमपट्टी केली की त्या बऱ्या झाल्याचं दिसतं. तसं, मनाच्या दुःखाचं नाही. दुःख अंतर्मनात किती खोलवर रुतून बसलंय तेच कळत नाही. आई साध्या आजारानं गेली नव्हती. कॅन्सरने होणाऱ्या यातना ती किती जिवाच्या करारानं सहन करत होती ते दादांना रोज पाहावं लागत होतं. अगदी अगतिकपणे. आयुष्यातील सारी दुःखं आजवर आपण दोघं मिळून झेलत होतो. तोच तर आपल्या अडतीस वर्षांच्या सहजीवनाचा भक्कम पाया होता आणि असं असताना, शेवटच्या लढाईत आपण आपल्या अर्धांगीला मुकाटपणे एकाकी सोडून देत आहोत याची यातना दादांना किती त्रास देत असेल? 'देवा, सोडव रे माझ्या इंदूला या यमयातनांमधून' अशी आपणच करुणा भाकली होती ना? एरवी, कधी कुणाचं न ऐकणारा परमेश्वर नेमका कसा 'ऐकता' झाला? काय करून बसलो आपण? असा अनेक प्रकारचा

कल्लोळ दादांच्या मनात पिंगा घालत असेल. प्रत्येकजण आपापली वेदना 'बोलकी' करायचा प्रयत्न करतो. कवी कवितेच्या माध्यमातून, गायक आपल्या संगीतातून; दादा लेखक होते म्हणूनच त्यांनी शब्दांच्या माध्यमातून आपली वेदना 'बोलकी' करण्याचा प्रयत्न साधला असावा!

दादा रोज एक पान मजकूर लिहीत. त्यामध्ये रोजच्या घडामोडी असत. कोण घरी आलं- कोण गेलं, आपण काय वाचलं- काय लिहिलं, कोण-काय बोललं हे सगळं ते रोजच्या रोज आईला सांगत. बऱ्याच वेळा त्यांचं ते मुक्तचिंतन असे. आयुष्यात आपण केलेल्या चुका, आपल्या पत्नीची आपल्याला न कळलेली किंमत, त्यासंबंधीची पश्चात्तापाची भावना वगैरे अनेक गोष्टी त्या चिंतनात असत. अनेक वाङ्मयीन नोंदी असत. ऐकलेल्या चांगल्या भाषणांमुळे मनात उमटलेले पडसाद, पाहिलेली नाटकं, वाचलेली पुस्तकं, दृष्टी अधू बनत चालल्यामुळे वाचनाच्या बाबतीत होणारी उपासमार या साऱ्या गोष्टी आपल्या इंदूला, रोजच्या डायरीच्या माध्यमातून होणाऱ्या एकतर्फी संवादातून सांगितल्याच पाहिजेत अशी दादांची धारणा होती. एक्सरसाईज बुकच्या एका पानावर मावेल इतका मजकूर लिहायचा असा दंडकच त्यांनी स्वत:ला घालून घेतला असावा. कारण कधीही एका पानाची दोन पानं झाली नाहीत की लिहायला मजकूर नाही म्हणून पान अर्धं राहिलेलं नाही. दादांनी दोनशे पानी वह्यांचे एकूण चोवीस भाग, आई गेल्यानंतरच्या अकरा वर्षांत लिहिले आहेत. काटेकोर हिशोबानं १ ऑक्टोबर १९७४ ते १५ जुलै १९८५ पर्यंत ३९४१ दिवस होतात. दादांनी जवळजवळ चार हजार पानं भरतील एवढा मजकूर लिहिला आहे! सगळा मजकूर 'इंदू' अशा संबोधनानं सुरुवात करून लिहिला आहे. जशी काही आपली पत्नी समोर बसली आहे. ती नेहमीप्रमाणे भाजी नीट करत आहे किंवा तांदूळ निवडत आहे आणि आपण तिच्याशी बोलतोय, हितगुज करतोय अशा आविर्भावात दादांनी मजकूर लिहिला आहे.

मी रूढार्थाने या लेखनाला दादांच्या डायऱ्या म्हणत असलो तरी खुद्द दादांनी त्याला छान नाव दिलं आहे. ते या वह्यांना 'संवाद पुस्तिका' म्हणत. क्वचित त्यांनी 'हितगुज पुस्तिका' असंही म्हटलं आहे.

त्यांचं डायरी-लेखन बहुतांशी पहाटेचा चहा घेतल्यावर होई किंवा रात्री उशिरा होई. त्या कामात ते अतितत्पर असत. एकदा, सांगलीहून डोंबिवलीला जायचं म्हणून सगळं सामान (डायऱ्यांसकट) बांधलं गेलं होतं. तेव्हा दादांनी भल्या पहाटे उठून एका सुट्या कागदावर मजकूर लिहिला आणि डोंबिवलीला पोचल्यावर तो मजकूर वहीत योग्य त्या पानावर पुन्हा लिहिला!

दादा प्रत्येक डायरीच्या आरंभी आईचा जन्मदिन आणि मृत्युदिन भारतीय तसेच इंग्रजी कालगणनेनुसार नोंदवत. त्याच्याखाली 'त्वमेव माता पिता त्वमेव, त्वमेव बंधु, सखा त्वमेव' हा संस्कृत श्लोक लिहीत. ते स्वाभाविकच होतं म्हणा. आमची आई हेच दादांचं सर्वस्व होतं. माता, पिता, बंधू, सखा वगैरे सर्व नाती त्यांच्यासाठी आईच्या ठिकाणी एकवटलेली होती. प्रत्येक वहीच्या अखेरच्या पानावर, त्यांनी त्यांच्या तीन आवडत्या कविता उद्धृत केलेल्या असत. मी त्या कविता पुढे संपूर्णपणे देत आहे, म्हणजे त्यामध्ये आईविषयीच्या त्यांच्या भावभावनांचं प्रतिबिंब यथार्थप्रमाणे कसं दृग्गोचर होत होतं हे दिसून येईल.

पहिली कविता प्रसिद्ध आहे; दादांचे लाडके कवी भा. रा. तांबे यांची-

जन पळभर म्हणतील 'हाय! हाय!'
मी जाता राहील कार्य काय? ।।धृ।।

सूर्य तळपतील, चंद्र झळकतील
तारे अपुला क्रम आचरतील
तसेच वारे पुढे वाहतील
होईल काही का अंतराय ।।१।।

मेघ वर्षतील, शेते पिकतील
गर्वाने या नद्या वाहतील
कुणा काळजी की न उमटतील
पुन्हा तटावर हेच पाय ।।२।।

सखे सोगरे डोळे पुसतील
पुन्हा आपुल्या कामी लागतील
उठतिल बसतिल हसुनि खिदळतील
मी जाता त्यांचे काय जाय? ॥३॥

राम कृष्णही आले गेले
त्याविण जग का ओसच पडले?
कुणि सदोदित सुतक धरले
मग काय अटकले मजशिवाय? ॥४॥

अशा जगास्तव काय कुढावे
मोही कुणाच्या का गुंतावे
हरिदूता का विन्मुख व्हावे?
कां जिरवू नये शांतीत काय?॥५॥

दुसरी कविताही तांबे यांची असे. ती अशी -

सहज तुझी हालचाल मंत्रे जणु मोहिते
सहज चालणेही तुझे
सहज बोलणेही तुझे
सहज पाहणेही तुझे
मोहिनी मज घालिते॥१॥

संसृतीचा घोर भार
बघता तू एकवार
विलया सखि जाय पार
देहभान लोपते॥२॥

देवी वनदेवी म्हणू
स्वप्नभास काय म्हणू
प्रतिभा की भैरवी म्हणू
मति माझी कुंठते॥३॥

एकवार बघ हासून
डळमळेल सिंहासन
तलमळतील मनि सुरगण
हास्यास्तव खास ते॥४॥

ही अपूर्व शक्तिसगूण
झाडितसे मम अंगण
हे माझे भाग्य बघून
जळफळतील देव ते॥५॥

तिसरी कविता 'अनिल' (आ. रा. देशपांडे) यांची आहे.

कितीक काळ हालला
असा तुझ्याविना
कळे न श्वास चालला
कसा तुझ्याविना
दहिवरल्या प्रहरातून
वाट पाहते पहाट
बहर गळे दरवळला
कसा तुझ्याविना
लवथवत्या पानावर
गहिवरते भर दुपार
दिवस ढळे ज्वर भरला
कसा तुझ्याविना

तमामधून सावकाश
उजळे आकाश निळे
चळे उदास चंद्रमा
कसा तुझ्याविना
ताऱ्यांचा धरून भार
रात्रिस उरले न त्राण
स्मरणावर प्राण जळे
कसा तुझ्याविना

आमच्या घरी ज्येष्ठ भावगीत गायक (खरं तर काव्यगायक) गजाननराव वाटवे यांचं येणं-जाणं असे. ते बऱ्याच कवितांच्या चाली आम्हाला ऐकवत. 'जन पळभर म्हणतील' या कवितेची त्यांची चाल वेगळी होती. आई अशा अनेक कविता दादांना गाऊन दाखवी. आई गेल्यानंतर त्या कविता दादा नेहमी गुणगुणत. दादांचं आईबरोबरच्या सहजीवनाच्या संदर्भात या तीन कवितांशी भावनिक नातं होतं. प्रत्येक डायरीवर अनुक्रमांक असे. प्रत्येक पानावरील नोंदीवर त्या त्या दिवसाची तारीख असे. ते डायरी पाठपोट लिहित, पण त्यामुळे माझा एक तोटा असा झाला, की दोन्ही बाजूंचे अक्षराचे छाप उमटल्यामुळे, बरीच अक्षरं दिसेनाशी झाली. आजारपणाच्या काळातसुद्धा त्यांच्या डायरी-लेखनात खंड पडत नसे. अंथरुणावरून उठवतसुद्धा नाही अशी स्थिती असली तर दादा खाडा पडलेल्या दिवसांचा गोषवारा एकत्र लिहीत. शेवटची नोंद आहे १५ जुलै १९८५ रोजीची. त्यांनतर त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावं लागलं आणि २१ जुलैला त्यांचं निधन झालं.

❐

## डायरी-लेखनाचा खटाटोप कशासाठी?

आता कुणालाही प्रश्न पडेल, की एवढा प्रचंड खटाटोप दादांनी का केला? खुद्द त्यांनाही असाच प्रश्न वारंवार पडला होता.

त्यांनी स्वत:लाच विचारलंय -

'इंदू, हा सगळा उद्योग मी का करावा किंवा का करतोय याचं उत्तर माझं मलाच मिळत नाही. हॅम्लेट म्हणतो त्याप्रमाणे सृष्टीच्या या व्यवहारात मला यत्किंचितही गोडी वाटत नाही. इंदू, तुझं स्मृतिगान करण्याची फलप्राप्ती काय? काहीही साधण्याची आशा नसताना मी अगदी नियमितपणे हे व्रत का आचरत आहे? तुला बरं वाटावं म्हणून? छे, तुला तर यातलं काहीच कळत नाही. मी या प्रकाराला दोन प्रेमी जिवांचा सुखसंवाद मानतो. हा संवाद चालू असताना तू आपल्या पूर्वीच्या स्वरूपात माझ्याशी बातचीत करत आहेस, माझं म्हणणं ऐकत आहेस; इतकंच नव्हे, तर आपलं म्हणणं कोणाला ऐकू जात नाही. ते आपल्या दोघांना कळतं. इतर जगाचा आपल्या बोलण्यात व्यत्यय येत नाही. तू अन् मी म्हणजे विश्व असा भास होतो. दिवसातल्या साऱ्या घटना ज्या मला महत्त्वाच्या वाटतात त्या तुला, काही एक आडपडदा न ठेवता सांगतो. हृदयाविष्काराचा हा एक अपूर्व प्रकार आहे. यानं मला खरीखुरी शांती मिळते. मन मोकळं होतं. माझी सुखदु:खं, माझे मानापमान, माझ्या व्यथा अन् कथा, माझ्या भावना अन् माझे विचार सारे तुला समजावून सांगतो. तू लक्षपूर्वक ऐकतेस. तुझे भावतरंग माझ्या कानांवर पडतात. अशा काही अपूर्व

काल्पनिक विश्वात आपण राहतो. थोडा वेळ का होईना पण अगदी स्वर्गसुख मिळाल्याचा अनुभव येतो, म्हणून मी हा नित्यक्रम चालू ठेवणार. हा छंद, हे वेड, ही लहर, हा ध्यास म्हणजे माझं जीवन आहे.'

आणखी एके ठिकाणी त्यांनी म्हटलंय -

'हे संवाद म्हणजे माझ्या मनाचा विरंगुळा आहे. खरा विसावा आहे. निवारा आहे. शांतिस्थान आहे. मी जुन्या संवाद-वह्या चाळून पाहतो तेव्हा विलक्षण आनंद होतो. पण या संवाद-वह्यांचं भवितव्य काय? आताच बरीचशी अक्षरं पुसट होत चालली आहेत. काही शब्द तर संपूर्ण नष्ट झाले आहेत, पण माझ्यासाठी नाहीत. मी वाचायला लागलो, की ते नष्ट झालेले शब्द मला स्पष्टपणे दिसू लागतात.... लोक आत्मचरित्र लिहितात, पण त्यात प्रसिद्धीचा मोह असतो. मी मात्र तुझी स्मृतिपूजा केवळ माझ्या, माझ्याच समाधानासाठी करतो.'

अशाच एका संवादात दादा लिहितात-

'ही डायरी मी का लिहितो? हा एक प्रकारचा Dramatic Monologue आहे. जवळजवळ चाळीस वर्षांच्या संसारात मी अनेकदा अनेक विषयांवर बोलत असायचो. तू केवळ श्रोता असायचीस. माझ्या भाष्यांवर तुझं प्रेम असायचं. माझं बोलणं, माझे विचार तुला आवडायचे. ही डायरी म्हणजे ते जुने संवादच. या डायरीचे लिहून झालेले भाग वाचताना माझा तो भूतकाळ पुन्हा सजीव होतो, म्हणून हे लिखाण मला आवडते.'

आता, एवढ्या भारंभार डायऱ्या का लिहिता असं दादांना कोण विचारणार का होतं? पण जागोजागी, त्यांनी आपल्या लिखाणाचं प्रयोजन सांगितलं आहे. एकदा, म्हणजे आई गेल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात ते थोडे आजारी झाले. काही घरगुती समस्याही समोर उभ्या ठाकल्या होत्या. त्या 'इंदूला' सांगता सांगता ते लिहितात.

'......तरीसुद्धा, तुझ्या स्मृतीवर हे एक पान मी रोज लिहितो. तुझ्याशी संवाद साधतो. मन प्रफुल्लित होतं. एवढाच आनंद. कोणतीही चांगली घटना घडली की तुला सांगायची. कठीण प्रसंग आला की तुझ्या मदतीची अपेक्षा करायची! हसतेस काय? तू दिसत नाहीस म्हणून काय झालं? देव आपल्याला दिसतो का? तरी आपण त्याची मदत नाही का

मागत?.... असं केलं म्हणजे सुख दुणावतं. दु:ख हलकं होतं.'

शेवटच्या काही वर्षांत दादांना अनेक आजारांनी त्रस्त केलं होतं. 'एकसारखी येणारी, घरातील इतरांची झोप उडवणारी खोकल्याची ढास, फजितीची वेळ आणणारी लघुशंका, तटणारी लघवी, त्यावेळी होणारा असह्य दाह, भयानक वेदना.....हे सगळं इंदू, मी तुझ्याशिवाय कुणाला सांगणार?' म्हणून हे संवाद असं दादांनी डायऱ्याचं समर्थन दिलंय.

बऱ्याच वेळा व्याधिजर्जर होऊन संवादात म्हटलंय, की 'देवाला मी रोज विनंती करतो की बाबारे, उद्याचा दिवस काही दाखवू नकोस.... देव काही ऐकत नाही.....इंदू, तुलासुद्धा प्रकृतीचं हे रडगाणं ऐकवायचा आता मला कंटाळा आलाय.'

आपण एवढे संवाद वर्षांनुवर्षं कसे काय लिहू शकलो याचं त्यांचं त्यांनाच आश्चर्य वाटायचं. म्हणून त्यांनी म्हटलंय, 'हे संवाद लिहिताना एखादी अद्भुत शक्ती माझ्या अंगात संचारत असावी. तीच हे संवाद आपल्या सामर्थ्यानं लिहवून घेत असावी.'

तथापि, मुळात असा 'संवाद' साधावा, रोजच्या रोज, पूजाअर्चा केल्याप्रमाणे संवाद-पुस्तिकेत एक पान लिहावं आणि आपल्या प्रिय पत्नीला मनोभावे अर्पण करावं ही कल्पनाच दादांच्या मनात कशी आली असावी याबद्दल माझ्या मनात उत्कंठा होती. त्यांच्या डायऱ्यांची सुरुवातीची पानं त्यावर काही प्रकाश टाकतील असं वाटलं होतं, पण त्या सुरुवातीच्या डायऱ्यांमधील अक्षरं अजिबात दिसेनाशी झाली होती. नंतरच्या डायऱ्या वाचताना एक नोंद मला सूचक वाटली. थॉमस हार्डी हा दादांचा आवडता लेखक होता. त्याच्या The Woodlanders या कादंबरीची त्यांनी अनेक वेळा पारायणं केली होती. त्याविषयीची एक नोंद मला अशी आढळली :

'या कादंबरीतील जवळजवळ सर्व पात्रं मला आवडतात, विशेषत: मार्टीचं. दुर्दैवानं तिच्या प्रेमाची पूर्तता झाली नाही, तरी तिने ज्याला आपला प्रियकर मानला त्याच्यावरील प्रेमाशी ती एकनिष्ठ राहिली. त्याच्या मृत्यूनंतरसुद्धा त्याच्या थडग्यावर ती नेमानं फुलं वाहत असे. त्याच प्रियकरावर प्रेम करणारी त्याची आणखी एक प्रेयसी होती. ती

दुसरी प्रेयसी जेव्हा आपल्या पतीकडे परत गेली तेव्हा मार्टीला विलक्षण आनंद झाला. आता, आपल्या प्रेमात प्रतिस्पर्धी नाही म्हणून! (गंमत आहे ना, इकडे प्रियकर तर केव्हाच देवाघरी गेलाय.) अत्यानंदानं, ती त्या प्रियकराला म्हणते, "Now, my own, own love!" She whispered, "You are mine; for she has forgot thee at last, although for her you died! But I.....whenever I get up I will think of thee, and whenever I lie down, I will think of thee again. भावनातिरेकानं शेवटी ती उद्गारते, "If ever I forget your name let me forget home and heaven! .....But no, no my love, I never can forget thee, for you was a good man, and did good things!" इंदू, manच्या ठिकाणी woman हा शब्द घातला तर मलाही तुझ्यासंबंधी असंच म्हणता येईल. खरोखर, तू थोर स्त्री होतीस. विसरू म्हटलं तरी विसरता येणार नाही. तुला विसरणं म्हणजे घराला, जगताला, परमेश्वराला व स्वत:ला विसरणं आहे. तुझ्या ठायी हाच माझा दृढ भाव आहे. त्या भावनेवरच मी जगतो.'

वरील नोंद मला लक्षणीय वाटली, कारण दादांच्या मनात आईची मानसपूजा रोजच्या संवादलेखनातून बांधावी असं आलं, त्याचं मूळ प्रेरणास्रोत कदाचित ही कादंबरी असावी. त्या कादंबरीमधील मार्टी जशी प्रियकराच्या समाधीवर नित्य: फूल चढवते तसे दादा एकेक स्मृतिपुष्प रोजच्या रोज वाहत. अर्थात, साम्य एवढ्यापुरतंच मर्यादित आहे. नीट विचार केल्यावर वाटलं, की तसं नसावं. कारण तसा उल्लेख दादांनी कुठेतरी केला असताच. त्यातून ही नोंद आहे १४ जून १९७९ची. म्हणजे दादांनी डायरीलेखन सुरू केल्यानंतर पाच वर्षांची. पण मृत्यूपूर्वी काही महिने दादांचं वाचन जवळपास थांबलं होतं. रोजचं संवादलेखन कसंबसं करायचं आणि जुन्या संवाद-वह्या वाचत बसायचं एवढाच त्यांचा विरंगुळा होता. त्यावेळी केलेल्या एका नोंदीत डायरी- रचनेचा उगम आढळतो. भूतकाळात रमताना त्यांनी एका नोंदीमध्ये म्हटलंय -

'हे संवाद लिहिण्याचा उपक्रम पूर्वनियोजित नव्हता. तू (इंदू) गेल्यानंतर दहा-पंधरा दिवसांनी, तुझ्या जाण्यामुळे माझं जीवन किती भकास, ध्येयशून्य व चैतन्यरहित झालं आहे याची मला कल्पना येऊ

लागली. जीवनात गोडी वाटेना. नित्यकर्मात रस घेता येईना. एक प्रकारची शून्यावस्था प्राप्त झाली. विरंगुळा म्हणून मी तुझ्याशी संवाद साधू लागलो. माझ्या जीवनात प्रवेश केल्यावर तुझे गुण माझ्या मनावर जे बिंबले ते मी लिहू लागलो. आपल्या दैनंदिन जीवनातील रम्य प्रसंग आठवू लागलो. जसजसे दररोज ते आठवत तसतसे लिहू लागलो. तुझ्या जाण्यामुळे मला काय वाटतं, माझी स्थिती काय झाली आहे, मी कसा वागतो, इतर माझ्याशी कसं वागतात या साऱ्या गोष्टी मनमोकळेपणानं मी तुला सांगू लागलो.... अर्थात, या लिखाणात आत्मगौरवाला फाटा दिला आहे आणि परनिंदा वर्ज्य केली आहे. होता होईल तो तुझे गुण आठवायचे, तुझ्याविषयी मला काय वाटतं ते सांगायचं, एवढाच हेतू मनात धरून मी हे लिखाण करतो. काही गोष्टी मला सहन झाल्या नाहीत तर तुझ्याजवळ व्यक्त करतो. माझे दोष, अपराध, चुका यांचा प्रांजळपणे उल्लेख करतो. इतरांच्या गुणांकडे पाहतो. दोषांकडे कानाडोळा करतो. हृदय बऱ्यावाईट भावनांनी ओतप्रोत भरलं की त्याचा निचरा तुला सर्व काही सांगून करतो. पहाटे उठलो की तुझं स्मरण करून, तुझ्या फोटोला वंदन करून जसजसं आठवेल तसं लिहितो.'

दादांनी जे काही वरील नोंदीमध्ये सांगितलं आहे त्या निवेदनाशी ते प्रयत्नपूर्वक प्रामाणिक राहिले आहेत. त्यांनी स्वत:चं वर्णन केल्याप्रमाणे, ते हेकेखोर, अहंमन्य होते; प्रसंगी, खूप वितंडवाद घालत, पण आईच्या मृत्यूनंतर त्यांनी जाणीवपूर्वक स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणलं होतं. काही प्रसंग माझ्या चांगले लक्षात आहेत. निदान माझ्या संबंधातील तरी. त्या त्यावेळी डोक्यात राख घालून म्हणा वा परिस्थितीच्या रेट्यामुळे म्हणा, मी त्यांना निश्चितच दुखावलं होतं, अपमानित केलं होतं. थोड्याशा औत्सुक्यानं आणि काहीशा भीतीपोटी मी त्या त्या प्रसंगासंबंधीच्या नोंदी वाचल्या. मी थक्क झालो. दादांनी माझा थोडासुद्धा निषेध केलेला मला आढळला नाही! उलट, काही प्रसंगांत स्वत:कडेच दोष घेतलाय, उणेपणा घेतलाय. त्यांची स्वत:चीच नोंद अशी; एका वेगळ्या प्रसंगातील.

'काल रात्री एक-दोन गोष्टींचा त्रास झाला. काही शल्यं आणि व्यथा अशा आहेत, की त्या मला तुझ्याशिवाय कोणाकडेही व्यक्त

करता येत नाहीत..... काय करू? मनाशी तडफडतो आणि मग माझी मीच मनाची समजूत घालतो. एक गोष्ट मात्र कटाक्षानं टाळतो. शब्दाशब्दी करत नाही. पडतं घेतो. नमतं घेत माघार घेतो. आपला हेका चालवत नाही. त्यामुळे कटुता वाढत नाही, दुरावा येत नाही. एक प्रकारचं सामजंस्याचं, तडजोडीचं वातावरण राहतं. एकोपा टिकतो. शांती नांदते. अर्थात, असं करण्यात स्वत्वाचा लोप होतो. स्वाभिमानाची गळचेपी होते.'

दादा आत्मसन्मानाच्या बाबतीत विलक्षण सजग होते. त्यासाठी त्यांनी, सार्वजनिक काय किंवा आपल्या नोकरीकाळात काय, प्रखर झगडा केला होता. त्यापायी झालेल्या नुकसानीची त्यांनी यत्किंचितही पर्वा केली नव्हती, पण हे सगळं आमची आई असताना. ती गेल्यानंतर? त्यांनीच एका नोंदीत म्हटलंय -

'तू असेपर्यंत मला स्वत्वाची विलक्षण जाणीव होती. कर्तृत्वाचा अतीव अभिमान होता. दर्प होता. अहंकार प्रज्वलित होता. 'मी'पणाची भावना तेजस्वी होती. दुसऱ्यातील व्यंगं टिपून, त्यात मालमसाला भरून त्याला हास्यास्पद करण्याची खुमखुमी असे, पण तू गेलीस आणि माझा अहंकार गळाला. आपण क्षुद्र, दुर्बल, कवडी किमतीचे जीव अशी भावना होऊ लागली. आतापर्यंतचं आपलं सगळं चुकत आलं असा ग्रह होऊ लागला. अति अहंकार वाईट तशीच स्वत:ची अतिनालस्ती करण्याची भावनाही त्याज्य. पण काय करू? बॅटरीतील मसाला संपला म्हणजे ती जशी प्रकाश देऊ शकत नाही, तशीच माझी अवस्था तू गेल्यापासून झाली आहे. आताच पाहा ना. या तुझ्या फोटोसमोर तुझ्याशी संवाद करत बसलो आहे. एवढाच काळ काय तो आल्हाददायक वाटतो, पण नंतर सारं उजाड, अंधारमय होतं...'

दादा आपणच लिहिलेल्या डायऱ्या वाचण्यात विलक्षण रंगून जात. एखाद्या बालकाला अपरिचित पण अपरिमित आनंद देणारं खेळणं मिळालं, की ते जसं त्या खेळण्याबरोबर क्रीडा करण्यात तहानभूक विसरून जातं; अगदी तशीच अवस्था दादांची या डायऱ्यांसंबंधात होत असे. त्यांनी एके ठिकाणी (खरं तर सततच) म्हटलंय,

'आपल्या या हितगुजांची चौथी वही मी वाचत होतो. वाचता-वाचता, आपल्या त्या भूतकाळाशी एकरूप झालो. वास्तवाला विसरलो. आपोआप मोठ्यानं वाचू लागलो. डोळ्यांसमोर ते अतुलनीय जीवन उभं राहिलं. मन सद्‌गदित झालं. हृदय उचंबळून आलं. नकळत डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. जवळजवळ अर्धा तास या समाधिसुखात मग्न होतो. सुदैवानं, माडीवर मी एकटाच होतो. त्यामुळं माझी ही रोमांचित स्थिती कोणाच्या नजरेस पडली नाही. किती आनंद होतो या वाचनामुळे! मग वाटतं, या साऱ्या पुस्तिका अविनाशच्या हवाली कराव्यात. तो रसिक आहे. संवेदनाक्षम आहे. पण नकोच. ही हितगुजं माझी मी वाचण्यात खरी गोडी आहे. अगदी अवी झाला तरी त्यालासुद्धा या प्रत्येक पानातील ओळींमध्ये जो एक अनुस्यूत अर्थाचा गुप्त प्रवाह वाहत आहे तो कसा कळणार? तो फक्त तुला कळणार! पण तू तर ही हितगुजं कधीच वाचू शकणार नाहीस.... तुझा अदृश्य आत्मा ही निवेदनं वाचू शकेल का? कसं कळणार? सूक्ष्मातिसूक्ष्म अवस्था कशी असते याचा बोध होत नाही....

'काही का असेना, औषध घेतल्यामुळं जसे शारीरिक रोग बरे होतात तसं या डायऱ्यांमुळे माझ्या मानसिक व्यथा दूर होतात.'

डायरी लिहिणं हे दादांनी अंगीकारलेलं एक व्रत होतं आणि अत्यंत खडतरपणानं ते त्याचे पालन करत. फाऊंटन पेन चालत नाही, त्याचं टोक, नीफ बिघडलंय अशा अडचणी उद्‌भवल्या तर स्वत:वर चिडून जात. मग एखादं लाल पेन, बॉलपेन ते हाताशी ठेवत. त्यामुळं त्यांच्या ठसठशीत अक्षरांतील नोंदींपेक्षा त्या नोंदी वेगळ्या ओळखून येतात. कितीही ताप असला, अंग मोडून आलेलं असलं, अशक्तपणा असला तरी या व्रतामध्ये ते कधी खंड पडू देत नसत. एकदाच, त्यांच्याकडून त्यांच्या दृष्टीनं अक्षम्य हलगर्जीपणा झाला होता. सुरुवातीच्या काळात डायरी लिहिल्याखेरीज ते अंथरुणाला पाठ टेकत नसत. (नंतर ते आदल्या दिवशीची नोंद दुसऱ्या दिवशी पहाटे लिहीत.) एकदा काय झालं. त्यांच्याच शब्दात -

'रात्रीचे साडेअकरा वाजून गेले होते. दिवसभर लेख-अग्रलेख,

घरातील काही अतिथींचं येणं-जाणं यात वेळ गेला. दमणूक खूप झाली. एकदम झोप आली आणि आता, एकदम खडबडून जाग आली. एक जाणीव अंत:करणात कळ घेऊन उठली. इंदू, अगं, आज दिवसभरात तुझ्याशी संवाद करायला कसा काय विसरलो? ताडकन् बिछान्यात उठून बसलो....'

एखाद्या भक्ताने नित्यपठणाच्या पोथीकडं पाहावं तसं दादा आपल्या या डायऱ्यांकडे पाहत. जुन्या नोंदी वाचताना, ते स्वत:वरच खूश होऊन जात. त्यांनी म्हटलंय-

'मी संवादवह्या पाहात होतो. तू गेल्यानंतरच्या प्रथम स्मृतिदिनाच्या दिवशीची हकीगत किती जीव तोडून मी लिहिली आहे. तू कधीतरी ती वाचणं शक्य आहे का? तू कशी येणार? तुला कसं जमणार? छे, कधीच शक्य नाही ते. मग कशाला मी ही यातायात करतो? का उगीच लेखणी झिजवतो? कागद नासतो? सारे कल्पनेचे खेळ. पण किती गोड कल्पना! तू येशील हा आभाससुद्धा किती सुखदायक! तू येणार नाहीस हे कळत का नाही? पण माया वेडी असते. तिच्या राज्यात निसर्गाविरुद्ध सर्व गोष्टी घडतात...... कल्पनेला इतकं स्वैर सोडता कामा नये. नाहीतर विपरीत परिणाम व्हायचा.'

या संवादवह्यांना जीवापाड जपताना दादांनी म्हटलंय, 'इंदू, तू माझी मार्गदर्शिनी. तू माझी प्रेरकशक्ती. या संवादवह्यांच्या द्वारे तुझ्या स्मृतीचा नंदादीप मी सतत तेवत ठेवला आहे. हा दीप इतरांना प्रकाश देत नाही. फक्त माझी वाट स्पष्ट करतो. अंधार घालवतो....

'यामुळे (म्हणजे संवादवह्यामुळे) मी तुझ्यासाठी काहीतरी करतोय याचं सात्त्विक समाधान वाटतं.'

पुढे, दादा विविध व्याधींमुळे जर्जर होऊन गेले. सावरकर, विनोबाजी या महान विभूतींप्रमाणे आत्मनाश करून घेण्याचं आपल्यात धाडस नाही याची नेहमी त्यांना खंत वाटे. अशा वेळी ते म्हणतात-

'इंदू, जिवंत समाधी घेण्याची क्षमता नाही म्हणून जगायचं. तू नाहीस. मुलांना आता आपल्या आधाराचीही आवश्यकता नाही. आता लिहायची ताकद नाही. हात कापतात. दोन्ही खांदे दुखतात. हात वर

उचलवतपण नाहीत. वाचायला जमत नाही. प्रयत्न करावा तर डोळ्यांत पाणी येतं...... सुख, दु:ख, निंदा, स्तुती यांचं फारसं कौतुक आता वाटत नाही. मरणाची वाट पाहतोय....

'....मरण म्हणजे तुझ्याकडे येण्याचा पासपोर्टच.'

आमच्या आईला स्वत:चा शेवट दिसू लागला तेव्हा तिला काळजी लागली होती ती फक्त दादांची. संपूर्णत: आपल्यावर अवलंबून असणाऱ्या आपल्या नवऱ्याचं 'नंतर' कसं निभावेल याची तिला जशी काळजी लागली होती, जवळपास तशी घोर चिंता दादांना आपल्या चार हजार पानांच्या चोवीस डायऱ्यांची लागली होती. आपल्या 'माघारी' डायऱ्यांचं काय करायचं याची काळजी त्यांच्या अनेक (अखेरच्या) नोंदींमध्ये दिसते. 'दक्षिण महाराष्ट्र' आणि अन्यत्र आलेले शेकडो लेख त्यांनी बिनदिक्कत, निर्मोही मनानं रद्दीत घालून टाकले, मात्र तसं त्यांना डायऱ्यांच्या बाबत करवेना. कसं करतील? कारण या डायऱ्यांच्या पानापानांत त्यांची 'इंदू' होती!

माझ्या धाकट्या भावाची बदली १९८३ मध्ये नागपूर भागातील ब्रह्मपुरी या डोंगरी भागातील स्टेट बँकेत झाली. तेव्हा दादांच्या पुढे दोनच पर्याय होते. एक रवीबरोबर तिकडे जायचं किंवा डोंबिवलीला माझ्याकडे राहायला यायचं. अशा मनस्थितीतील त्यांची एक नोंद अशी आहे.

'इंदु, आपल्या रवीची बदली लांब ब्रह्मपुरीला झाली आहे. आता मला या घरात एकटं राहणं शक्य नाही. एक तर अवीकडे डोंबिवलीला तरी राहिलं पाहिजे नाहीतर रवीकडे ब्रह्मपुरीला गेलं पाहिजे. आपण मोठ्या जिद्दीनं (सांगलीतील) हे घर बांधलं. या घरातील वस्तू-वस्तूंवर तुझा हात फिरलेला आहे. एकेक वस्तू तू मोठ्या कष्टानं जमवली आहेस. त्यामागे सुखदु:खांच्या अनेक आठवणी आहेत. या घराच्या कानाकोपऱ्यात तुझा वावर होता. आता, या घराला सोडून जाण्यास मन तयार होत नाही. पण परिस्थितीपुढे मी हतबल आहे. गौतमबुद्धासारखी माणसं कशी सहजी ऐहिकाचा त्याग करू शकली? इथं कोणत्याच वस्तूची मला आसक्ती नाही पण आपल्या इतक्या संवाद-वह्यांचं मी काय करू? अवीचा ब्लॉक

लहान. त्यामध्ये या संवाद-वह्या कुठं ठेवू? पण या संवाद-वह्या, ही हितगुजं म्हणजे माझा ऑक्सिजन आहे.... .....काय करावं समजत नाही.'

आमचं नशीब दादांनी डायऱ्या टाकून दिल्या नाहीत; एरवी आम्ही केवढ्या अनमोल धनाला मुकलो असतो! त्यांच्याच भाषेत सांगायचं तर या डायऱ्याद्वारे 'मी एक स्वप्नसृष्टीच माझ्यासाठी निर्माण केलीय. जसा काही मी कोणी विश्वामित्रच!'

□

## डायऱ्या - बुद्धिवादी मनाची कुतरओढ

दादांच्या अकरा वर्षांच्या 'संवादा'संबंधी जेव्हा कळलं (अर्थात, त्यांच्या मृत्यूनंतरच) तेव्हा त्यांच्या अनेक परिचितांना आश्चर्य वाटलं. त्याचं स्पष्ट कारण म्हणजे त्यांना दादा बुद्धिनिष्ठ म्हणूनच माहीत होते. ती वस्तुस्थितीही होती. दादा स्वत:ला तर्ककठोर बुद्धिवादी समजत. क्वचित, त्यात भूषण मानत. बाहेर ते एखाद्या विषयावर मतभेद झाले तर वितंडवाद घालत. देवभोळेपणा, अंधश्रद्धा, स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या सामाजिक चालीरीती, राजकारणातील पुढाऱ्यांचा दांभिकपणा अशा अनेक बाबींवर त्यांनी 'दक्षिण महाराष्ट्र'मधून कडाडून टीका केली आहे. त्यांचे विद्यार्थी वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असतानाही, दादांनी त्यांच्यावर शरसंधान केले होते. दादा निःस्पृह होते. त्यामुळेच परखडपणे बोलत. आपल्या शैक्षणिक जीवनात, नंतर भाग घेतलेल्या सामाजिक-सांस्कृतिक कार्यात, दादा बुद्धीच्या कसोटीवर जर एखादी गोष्ट पटत नसेल तर त्याविरुद्ध प्रखर झगडा करत. प्रसंगी एकाकी पडले तरी माघार घेत नसत. ते या गुणामुळेच काही क्षेत्रात मागे पडले. आपण आपल्यामागे ताकद उभी करण्यात कमी पडतो हे जाणवल्यावर ते आपणहून त्या त्या क्षेत्रातून बाजूला झाले; आणि त्यामुळे एकाकी पडले, पण स्वत:च्या बुद्धीला न मानवणारी तडजोड करत बसले नाहीत.

अर्थात, ही गोष्ट बाहेरच्या जीवनातील. कौटुंबिक जीवनात, दादा हळवे होते, मायाळू होते. आईच्या मृत्यूनंतर तर ते कमालीचे हळक झाले होते.

दादांच्या मनावर स्वामी विवेकानंदांचा आणि त्यापेक्षाही रामकृष्ण परमहंसांचा पगडा होता. केशवचंद्र सेन आणि विवेकानंद यांच्यासारख्या तत्त्वज्ञानी व पाश्चिमात्य शिक्षणसंपन्न तरुण मंडळी या अवलियाच्या पाठीमागे का लागतात आणि अशिक्षित असलेला हा पुरुष सर्व शिक्षितांना आपल्या अमृतवाणीनं धर्मतत्त्वं कशी विशद करत असे हे पाहण्याचं भाग्य लाभलं नाही हे आमचं दुर्दैव असं दादांनी म्हटलंय. त्यांच्याविषयी दादांनी एके ठिकाणी म्हटलंय, 'रामकृष्ण परमहंस म्हणत, की आपण ज्या व्यक्तीवर आत्यंतिक प्रेम करतो त्या व्यक्तीच्या माध्यमातून देवाची आराधना करावी म्हणजे देवदर्शन होतं, मोक्ष मिळतो.' देवाविषयी दादा उदासीन होते पण 'माध्यमा'चं प्रेम मात्र त्यांना आकर्षित करत असे! हे माध्यम म्हणजे ते लिहीत असलेल्या डायऱ्या. रामकृष्ण परमहंसांनी म्हटल्याप्रमाणे आत्यंतिक प्रेम असलेल्या पत्नीबरोबर आपला जो संवाद चालतो त्या माध्यमाला एक भक्कम समर्थन मिळाल्याचा आनंद त्यांना नक्कीच झाला असेल.

बुद्धी आणि भावना यांच्यातील झगडा त्यांच्या अंतर्मनात सतत चाललेला दिसतो. मृत्यूनंतरचं जीवन, भटकणारा अतृप्त आत्मा यांविषयी त्यांचं मंथन चालू असे. एका नोंदीमध्ये दादांनी म्हटलंय. '...आत्म्याची आत्म्याशी भेट वगैरे गोष्टी खऱ्या असतील तर असं वाटतं, की अंतराळातून गुप्त रीतीनं इंदू तू इथं यावेस. ही सारी हितगुजं वाचावीस. माझी खात्री आहे, की वाचता वाचता तू, आपण सूक्ष्म जिवात आहोत, अशरीरी आहोत हे विसरशील आणि फिरून त्या जुन्या देहात प्रवेश करण्याचा तुला मोह होईल. निदान या संवाद-वह्यांसह तू मला तुझ्या त्या अज्ञात ठिकाणी घेऊन जाशील आणि मग आपण युगानुयुगं एकमेकांशी बोलत राहू. युगाचा अंत होईल. पृथ्वी फिरून जलमय होईल. जीवसृष्टी नाश पावेल तरी आपण दोघं अमर राहून एकमेकांशी वार्तालाप करत राहू. केवढी अचाट कल्पना पण माझ्यासाठी किती रम्य! निदान कल्पनेचे पंख लावून मी तुझ्या सूक्ष्म जीवासमवेत विहार करू शकतो या गोष्टीतसुद्धा किती विरंगुळा वाटतो!...'

दादांचा किती हा वेडेपणा? एम.ए. झालेला हा पत्रकार. नेहमी स्थिर बुद्धीनं वागणारा माणूस! किती अशक्य कोटीतील विचार करत बसतो? तथापि लागलीच भानावर येत ते पुढे लिहितात-

'...पण मध्येच या स्वैरसंचारात विवेकबुद्धी जागी होते. ती निष्ठुरपणे मला सांगते, 'हे कल्पनेचे तरंग म्हणजे केवळ बुडबुडे. अल्पजीवी आणि मिथ्याभासी. फिरून तुझी अन तुझ्या इंदूची कल्पांतानंतरही गाठ पडणं शक्य नाही. तुझ्या देहावसानानंतर तू शून्य आणि तुझी इंदू शून्य. हीच गोष्ट सत्य आहे. बुद्धीला पटतं. मनाला समजतं, पण हृदयाला पटत नाही गं, इंदू. काय करू?'

दादांच्या डायऱ्या वाचताना मला एका गोष्टीचं फार आश्चर्य वाटलं. ते म्हणजे वारंवार आलेले स्वप्नांचे उल्लेख. एरवी, त्यांनी स्वप्न या विषयावर बोलणाऱ्याची टर उडवली असती, पण डायऱ्यांमध्ये असे शेकडो उल्लेख आहेत. 'इंदू तू स्वप्नात आलीस. आपण अशा विषयांवर बोललो. अमुक प्रसंगात मी असा वागलो पण तू माझी कानउघाडणी केलीस हे फार बरं झालं.' अशा तऱ्हेच्या अनेक नोंदी आहेत. एक नोंद अतिशय हृद्य आहे. ती अशी :

'माझ्या कालच्या स्वप्नात काय दिसलं सांगू? ज्ञानेश्वरी वाचता-वाचता काही अर्थ, जो मला आजवर ज्ञात होता त्यापेक्षा काही तरी वेगळाच आहे असे जाणवलं... डोळ्यांसमोर तो अर्थ स्पष्ट होऊ लागला. मोठाच शोध लागल्यासारखं वाटलं. इतका आनंद झाला, की त्या भरात इंदू, ही बघ काय गंमत झाली म्हणून सांगायला लागलो... आणि एकाएकी जाग आली!'

या उलट 'इंदू, तू हल्ली स्वप्नात का दिसत नाहीस?' म्हणून त्रागा केलेलाही आढळतो. असा प्रकार बराच काळ चालला तेव्हा ते आपल्या संवादात विचारतात, अगदी व्यथित होऊन.

'इंदू, हल्ली तू स्वप्नात का भेटत नाहीस? तुला माझी आठवण येत नाही का? आत्मा देह सोडून गेला म्हणजे पूर्वीच्या देहाच्या बाबतीतील सर्व काही विसरतो का? नवे ऋणानुबंध आपल्याभोवती जमवतो, मग त्या इच्छेवर नियंत्रण करणारी आणखी एखादी शक्ती आहे; ती काय? ती शक्ती तुला आपल्या मनाप्रमाणे वागू देत नाही असं तर नाही? म्हणजे माणूस जिवंत असतानाही पराधीन आणि मृत्यूनंतरही परतंत्र असतो का?'

अशा बऱ्याच रात्री खिन्नपणात जातात. दादा मनोमन अगदी चिडचिडे

झालेले असतात आणि एक दिवस आनंदाचा उगवतो! आई स्वप्नात येते. दादांची समजूत घालते. हल्ली आपल्या इंदूविषयी कोणीच फारसे बोलत नाही. येणारे-जाणारे परिचित, नातेवाईक, मुलं, सुना या सर्वांनी इंदूविषयी एकसारखं बोलावं असं दादांना वाटतं, पण ही गोष्ट नेहमी नेहमी कशी शक्य होणार? दादांना एकाकी, निराधार वाटू लागतं. अशा वेळी, इंदूचं स्वप्नदर्शन झालं की दादा हरखून जातात. त्यावेळची नोंद असते :

'इंदू, आज तू स्वप्नात आलीस. माझी समजूत घालत म्हणालीस, तुम्ही का खिन्न होता? सर्व जग तुम्हाला विसरेना का? पण मी आहे ना? मी अगदी तुमच्याजवळ वावरते. तुम्ही आठवण काढलीत की येते. इंदू, खरंच अशा स्वप्नसृष्टीत असताना, तुझ्या सहवासात मला मृत्यू यावा!'

दादांनी स्वत:च एके ठिकाणी प्रांजळपणे कबुली दिलीय. 'माणूस कितीही बुद्धिप्रामाण्यवादी असला तरी केवळ बुद्धिनिष्ठतेवर तो जगू शकत नाही. भावनेचा मृदू स्पर्शच त्याच्या जीवनाला चेतना देतो.'

एके काळी, स्वप्नांवर फारसा विश्वास न ठेवणारे दादा, आमच्या आईच्या मृत्यूनंतर 'स्वप्न हे सत्य आहे असे मानण्याइतके भावुक झाले. इहलोक आणि परलोक यांचा सांधा जागवणारं स्वप्न एक माध्यम आहे असे ते म्हणू लागले. 'ध्यानी वसे ते मनी दिसे' म्हणून असेल पण त्यांना स्वप्नात सातत्यानं आईचं दर्शन होई. गप्पागोष्टी होत. 'आपली पत्नी स्वप्नात येते ही गोष्ट सत्य आहे; मग स्वप्नांवर विश्वास कसा नाही ठेवायचा?' असं ते स्वत:च एका नोंदीत विचारतात.

पुढे पुढे, प्रकृती फारच खंगली, रात्र रात्र खोकल्याची ढास लागू लागली, प्रोस्टेड ग्लॅण्डचा त्रास वाढला तेव्हा दादांची झोप पार 'झोपी' गेली! थोडीसुद्धा निवांत झोप येईना तेव्हा ते चिडचिडे (अर्थात स्वत:शी) होऊ लागले. झोप न लागल्यामुळे होणाऱ्या शारीरिक त्रासाचा तो त्रागा नव्हता तर त्यामुळे स्वप्नं पडत नाहीत आणि आपल्या इंदुची भेट होत नाही याचं दु:ख मोठं होतं! स्वप्नं पडणार असतील तर केव्हाही रात्री वा दिवसा झोपेची गोळी घेण्याची त्यांची तयारी होती. असं व्हायला लागलं की ते स्वत:ला विचारायचे,

'कधी कधी वाटतं, आपण का लिहायचं? हे शब्द काही तुझ्यापर्यंत पोचणार नाहीत.'

मग अशा वेळी विनमस्क होऊन ते बाल्कनीतील खुर्चीत बसत आणि त्यांचा स्वत:बरोबरचा संवाद चालू होई.

'जूनमधील पावसाळी हवा आहे. संध्याकाळची प्रसन्न वेळ आहे. काळे-पांढरे ढग आकाशात इकडून तिकडे फिरत आहेत... या ढगांच्या आड इंदू, तू कुठे आहेस का? मी असा एकटा विमनस्क मनस्थितीत बसलो आहे हे तुला ढगाआडून दिसत नाही का?...

'मी देवभोळा नाही. अंधश्रद्धही नाही, पण तुझ्याबाबतीत माझं वागणं असं वेडगळपणाचं का?... त्यावेळी सगळी तत्त्वं गळून पडतात... उगाच वाटतं, की आपण पुन्हा भेटणार! फिरून सहजीवनाचा लाभ होणार हे सगळं वाटणं अजिबात तर्कशुद्ध नाही हे उमजतं, पण...'

अशाच दोलायमान अवस्थेत असताना दादांना एका सत्पुरुषाचं भाषण ऐकण्याचा योग आला. त्याबद्दल त्यांनी म्हटलंय-

'मी संवादलेखनाचा एवढा खटाटोप करतोय ते सगळं काही निरर्थक का? परवाच एका योगी पुरुषाचं भाषण ऐकलं. त्यांनी सांगितलं, की काही विशिष्ट सिद्धी प्राप्त करून घेतली तर आपण आत्म्याशी बोलू शकतो. मी मला स्वत:ला बुद्धिवादी समजत असेन पण केवळ तुझ्याशी 'बोलता' यावं एवढ्या एकाच इच्छेपोटी मी त्या 'थिअरी'मध्ये रस घेणार आहे...'

स्वतःला बुद्धिवादी समजणाऱ्या माणसाचा केवढा हा भाबडेपणा? लहानलहान मुलं प्लँचेटच्या खेळात दुसरं काय करतात?

पत्नीबरोबरच्या जवळजवळ चाळीस वर्षांच्या सहजीवनाचा दादांना अभिमान होताच, पण त्याबरोबरच खंतही होती. आपण आपल्या पत्नीची किंमत तिच्या हयातीत पूर्णपणे ओळखली नाही; त्यावेळी तिला आपण अधिक गौरवानं, सन्मानानं वागवायला हवं होतं. तसं आपण न केल्याची बोच त्यांनी डायरीत अनेक वेळा बोलून दाखवली आहे. सहजीवनाविषयीची नोंद करताना दादानी जयप्रकाश-प्रभावतीदेवी, चिंतामणराव देशमुख-दुर्गाबाई, आचार्य जे.बी कृपलानी-सुचेता कृपलानी,

अनिल- कुसुमावती देशपांडे अशा लोकोत्तर जोडप्यांचा उल्लेख मोठ्या गौरवानं केला आहे. कृपलानीचं एक वाक्य दादांना फारच आवडून गेलं होतं. कृपलानींनी लिहिलंय, 'मृत्यूसमयी माणूस परमेश्वराच्या दर्शनाची इच्छा करतो. माझीही तीच मनीषा आहे, पण शेवटच्या क्षणी मला जर माझ्या (मृत) पत्नीची आठवण झाली तर मी परमेश्वराला विसरेन व तिच्या गुणगानात तल्लीन होईन.' दादा जवळपास नास्तिक होते याचा उल्लेख आला आहेच, तरीही त्यांनी एके ठिकाणी असंच म्हटलंय, 'परमेश्वरानं जर अखेरची इच्छा विचारली तर मी सांगीन की या लिहिलेल्या सर्व संवादपुस्तिका, स्मृतिलीलामृताचे भाग स्वर्गात घेऊन येण्यास मला परवानगी द्यावी म्हणजे, इंदू, तुला ते सर्व मी वाचून दाखवीन.'

अशा प्रकारच्या नोंदी वाचल्या की बुद्धिवान माणसंसुद्धा एकटी, एकाकी पडली की किती भाबडी होतात, भावुक होतात याचं आश्चर्य वाटून जातं. जगात असे अनेक विधुर असतील की ज्यांच्या आयुष्यातील जीवनरसच त्यांच्या प्रिय पत्नींच्या मृत्यूनंतर आटून गेला असेल. एकटं पडल्याची कटू जाणीव त्यांच्या अंत:करणात घर करून राहिली असेल, त्यांना क्षणोक्षणी विद्ध करत असेल. अशा मनस्थितीतील एका नोंदीत दादा म्हणतात-

'आता (अवी-रवीच्या) घरांचं ऐश्वर्य बघायला तू नाहीस तर काय अर्थ आहे? इंदू, तू गेल्यापासून स्वामित्वाची, हक्काची भावनाच नाहीशी झाली आहे. एक पाहुणा म्हणून मी घरात (जगतात) वावरतो. पाहुण्याने दुसऱ्याला कंटाळा येईपर्यंत मुक्काम ठेवू नये. आपल्याला हे घर लवकर सोडून गेलं पाहिजे याची सतत जाणीव मी बाळगतो.'

आपण घेतलेलं इंदूच्या स्मृतिजागृतीचं व्रत आपल्या हातून कसं काय अव्याहतपणे चालवलं गेलं याचं दादांनासुद्धा आश्चर्य वाटलं होतं. मुळात नसलेली जिद्द या कामात कशी काय दाखवली याबद्दल त्यांनी स्वत:ची पाठ थोपटली आहे. अर्थात, तोपर्यंत सारं काही संपत आलेलं होतं. त्यांनी म्हटलंय:

'इंदू, आपल्या या सुसंवादाची तेविसावी पोथी संपत आली. ही संख्या पाहिली म्हणजे माझं मलाच आश्चर्य वाटतं. उभ्या आयुष्यात

एवढा एकच नियम मी सातत्याने व निरलसपणं पाळला. दररोज तुझ्याशी संवाद करतो याला काय नाव द्यावं हेच कळत नाही. हे एक व्रत आहे का हा एक यज्ञ आहे, का हे एक तप आहे, काहीच सांगता येत नाही. रोज ज्या घटना घडल्या त्या तुझ्या कानावर घालायच्या... विवेकाच्या निकषावर हे माझं करणं वेडेपणाचं आहे हे कळत का नाही? पण मानवी व्यवहारात काही भाग वेडेपणाचा, अव्यवहार्यतेचा, अचाटपणाचा असतो, त्यातलाच हा एक प्रकार. आता दृष्टी अधू झालीय... या सर्व पुस्तिका माझ्या हातून फिरून वाचून होणं अशक्य आणि माझ्या मृत्यूनंतर या चोपड्या निर्माल्यवत्."

एका बुद्धिवादी माणसाचा केवढा हा भावनाकल्लोळ? आमच्या आईच्या मृत्यूनंतर दादांचं जगणं दोन स्तरांवरचं होतं. आम्हांला व जगाला त्यांचं जे जगणं दिसलं ते पत्नी गेल्यानंतर पतीच्या वाटेला जे एक प्रकारचं स्वाभाविक जिणं असतं तसं होतं. दीनवाणं आणि बापुडवाणं म्हणावं अशा तऱ्हेचं ते जिणं होतं. दुसऱ्या स्तरावर ते जे जगले ते केवळ अलौकिक होतं. सर्वसामान्य माणसाच्या कल्पनेपलीकडचं ते जगणं होतं. रात्री पडणाऱ्या स्वप्नात आणि जागेपणी पाहात असलेल्या दिवास्वप्नात ते मश्गुल असत. त्याचेच अनेक मनोहारी आविष्कार त्यांच्या 'संवादा'मध्ये उमटत असत. एके काळी आपण स्वप्नांची टिंगलटवाळी उडवत होतो याची कबुली त्यांनी स्वतःच अनेकवार दिली आहे. तेच दादा एके ठिकाणी म्हणतात.

'स्वप्न हा दरिद्री माणसाजवळ असलेला 'परीस' आहे. विश्वामित्राची सृष्टी स्थापन करण्याचं सामर्थ्य त्या स्वप्नात आहे. या स्वप्नाच्या नगरीत तो गेला म्हणजे कटू वास्तवाला विसरतो,'

दुसऱ्या एके ठिकाणी ते लिहितात. 'इंदू, काल एक स्वप्न पडलं. तू रिक्षातून येत होतीस. मी रिक्षाचा आवाज ऐकून बाल्कनीत आलो. रिक्षातून तू हात केलास. मीही आनंदाने हात केला आणि तेवढ्यात जाग आली. इंदू, असा राग आला मला या जागा होण्याचा! पण काय करू गं? झोप येणं, स्वप्न पडणं व जागं होणं या तिन्ही गोष्टी माझ्या हातात नाहीत. स्वप्नं पडतात, तुझ्याविषयीची स्वप्नं पडतात. तू जाऊन बराच काळ झाला तरी

तू स्वप्नात येतेस. केवढे भाग्य आहे! केवढं ऐश्वर्य! जीवन असं स्वप्नमय सृष्टीत मला जगता येतं याहून अधिक मागणं तरी काय मागायचं? मृत्यूनंतरचं आपलं सहजीवनच म्हणायचं.'

वरील प्रसंगी दादांना स्वप्नातून अचानक जाग आली. स्वप्न अर्धवट राहिलं म्हणून जाग आली, पण पुढे आजारपण वाढलं तेव्हा आपल्याला स्मृतिभ्रंशाची व्यथा जडलीय असं त्यांना वाटे. एका नोंदीत दादा म्हणतात-

'इंदू, काल वाचता-वाचता कधी झोप लागली ते कळलं नाही. एक स्वप्न पडलं. स्वप्नात तू दिसलीस. प्रसन्न वाणीनं, हसतमुखानं माझ्याशी बोलत होतीस. विषय काय होता आठवत नाही. पण काही तरी मला आवडण्याजोगा होता खचित. जागा झालो ते संतुष्ट मनस्थितीत. स्वप्नात काय पाहिलं, तू कशी बोलत होतीस, विषय काय होता याचं स्मरण करू लागलो पण काही केल्या आठवेना. वाईट वाटलं. स्मरणशक्ती अशी दगा का देते ते कळत नाही... झोपल्यावर फिरून स्वप्न पडलं. स्वप्नात मी खूप घाबरलो होतो. 'इंदू' म्हणत मी टाहो फोडला अन् एकदम जागा झालो. फिरून तोच स्मृतिभ्रंश. काऽही आठवत नाही. सारं काही शून्य. मोठी चमत्कारिक अवस्था झाली आहे माझी...'

आणखी एके ठिकाणी नोंद आहे, 'इंदू, खूप दिवस तापानं फणफणलोय. काल रात्री तुझ्या फोटोसमोर उभा राहिलो आणि म्हणालो, 'इंदू, गेले पंधरा दिवस मी आजारी आहे. तरी जिद्दीनं थरथरत्या हातानं संवादलेखन चालू ठेवलंय, पण तू मला विसरलीस काय?... म्हणजे आता स्वप्नातही तुला पारखा झालो की काय?' एक स्मित हास्याची लकेर तुझ्या चेहऱ्यावरनं चमकून गेल्याचा भास झाला. आणि,... आणि खरंच तू भेटलीस. जवळजवळ तासभर तरी आपण गप्पा मारल्या असतील पण विस्मयाची गोष्ट म्हणजे आपण काय बोललो हे स्मरणशक्तीला ताण देऊनही आठवत नाही! तरी पण तू स्वप्नात दिसलीस हा केवढा आनंद आहे! या गोष्टीला आता मी चमत्कार म्हणत नाही. मृतात्म्याशी संवाद साधण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्वप्न अशी माझी खात्री झाली आहे. स्वप्नातून जागा होऊन पुन्हा झोपलो. काय गाढ झोप

लागली म्हणतेस? सकाळी चारू, अजून दादा का उठले नाहीत म्हणून माडीवर आली तेव्हा मला जाग आली. कित्येक दिवसांत अशी गाढ झोप लागली नव्हती.'

स्वप्नांच्या बाबतीत त्यांना काही असे अनुभव आले, की 'स्वप्न' या प्रकाराचा शोध घ्यावा, त्या विषयावरची पुस्तकं मिळवून वा एखाद्या अधिकारी पुरुषाला भेटून त्याचा अभ्यास केला पाहिजे असे त्यांना वाटू लागलं होतं. एक नोंद अशी आहे.

'इंदू, स्वप्नाविषयी आता मला जरा गंभीरपणे विचार करायला हवा. तू स्वप्नात दिसतेस म्हणून मला स्वप्नाविषयी आकर्षण, पण काल मला एक वेगळाच अनुभव आला. अप्पासाहेब पंत यांच्या एका पुस्तकाचा उल्लेख मागे मी डायरीत केला होताच. त्यात आलेल्या एका जर्मन शब्दाच्या अर्थाविषयी आणि उच्चाराविषयी मला काही समजत नव्हतं. डिक्शनऱ्या बघून झाल्या. आपल्या मा. स. मराठे यांच्याबरोबर चर्चा झाली. तो अलिकडे जर्मन भाषेचा अभ्यास करत आहे. गंमत म्हणजे काल स्वप्नात त्याचा अचानक उलगडा झाला. हा चमत्कार काय असावा? एखाद्या गोष्टीचं ज्ञान स्वप्नात व्हावं हे किती विलक्षण आहे! मागे 'ज्ञानेश्वरी'च्या ओवीचा एक वेगळाच गूढार्थ स्वप्नात कसा माझ्या लक्षात आला ते तुला मी सांगितलं होतंच. मानवी जीवन आणि स्वप्न यांचा काही अतूट संबंध असला पाहिजे. कदाचित या माध्यमातून तू मला संदेश पाठवायचा प्रयत्न करत असशील. चमत्कारावर विश्वास ठेवणारा मी नाही हे तुला माहीत आहेच, पण स्वप्नात काही गोष्टी अशा जाणवतात की विश्व व मानव यांचा काही अनाकलनीय संबंध असावा असं माझं मत होऊ लागलं आहे. खरं म्हणजे मीच माझ्या स्वार्थासाठी यावर संशोधन करायला हवं, पण तितकी चिकाटी, उत्साह आता माझ्यात उरला नाही आणि फार चिकित्सा करण्याची मला जरुरी भासत नाही. तू स्वप्नात मला भेटतेस एवढ्या गोष्टीवर मी संतुष्ट आहे. एक मात्र खरं. देवाधर्मावर अंधविश्वास ठेवणारे लोक चमत्कारावर इतके का भाळतात याचा बोध मला आता होऊ लागला आहे.'

स्वप्नाबाबतची दादांची एक नोंद मजेशीर आहे. 'इंदू, काल गंमत

झाली. काल स्वप्न पडलं पण त्यात तुझं नाही तर चक्क लोकमान्य टिळकांचं दर्शन झालं! ते येरझारा घालत कुणाला तरी अग्रलेखाचा मजकूर सांगत होते. मी कोपऱ्यात उभा होतो. सांगता सांगता, एकदम माझ्यासमोर आले. त्यांना Dominance या शब्दाला प्रतिशब्द पाहिजे होता. सुटसुटीत, मराठी प्रकृतीला शोभण्याजोगा. शेवटी 'वरचढपणा' या मराठी शब्दावर ते खूष झाले!'

वास्तव परिस्थिती, आपल्या मनातील विचारप्रवाह यांचा कुठेतरी मेळ घडून त्याचं प्रत्यंतर कधी कधी स्वप्नातून होत असावं. दादांनी दिलेल्या एका स्वप्नाची हकीगत अशीच काहीशी आहे. दादा एका नोंदीत लिहितात-

'इंदू, काल रात्री बाराचा सुमार असेल. एक भयानक स्वप्न पडलं. आपण दोघं काहीतरी भयानक प्रसंगात सापडलो होतो. कोणी तरी दोन भयानक माणसं, दरोडेखोर होते की आणखी कोण ते आठवत नाही. आपल्याला पकडून नेणार होते. आधी कोणाला पकडून नेऊ असं विचारत होते. मी त्यांना म्हटलं, की आमची मुलं आजोळी गेली आहेत. त्यांना आम्ही भेटून येतो, मग आम्हाला पकडा. थोड्या नाखुषीनं का होईना पण त्यांनी संमती दिली. पण तू म्हणालीस, 'नाही, तसं नको. आम्हांला पकडून नेण्याचा तुमच्याकडे हुकूम आहे तर आम्हांला घेऊनच चला.'' तो शेवटचा निरोप, आल्या हाकेला 'ओ' देण्याची ती कर्तव्यतत्परता, ते केविलवाणे बोल, ती असहाय्यता, याचे भेटीच्या अंतिम क्षणी वियोग घडवून आणणारं ते दृश्य पाहणं नको. इंदू, त्या स्वप्नाचा अर्थ मला कळला! मला एकदम स्मरलं. तू आमचा शेवटचा निरोप न घेता गेलीस याचं कारण हेच असावं. आयुष्यातील तुझी प्रत्येक कृती विचारपूर्वक असायची. अविचारी भावना नाही. विवशता नाही. एकदा आलेलं दुखणं असाध्य आहे हे कळल्यावर तू निश्चयी बनलीस. तुझी चलबिचल संपली. आल्या संकटाला धैर्यानं तोंड देण्याचा तू निश्चय केलास व तो पूर्णत्वाला नेलास. इतरांच्या दृष्टीला सामान्य स्त्री तू. तुझ्या अंत:करणाची खोली, उदारता इतरांना कळणं शक्य नाही, पण मला तुझी योग्यता प्रथमपासून कळली. असामान्यांचे गुण घेऊन सामान्य रूपात तू

प्रवेश केलास. त्यामुळे तुझ्या अलौकिक गुणांचा बोलबाला झाला नाही.'

दादांची ही नोंद मला फार चटका लावून गेली. दु:खद आठवणींचे कढ अनावर झाले. दादांच्या स्वप्नाची हकीगत थेटपणे आमच्या आईच्या कॅन्सरच्या दुखण्याशी निगडित आहे. स्वप्नातील ती भयानक माणसं म्हणजे यमदूतच. त्यावरून आमच्या लहानपणीच्या अनेक आठवणी आल्या. आई, दादा, मी व माझा भाऊ रवी असं आम्हां चौघांचं एक अभेद्य कुटुंब आहे. आम्ही एकमेकांशिवाय जगूच शकत नाही अशा काही भावनेचा आम्हा भावाभावांवर विलक्षण पगडा होता. किंबहुना, आईनेच तशी आमच्या मनाची जडणघडण केली होती असं म्हणानात. प्रत्यक्ष यमराज समोर आला आणि तुमच्यापैकी एकाला घेऊन जाणारच असं म्हणू लागला तर 'आधी मला ने' अशीच आमच्यात भांडणं लागतील असं आई आमच्या एकोप्याचं वर्णन करी, तेव्हा मी अगदी भारून गेलेलो असे. कारण मी मोठा होतो व रवी लहान होता. पुढे मोठेपणी आईला कॅन्सर झाला. आम्ही सगळे हादरून गेलो. घशावाटे काहीही गिळता येत नाही, उपासमार होऊ लागली तेव्हा नाईलाज म्हणून आईच्या पोटाला भोक पाडून एक नळी बसवावी लागली. स्टोव्हमध्ये फनेलने रॉकेल भरावे तसं एक गाळणं घेऊन त्यातून दूध, नारळाचं पाणी वा अन्य द्रव पदार्थ आईला भरवावे लागत. आईला बिचारीला स्वत: काही करता यायचं नाही. इतर कोणाकडून करवून घ्यावं तर विलक्षण संकोचास्पद अशी आईची अवस्था व्हायची. कोणी बाईमाणूसच ते काम करू शकत होती. घरात माझी मावशी-ताई होती, पण वृद्ध होती. रवीची बायको, चारू कोल्हापूरला पहिल्यावहिल्या बाळंतपणासाठी गेली होती. माझी बायको, सुमन, स्वयंप्रेरणेनं दोन लहान मुलं घेऊन तब्बल सहा महिने आईची सेवाशुश्रूषा करण्यासाठी डोंबिवलीहून सांगलीला येऊन राहिली होती. आणखीही राहिली असती पण आमच्या आईने निग्रहानं तिला डोंबिवलीला परत पाठवलं. 'आईची प्रकृती आता सुधारत आहे, चारू आता कोल्हापुरातून लवकरच परत येईल, तेव्हा तुला आता डोंबिवलीला परत जायला बिलकुल हरकत नाही' असं इतरांकरवी तिनं सुमनला पटवून दिलं; इतकंच नव्हे तर आमच्या फॅमिली डॉक्टरांनाही सुमनला तसं सांगायला लावलं. इतकं झाल्यावर बिचारी सुमन डोंबिवलीला परतली.

अगदी जड अंत:करणानं आणि पंधरा दिवसांनीच आईने इकडे प्राण सोडला! ''पकडून आणायचा तुमच्याकडे हुकूमच आहे तर मुलं आजोळी आहेत. भेटून येतो. तोवर थांबा'', असं काहीही न सांगता निग्रहानं आई संकटाला सामोरी गेली. असं जे काही दादांनी त्या भयानक स्वप्नांची नोंद करताना म्हटलं आहे त्यामागे अशी पार्श्वभूमी आहे.

स्वप्नंच, पण अगदी पोटातलं किती खरं सांगून जातात!

❐

## सहजीवनाचे उमासे - इंदुविलाप

आमच्या आई-दादांचा विवाह झाला तो १७ जानेवारी १९३६ रोजी. त्या उभयतांची इहलोकीची ताटातूट झाली ती १७ सप्टेंबर १९७४ रोजी, आईच्या झालेल्या निधनाच्या दिवशी. म्हणजे लौकिक अर्थाने त्यांचं सहजीवनं एकोणचाळीस वर्षांचं. त्यानंतर सुरू झालं ते त्यांचं अलौकिक सहजीवन. त्या सहजीवनाचा अंत झाला ती 'अलौकिकाची पालखी' आम्ही भूतलावरच्या भोयांनी दादांच्या अखेरच्या प्रवासासाठी उचलली तेव्हा. तो दिवस होता २१ जुलै १९८५. म्हणजे व्यवहाराच्या कोणत्याही कोष्टकात न बसणारं आई-दादांचं सहजीवन उण्यापुऱ्या अर्धशतकाचं झालं. त्या शारीर आणि अशशिर सहजीवनाचे उमासे, निःश्वास, उद्रेक शब्दरूप घेऊन उमटलेत ते कागदाच्या चार हजार पृष्ठांच्या. आपल्या प्राणप्रिय 'इंदुमती'साठी एका पतीने केलेला तो 'अजविलाप'च आहे. त्यातील आर्तता, विरहवेदना जाणवतील त्या संवेदनाक्षम मन असलेल्या जाणकारालाच.

या चार हजार पानांमध्ये आणि तब्बल अकरा वर्षांइतक्या प्रदीर्घ काळात दादांनी एकच एक राग आळवला आहे. त्याचं नाव 'राग इंदुमती'. संगीतातील रागांच्या गायनाचा विशिष्ट वेळा असतात. सकाळचा राग, दुपारचा राग, रात्रीचा राग. 'राग इंदुमती'ची वेळ म्हणजे रात्रीचा शेवटचा प्रहर किंवा पहाटेचा पहिला प्रहर. भीमसेनजी वर्षानुवर्षे शुद्ध कल्याण किंवा यमन-कल्याण आळवतात. तोच तो राग पुनःपुन्हा आळवला

तरी ते त्या त्या रागांच्या सूक्ष्म, अतिसूक्ष्म अशा किती छटा दाखवतात. सारी संगीताची दुनियाच सात सुरांवर आधारलेली. त्यामुळे तेच ते स्वर पुनःपुन्हा कानांवर पडणारच. त्याला इलाज नाही. दादांनी एकच 'इंदुमती' राग वर्षानुवर्षे आळवला. त्यामुळे पुनरुक्ती अनिवार्य आहे. त्यातील सहजीवनाविषयीचे आणि त्याबरोबरच येणारे कौटुंबिक जीवनाविषयीचे काही 'तुकडे' दादांनी जसे आळवले तसे सलगपणे उद्‌धृत करत आहे. अर्थात या नोंदी कालक्रमानुसार नाहीत.

आपल्या सहजीवनासंबंधी खुद्द दादांनी म्हटलंय-

'इंदू, आपण एकत्र घालवलेल्या दिवसांची आठवण झाली आणि त्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या संसारजीवनाचं यथार्थ शब्दांत, सुरेख अर्थगर्भ शब्दांत कसं वर्णन करावं याचा विचार करू लागलो तो कवी सूर्यकांत खांडेकरांची एक कविता वाचनात आली. त्या कवितेत तुझ्या-माझ्या जीवनाचं प्रतिबिंब पडलं आहे. कवी म्हणतो,

*'तुझ्या माझ्या संसारात। खेळ ऊन-सावलीचा।*
*कधी सुख कधी दुःख। असा खेळ गमतीचा।*
*नाही वैभवाचा थाट। नाही शोभा जरतारी।*
*भोळ्या प्रेमभावाची ही। वाजे गोड एकतारी।*
*साधे बोलणे वागणे। साधे हसणे खेळणे।*
*साधेपणात आपुल्या। जीवा भावाची मीलने।*
*तुझे मन, माझे मन। दोन मने भाव एक।*
*तुझे डोळे माझे डोळे। प्रतिबिंबी एकमेक।*
*तुझ्यामाझ्या जीवनात। खेळ ऊनसावलीचा।*
*प्रेम प्रकाशी उजळे। प्रसाद या जीवनाचा।'*

'इंदू, ते गतजीवन आठवलं म्हणजे त्यात रमावं, त्यात विलीन व्हावं आणि तिथंच जीवानं चिरविश्रांती घ्यावी असं वाटतं.'

'इंदू, आज मंगळवार. हा दिवस मी कसा विसरेन? याच दिवशी गेल्या महिन्यात तुझी प्राणज्योत मावळली आणि माझी जिवंत मृत्यूची वाटचाल सुरू झाली. हा दिवस सतत स्मरणात राहावा म्हणूनच मी

आता मंगळवारचा उपास सुरू केला.'

'इंदू, तू पहाटे झोपेतच गेलीस हे फार बरं झालं. तू शुद्धीत असतीस, एक हात एका मुलांच्या हातात, दुसरा हात दुसऱ्या मुलाच्या हातात, तुझं मस्तक माझ्या मांडीवर अशा अवस्थेत मृत्यू आला असता तर तुझा प्राण घोटाळत राहिला असता. शेवटचं बोलायचं आहे, पण बोलता येत नाही अशी अवस्था आम्हाला आणि तुला क्लेशकारक झाली असती. तू केविलवाण्या नजरेनं अंतकाळी माझ्याकडं पाहिलं असतंस तर ती असहाय्य नजर मी कधीच विसरू शकलो नसतो. त्या नजरेच्या आठवणीनं मला जन्मभर अस्वस्थ केलं असतं. सतत तळमळत ठेवलं असतं. कुणास ठाऊक हा सारा विचार करूनच तू अकस्मात प्राण सोडलास का?'

'इंदू, काल बराच वेळ विचार करत होतो. तुला कॅन्सर झाला हे कळल्यावर तू निराश झाली होतीस का, मरणास सिद्ध होतीस का, यातून आपण वाचत नाही अशी तुझी खात्री होत चालली होती का? हे प्रश्न पुष्कळ वेळ मनात घोळून तुझा त्यावेळचा जीवनक्रम नजरेसमोर आणतो व अप्रत्यक्ष सूचना देऊन मृत्यूविषयी काही बोलत होतीस का हे आठवू लागलो, पण तू मरणाविषयी एकही उद्गार कधीही काढला नव्हतास. निराश तर मुळीच दिसत नव्हतीस. डॉक्टर जी जी इंजेक्शन देत ती तू विश्वासानं, आपणास बरं वाटेल या उमेदीनं घ्यायचीस तर कोणी वैद्यांनी औषधं सुचवली तर ती घेण्यास तू कंटाळा करत नसेस, घरगुती औषधांचा उपयोग करून पाहण्यासही तू सदैव सिद्ध असेस. याचा अर्थ जगण्याची, संसार करण्याची आशा होती, असं का? आमचा निरोप घेण्याच्या आधी दोन-तीन दिवस तू डॉक्टरांना माझा आवाज का उमटत नाही, घशास घरघर का वाटते, काही चांगलं औषध द्या बघू असं म्हणाली होतीस. तुला मृत्यू कळला नव्हता का, म्हणजे इतका अगदी जवळ आलेला. एरवी, सुमन-अविनाशवर तुझा एवढा जीव, त्यांना तार करून बोलावून घ्या असं म्हणाली असतीस.... काही कळत नाही. सहा महिने मनोभावे

शुश्रूषा करणाऱ्या सुमनला तू आग्रह करून, आपणहून डोंबिवलीला परत पाठवलंस... अजिबात गिळवत नसतानासुद्धा माझ्याबरोबर चहा घेण्याचा जो अभिनयाचा फसवा प्रकार करायचीस, तसं तर नव्हतं?

'इंदू, तुझी मुलं, सुना कशा मनकवड्या आहेत बघ. सुमनचे डोंबिवलीहून पत्र आलंय. दिवाळीला डोंबिवलीलाच या म्हणून. तू गेल्यानंतरची ही पहिलीच दिवाळी.... या आपल्या सांगलीच्या घरात तुझ्याविना दिवाळीची कल्पनाही सहन होत नाही, पण मुंबईला तरी मी का जावं? माझ्या सुमन-अवीला दिवाळी करावी असं कधी चुकून तरी वाटेल का? पण मंजा-मकू लहान आहेत. त्यांच्या आनंदावर मी कसं विरजण घालू? पण इंदू, तुझी सून शहाणी आहे. सुमन लिहिते की ह्यांना दोन दिवसांची दिवाळीची सुट्टी आहे. जोडून रजा घेतील. आपण कुठंतरी बाहेरगावी जाऊ. वाटल्यास लोणावळा-खंडाळा करू. कार्ल्याची लेणी मी पण अजून बघितलेली नाहीत. ही कल्पना चांगली आहे. घराघरातून फटाके वाजत असताना, फुलबाज्या उडत असताना आपण कुठंतरी दूर असावं हे उत्तम आणि ते दूर असणं जर डोंगरदऱ्यांच्या सहवासात असेल तर किती छान! माझ्या मनात अगदी हेच होतं पण एकट्यानंच जावं असं होतं. पण मुलं तशी मला जाऊ द्यायची नाहीत. चारू-रवीला हलताच येणार नाही. मंदार अजून तीन महिन्यांचापण झाला नाही.

'इंदू, मला जपण्यासाठीच चाललंय सगळं!'

'इंदू, आज आपल्या जुन्या शिवाजीनगर (सांगलीच्या) भागात माझे मित्र माधवराव घाटे आजारी आहेत म्हणून त्यांना भेटावयास गेलो होतो. येताना डिग्रजकर आपट्यांचा (आपले 'आनंद' सिनेमावाले) बंगला लागला. जुन्या स्मृती जाग्या झाल्या. तिथं सुरुवातीला आपलं बिऱ्हाड होतं. त्या बंगल्याच्या पुढील बाजूच्या दोन खोल्या, तुझा तो चिमुकला मांडलेला व्यवस्थित संसार! घरात खुर्ची नाही. टेबल नाही.... नंतर त्या संसाराला येत असलेलं साजरं स्वरूप. बेबीच्या वेळेला तुला दिवस गेलेले. किती त्रास व्हायचा तुला! त्यातून ती शाळा. दिवस गेलेली

शिक्षिका म्हणजे अनेकांच्या कपाळावर आठ्यांचं जाळं. अशा त्या अडचणींच्या दिवसात माझा बेचाळीस दिवसांचा टॉयफॉईड! त्या काळी त्या टॉयफॉईडची पण किती भीती वाटायची? तुझी पळापळ. आपल्या मालकीणबाई कमलाबाई आपटे आणि शेजारचे क्रीडाशिक्षक भोसलेमास्तर (विजय हजारेंचे गुरू). त्या दोन्ही कुटुंबांनी धीर देऊन आपला केलेला सांभाळ. मी बरा होत चाललो तसतशी तुझ्या उत्साहाची उमलत जाणारी कळी....सारं सारं आठवलं. इंदू, तो काळ आपल्या खूप अडचणींचा होता. आज समृद्धीचा काळ आहे, पण तो तुझ्या सहवासातील खडतर काळच हवाहवासा वाटतो.'

'इंदू, आज १४ जानेवारी. मकरसंक्रांत. अगदी मागचा काळ आठवतो. तो डिग्रजकर बंगला. पहाटेची थंडी. शेगडी फुलली आहे. मांडीवर आपली बेबी आहे. मंदाग्नीवर ठेवलेली ती छोटी कढई. त्यात असलेले हलव्याचे छोटे छोटे दाणे. शेजारी ते पाकाचं पातेलं. चमच्या-चमच्यानं पाक घालणं. उमलू लागलेला हलव्याचा दाणा. इतक्यात मी चहाचा कप तुझ्या हातात देतो. प्रसन्नवदनावरील हास्य. गप्पागोष्टी करत आपण चहाचा आस्वाद घेतोय.....

'ते स्वप्न आता विरून गेलंय. ते वास्तव होतं का स्वप्न होतं असा संभ्रम पडत आहे. नंतर आठवतात त्या गुळाच्या खुसखुशीत पोळ्या. अगदी कडेपर्यंत गुळाचा थर गेलेल्या. न चुकता त्या दिवशी राजमतीच्या घरी गुळाच्या पोळ्या पाठवण्याचा तुझा क्रम. नेमगौंडाला फार आवडायच्या. कधी कधी, राजमती गुळाच्या पोळ्या करू लागली की नेमगौडा सांगायचा, 'इंदू पोळ्या करते तशा कर.'' तसंच त्या तिळाच्या वड्या. किती खुशखुशीत! पेढा खातो आहे असं वाटायचं आणि मग संध्याकाळी आपल्या दोघांचं ते गणपतिमंदिराकडे जाणं. जणू स्वर्ग पृथ्वीवर अवतरलाय असा भास व्हायचा. कोण म्हणतो संसार असार आहे? संसार करण्यात गोडी आहे, लज्जत आहे; मात्र करणाऱ्यांची मनं सुजाण, रसिक व संतुष्ट पाहिजेत. इंदू, आज सकाळी श्रद्धेनं तुझा 'गीतरेखा' काव्यसंग्रह काढला. शेवटची कविता, 'तिळगूळ घ्या' अगदी अखेरपर्यंत वाचली... 'भिन्न

मतांना मुरड घालुनि। जुळते मिळते, नमते घेऊनि। धरू अंतरी निसर्गवाणी। हाच मार्ग ही अमृतवाणी', इंदू, हा अमर संदेश देऊन तू निघून गेलीस. एकटीच. मला मागं ठेवून.'

'इंदू, आज १७ जानेवारी. आपल्या लग्नाचा वाढदिवस. हा दिवस मी कसा विसरीन? या दिवसानंच मला 'सोन्या'चे दिवस दाखवले. तू कोण, मी कोण, कसं आपण एकत्र आलो? याला काय योगायोग म्हणायचं? मात्र आपला संयोग किती शुभ्र,किती मंगल, किती लाभकारी! एकाविना दुसरा शून्य. दोन एक म्हणजे सर्वस्व. आपलं जीवन म्हणजे एक सहकार, एक यज्ञ, एक संसार. आता तू गेलीस. मी राहिलो. म्हणजे शून्य, नगण्य. मी काही करू लागलो म्हणजे वाटतं, काय करायचं करून? काय करायचं जगून? आता वाटतं, मृत्यू आपली दोघांची ताटातूट करणार आहे हे अगोदर डोक्यात ठेवलं असतं तर दोघांनी आपापल्या मनीषा पुऱ्या केल्या असत्या, निरवानिरव केली असती, मी कसं वागावं याचं मार्गदर्शन झालं असतं. आता मात्र मागचं काही आठवेनासं झालं आहे. भविष्यकाळ अस्पष्ट व धूसर झाला आहे. भूतकाळात रमावं असं वाटतं, पण त्या काळाची चित्रं पुसट, फिकट व अंधुक होतात. म्हणजे भूतकाळ नाही, वर्तमानकाळ नाही आणि भविष्यकाळाचीही आशा नाही. अगदी त्रिशंकू झालो आहे मी. मात्र जगतो आहे. शेळ्या, मेंढ्या, कुत्री नाही का जगत? ते जिणं. नको असलेलं. नीरस, रूक्ष व हेतुशून्य. का जगवतो मृत्यू अशा परिस्थितीत!

'इंदू, आपल्या लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्तानं मन ढवळून निघालं. आता त्या जुन्या काळाविषयी मुलांकडे तर काही बोलता येत नाही. अगदी राहवेना म्हणून संध्याकाळी फिरत फिरत तात्या मास्तरांच्या घरी गेलो. ''या बाजूला आलो होतो म्हणून डोकावलो'' असं बळंच सांगितलं! वहिनीपण भेटल्या. दोघं आता खूप थकलेत. खूप गप्पागोष्टी झाल्या. अगदी माझ्या मनासारख्या. त्या दोघांनाही बरं वाटलं आणि मला तर खूपच. कारण तिथं गेलं की तुझ्या साऱ्या आठवणी दाटून गोळा

होतात. आपण आठ-दहा माणसं नरसोबाच्या वाडीला गेलो आणि तिथल्या पुजाऱ्यानं आपलं लग्न लावलं. ना बँड, ना वाजंत्री, ना गर्दी, ना गोंधळ. निदान तुझी भावंडं तरी होती. मला कुणीच नव्हतं. तात्यांनी आपलं लग्न जमवलं. मी तयारच नव्हतो. सासरच्या घरी म्हणून तू माप ओलांडलंस ते या तात्यांच्या याच घरात! तसं पाहिलं तर तात्यांचा आणि माझा काय संबंध? ते शाळेचे हेडमास्तर आणि मी त्यांचा मदतनीस. पण तो काळ, ती माणसं फार वेगळी होती. माणुसकी, स्नेहबंध हे त्यावेळी विशेष मानले जात. तू सासुरवाशीण म्हणून या घरात आलीस. तात्या-वहिनींना किती आनंद झाला? किती प्रेमानं त्यांनी आपलं स्वागत केलं!

'इंदू, आज १९ मार्च. याच दिवशी आपली बेबी गेली. किती चुणचुणीत मुलगी होती. गोड बोलायची. डॉ. हेरेकरांना खूप आवडायची. ते दवाखान्यात आले की आधी टिळकांची बेबी आली आहे का म्हणून चौकशी करायचे. तुझ्या मांडीवर असताना, अवी पाळण्यात उठून रडायला लागला की पटकन ती मांडीवरून उठायची आणि म्हणायची, ''इंदुताई, आधी त्या वाघोबाला घे.'' आपण त्याला वाघोबा म्हणायचो. बेबीनं कधी आपल्याला आई, बाबा म्हणून हाक मारलीच नाही. तुझी सुशी-नाना ही भावंडं जसं आपल्याला इंदुताई, भाऊसाहेब म्हणत तसंच तीही म्हणे. जरा मोठी झाल्यावर आई-बाबा म्हणायला शिकवू असा आपल्या दोघांचा विचार पण तशी वेळ आलीच नाही. चौथं वर्ष पुरं व्हायच्या आधीच काळानं तिला आपल्यातून ओढून नेलं. त्या दिवशी होळी पौर्णिमा होती. बाहेर सगळे लोक दोन्ही हात तोंडावर ठेवून आरडाओरड करत होते. त्या संध्याकाळी बेबीचं थोडं जास्ती झालं होतं म्हणून मी बेळगावच्या आपल्या डॉ. हेरेकरांकडे गेलो होतो. तुझ्या मांडीवर बेबी आचके देऊ लागली. तू मोठ्यानं शेजारच्या वहिनींना हाक मारत होतीस, पण बाहेरच्या गोंगाटात तुझी हाक ऐकू कशी जाणार? तू तशीच बेबीला खाली ठेवून शेजारच्या वहिनींना बोलावलंस. त्यांनी दत्तोपंत जोशींना निरोप पाठवला. तू पळत येऊन बेबीला मांडीवर घेतलंस. आजुबाजूची मंडळी गोळा झाली. सगळ्यांना कळलं, पण

मांडीवरच्या बेबीनं केव्हाच प्राण सोडला होता.... ते सगळं आठवलं. आपल्या सहजीवनातलं ते पहिलंच मोठं दु:ख आपल्याला फार हादरवून गेलं. तुला तर फारच मानसिक त्रास झाला. शहापूरचा तो चिखल, कुंद हवा, पाण्याचे हाल यामुळे तुला खूप त्रास झाला. शेवटी, बऱ्याच खटपटीनंतर आपल्याला सांगलीत बदली मिळाली.'

'इंदू, आज सकाळी 'दैनिक राष्ट्रशक्ती'मध्ये आपले बाळकृष्णबुवा मोहिते यांच्या निधनाची बातमी वाचली. किती थोर पेटीवादक. आजच्या बहुतेक सर्व नामवंत गवयांना त्यांनी साथ केली होती. कितीतरी गायक त्यांना पुण्या-मुंबईकडे किंवा दूर गावी साथीसाठी घेऊन जात. त्यांनी स्वत: संशोधन करून जी एक हार्मोनियम तयार केली होती तिची अनेक संगीतज्ञांनी स्तुती केली होती. दुर्दैवानं, त्याचा व्हायला पाहिजे होता तितका बोलबाला झाला नाही. बातमी वाचल्यावर, मला तुझी फार आठवण झाली. लहानपणी तुमच्या कुटुंबाला वाईट दिवस आलेले. वडिलांचा मृत्यू, भावाला व्यापारात प्रचंड खोट, त्यातून त्याची आत्महत्या, जप्ती, देणेकऱ्यांचा तगादा या सर्व गोष्टींमुळे तुमच्या कुटुंबावर दु:खाची छाया पडली. तुझी थोरली बहीण ताई, एकटी धडपडत होती. तुला शास्त्रोक्त संगीताची किती आवड! केवळ गाणं शिकण्याच्या ओढीपोटी तू एका घरात शिकवणी धरलीस आणि त्या पैशांतून तू याच मोहितेबुवांकडे जाऊन गाणं शिकायचीस. पण असं किती काळ जमणार? ताईच्या बरोबरीनं तूही स्वत:ला कुटुंबाचा गाडा ओढण्यासाठी जुंपून घेतलंस... संगीत शिक्षण अर्धवटच राहिलं.

'इंदू, आपल्या लग्नापूर्वी मी चहाचा केवळ एक कप आणि इंग्रजी वाङ्मयाच्या वाचनावर जगणारा एक प्रकारचा मुक्तात्माच होतो. दुसरा कोणताही विचार नव्हता. माझ्या वयाचे इतर तरुण भावी संसारासाठी थोडा थोडा पैसा साठवतात, एकेक भांडं खरेदी करतात, पण तसला विचारही माझ्या डोक्यात कधी येत नसे. सांगलीजवळच्या कवलापूरसारख्या खेड्यात माझं वास्तव्य, वडील माझ्या लहानपणीच

गेले, आई निराश्रितासारखी जगली. तिला सुखाचे दिवस दाखवावेत म्हणून मी धडपडलो, पण मुळातच आबाळ झालेली तिची काया फार दिवस काढू शकली नाही. ना कोणी भाऊ-बहीण, ना कोणी आप्तेष्ट. सडाफटिंग, अल्पसंतुष्ट, महत्त्वाकांक्षाविरहित असा मी माणूस. तुमच्या घरची परिस्थिती सांगून तात्या मास्तरांनी भरीस पाडलं म्हणून केवळ मी लग्नास तयार झालो. अशा परिस्थितीत, तू माझ्या जीवनात आलीस. मांगल्याचा दीप घेऊन, सगळे शुभ ग्रह आणून शून्यातून तू मला वर काढलंस. माझ्याशी जमवून घेतलंस. पैशांसाठी कधी कुरबुर नाही. आहे त्या परिस्थितीत संसार सुखी, संपन्न व आदर्श करण्याकरता तू राबलीस, थकलीस, श्रमलीस.... किती उपकार मानू तुझे?'

'इंदू, आज वर्तमानपत्रात आपल्या डॉक्टरांनी 'सदाफुली' या वनस्पतीपासून कॅन्सरवर रामबाण औषध शोधून काढल्याचं वाचलं. इंदू, हा शोध जरा आधी लागता तर! तसंच तुझ्या रोगाचं निदान अगदी प्रारंभिक अवस्थेत झालं असतं तर? जाऊ दे. विचार करू लागलो म्हणजे मनात खळबळ उडते. आपलं काही चुकलं तर नाही ना असं वाटू लागतं. पण औषधांचे कितीही शोध लागले तरी मृत्युपुढे या औषधांना हार खावी लागते. माणसाची अगतिकता कळून येते. जीवनाची क्षणभंगुरता पटते, पण इतकं सारं कळूनसुद्धा माणूस जीवन जगण्यासाठी धडपडत असतो. खरंच, माणूस म्हणजे न सुटणारं कोडं आहे....

'काही का असेना आमच्या भारतीय डॉक्टरांचं संशोधन यशस्वी होवो. इंदू, तुझ्यासारख्या अनेक रुग्णांना त्याचा वेळेवर फायदा झाला तर चांगलंच आहे.'

'इंदू, आज श्रावणी सोमवार. वाटलं, की रिक्षा करून हरिपूरला जावं. आपण दोघंच दोघं किती वेळा हरिपूरला गेलो आहोत! जत्रा असो वा नसो आणि मला श्रावणी सोमवारच्या जत्रेच्या गर्दीत जायला नकोच वाटायचं. हे रम्य, सात्त्विक ठिकाण आपल्या दोघांच्याही किती आवडतं स्थळ होतं. जाताना वाटेतील त्या बागेतील गणपतीभोवती केवढं चिंचेचं

बन होतं! त्यामुळे ते देऊळ पटकन दिसायचंच नाही. त्या गर्द झाडीमुळं देवस्थानाला गूढ अशी अद्‌भुतता लाभली होती. हरिपुरातील त्या संगमेश्वराच्या मंदिरात तू किती भाविकतेनं दर्शनाला उभी असायचीस! तितक्याच भाविकतेनं मी तिथल्या पिंपळाच्या पारावर बसायचा! याच पारावर बसून चिंतन करता करता देवलांना 'शारदा' नाटकातील तू टाक चिरून ही मान। नको अनमान' हे पद स्फुरलं. समोरचा कृष्णा-वारणेचा मनोहर संगम पाहत पाहत, संध्याकाळच्या वेळेचा पक्ष्यांचा चिवचिवाट ऐकत आपण कितीतरी वेळ बसत असू! कुरकुरीत चुरमुरे आणि खारे दाणे खात खात! फारशी वर्दळ नसली तर माझ्या आग्रहास्तव तू मला देवलांचं ते 'मूर्तिमंत भीती उभी' हे पदपण म्हणून दाखवायचीस..... पण आता त्या जागी मी कसा जाऊ?'

'तिथंच तर मी तुझ्या अस्थी विसर्जित केल्या!'

'इंदू, तुला जाऊन आज बरोबर एक वर्ष झालं. ती काळ-पहाट, त्या तुझ्या वेदना, ते कण्हणं, ते विव्हळणं, ती धाप, तो श्वास.... सारं, सारं काही निमालं. या घरात आता तुझी हालचाल फिरून मला दिसणार नाही. तुझं स्मृतिरूप अस्तित्व माझ्याजवळ राहील. मी असेतोपर्यंत टिकेल. पुढे तेही नष्ट होईल. हा सृष्टीचा नियम आहे. त्यासंबंधी खेद वाटण्यात अर्थ नाही. जगाच्या दृष्टीनं तू म्हणजे चैतन्याचा एक बिंदू, पण माझ्यासाठी महासिंधू. मला तू परमेश्वराइतकीच थोर वाटतेस. माझ्या विश्वसृष्टीत तू माझी आधारशक्ती. प्रत्येक माणूस विश्वामित्राचा अवतार आहे. तो आपलं म्हणून एक स्वतंत्र जग निर्माण करतो. इंदू, हे माझं जग मी असेपर्यंतच असणार. या जगात तुझ्याविना कुणालाही स्थान नाही...

'... हे माझं, माझं जग आहे म्हणूनच मी जगतोय?'

'इंदू, तुझा दिनक्रम आठवतो आणि गहिवरून येतं. किती विलक्षण नियमितपणा, किती उत्साह! सतत कुठल्या ना कुठल्या कामात गुंतलेली. गप्पा माराच्या त्या काम करता करता. अगदी कवितेची एक ओळ

स्फुरली तर ती स्वयंपाक करता करता स्वत:शीच गुणगुणायची (बहुतेक विसरू नये म्हणून). मग केव्हातरी कागदावर उतरवून ठेवायची. शाळेत काय काय शिकवायचं याचं चिंतन त्याच वेळी करायचीस. त्यातील एखाद्या शंकेचं निरसन माझ्याकडून करून घ्यायचीस. एकामागून एक, कामाचा एवढा पसारा व व्याप तू निर्माण करत असेस की फालतू गोष्टींकडे लक्ष देण्यास तुला फुरसतच मिळत नसे. राजवाड्यातील या परिसरात आपण राहायचो, पण केवळ गप्पा मारण्यासाठी एखाद्या घरी तू गेली आहेस असं काही मला आठवत नाही. कुणाशी दुरावा नाही, दुस्वास नाही पण अतिपरिचय नाही, तरीही सर्वांना तू हवीहवीशी वाटायचीस. शाळेत गेलीस की घराचा विसर आणि घरात आलीस की शाळेचा विसर, असा तुझा दिनक्रम. एवढ्या मोठ्या आजारानं तुला ग्रासलं पण कधी चिडचिड नाही. शांत स्वभावानं व सौम्य सौजन्यानं तू सर्वांना त्या आजाराच्या काळातही प्रभावित केलंस.'

'इंदू, रेडिओवर प्रभात संगीत लागलं की तंबोरा घेऊन गाण्याचा रियाज करत बसलेली तुझी मूर्ती आठवते. भल्या पहाटे मी खाली स्वयंपाकघरात जाऊन आपल्या दोघांचा चहा करून आणायचा. पलंगावर मी वाचत बसायचा. तिकडे तुझा तंबोरा झंकारत असायचा. तुझे ते गाण्यातील राग वगैरे मला कधीच कळले नाहीत. अभंग आवडायचे, कधी कधी माझं आवडतं 'प्रसन्न मंगल पहिल्या प्रहरी, सोपा मंत्र जपा, जय जय रामकृष्ण हरी' म्हणायचीस तेव्हा मी दाद दिली असेल, पण एकूण तुझ्या नैसर्गिक गुणांना पुरेसा न्याय द्यायला मी खूपच कमी पडलो, नव्हे तो माझ्या हातून अक्षम्य गुन्हाच घडला. गांधर्व विद्यालयाच्या परीक्षेच्या वेळी पंडित विनायकबुवा पटवर्धन आले होते. तुझा गोड गळा ऐकून ते गोडबोलेबुवांना रागावले. इतक्या चांगल्या गळ्याच्या गायिकेला पेटीवर काय शिकवता? त्यांना तंबोऱ्यावर गायला बसवा असं म्हणाले. त्याच्यापुढे आपली तंबोरा घेण्याची धावपळ. मग इतर जाणकारांच्या सल्ल्यानं चिंतुबुवा म्हैसकर येऊ लागले आणि तेव्हाच खरं तुझं संगीत बहरू लागलं. सांगली जिमखान्यातील आणि कोजागिरीला सांगली नगर- वाचनालयातील तुझ्या

बैठकी किती रंगल्या होत्या! अनेकांनी कौतुक केलं. नंतर 'वंदे मातरम्'च्या चालीचा प्रसार करण्यासाठी मा. कृष्णराव फुलंब्रीकर आले होते, त्यांनी केलेलं तुझं कौतुक मला अजून आठवतंय. 'पुण्याला या, मी शिकवतो' असंही ते म्हणाले होते. त्यांचाच कुठलासा अभंग आणि एक शास्त्रीय चीज तू त्यांना म्हणून दाखवली होतीस, पण सगळ्या गोष्टींना खूप उशीर झाला होता. तुझी चाळिशी आल्यावर मला जाग आली होती. मग तुला कानाच्या दुखण्यानं सतावलं. मला संगीतातील काही कळत नव्हतं म्हणून मी काय इतका या बाबतीत आळस करायचा? आनंदी जोशीच्या गोपाळरावासारखी जिद्द मी दाखवायला नको होती? इंदू, मी तुझा अनंत अपराधी आहे. मला क्षमा कर.'

'इंदू, तुझ्याविना संसार म्हणजे रामाविना रामायण. तू असताना लोळत वाचत पडावं. हाक मारलीस की जेवायला उठावं असा मामला होता. तुझ्या जिवावर मी आळशासारखे दिवस काढले. अगदी चैनीत राहिलो.....आता स्वत:ला बदलवून घेण्याचा प्रयत्न करतोय पण अजून जमत नाही. टीव्ही, फ्रीज, गीझर, मिक्सर, सोफा, टीपॉय, नवीन तऱ्हेचं फर्निचर अशा अनेक वस्तू घरात आल्या आहेत, पण तू नाहीस म्हणून सर्व व्यर्थ वाटतं. रामायणातील हनुमंताला मोत्यांचा उत्तम हार घालावयास मिळाला, पण कुठल्याच मोत्यामध्ये त्याला त्याचा राम मिळाला नाही म्हणून त्यानं एकेक मोती फेकून दिला, तसं आता या वस्तूंमध्ये तुझं अस्तित्व नाही म्हणून मला त्या निरर्थक वाटतात.'

'इंदू, तुझं दररोज स्मरण केल्यामुळे काय लाभ होतो असं मी स्वत:लाच विचारतो अन् मग माझं मलाच उत्तर मिळतं. तुझ्या चिंतनामुळे मन विशाल झालं आहे. पूर्वी दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीचे दोष मला ठळकपणे दिसत आणि त्यांचं दर्शन तिसऱ्यांना घडवण्यात आनंद होई. आता दोषदिग्दर्शनाची दृष्टी मावळत चालली आहे. उलट, प्रत्येक व्यक्तीतील गुण, अगदी बारीकसारीक गुण हुडकून काढण्याची सवय लागली आहे. स्त्रियांविषयी एक उदात्त दृष्टिकोन निर्माण झाला आहे. तुझा

एकसारखा विचार करत असल्यामुळेच बहुधा अनेक प्रसंगी स्वप्नात तुझी भेट होते अन् मी उच्च वातावरणात विहरू लागतो. आता मला बोध होऊ लागला आहे, की अशीच निष्ठा, प्रेम व अनुराग ईश्वरावर केला तर कदाचित त्याचंही दर्शन नाही का होणार?.... पण तुझं भजन सोडून त्याचं करावं हा विचार मनाला शिवत नाही.'

'इंदू, आज सकाळी चहाच्या वेळी रवी, बोलता बोलता म्हणाला, ''आई किती प्रकारची लोणची घालायची! नुसत्या मिरच्यांचे, आंब्याचे किती प्रकार असायचे! तू लिंबाची, गाजराची, माईनमुळ्याची अशी किती तऱ्हेची लोणची बनवायचीस. आपण शिक्षक पेशाचे. विद्यार्थ्यांनी बघितले तर त्यांना काय वाटेल म्हणून सांगलीत कधी तू हॉटेलात यायची नाहीस. बाहेरगावी गेल्यावर आम्ही सगळे हॉटेलचे पदार्थ खाण्यात गुंग, तर तू तो फोडून त्यात काय काय पदार्थ घातलेत हे पाहण्यात मग्न!

'नानाने तुझ्या पाककौशल्याच्या लहानपणापासूनच्या अनेक आठवणी सांगितल्या. त्याच्या शाळेत स्नेहलताबाई दसनूरकर, शैलजा राजे, प्रमिला दंडवते अशा अनेक विदुषी पाहुण्या म्हणून कार्यक्रमांना यायच्या तेव्हा हटकून आपल्याकडे जेवायला असायच्या. सांगली नगरवाचनालयातील तुझ्या नावानं सुरू केलेल्या भावगीत गायन स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी शैलजा राजेंनी तुझ्या पाककौशल्याच्या किती आठवणी सांगितल्या! परवा, बाजारात मोठमोठे आवळे बघितले त्यावेळी तू करत असलेल्या ताकातील आवळ्याच्या लोणच्याची आठवण झाली. कोणताही पदार्थ बनवायचा असला म्हणजे अगदी मन लावून तू ते काम करायचीस. त्यात अंगचोरपणा नाही. आंतरिक ओढ, आवड व तळमळीनं तू ते काम करायचीस. सुमन म्हणते तसं पाकशास्त्रावर तुझ्याकडून एखादं पुस्तकच लिहून घ्यायला हवं होतं!'

'इंदू, आज ठकुताई आणि गंगू या माझ्या दादरच्या मामेबहिणी आल्या होत्या. माझ्याकडील नातेवाईक मुळात कमी आणि मीही कुणाशी फार संबंध ठेवले नाहीत. आपला अवी रिझर्व्ह बँकेत मुंबईत नोकरी करू

लागला आणि नव्यानं सर्वांशी संबंध जुळून आले. त्या दोघींमुळे माझ्या आंबवच्या बालपणातील आठवणी जाग्या झाल्या. आंबव हे माझं जन्मगाव. माझ्या आईला बनी म्हणत. गोरीपान, चाफेकळीसारख्या नाकाची पण कृश देहयष्टीची माझी आई फार सुरेख होती. गरिबीमुळे बिजवराला दिली होती. माझ्या वडिलांचं दुकान गिरगावात होतं. त्यात जबरदस्त खोट आली. त्यांनी अत्यंत अपमानित अवस्थेत मुंबई सोडली आणि खचलेल्या अवस्थेमुळेच त्यांचा मृत्यू लवकर ओढवला. माझ्या बिचाऱ्या आईला मला घेऊन कोल्हापुरातील टिळकांच्या एकत्र कुटुंबात राहावं लागलं. निष्कांचन अवस्थेतील निराधार स्त्रीला घरात काय स्थान असणार? ठकी-गंगीमुळे सगळ्या आठवणी निघाल्या. वडील मला आठवतच नाहीत पण आंबवंचे दोन्ही मामा-माम्या आठवतात. त्यांची ती कोकणी भांडणं, तिथलं ते सूर्यनारायणचं मंदिर, एका बाजूला माखजन, दुसऱ्या बाजूला अरवली. डोंगर उतारावरचं आमचं आंबवचं घर. सगळं नव्यानं आठवलं. लग्नानंतर जवळजवळ सोळा वर्षांनंतर तुला आणि अवी-रवीला कोकण दाखवायचं म्हणून पहिल्यांदाच मी आंबवला नेलं. तिथलं ते जंगल, निर्मनुष्य वस्ती, भुताखेतांच्या गोष्टी सांगणारी मंडळी आणि त्यातच सूर्यनारायणाच्या मंदिराकडून येताना दिसलेला तो मोठा नाग! तू किती घाबरून गेली होतीस! त्या रात्री बाहेरच्या उघड्या सोप्यावर निजल्यावर आजुबाजूचा गर्द अंधार आणि रातकिड्यांचा आवाज यामुळे तुझी झोप उडून गेली होती. भुताखेतांच्या, वेताळांच्या गोष्टी ऐकताना भीतीनं तुझ्या अंगावर काटा उभा राहायचा तर माझ्या अंगावर अद्भुत आनंदानं रोमांच उभे राहायचे! तुला किर्र झाडी, उंच डोंगर, निर्मनुष्य प्रदेश, तिथं असणारी भयाण शांतता यांचा तिटकारा, मला त्यांची आवड. हेदवीची ती वाघदरी, समुद्रकाठ यांचं मला केवढं आकर्षण आणि तुला पुण्या-मुंबईचं झगमगाटी जीवन आवडायचं. (अशी आपल्या दोघांच्या आवडीनिवडीत विभिन्नता असली तरी आपण एकमेकांच्या किती जवळ होतो!)'

'इंदू, घरात काही घटना अशा काही घडल्या की त्यामुळे आपलं

काही चुकतं का असं वाटू लागतं. आताशा मी कोणाला सल्ला देत नाही. जे काही चाललं आहे त्यात व्यत्यय आणत नाही. घरात आपण तटस्थतेनं राहायचे, उदासीनतेनं काळ घालवायचा आणि शक्य तितकी आपल्या अस्तित्वाची व व्यक्तित्वाची जाणीव कुणालाही करू द्यायची नाही असं सूत्र डोळ्यांसमोर ठेवलं आहे. अशा वेळी तुझा अभाव फार जाणवतो. तुझ्या नसण्यामुळे माझं असणं नगण्य आहे. आणि मग वाटतं, की तुझ्याऐवजी मी गेलो असतो तर? किती छान झालं असतं? तुझा तुझ्या मुलांना खरा उपयोग झाला असता. तुझ्या नातवंडांना तू वळण लावलं असतंस. जीवनाचा प्रत्येक क्षण घराकरता, मुलांकरता वेचला असतास. आज मी मात्र केवळ भारभूत आहे. घरातील अडगळीची एक वस्तू. धड टाकण्याचं धारिष्ट्य नाही. ठेवावी म्हटलं तर उपयोग नाही.... विश्वाच्या या कार्यात माझा काय उपयोग? मी नसलो वा असलो तरी दुनियेला त्याचं काय? मग मी का जगतो? ईश्वर मला का जगवतो? अर्थात मी या जगतात आहे हे त्या जगन्नियंत्याला माहीतही नसेल! त्याच्या खिजगणतीतही नसेल. उगाच, मरता येत नाही म्हणून मी जगतो आहे?'

'इंदू, हल्ली सारखी चक्कर आल्यासारखं वाटतं. झोपेतून उठून चालू लागलो की तोल सावरला जात नाही. कशाला तरी धरून पाऊल टाकावं लागतं. रस्त्यावरून पावलं हळू टाकतो. एक काळ असा होता, की झपाझपा पावलं टाकल्याखेरीज मी चालू शकत नसे. या बाबतीत आपलं नेहमी भांडण. तू म्हणायचीस, ''अहो सावकाश चाला.'' मी तर बोलण्याच्या नादात तुझ्यापासून आठ-दहा पावलं पुढेच. आता तो काळ गेला. अवी काय- रवी काय, माझ्याबरोबर चालू लागले की मी त्यांना म्हणतो, ''जरा सावकाश चाला. मला तुमच्याबरोबर चालवत नाही.'' इंदू, आता कुठलीही धाई-गडबड सहन होत नाही.'

'इंदू, काल फिरून ताप आला. सतत खोकला असतोच. डॉक्टरांनी सांगितलं म्हणून दात काढले. त्यांचं म्हणणं खोकल्याचं मूळ तिथं आहे. काही फरक पडला नाही. तू किती तऱ्हतऱ्हेचे काढे करायचीस! डॉक्टरांची

किती औषधं घेतली, इंजेक्शनं झाली पण काही फरक नाही. तळकट तर हल्ली चुकून खात नाही. फक्त पहाटे फिरायला जायचं निमित्त झालं, पण तू गेल्यापासून मी बघतोय. सतत खोकला, ताप; थोडं बरं वाटलं की पुन्हा खोकला, ताप असं सारखं माझं रहाटगाडगं चालूच असतं. त्यावरून मला गोपाळ गणेश आगरकरांची आठवण होते. दम्याच्या त्रासानं ते नेहमी हैराण असत. एकसारखी ढास लागायची. त्यांनी गमतीनं त्यावर एक मजेदार काव्य-चुटका लिहिला होता. त्यात ते आपल्या प्रिय दुखण्याला, दम्याला म्हणतात, 'मी गेल्यावर तुझं कसं होणार? तुला कोण आश्रय देणार?'

'शारीरिक व्याधींकडे इतक्या खेळकर दृष्टीनं आगरकर पाहायचे. मी त्यांच्यापासून काही शिकायला नको का?'

'इंदू, हल्ली मी मनोमन फार चिडचिडा आणि प्रक्षुब्ध होऊ लागलो आहे. साधा बीबीसी नीट लागेना. बॅटरीचे नवे सेल आणून कुठं ठेवलेत ते माझे मलाच सापडेनात... जीवनात चढउतार असतातच. तू किती शांत मनानं आपलं कर्तव्य बजावत असे. चिडचिड नाही. आदळ आपट नाही. सारं कसं शांत आणि प्रफुल्ल वातावरण. तुझ्या मनाची घडणच अपूर्व. संयम, सहनशीलता व प्रसंगावधान या तुझ्या गुणांमुळे तुझा तोल कधी जात नव्हता. शाळेतही वागण्यात तीच तऱ्हा. नुसतं छातीतील न्युमोनियाच्या पॅचचं कदाचित ऑपरेशन करावं लागेल असं म्हटल्यावर मी गडबडून गेलोय आणि पोटाला नळी बसवण्याच्या ऑपरेशनप्रसंगी, तू किती धैर्यानं ऑपरेशन थिएटरमध्ये गेलीस. शुद्धीवर आल्यावर ऑपरेशन थिएटरमधील गमतीजमती, डॉक्टरांचे एकमेकांमधील विनोद सांगितलेस. तो तुझा क्षीण आवाज मला आजही आठवतो....नंतर थोडी गंभीर झालीस. सुमननं डोंबिवलीहून आपली सेवाशुश्रूषा करण्यासाठी यायचं, तिकडे अवीचे जेवणाचे हाल, लालू-मंजाचं रूटीन बदलणार त्यांना इथं करमणार नाही, न येण्याबद्दल सुमननं माझं ऐकलं, तर पोटाला बसवलेल्या ट्यूबमधून तुम्हाला दूध, शहाळ्याचं पाणी वगैरे नीट घालता येईल, ना? असं तू मला विचारत होतीस.... पण गंमत म्हणजे आपल्याला किती त्रास

झाला, वेदना झाल्या याविषयी तू अवाक्षरही काढलं नाहीस.'

'इंदू, आपल्या घराच्या मागील खंदकाचा भाग भरून घेण्याचं रवीनं अगदी मनावर घेतलंय. अवीने दोन हजाराचा ड्राफ्ट पाठवून दिला. नानाने एक हजार रुपये दिले. त्या बापड्याची खरी कमाल आहे. तुझ्या संसाराशी किती एकरूप झाला आहे! घरात किती वस्तू आणतो, बाहेरगावाहून आला की चारूला, मंदार-मधुराला किती संसारोपयोगी गोष्टी आणतो त्याला गणतीच नाही. आपल्या घराशी तो पूर्णपणे एकरूप झाला आहे. या घराविषयी त्याला ममत्व वाटण्यास कारण तूच. धाकटा भाऊ, पण मातेच्या ममतेनं त्याचं संगोपन केलंस. त्याची आजारपणं काढलीस. वागण्यात कधी भेदाभेद नाही. इंदू, आता आपल्या स्वयंपाकघरात चारूने किती सुधारणा करून घेतल्या आहेत. तसंच तिकडे डोंबिवलीला सुमननं ब्लॉक किती छान सजवला आहे! सर्व प्रकारच्या सोयी करून घेतल्या आहेत. तू असताना मला मात्र तुझ्या मर्जीप्रमाणे काहीच करता आलं नाही. नित्याच्या खर्चाची तोंडमिळवणी करता करता आपल्या नाकी नऊ यायचे. चणचण भासायची ती पैशाची, पण त्यामुळे आपण कधीच नाराज झालो नाही. निराशा तर आपल्या हृदयाला कधी शिवलीच नाही म्हणून तर आपण सुखी होतो. जे आपल्याला मिळणं शक्य नाही त्याकरता आपण कधी धडपड केली नाही. ही आत्मसंतुष्टता आपल्या सुखाची गुरुकिल्ली ठरली.'

'इंदू, आज नगरवाचनालयात गेलो होतो. तिथं एका सेवकाने वजनाचा काटा आणला होता. आग्रह केला म्हणून वजन केलं. वजन सदतीस किलो. माझं वजन मला किती वर्षात माहीतच नाही. शेवटचं आठवतंय तेव्हा एकशे दोन पौंड होतं. बहुतेक सांगली हायस्कूलमधून निवृत्त होण्याच्या आसपास. म्हणजे पंधरा वर्षात वीस पौंड कमी झालं. अशक्तपणा जाणवतो. चालताना थकतो. जरा काही झालं की ताप येतो. खोकला बळावतो. याचं कारण माझी ताकद, शक्ती, जोर, उमेद, उत्साह ओसरू लागला आहे..... आता, कशासाठी ताकद वाढवायची आणि कुणासाठी जगायचं? तुझ्याविना मी शून्य. माझी कवडी किंमत

नाही. मुर्दाडपणानं जिवंत राहायचा माझा अट्टाहास. इंदू, प्राचीन काळी काही सात्त्विक पतिव्रता नवऱ्याच्या मृत्यूनंतर हसतमुखानं जळत्या चितेत उडी घेत. केवढी निष्ठा! केवढी कमालीची सहनशीलता! पतिविना जगणं म्हणजे पाण्याविना मासळीचं जगणं, असं त्या बिचाऱ्यांना मनापासून वाटे. पण एका तरी पुरुषानं आपल्या पत्नीकरता तिच्या सरणावर आपला देह जाळला आहे काय? इंदू, स्वेच्छेनं मरण स्वीकारण्यास अतुल धैर्य लागतं. ते काम विनोबाजींचं, सावरकरांचं. आम्ही सारे रणछोड वाचिवीर! पत्नी गेल्यानंतर फार तर विरहगीत खरडण्याइतके निर्लज्ज!'

'इंदू, काल विश्राम बेडेकरांची मुलाखत ऐकली. नुसती एक 'रणांगण' लिहिली असती तरी मी त्यांना श्रेष्ठ लेखक मानलं असतं. मराठी वाङ्मयातील 'रणांगण' हा एक मानदंड आहे. त्या कादंबरीची जन्मकथा मागे मी तुला सांगितली आहेच. पती-पत्नींमध्ये अशी गोड चुरस असावी. एकमेकांचे गुणावगुण जाणले म्हणजे संसाराला एक निराळी लज्जत येते.... असं काही ऐकलं की जाणवतं, आपण दोघांनी खूप काही करायला हवं होतं. तू तुझी संगीताची आराधना, मी साहित्याचा अभ्यास. पण....?'

'इंदू, काल तुझी मैत्रीण विजूची ताई आली होती. सुमतिबाई मल्लेवाडीकर ही ओळख जगासाठी. तुझ्या नावानं नगरवाचनालयात ज्या गीतगायन स्पर्धा सुरू झाल्या त्याच्या उद्घाटन समारंभात तिने तुझ्या कविता सुरेख गायल्या होत्या. विशेषत: तुझी 'रडू नको माझ्या राजा' ही कविता एवढी सुरेख म्हटली की अनेकांना अश्रू आवरेनात. ती आली की मी नेहमी कान टवकारतो. कारण मग सगळ्या गप्पा तुझ्याभोवतीच असतात! काल सगळ्या गप्पागोष्टी कवठे महांकाळ गावातील आपल्या वास्तवाच्या होत्या. तिची मुलं- मधू-विजू आपल्या अवीबरोबर खेळत. त्यांच्या गमतीजमती सांगत होती. आपली अवीला बिचाऱ्याला लहानपणी कुठली मोटारबिटार खेळायला मिळणार? तुझ्या जुन्या फणी-करंड्याच्या लाकडी पेटीला तो दोरी बांधायचा आणि रस्त्याने पोंऽपों करत रुबाबात

फिरवायचा! मग विजू गावभर त्याचा वेडेपणा सांगत फिरायची. पण ताईने सांगितलेली एक आठवण ऐकून माझे डोळे तुझ्या आठवणीनं पाणावले. सांगलीच्या आपल्या हायस्कूलच्या मैदानात एक मोठं प्रदर्शन भरलं होतं. त्यातील मनोरंजनाच्या प्रकारामध्ये उभ्या चक्रावर आकाशात जाणारा उंच पाळणा हे मोठं आकर्षण होतं. विजूची ताई विजूला आणि मधूला घेऊन आपल्या घरी सांगलीला आली होती. पाहुणचार म्हणून तू सर्वांना घेऊन गेली होतीस. सगळीकडे फिरता फिरता तुझे पैसे संपत आले होते. म्हणून तू आपल्या अवी-रवीला घेऊन बाजूला गेलीस आणि त्यांना हळूच म्हणालीस- ''हे बघा, माझ्याजवळ आता थोडेचे पैसे उरलेत. सगळ्यांना काही मी त्या चक्रामध्ये बसवू शकत नाही. मधूला व विजूला घेऊन आम्ही बसतो. ताईनं तुम्हाला आग्रह केला तरी यायचं नाही. तुम्ही म्हणायचं की आम्हाला उंच पाळण्याची भीती वाटते. चक्कर येते. राहील ना नीट लक्षात.'' इंदू, अलिकडे केव्हातरी अवी पुण्याला ताईकडे गेला होता तेव्हा त्याने लहानपणची ही हकिगत गंमत म्हणून ताईला सांगितली. त्यावेळी अवी ताईला जे एक वाक्य बोलला ते मला चटका लावून गेलं. ''त्यावेळची आईची व्यथित नजर, व्याकुळ चेहरा आजही माझ्या स्मरणात आहे. दोन-चार रुपड्यांसाठी आपल्या लाडक्या मुलांना हिरमुसलं करताना तिच्या मनाला किती वेदना झाल्या असतील?''

'इंदू, खरंच किती चटका लावणारी आठवण!'

'इंदू, आज आपला रवी ब्रह्मपुरीला निघाला तेव्हा डोळ्यांच्या कडा पाणावल्या. मनात विचार आला. उद्या या जगातून जाण्याच्या प्रसंगी माझा कसा निभाव लागेल? हे घरदार, ही पोरं, ही नातवंडं सोडून जाताना मला विषण्ण वाटेल का? मनात चलबिचल होईल का? डोळे अश्रूंनी डबडबतील का? अगदी तटस्थपणे माझ्या मनातील विचारांचा मागोवा घेतल्यावर जाणवलं, की मला वियोगाचं दु:ख होणार नाही. मी साऱ्यांचा निरोप शांत चित्तानं, अविचलित भावनेनं घेईन. मुलं समंजस आहेत. सुना मनमिळावू आहेत. नातवंडं हुशार आहेत. नाना, ताई सगळ्या परिवारावर आपुलकीचा वर्षाव करत आहेत. मग मी का खिन्न

व्हावं? जुने जाऊ द्या मरणालागुनी हे खरं नाही का? वाईट एवढंच वाटतं, की हा देह सोडून गेल्यावर मला तुझ्या भेटीची खात्री वाटत नाही. आज तुझं स्मरण करता येतं. मृत्यूनंतर ते समाधान नाही. कुठेतरी अज्ञातात माझा आत्मा संचरत असणार? तुझाही असाच कुठेतरी भ्रमण करत असणार. एकमेकांना 'ओळख' पटणं कसं शक्य आहे? किंबहुना आपल्या धर्मात व संस्कृतीत दिलेल्या या जीवात्म्याच्या गोष्टी म्हणजे भाकडकथा तर नसतील? निदान त्या काव्यकल्पना असाव्यात. आपले वेदकालीन पूर्वज कल्पनाशक्तीच्या बळावर, प्रतिभेच्या सामर्थ्यानं एक आदर्श काव्यात्म विश्व बनवत. त्या विश्वातील आत्मा, देह, जीव संसार, ब्रह्म आदी कल्पना; वास्तवाचा त्यांच्याशी संबंध नाही. (एकूण काय) मरणानंतर तुझं स्मरण करता येणार नाही एवढीच रुखरुख!'

'इंदू, अनेक गोष्टी करून बघतो पण मन रमत नाही. काही केल्या मन उभारी घेत नाही. शरीर काम करतं एखाद्या यंत्रासारखं. अति विचारानं मन दुर्बल होतं. तुझा खरा कर्मयोग-प्राप्त कर्तव्य सर्वस्व ओतून तू करायचीस. चित्त आणि शरीर त्या त्या कामात लावायची हा तुझा बाणा. त्यामुळे कार्यमग्नतेत तुला अपूर्व आनंद मिळे. तो मला मिळत नाही. नव्या प्रतिज्ञा, नवे संकल्प, नव्या योजना आखतो, पण तुझ्यासारखं कामात झोकून देणं जमत नाही. झेपत नाही.'

'इंदू, कितीतरी दिवसांनी गणपतिमंदिरात गेलो. आपल्या पायातील ताकद अजमवण्यासाठी! पुन्हा सगळ्या आठवणी जाग्या झाल्या..... त्या खांबाजवळ आपण बसलेलो दिसलो. नुकतंच 'त्या' आजाराचं निदान झालं होतं.....दोघंही देवाची करुणा भाकत होतो. हो, मीसुद्धा. मला स्वत:ला काही झालं असतं तर नसते मी हात जोडले. पण तू इतकी श्रद्धाळू, देवावर नितांत विश्वास ठेवून वागणारी. मग 'त्या' जीवघेण्या आजाराची शिक्षा परमेश्वरानं तुला का द्यावी? मला का देऊ नये? म्हणून मी देवाला मनोभावे हात जोडले. अवीनं पत्रात लिहिलंय, की तू म्हणजे आमच्या छोट्याशा टिळक साम्राज्याची स्वामिनी. ....तुलाच मृत्यूचा

वेढा पडावा? जड पावलांनी आपण दोघं उठलो. बाहेर आलो. तू म्हणालीस, "त्या डावीकडच्या झाडाखाली बाकड्यावर थोडे बसू. तेथे आपण चांगले अर्धा-पाऊण तास बसलो. पुढे ठाकलेला मृत्यू हा एकच विषय आपल्या दोघांच्याही डोक्यात होता. पण 'तेवढाच' विषय टाळत बाकी सगळं आपण बोलत होतो. त्या विषयाशी येऊनही बुद्ध्या आपण आपलं संभाषण दुसरीकडे वळवत होतो!'''

'इंदू, ऐन आजारपणात आणि ते सुद्धा कॅन्सरसारख्या, तुझा तोल गेला नाही याचं मला राहून राहून नवल वाटतं. मी स्वत: आजाराला आणि विशेषत: वेदनांना किती घाबरतो हे तुला माहीत आहेच. आपण राजमतीकडे, नेमगौडाला बघायला जायचो तेव्हाचं चित्र किती वेगळं असायचं. तुझ्याआधी त्याला असाच कॅन्सर झाला होता. तो किती चिडे, भांड्याची आदळाआपट करी, सेवा करणाऱ्या माणसांच्या अंगावर धावून जाई....राजमतीची अवस्था किती केविलवाणी व्हायची, पण तू तिला किती छान धीर द्यायचीस... आम्हा पुरुषांमध्ये मुळातच सहनशीलता कमी आणि त्यातून नेमगौडाच्या वेदनाही असहनीय असायच्या. पण तू?.... कशा त्या जीवघेण्या वेदना, प्राणांतिक यातना सहन करत असशील? मला आठवतं, त्या दिवसात सुमन तुझी शुश्रूषा करण्यासाठी राहिली होती. तुझ्याकडून किती कष्टाळूपणानं एकेक पदार्थ ती शिकायची आणि तू हौसेनं शिकवायचीस पण. आजार विसरण्यासाठी मुद्दाम तर करत नव्हता तसं तुम्ही? एकदा राजमती सुमनला मैसोरपाक शिकवत होती तर तू तेव्हा बिछान्यातून उठून बघत होतीस. त्या दुखण्यातही तू एका मैत्रिणीच्या आग्रहाखातर तिच्या पुस्तकावर अभिप्राय लिहिलास. सुशा तुझी नात्याने सर्वांत धाकटी बहीण. तू तिला मुलीच्या मायेनं वाढवलंस. तुझ्या मृत्यूच्या थोडे दिवस आधी तिच्या सिंधूचं लग्न ठरलं होतं. सुशीची इच्छा म्हणून एक सुरेख विहीण रचून, कोणीतरी गेलंच पाहिजे म्हणून तू अवीला पाठवून दिलंस. इंदू, सुशाने ती कविता फ्रेम करून घरात लावलीय. अनेक लग्नप्रसंगी ती म्हणते आणि अनेकजण कोणी विहीण रचली म्हणून कौतुकानं चौकशी करतात. त्या दुखण्यात

सकाळच्या वेळात तुला खूप त्रास व्हायचा पण मग मात्र दळणाचं बघणं, हवी-नको ती भाजी आणवून घेणं, घरसामानाची यादी करणं, लग्न-मुंजी, त्यांचे आहेर.... अशा अनेक गोष्टी तू व्यवस्थित पार पाडत होतीस. आता मला काय त्याचं? असा भाव कधीच नसायचा. आपल्यासमोर दिसणाऱ्या मृत्यूचा एवढासासुद्धा परिणाम तुझ्या नित्यक्रमावर नव्हता. हे विलक्षण होतं!'

'इंदू, अवी-सुमन डोंबिवलीहून आली की आपली मंदार-मधुरा धावत जाऊन त्यांना चिकटतात. चारूची प्रेमळ ठकुमावशी आली की ती दोघं तिच्या गळ्यात जाऊन पडतात. इंदू, अशा मायेला मी लहानपणापासून वंचित झालो. माझ्यावर कोणी असं अकृत्रिम प्रेम केलं नाही. कोणी आस्थेवाईकपणे वागले नाहीत. त्यामुळेच माझ्या स्वभावात एक प्रकारचा एकलकोंडेपणा, कुढेपणा व जगाविषयी तुच्छतेची वृत्ती निर्माण झाली..... त्यामुळे तू मला भेटलीस, मला समजून घेतलंस, म्हणून माझं सर्वस्व झालीस. माझ्या जीवनात एक सुवर्णयुग निर्माण झालं.

'इंदू, तुझ्या वेळेचं ते पारिजातकाचं रोपटं आता केवढं मोठं झाड झालं आहे म्हणतेस. आज तर तो वृक्ष कमालीचा बहरला आहे. आपल्या अंगणात टपोऱ्या फुलांचा सडाच पडला आहे. किती नाजूक, अल्पजीवी फूल, पण सुगंध पसरवणारं फूल. या पारिजातकाकडे पाहिलं की तुझी आठवण बहरून येते.'

'इंदू, जसजसे या जगातील व्यवहार बघतो, तसतशी माझ्यात वसत असलेल्या दुर्गुणांची मला खंत वाटते. मी पूर्वी एक प्रकारचा 'सिनिक' बनलो होतो. माणूस सारे व्यवहार स्वार्थासाठी करत असतो असा माझा समज बनला होता, पण तुझ्या सहवासात आल्यावर माझ्यामधील वैगुण्याची मला जाणीव होऊ लागली. मी स्वत:ला सुधारण्याचा प्रयत्न करू लागलो. तुझ्यात मात्र काही दोष आहेत असं मला कधी वाटलंच

नाही. माझ्या दृष्टीनं तू खरोखरच उच्च कोटीची. आता मात्र मी अधिकाधिक थोर बनत चाललोय. मन विशाल होऊ लागलंय. स्वत:तील दोष उमगतात. मनाशी मी ते तत्काळ कबूल करतो. त्यावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करत नाही. उलट ते दोष काढून टाकण्याचा हिरिरीनं प्रयत्न करतो.'

'इंदू, काल चारू माडीवरील चौरंग घेण्यासाठी म्हणून आली होती. बोलण्यावरून वेगवेगळ्या विषयांवर गप्पा झाल्या. त्यावेळी ती म्हणाली, ''खरं म्हणजे हा चौरंग वहिनींच्या माहेरचा. डोंबिवलीला त्यांनी दुसरा चौरंग घेतला पण आपला मागितला नाही.'' पुढे ती म्हणाली, ''वहिनींनी भाऊजींच्या ओव्हरटाईमच्या कष्टाच्या पैशातून हौसेनं चांदीचं ताट विकत घेतलं पण आईचं चांदीचं एक ताट, त्यांनीच आमच्या लग्नात घरात आणलं त्याचा चुकून उल्लेखसुद्धा कधी केला नाही.'' इंदू, मला चारूचं हे उत्स्फूर्त सहजी बोलणं ऐकून धन्य वाटलं. तुझ्या सुना खरंच किती थोर मनाच्या आहेत. मुलं तर काय तुझीच! त्यांच्या मनाचा उदात्तपणा किती म्हणून सांगावा? अवीनं काय किंवा सुमननं काय डोंबिवलीला नवं बिऱ्हाड थाटण्याच्या वेळी मला घरातील अमुक एक गोष्ट पाहिजे असं चुकून कधी म्हटलं नाही. सगळा संसार स्वकष्टावर उभा केला. मी रवीला घरखर्चासाठी पैसे देतो पण ते पुरेसे नसतात याची मला जाणीव आहे. पण रवी-चारू त्याचा उल्लेख तर करत नाहीतच पण 'दादा, आम्ही टॉनिक आणतो, आम्ही प्रोटिनेक्स आणतो' असा आग्रह धरतात. माझ्या मंगळवारच्या उपासासाठी नाना आठवणीनं फ्रूट सॅलडसाठी फळं आणून ठेवतो. हे सगळं तुझ्या प्रभावामुळे. तुझ्या संस्कारांमुळे.'

'इंदू, तुला आठवतंय. एकदा आपण कोल्हापूरहून एसटीतून येत होतो. आपण आपल्या गप्पांमध्ये गुंग होतो. समोरच्या सीटवरील एक गृहस्थ आपल्याकडे निरखून पाहत होते. आपल्या गप्पा संपायची वाट पाहत होते. एकदम मध्येच उठले. माझ्यासमोर येऊन म्हणाले, ''तुम्ही टिळक सर ना?'' मी मान डोलावल्यावर म्हणाले, ''सर, मी पी.जी.

पाटील. मी तुमचा विद्यार्थी. सर, माझा इंग्रजी विषय तुम्ही पक्का करून घेतलात...''

'आज तो प्रसंग आठवला. नगरवाचनालयात गाडगेमहाराजांच्या तसबिरीचं अनावरण झालं ते याच बॅ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते. चहापानाच्या वेळी, शिवाजी विद्यापीठाचं कुलगुरुपद भूषवणाऱ्या या गृहस्थानं मला वाकून नमस्कार केला. तुझी आठवण काढली. मलाच संकोचल्यासारखे झालं.'

'इंदू, सुमन आली की घरात चैतन्य निर्माण होतं. नाना तऱ्हेचे पदार्थ करण्यात तिचा हातखंडा आहे. कामाचा आवाका आणि उरक जबरदस्त. आंब्याच्या, नारळ-टोमॅटोच्या, गाजराच्या, कोहाळ्याच्या, किती प्रकारच्या वड्या आणि किती चविष्ट. मसाला डोसा घरी इतका छान बनतो याची तर मला कधी कल्पनाच नव्हती. सुरळीच्या वड्या काय, ढोकळा काय, पाटवड्या काय; आणि रोजचा स्वयंपाक तर विचारू नकोस. इंदू, तू अशीच सुगरण होतीस पण आपल्या संसारात अशी विपुलता नव्हती. नवनवे पदार्थ करून पाहण्याची तुझी हौस मुलुखावेगळी होती, पण ते पदार्थ करण्यास लागणारं साहित्य तुला पुरवणं आपल्या कुवतीच्या बाहेरचं होतं...

पण सुमन मात्र सगळं श्रेय तुला देते. तुझ्यामुळं नवीन नवीन गोष्टी शिकले. नवं शिकण्याची दृष्टी आईमुळे आली असं पोरगी ज्याला त्याला सांगते तेव्हा ऊर भरून येतो. कितीही पदार्थ चांगला झाला तरी चुटपटून म्हणते, ''छे, आईसारखी चव नाही आली.''

'इंदू, तुझा जेव्हा जेव्हा विचार करतो तेव्हा अनेक वेळा एखादा नवाच पैलू लक्षात आल्यासारखा वाटतो. माझ्या ओळखीचे लोक खूप असतात पण अगदी जवळचा मित्र म्हणावा असा कोणी नाही. मी एवढ्या गप्पाटप्पा करत असलो तरी तू तर मितभाषी. हसतमुख म्हणावीस अशी नक्कीच नव्हतीस. तुझ्या मैत्रिणी मोजक्याच पण मैत्री केवढी घट्ट धाग्यांनी विणलेली! तुझी हैदराबादची विमल. सांगली संस्थानच्या

दिवाणसाहेबांची मुलगी. तू नुसतं शब्द टाकायला सांगितला असतात तर केवढा तुझा फायदा करून दिला असता तिनं. पण वैयक्तिक स्वार्थासाठी मैत्रीचा लाभ उठवणं तुझ्या मानी स्वभावाला कधीच मानवलं नसतं. हैदराबादचं तिचं सासर केवढं बडं. खानदानी पण विमलनं माझी बालमैत्रीण म्हणून सर्वत्र कौतुकानं आणि मानानं फिरवलं. तुझं गाणं सर्वांना ऐकवलं. तुझ्या आजाराचं कळल्यावर हैदराबादहून धावत भेटायला आली. तू गेल्यावर केवळ माझ्या सांत्वनासाठी म्हणून आली. अमेरिकेला कायम वास्तव्यासाठी जाण्यापूर्वी पुन्हा मला भेटून गेली. तुझी कायम आठवण राहावी म्हणून तुझा 'गीतरेखा' काव्यसंग्रह आठवणीनं मागून घेऊन गेली.

सोलापूरच्या छन्नुसिह चंदेले या प्रसिद्ध काँग्रेस नेत्याची पत्नी गजरा ही तुझी मैत्रीण. ग्रंथालय परिषदेच्या मांडवातून हिंडताना मला बघितल्यावर, 'भाऊसाहेब, भाऊसाहेब' ओरडत आली आणि माझा सगळा बाडबिस्तारा माझ्यासह आपल्या घरी घेऊनच गेली! राजमतीच्या स्नेहाची तर कशाशी तुलनाच करता येणार नाही. प्रत्येक १७ सप्टेंबरच्या तुझ्या मृत्युदिनी जैन मंदिरात जाऊन तुझ्या नावानं फूल वाहून पूजा करते. यंदा अमेरिकेत आहे पण काल तिचा भाचा सांगत होता, की तिथून अक्कांचं पत्र आलं आहे. १७ सप्टेंबरची आठवण करून देण्यासाठी. केवढी ही निष्ठा. त्या निष्ठेवरून आठवण झाली. कधी काळी तू उपकार केलेली ती ख्रिश्चनबाई सत्यव्वा. दर रविवारी येते. तुझ्या फोटोसमोर बसून आकाशातील देवाची प्रार्थना करून मग चर्चला जाते. स्वत: घरातील असतील ती चार कामं केल्याशिवाय जात नाही. आताशा स्वत:ला होत नाही तर सुनेला पाठवते. माणसं कशी तुझ्या व्यक्तिमत्त्वाने भारून जात असत ते कळत नाही. आपला अवी पुण्याच्या सवाई गंधर्व महोत्सवासाठी प्रथमच गेला तेव्हा विजूच्या ताईने त्याची केवढी बडदास्त ठेवली. त्या महोत्सवाचं भारी तिकिट तिनेच काढलं आणि वर बजावलं, की प्रत्येक वर्षी मीच तिकिट काढणार आणि तू माझ्याकडेच राहायचंस. तिच्या विजू-माणिक आपल्या अवी-रवीची ओळख 'आमचा मावसभाऊ' म्हणूनच करून देतात. इंदू, कसलं विलक्षण रसायन होतं गं तुझ्या व्यक्तिमत्वात!'

'इंदू, काल रवीने फार आग्रह केला म्हणून मी रात्री नाटकाला गेलो होतो- 'संगीत मानापमान.' संगीत हा तुझा प्रांत. कॅन्सरच्या आजारातसुद्धा सुधीर फडके यांचं गीतरामायण ऐकायला आपण सगळे जनता थिएटरमध्ये गेलो होतो. सर्वांचं लक्ष गाण्याकडे आणि माझं काळजीनं तुझ्याकडे. तुला झेपतंय ना, त्रास होत नाही ना, हे बघण्याकडे. कालच्या नाटकातले छोटा गंधर्व, जयराम शिलेदार आणि विशेषत: जयमाला शिलेदार ही सर्वच नटमंडळी तुझ्या आवडीची. जयमालाबाईंचं काम आणि गाणं हे दोन्ही खूप रंगलं. भारदस्त दर्शन, संयत अभिनय, गोड गळा ही जयमालाबाईंची वैशिष्ट्यं. वयाचा विचार करता अजूनही ते गुण टिकून आहेत. इंदू, नाटक पाहताना मात्र मला खोकल्याचा खूप त्रास होत होता. ढास आवरताना श्रम पडत. किती कौशल्यानं मी खोकल्याची उबळ आवरी! रवीच्यासुद्धा लक्षात आलं नाही. बापडा आज म्हणाला, "दादा, तुम्हाला खोकला आला नाही काल." (माझं नाटक बेमालूम जमलं.) पण एक गोष्ट नक्की. यापुढं नाटक-सिनेमाचा प्रयोग बंद. न जाणं उचित. आपल्या अस्तित्वाने दुसऱ्याला त्रास होता कामा नये. बाकी नाटक मात्र आवडलं. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर यांची नाट्यवस्तू मांडण्याची पद्धत किती विलोभनीय! ती जुनी नाटकं आजच्या काळातसुद्धा मनाची पकड घेतात. नाटक, प्रवास, ग्रंथवाचन यांची अजून आवड आहे, पण डोळे व कान नकार देतात, पाय थकतात!'

'इंदू, काल एक चांगली गोष्ट केली. स्कूटर घ्यायची असं घरात बोललं जात होतं. मी ऐकत होतो. तुझ्या पुण्यतिथीला स्मरून रवीला दोन हजार रुपये दिले. मनाला समाधान झालं. तू असतीस तर म्हणाली असतीस स्कूटरला लागणारे सगळेच पैसे द्या. पण इंदू, आता थोडं व्यवहारी राहायला हवं. मी काही स्वत:च्या चैनीकरता पैसे खर्चणार नाही. अजून किती दिवस जगायचे आहे ते कळत नाही. औषधपाण्यासाठी किती पैसे लागतील तेही कळत नाही. निदान तो खर्च मुलांवर नको. मला जिवंत ठेवण्यात त्या मृत्यूला का हौस वाटत आहे, कळत नाही. मला जगण्याची इच्छा नाही तर मला मार्कंडेयाचं आयुष्य! तुला जगण्याची

तितीर्षा तर तुझी या जगातून उचलबांगडी? या जगात मी वावरत आहे हेच मृत्यू बहुतेक विसरून गेला असावा!'

'काही का असेना, 'स्वत:च्या आजारपणाकरता तरी थोडा पैसा गाठी ठेवायला हवा ना?'

'इंदू, सुमन काय-चारू काय, किती माझी काळजी घेतात! दादा, काही खायला करू का, बोर्नव्हिटा- ओव्हलटाईन करू का? असं जाता-येता विचारतात. न चुकता दूध, वेळच्या वेळी चहा, कमी तिखटाचं जेवण अशी माझी एकसारखी सोय बघतात. कपडे कुठले फाटलेत-कुठले नवीन शिवायला पाहिजेत याची काळजी घेतात. माझी औषधं आणून ठेवतात. डोंबिवलीला निघालो की चारू स्वत: बॅग भरते. तिकडून येताना सुमन बॅग भरून देते. इंदू, तुझ्या पश्चात या तुझ्या दोन्ही सुना माझी छान काळजी घेतात. खरं तर या दुसऱ्या घरच्या मुली. पण आपले आई-वडील, भाऊ, बहिणी, सारी मायेची माणसं सोडून येतात आणि या सर्वस्वी परक्या घराला, आजवर न पाहिलेल्या माणसांना आपलं मानून राहतात. किती विलक्षण आहे हे?

'इतकी समरसतेची भावना आम्हा पुरुषांमध्ये असते का? विचार करावा लागेल!'

'इंदू, काल रवीने स्कूटर घेतली म्हणून मित्रांना पार्टी दिली. मागे ऑफिसर झाल्यावर डोंबिवलीत अवीने मित्रांना अशीच मोठी पार्टी दिली होती. अशा गोष्टी बघितल्यावर आपल्या कुटुंबात आलेल्या संपन्नतेचा आनंद होतो. आपल्या काळात हे शक्य होतं का? या सुबत्तेत मला तुझी आठवण होते. तू नाहीस म्हणून या संपन्नतेच्या काळात मला खरं समाधान मिळत नाही. अर्थात ही माझी चूक आहे. काल रात्री अन् आज पहाटे आपल्या सहजीवनाचा विचार करत होतो. काही सुखद प्रसंग आठवले तर काही दु:खद. या दु:खद प्रसंगाचं कारण बहुतेक प्रसंगी मीच. तुझ्याइतकी दिलदार वृत्ती माझी नव्हती आणि त्यालाही कारणीभूत पुन्हा आपली परिस्थितीच होती. इतकं

असूनही तू माझ्या दोषांकडे काणाडोळा केलास. माझ्यावर नितांत प्रेम केलंस, किती उपकार मानू तुझे? पण छे, उपकार मानण्याची कल्पनासुद्धा तुला आवडणार नाही. आता वाटतं, हे सर्व प्रमाद वगळून फिरून आपल्याला ते सहजीवन उपभोगता येईल का? नकोच पण. प्रमादांनी भरलेल्या त्या सहजीवनात जी एक रमणीयता होती ती या निर्दोष सहजीवनात येणार नाही.'

'इंदू, किती वर्षं झाली तुला जाऊन! पण तुझी आठवण अजून ताजी आहे. दिवसातून कितीतरी वेळा तू माझ्याजवळ आहेस, या घरात वावरत आहेस असा मला भास होतो. तुझ्यावर मी किती प्रेम केलं, किती अजून करत आहे याची तुला जाणीव तरी आहे का? तू गेल्यानंतर प्रेमाची आर्तता, एकनिष्ठता, खोली का वाढावी याचा बोध होत नाही. तुला आता माझं प्रेम कळणं शक्य नाही. तरीही मी तुझ्यावर का प्रेम करावं? जवळजवळ चार दशकं मी तुझ्या सहवासात घालवली. आता वाटतं, तू माझ्या जीवनात आल्यापासून जाईतोपर्यंतचा सगळा भाग मी लिहून काढला असता तर? या काळात किती आनंद झाला असता तो वाचताना. काही गोष्टी उशिरा सुचतात. आता वाटतं, केव्हा ना केव्हा तुझी-माझी ताटातूट होणार होती, मग आपल्या सहजीवनाचा क्षण न् क्षण मी का बरं टिपून ठेवला नाही?.... शेवटच्या दुर्धर आजारात तुझा मृत्यू होणार हे तुला व मला खचित माहीत असताना आपण एकमेकांचा एक क्षणभराचा विरह तरी का सहन केला? मी बुद्धिनिष्ठ आहे. आंधळं प्रेम मी कुणावर करत नाही. म्हणून पुष्कळदा माझं मलाच आश्चर्य वाटतं, की तुझ्या मृत्यूनंतर तुझी इतकी ओढ मला का लागावी?

'इंदू, फळभारानं समृद्ध झालेल्या व त्यामुळे वाकलेल्या वृक्षाला थोडंसं हलवलं म्हणजे फळं पटापट पडू लागतात. त्याप्रमाणे तुझं स्मरण झालं म्हणजे मागील आठवणींचे घोसच्या घोस माझ्या डोळ्यांसमोर तरंगू लागतात!'

'इंदू, मी खरा संसारी पुरुष नाही. केवळ तुझ्यामुळे मी गृहस्थ बनलो. योजनापूर्वक संसार करण्याची कला मी कधीच आत्मसात केली नाही. तशी इच्छाही नव्हती. तुझी मुलं काय, सुना काय, किती आपलेपणाने आल्यागेल्याचं स्वागत करतात. अशी अगत्यशीलता माझ्यात कधी नव्हतीच. हा गुण माझ्यात जात्याच कमी. फार तर अशी अगत्यशीलता मी फक्त मला आवडणाऱ्या लोकांच्या बाबतीत दाखवीन. संसारात जो काही समंजसपणा, शहाणपणा लोकांना दिसून आला असेल तो केवळ तुझ्यामुळे. स्वप्ननगरीत विहार करणारा माणूस मी. इंदू, तुला खरंच किती कष्ट पडले असतील, प्रसंगी तू किती नाउमेद झाली असशील माझ्यासारख्या अवलियाशी संसार करावयास?'

'इंदू, काल आपली माडीवरची खोली आवरायला घेतली. आवरता आवरता आपण पांघरुणांच्या घड्या ठेवायचो त्या कोपऱ्यातील तंबोरा बघितला आणि मूकपणं बसून राहिलो. तो तंबोरा आता भग्न झाला. त्या भग्न तंबोऱ्याकडे पाहवत नाही. त्यातून आता सूर झंकारत नाहीत. मूक उदास असा बिचारा एकाकी पडलेला दिसतो. अगदी माझ्यासारखा!.....पण तुझी स्मृती म्हणून किती दिवस ठेवायचा?

'एखाद्या सुरेल आवाजाच्या गरजू मुलीला द्यावा असं मनात होतं.... पण तसं कुणी आढळलं नाही, म्हणून आज तुझ्या चिंतुबुवांच्या सल्ल्याप्रमाणे 'संगीत साधना' या संस्थेस देऊन टाकला. संस्थेत त्याचा अनेकांना उपयोग होईल हा त्यांचा सल्ला रास्त होता. झालं ते बरंच झालं, पण तुझ्या स्मृतीचा एक कोपरा संपला. त्याचं दुःख झालं. जुनं सारं आठवलं. ती विनायकबुवा पटवर्धन यांनी केलेली तुझी भलावण, मग बाळकृष्णबुवा मोहित्यांना घेऊन तंबोरा घेण्यासाठी केलेली धावपळ. पहाटेच्या शांत प्रहरीचा तुझा तो रियाज. हळुवारपणे हात फिरलेली, ती तू वापरलेली वस्तू देताना तुझी रोजची स्मृतीच मी दूर करतोय असं वाटत होतं. आता असाच एकेक कप्पा हळुहळू मला बंद करायला हवा.'

'इंदू, चारू-रवीच्या आग्रहानं मी एक फोटो आपल्या चारी नातवंडांबरोबर काढून घेतला होता. मंजा-लालूला तू बघितलंस. मंदार झाल्यावर रवीने स्पेशल टॅक्सी करून चारूला आणि एक महिन्याच्या मंदारला कोल्हापूरहून आणलं. तुझ्या मांडीवर या तिसऱ्या नातवंडाला ठेवलं तेव्हा तुझी मुद्रा किती आनंदित झाली होती! त्यानंतर अवघ्या दीड महिन्यांतच तुला हे जग सोडून जावं लागलं. आपल्या गोड मधुराला तू बघितलंच नाहीस. तो फोटो अवीकडे, लालू-मंजा उन्हाळ्याची सुटी संपवून डोंबिवलीला गेले तेव्हा पाठवला. त्यावर आज आलेल्या पत्रात अवी-सुमन लिहितात, ''दादा, तुमचा आणि चारी नातवंडांचा फोटो अगदी छान आलाय. त्या फोटोत आई असती तर हा फोटो परिपूर्ण झाला असता.'' इंदू, या दोन वाक्यांत सर्वांच्या तुझ्याविषयीच्या उत्कट भावना एकवटलेल्या आहेत.'

'इंदू, श्रावण महिना सुरू झालाय. नवविवाहित तरुणींचे घोळके रस्त्यानं जाताना दिसतात. त्यांच्या गप्पागोष्टी उत्साहानं, आनंदाने चाललेल्या दिसतात. आपली चारूही नवी साडी नेसून कुणाच्या तरी मंगळागौरीला निघाली आहे. अशा वेळी मला तुझं जीवन आठवतं. तुझी कसली म्हणून कसलीही हौसमौज झाली नाही. ना दिवाळीसण, ना वर्षसण, ना मंगळागौर, ना डोहाळजेवणं. लग्नाच्या वेळी तू तर दबलेल्या अवस्थेतच होतीस. तुझ्या श्रीमंत वडिलांचा मृत्यू, थोरल्या भावानं भांबावून केलेली आत्महत्या, मग जप्त्या, वारंट-देणेकरी यांचा ससेमिरा, उघड्यावर पडलेल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी तू ताईच्या बरोबरीनं धडपडत होतीस. या सगळ्या परिस्थितीमुळं तुला अकाली प्रौढत्व आलं होतं. मी तर निष्कांचन. ना आई-वडील, ना भाऊ-बहीण. कोण करणार तुझे सणवार आणि हौशीमौजी?.....पण तू मात्र हे सारं विसरून किती हौसेनं आपल्या सुनांचे सणवार केलेस? चारूचं डोहाळं जेवण कॅन्सर असतानासुद्धा कार्यालय घेऊन थाटामाटात केलंस. धन्य आहे तुझी, इंदू!'

'इंदू, एखादा सुंदर लेख, मनोहर कथा, भावनोत्कट कविता, समस्याप्रधान नाटक मी वाचलं म्हणजे केव्हा एकदा तुला सांगीन असं मला होई....पण तू तर सदैव कामातच गुरफटून गेलेली असायचीस. सकाळी किंवा संध्याकाळी थोडं फिरायला जात जाऊ असा माझा आग्रह असायचा. पण तुला ते काही जमायचं नाही.'

'इंदू, काल डोळ्यांनी खूप त्रास दिला. तपासण्या झाल्या. नवा चष्मा झाला. डॉक्टर म्हणतात, आता डोळ्यांची ताकद कमीच होणार. नवं पुस्तक दिसलं की अधाशासारखा झडप घालतो आणि मग स्वत:चीच दया येते. कुठलीही कला, हस्तकौशल्य यांचं ज्ञान नाही. ध्यान करणं, मन एकाग्र करणं, सतत चिंतन करणं एवढा एकच मार्ग दिसतो. आता वाटतं, लोकमान्यांनी लहानपणीच गीता मुखोद्गत केली म्हणून उतारवयात एकेका श्लोकाचं चिंतन करत बसले तसं मी काहीतरी करायला हवं होतं. वर्षानुवर्षं अर्थ न समजता पाठांतर करतात त्यांची टिंगल केली, ते चुकलंच.'

'इंदू, काल आपल्या स्मृतिस्मरणिकेचा बारावा भाग वाचत होतो. वाचता वाचता, स्वत:शीच मोठ्यानं वाचू लागलो. काही काही वाक्यं व ओळी अगदी काव्यमय वाटल्या. उत्स्फूर्त उद्‌गारात काही वेगळा आशय चिकटलेला असतो. या स्मृती वाचत असताना एक वाक्यार्थ कळतो, पण शब्दाशब्दांतून एक खोल अर्थ अनुस्यूत होत जातो तो मात्र मलाच कळतो. एकेक ओळ तुझं एक विशिष्ट चित्र डोळ्यांसमोर उभं करतं. उद्या मृत्यूनंतर हा आनंद मला मिळणार नाही. तू गेलीस तरी या स्मृतिरूप पानांतून मी तुला पाहू शकतो. स्वप्नात तुझा सहवास मिळतो. या वास्तूत तुझ्या हालचालींचा अस्पष्ट ध्वनी कानावर येतो. म्हणून जगण्यात मौज आहे. उद्या मी मरण पावलो म्हणजे तू अन् मी विशाल कालसागराच्या ओघात मिसळून जाणार. आपण या प्रवाहात आहोत याची जाणीवही एकमेकांना होणार नाही. त्या 'उद्या'हून आजचं जीवन चांगलं, पण सर्वोत्तम जीवन आपण दोघांनी एकमेकांच्या सहवासात

घालवलं ते! ते आता परत अनुभवणं शक्य नाही, पण त्याचा आठवसुद्धा शरीराची सारी गात्रं उल्हसित करतो.'

'इंदू, केवळ वेळ घालवायचा म्हणून चार लोकांमध्ये जाऊन बसतो. वृद्धांच्या संगतीत बसतो, पण मनापासून त्यांची संगत, त्यांचं बोलणं मला आवडत नाही. आपण त्यांच्यापेक्षा वेगळे आहोत याची वारंवार जाणीव होते. उच्च अभिरुचीचा सुंदर बौद्धिक संवाद मला कोणाशी साधता येत नाही. मग रात्री अनेक विचारांचा गदारोळ मनात धिंगाणा घालतो. त्यामुळं झोपेचं खोबरं होतं व लघवीचा विकार बळावतो. इंदू, असं हे कंटाळवाणं जिणं चालू आहे. तुझ्याविना कोणाला मी माझं दु:ख सांगणार? मूक मन, मूक अश्रू, भकास जीवन घेऊन मी वाटचाल करत आहे.'

'इंदू, आपल्या रवीची बदली लांब नागपूरच्या बाजूला आदिवासी भागात झाली आहे. ब्रह्मपुरी असं त्या गावाचं नाव आहे. केवढी मोठी संधी त्याला आता ऑफिसर म्हणून मिळाली आहे! मात्र बिचाऱ्याला खूप दगदग होणार. शहरी सुखसोयी नाहीत. त्याचं बालपण कसं होतं? त्याच्या वेळेला तुला खूप त्रास झाला. वर्षभर अंथरूणावर काढावं लागलं. पायात चालण्याचं त्राणच नव्हतं. त्याचा परिणाम रवीवरही झाला. त्यावेळी ताईचा आणि नानाचा खरा उपयोग झाला. रवीला त्यांनीच खरं वाढवलं, पण बालपणींच्या दुखण्यात त्याला वाचवलं ते खरं आपल्या बुधगावच्या बापट डॉक्टरांनी. असा रवी ऑफिसर झालेला बघून तुला किती धन्य वाटलं असतं!

'आता माझं काय? ब्रह्मपुरीला मला घेऊन जायचं असं चारू म्हणते. डोंबिवलीला नेणार असं सुमन सांगते. खरंच, मी भाग्यवान आहे. इंदू, तुझ्या दोन्ही सुना माझी भरपूर काळजी घेतात, पण सांगली कशी सोडायची? असू दे. आता काही आशा, इच्छा, आकांक्षा नाहीत. श्रेयस व प्रेयस यांच्या पलीकडे गेलो आहे.'

'इंदू, दररोज सकाळी आंघोळ केल्यावर मी आपल्या माडीवर येतो. तुझ्या भव्य फोटोसमोर उभा राहतो अन् तुझ्याकडे पाहून म्हणतो, ''इंदू, तुझ्यामुळे मी मानानं जगतो. तुझ्या परिश्रमामुळे आपला संसार सुखाचा झाला. तुझ्यामुळे मला मान-प्रतिष्ठा लाभली. तुझ्यामुळे हा संसार. तू होतीस म्हणून मी ताठ मानेने उभा राहू शकलो. तू माझी मार्गदर्शिनी. तू माझी प्रेरकशक्ती. तुझ्यामुळं मुलं, सुना, आप्तेष्ट, परिचित माझ्याशी स्नेहार्द सौजन्यानं वागतात. हे घर, तुझा मोठेपणा, तुझी शालीनता, तुझी संस्कृती दाखवते. तुझ्यामुळे मी 'मी'पणा घेऊ शकलो. माझ्यातील थोड्याफार सद्गुणांच्या विकासास तू कारण. माझ्यातील त्रुटी घालवण्यास तू, केवळ तूच साहाय्यभूत. तुझ्या माध्यमातून मी परमेश्वरस्वरूप बघतो. मुक्तीचा मार्ग शोधतो.''

'इंदू, कालची तुझी प्रार्थनेसंबंधीची नोंद केली आणि मन चिंतन करू लागलं. 'मूर्तिपूजा' आपल्या देशात सुरू झाली याचा 'खोल' अर्थ आता मला प्रतीत होऊ लागला आहे.....ज्या व्यक्तीवर आपण प्रेम करतो तिचं दर्शन या मूर्तिपूजेमुळे होऊ शकतं. खाली आणि माडीवर अशा दोन्ही ठिकाणी तुझे मोठे फोटो ठेवले आहेत. रात्री झोपताना आणि सकाळी उठून खाली आलो की दोन्हींकडे तुझ्या सात्त्विक मूर्तीचं मला दर्शन होतं. अखंड नामस्मरण केल्यासारखं मी तुझं चिंतन करतो, ते मला स्फूर्तिदायक होतं.

'माझ्यासाठी तर हे घर म्हणजे एक मंदिर आहे. हे सोडून दुसरीकडे मी कसा जाणार?'

'इंदू, काल रात्री चांगलाच ताप भरला. दोन-तीन पांघरुणं घेतली तरी थंडी जाईना. झोप लागेना. रात्रभर विव्हळत होतो. आज पहाटे मी व नानाखेरीज सर्वजण किर्लोस्करवाडीला चारूच्या भावाकडे जायची होती, म्हणून तापाविषयी काही बोललो नाही. उगाच त्यांना परगावाला जाताना अडथळा नको. कधी नव्हे ती मौजमजेसाठी सगळी जाणार. इंदू, शक्य तितका माझ्यापासून कुणाला उपद्रव होऊ नये अशी खबरदारी घेत

असतो. दुसऱ्याचा दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न करतो..... नाना चिडतो. जरा त्रासदायकपणे सर्वांशी वागतो. पण एवढ्या मोठ्या थरातील लोकांशी संबंध येत असल्यानं त्याची जीवनशैली थोडी वेगळी होत चाललीय हे खरं.'

'इंदू, तुझा भाऊ आता मोठा प्रतिष्ठित असामी झाला आहे. सांगलीतील मोठमोठ्या लोकांमध्ये त्याचा वावर असतो. माझी खूप जपणूक करतो. चांगली सोबत करतो. चहाच्या वेळी गावातल्या सगळ्या बित्तंबातम्या सांगतो. काल त्याने काही पुढाऱ्यांच्या पैशांच्या व्यवहाराच्या गमतीजमती सांगितल्या. त्यांची जमिनी खरेदीची लालसा कुठच्या कुठं गेलीय ते सांगितलं. त्यापायी किती भयानक गोष्टी घडतात ते सांगितलं. वाईट वाटलं. संताप आला. चीड आली. भ्रष्टाचार कोणत्या थरापर्यंत गेलाय याचा थांगपत्ताच लागत नाही. याला काही उपाय आहे का? उलट, नवी पिढी हा कित्ता किती अमाप प्रमाणात गिरवेल याची कल्पना आली म्हणजे या भारत देशात जन्मणं म्हणजे भ्रष्टाचार व अत्याचार यांच्या नरकात जन्मणं असं वाटतं. सत्यम्, शिवम्, सुंदरम् या गोष्टी आता प्रतिगामी होऊ लागल्या आहेत. अनीतीचा केवढा मोठा टप्पा आपण गाठला आहे? वाटतं, याविरुद्ध बंड करावं. पण ते अरण्यरुदन होणार. प्रवाहाविरुद्ध पोहत जाऊन तो थोपवायला प्रचंड पराक्रमाचे, अतुल चारित्र्याचे वीरपुरुष लागतात.'

'इंदू, आता मी डोंबिवलीस अवी-सुमनकडे राहायला जाणार. चारू म्हणते त्याप्रमाणे ब्रह्मपुरीला त्यांच्याबरोबर जाऊन राहाणं काही मला झेपणार नाही. प्रचंड उन्हाळा आणि प्रचंड थंडी. दरवर्षी दिवाळीत आणि एप्रिल-मेच्या सुट्टीत जात असल्यानं डोंबिवली माहितीची आहे. अवीच्या सोसायटीतील माणसं माझ्या परिचयाची आहेत. यंदाच्या तुझ्या नावानं सुरू असलेल्या गीतगायन स्पर्धेचा माझा हा बहुतेक शेवटचा प्रसंग असावा. आयुष्यात एवढ्या दोन गोष्टी मनासारख्या झाल्या. तुझ्यामधील संगीतकलेला मी न्याय देऊ शकलो नाही, पण या स्पर्धांच्या निमित्तानं

तुझी स्मृती कायम राहील. दुसरी गोष्ट म्हणजे तुझ्या नावानं नगरवाचनालयात प्रतिवर्षी होणारा वासंतिक हळदीकुंकू समारंभ. या हळदीकुंकू समारंभाची तुला किती हौस असावयाची! ती खमंग आंब्याची डाळ, पन्हं, आपल्या पोंक्षेमास्तरांच्या मधूला बोलावून तू सुरेख चैत्रगौरीची आरास रचायचीस. शंभरएक सुवासिनी तरी त्या दिवशी आपल्या घरी येत असतील. डाळ-पन्हं असायचंच, पण वर पुन्हा चकली-चिवडा करायची तुझी धावपळ असायची. संध्याकाळी बायकांचं आटोपलं की रात्री पुन्हा पुरुषवर्ग फराळाला. हे घरचं करायचीस पण पुन्हा सार्वजनिक हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्याची किती हौस! पंचमुखी मारुती भागात जाऊन, गौल्लांच्या वस्तीत जाऊन असे समारंभ करायची तुला हौस. त्यातून तुझं प्रौढ महिला साक्षरता प्रसाराचं काम सुरू व्हायचं.

'तुझ्या या दोन्ही आवडीच्या गोष्टींचं या नगरवाचनालयातील समारंभात कायमचं स्मरण राहील याचा मला अवर्णनीय आनंद होतो.'

'इंदू, डोंबिवलीत येऊन बरेच दिवस झाले. आता, इथल्या हवेशी आणि रोजच्या जीवनशैलीशी बरंचसं जुळवून घेतलंय. संध्याकाळी बाबल्या आला की गणपतीच्या देवळापर्यंत जातो. तेथील कट्ट्यावर किंवा समोरच्या बागेत बसून गप्पा मारतो. बाबल्या माझा सख्खा मावसबंधू. त्याचा- माझा संबंध तसा कमी आला. त्याचा थोरला भाऊ बापू आणि मी बरोबरीचे. संघासाठी आणि नंतर जनसंघासाठी बराच राबला. जुन्या दिवसांविषयी आणि नातेसंबंधांबद्दल खूप गप्पा होतात. अवी मात्र फारसा माझ्या वाट्याला येत नाही. या मुंबईकरांचा जीवनक्रम घड्याळाच्या काट्यावर चालतो. सकाळपासून जवळजवळ बारा तास ही डोंबिवलीकर मंडळी लोकलचा प्रवास आणि ऑफिस यामध्ये घालवतात. लोकल गाड्यांचा गोंधळ असेल तर त्याहून अधिक वेळ मोडतो. झोपेचे सात-आठ तास. मग या मंडळींना खाजगी आयुष्यासाठी किती वेळ आणि उत्साह राहतो? पण तेवढ्यातही इथली मंडळी कोणत्या ना कोणत्या उद्योगात गुंग असतात. इंदू, आपला अवीपण त्यातलाच.'

'इंदू, सुमनचा दिनक्रम बघितला की मी थक्क होतो. एकसारखी कामात व्यग्र असते. परवा अवीचा देशमुख नावाचा एक मित्र आला होता; म्हणजे अवी मुद्दाम माझी ओळख करून देण्यासाठी घेऊन आला. बँकेची नोकरी सांभाळून इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासात रममाण असतो. आम्ही गप्पा मारत होतो. तेवढ्या वेळात सुमनची अष्टावधानी कामं चाललेली बघून तो म्हणाला, "वहिनी, तुमची एका वेळी आठ कामं चालली आहेत ना, त्यात मी आणखी एक काम सांगतो. मला आता आणखी एक कप चहा ठेवा." गंमत म्हणजे तो आल्या आल्या चहा झाला होताच, पण तासभर गप्पा झाल्यावर दादा आता दमले असतील म्हणून आलं घालून सुमनला चहा केला होताच!'

'इंदू, आज मला भेटण्यासाठी सई आपल्या मुलाला- राजाला घेऊन आली होती. आता हा राजा म्हणजे राजा राजवाडे. मोठा नामांकित लेखक झालाय. गिरगावातील तारा बागेत एका खोलीत संसार मांडून लेखनाचा एवढा प्रचंड व्याप सांभाळतो ही खरोखर कौतुकाची गोष्ट आहे. सईपाठोपाठ दादरहून ठकी-गंगूपण येऊन गेल्या. सांगलीची इथं स्थायिक झालेली माणसं येत असतातच. मला बरं वाटतं, पण सुमनला खूप काम पडतं याचं वाईट वाटतं. दारावरची बेल आणि गॅसवरील चहाचं आधण यांची स्पर्धा लागलेली असते!'

'इंदू, मी अवीच्या ब्लॉकमध्ये बसलोय. समोर टीव्ही आहे. शेजारी टीपॉयवर भरपूर वर्तमानपत्रं, मासिकं, पुस्तकं माझ्याभोवती पडली आहेत. असं दृश्य म्हणजे माझ्या आनंदाचा परमोच्च क्षण आणि तरीही माझ्या डोळ्यांत पाणी तरळतंय. यापुढं जिंकायला जग नाही म्हणून अॅलेक्झांडरच्या डोळ्यांत पाणी आलं आणि वाचायला एवढं प्रचंड साहित्य पडलंय पण डोळ्यांमध्ये वाचायची शक्ती नाही म्हणून माझ्या डोळ्यांत पाणी गोळा झालंय!'

'इंदू, तुझ्या अवीचा ब्लॉक सुसज्ज आहे पण लहान आहे.

आजपर्यंत मी किती वेळा आलो आणि महिना महिना राहिलो. इंदू, तुझा योग तर फारच थोड्या वेळा आला. एक दिवाळी आपण सर्व कुटुंबीयांनी इथं छान एकत्र घालवली. नंतरच्या तीन-चार फेऱ्या टाटा हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठीच झाल्या. त्यावेळी कधी जागा लहान वाटली नाही, पण आता कायम वास्तव्यासाठी आल्यावर मात्र जाणवतंय. मंजाचा फॉर्मसीचा अभ्यास चालतो. केवढी मोठमोठी पुस्तकं घेऊन बसते पोरगी. माझी कुचंबणा होते. खोकल्याची एकसारखी मोठी ढास लागते. रात्री लघवीसाठी उठावं लागतं. त्यामुळे बिचारीच्या अभ्यासात आणि झोपेमध्ये माझा व्यत्यय येतो. सांगलीत आपल्या माडीवर मी निवांत होतो. बीबीसी लावतो. मोठा आवाज ठेवला तर इथं सगळ्यांच्या झोपेत व्यत्यय येतो. अवीने कानात घालून ऐकावे म्हणून इअर-फोन आणला आहे. पण ते तंत्र मला जमत नाही.

'दिवसा वेळ जात नाही. थोडा वेळ, अक्षर लावून लावून वाचतो पण लागलीच डोळ्यांतून पाणी येऊ लागतं. आता डोळ्यांची शक्ती अगदी क्षीण झाली आहे. त्यात फारशी सुधारणा होणार नाही असं सगळ्याच नेत्रतज्ज्ञांनी सांगितलं आहे. सुमन दुपारी काही ना काही वाचून दाखवते, पण तिचे स्वतःचे व्याप किती आहेत.

'आता सर्वांना पत्रं लिहीत बसतो. एकेकदा ठीक आहे. पण रोज रोज लिहीत बसलो तर तो एक चेष्टेचा विषय होईल. इंदू, परमेश्वरानं सोडवावं.

'चैतन्यरहित, उत्साहविरहित जीवनाला पूर्णतः कंटाळलेल्या माणसाला जगवण्यात देवाला काय हौस वाटते, कोण जाणे? एवढ्या नीरस जीवनात तुझ्या आठवणींचे तुषार मधुनमधून उमटतात आणि तेवढा काळ आनंदात जातो.'

'इंदू, काल सुमनकडे घरगुती कामं करणारी एक मुलगी आली होती. आपल्या ब्राह्मण जातीतलीच आहे. आई-वडील कोकणातले. त्यांनी फारशी चौकशी न करता मुलीचं लग्न लावून दिलं. नवरा दारुडा. स्वतः मिळवलेला पैसा दारूत घालवायचाच पण बायकोने मोलमजुरी

करून घरात आणलेला पैसापण दारूत घालवायचा. बेहोष अवस्थेत भटकायचा. घरी आल्यावर सर्वच दारुड्यांसारखी बायकोला मारहाण करायचा. एक दिवस, कुठेतरी नाहीसा झाला आणि डोंबिवलीच्या प्लॅटफॉर्मवर मृतावस्थेत सापडला. नगरपालिकेने त्याच्या प्रेताची बेवारशी म्हणून विल्हेवाट लावली. त्या मुलीला सगळं काही कळलं होतं, पण त्याला इतकी विटली होती, की माझा हा नवरा आहे असं सांगायला काही ती पुढे आली नाही. असा संसार, पण ही मुलगी डगमगली नाही. आपलं कुंकू स्वतःच पुसलं आणि स्वतःच आपलं नाव विवाह संशोधन मंडळात जाऊन नोंदवलं. सुदैवानं तिच्या हाताला यश आलं. लग्न ठरलं म्हणून आनंदानं सुमनला सांगायला आली होती. सुमन तिला बरीच कामं मिळवून देते....

'काही का असेना स्त्रिया आता स्वावलंबी होऊ लागल्या आहेत. एक नवरा मरण पावला तर दुसरा करून घेण्यासाठी स्वतः धिटाई दाखवू लागल्या आहेत. आगरकर यांच्या आत्म्याला धन्य वाटत असेल.'

'इंदू, डिसेंबर महिना सुरू झालाय. इथंसुद्धा थंडी पडते. सांगलीत तर किती पडत असे! पूर्वी आपल्याकडे गॅस येण्यापूर्वी तू कोळशाची शेगडी पेटवायचीस. त्याभोवती आपण सगळे गप्पा मारत बसत असू. त्या शेगडीवर चहा करून पिण्याचा आपला नित्यक्रम कधी चुकायचा नाही. स्वेटर घालायचा तुला कोण कंटाळा! घरकाम करताना त्याची तुला कसली अडचण वाटायची, कुणास ठाऊक? मी फार रागावलो तर माझ्या समजुतीपुरता स्वेटर घालून दाखवायचीस, पण केव्हा काढून टाकायचीस ते कळायचंच नाही. पण खरंच, त्या शेगडीभोवती चहाचे घुटके घेत घेत सगळे मिळून गप्पा मारायला किती मजा यायची! असं कौटुंबिक संमेलन मनाला उन्नत करतं.'

'इंदू, काल रात्री पायाची आग होऊ लागली. नाक चोंदलं. नेहमीप्रमाणे ताप येणार असं वाटलं. क्रोसिनची गोळी घेतली. थोडी झोप आली. रात्रीत दिवेही गेले ते लक्षात नव्हतं. अंधारात बटन लावायला

गेलो तो स्टँडच्या काचेला धक्का लागून ती फुटली. अगदी अपराधी, चोरट्यासारखं वाटलं. सुमनने लागलीच सगळ्या काचा गोळ्या केल्या. अर्वीने केर काढला. दोघांनी जणू काही झालंच नाही अशा सहजी वृत्तीनं नेहमीची कामं सुरू केली. मी मात्र खजील झालो. यावरून धडा घेतला. हातात बॅटरी घेतल्याशिवाय कुठेही अंधारात हिंडायचं नाही. या वयात इतरांना त्रासदायक अशी आगळीक आपल्याकडून होणार नाही याबाबत दक्ष असलं पाहिजे....'

'इंदू, म्हातारपणात कसं वागावं ही एक बिकट समस्या आहे. प्रसंग, व्यक्ती, काळ यांचा समतोल साधून शहाणपणानं वागलं तर म्हातारपण थट्टेचा विषय होणार नाही. आत्मचिंतन, आत्मानंद व आत्मनिवेदन यामध्ये वृद्धांनी स्वतःला गुंतवून घ्यावं म्हणजे त्यांचा वेळ जाईल व इतरांना कंटाळा येणार नाही... अर्थात, या झाल्या जर-तरच्या गोष्टी. विधाता आपल्या मार्गानं जातो. हा मार्ग जीवमात्राला त्रासदायक असला तरी त्याला त्याची काय चिंता? खरंच, या विश्वाच्या निर्मितीतील व्यवहारात आपण मानव काही अडथळा आणू शकत नाही... हा विधाता, परमात्मा वा आदिशक्ती कोण याचाच शोध लागत नाही. शास्त्रज्ञांची बुद्धी कोती पडते आणि तेही शेवटी या अज्ञात व अबोध शक्तीला शरण जातात.'

'इंदू, एकांतात आपणच आपलं दुःख किती गोंजारत बसतो याची काल माझी मला लाजच वाटली. काल संध्याकाळी बाबल्याने एका अंध माणसाची ओळख करून दिली आणि नंतर त्याची हकीकत सांगितली. त्या सद्गृहस्थांचं आडनाव भिडे आहे. त्याला दिल्लीत चांगली नोकरी होती. डोळ्यांना दिसण्याचा त्रास होऊ लागला म्हणून डॉक्टरांची बरीच महागडी ट्रीटमेंट घेतली, पण उपयोग झाला नाही म्हणून ऑपरेशन केलं. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळं त्याचे शेवटी दोन्ही डोळे पूर्ण निकामी झाले. पूर्ण अंधकारमय जीवन. काय अवस्था असेल बिचाऱ्याची, पण बायको मोठी खंबीर. दोघं दिल्ली सोडून इकडे महाराष्ट्रात आली. जवळ

पुंजी होती ती या ट्रीटमेंटमध्ये आणि मग कोर्टात दाव्याच्या कामी खर्ची पडली. बायको आता काही ना काही उद्योग करते. ती किंवा मुलगा या गृहस्थाला गणपतिमंदिराच्या दारात आणून उभे करतात. तो लॉटरीची तिकिटं विकतो. ब्रेल लिपीच्या आधारे काही तरी शिकण्याची आणि चार पैसे कमावण्याची उमेद बाळगून आहे.

'इंदू, अशी माणसं जगात अनेक असतात. आपली दुःखं कुरवाळत बसत नाहीत. मी एक ठरवलंय, इंदू, मी कधी लॉटरी तिकिटं घेत नाही, पण त्या गृहस्थाकडून इथं आहे तोपर्यंत रोज घेणार आहे; आणि सुदैवानं बक्षिस मिळालंच तर नक्की त्यालाच देणार. तुझी शपथ. बघू या देव काही मदतीला येतो का?'

'इंदू, या अफाट विश्वाच्या पसाऱ्यात तू आणि मी म्हणजे किस पेड का पत्ता. पण हा 'स्व' प्रभावी ठरतो. अल्पकाळ माणूस त्यामुळे स्वानंद-सुखात मग्न होतो..... मुलं, सुना चांगली वागतात. मी पाठवलेल्या लेखांवर प्रशंसापत्रं येतात. सर्वजण माझ्यावर चांगुलपणाचा वर्षाव करतात. ही केवळ तू पेरलेल्या चांगुलपणाची फळं आहेत....अशा या सुखी वातावरणात मी हा देह सोडून गेलो तर! सोनं होईल माझं. पण हा 'सोनियाचा' दिवस उगवत नाही. अजून किती आयुष्य आहे? कल्पना येत नाही. आज सहज कपाटातील आरशात बऱ्याच दिवसांनी स्वतःला न्याहाळलं. चेहऱ्यावरून तरी वृद्धापकाळातील अंतिम अवस्थेच्या फार मोठ्या खुणा दिसत नाहीत. भारी चिवट शरीर आहे. कोकणी हाड आहे. लवकर खतम होणार नाही. मी मरणाला सिद्ध आहे, पण मृत्यू येतच नाही माझ्या भेटीला. काय करू?'

'इंदू, काल तुझा आवाज टेपवरून ऐकला. तो क्षीण, कंपयुक्त घोगरा आवाज ऐकला. कॅन्सरच्या तुझ्या त्या आजारात आपल्या अवीची टेपरेकॉर्डर खरेदी करण्याची कोण धांदल उडाली होती! तुझा आवाज, कदाचित शेवटचाच ठरू शकणारा आवाज टेप करून ठेवण्यातील अवीची काळजी आपल्याला समजत होती पण त्यासाठी

म्हणून आपण टेपरेकॉर्डर खरेदी करत आहोत हे आपल्याला कळू न देण्याची त्याची कसरत पण चालू होती. अवीने आपल्यापुढे मोठा आव आणला. मित्र मागे लागलाय. त्याला त्याचा टेप विकायचा आहे असं सांगत अवीने टेप घरी आणला. सगळ्यांचे आवाज टेप केले. आपल्या बाबल्याची मुलगी कीर्ती तुला भेटायला आली होती. अवीने तिच्या आवाजात तुझ्या काही कविता 'गीतरेखा'मधून टेप केल्या. माझ्या आवाजात 'दक्षिण महाराष्ट्र'तील अग्रलेखाचा काही भाग टेप केला आणि मग अगदी सहज बोलल्यासारखा अवी तुला म्हणाला, ''आई, तू काहीतरी बोल बघू.'' त्यावेळी मी क्षणभर शहारलो होतो. आता आईचा आवाज जाणार, आवाजच काय तिचाही शेवट केव्हाही होऊ शकतो. त्याआधी तुझा आवाज मला टेप करू दे अशीच ती मूक विनवणी होती. तू सुज्ञ होतीस, समंजस होतीस. त्रास होत होता तरी मोठ्या कष्टाने दोन-चार वाक्ये बोललीस. ''अविनाश, तू टेप घेतलास. खूप आनंद झाला. आता आपल्याला खूप ऐकता येईल... माझी मंजा तंबोऱ्यांवर बसेल.....'' टेपवर तुझा आवाज ऐकताना कितीही संयम केला तरी डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहायला लागतात. म्हणून तर अवी टेप लावायचं टाळत असतो.'

'इंदू, आज १४ सप्टेंबर. इंग्रजी तिथीप्रमाणे माझा वाढदिवस. प्रथम माझी आई आणि नंतर तू माझा वाढदिवस साजरा करत होतीस. नंतर मुलं मोठी झाल्यावर आपण आपले वाढदिवस बाजूला ठेवले. आपण १७ जानेवारी हा आपल्या लग्नाचा वाढदिवस तेवढा साजरा करत असू. तू गेल्यावर तेही संपलं. पण आजचा भाग्यदिवस बघ. .....आज सकाळी अवी-सुमन-मंजा-लालू माझ्या कॉटसमोर उभे. तुझ्या फोटोला वंदन करून सर्वांनी मला नमस्कार केला. अवी म्हणाला, ''दादा, आज चौदा सप्टेंबर. तुमचा वाढदिवस. आज तुम्ही पंच्याहत्तराव्या वर्षात पदार्पण केलंत.'' सुमन म्हणाली, ''या निमित्ताने आम्ही तुम्हाला आरामखुर्ची आणलीय. तुम्हाला आवडतो त्या रंगाच्या लोकरीचा स्वेटर आज येईल. आई करायच्या तसा साधा केक केलाय.'' माझ्या डोळ्यांतून अश्रू

घळाघळा वाहू लागले.

'अवीने सकाळी काही पत्रकार मित्र चहापानासाठी बोलावले होते. त्यांनी माझा मोठा सत्कार केला. सगळं अनपेक्षितपणं झाल्यानं मी संकोचलो. मला त्यांच्या अपेक्षेप्रमाणे काही बोलता आलं नाही.'

'इंदू, हा खोकला, लघवी यांचा मधुनमधून एकसारखा उद्भवणारा त्रास यांनी अगदी छळवणूक मांडली आहे. या सर्व व्याधींनी हैराण केलं की जीव नकोसा होतो. एक डोळे धड असते तर या व्यथांना मी जुमानलं नसतं. पण दृष्टिदोषामुळे मी अतिशय वैतागतो. मनासारखं काही वाचता येत नाही. सावकाश, थांबून, थांबून अक्षरं लावत वाचल्यानं मनाचं समाधान होत नाही..... आयुष्याची दोरी इतकी लवचीक व बळकट आहे, की तुटता तुटत नाही. ऐवीतेवी जगणं भाग आहे तर नुसती कुरकुर करण्यात काय अर्थ? आता वाटतं, एखादा छंद असता तर किती छान झालं असतं! वाचन, गप्पा व प्रवास एवढाच नाद. वाचनाला दृष्टी धड नाही, गप्पांना योग्य मित्र नाहीत, प्रवासाला सुदृढ आरोग्य नाही!'

'इंदू, अखेर हो-नाही करता करता मी ब्रह्मपुरी गाठली. अवीला रजा मिळाली. माझ्यापायी पोरांच्या रजा खर्ची पडतात याचं वाईट वाटतं. तसा हा खूप लांबचा पल्ला आहे. नागपूरजवळ म्हणायचं पण नागपूरहून बसनं यायला तीन तास लागतात. अवी बरोबर होता त्यामुळे प्रवासात तसा काही त्रास झाला नाही. रवीचं घर ऐसपैस आणि छान आहे. मला चांगली गोष्ट म्हणजे तळमजला आहे. मोकळं अंगण आहे. रवीची स्टेट बँक अगदी समोर दिसते. संध्याकाळी तिथले दिवे मालवले गेले की मंदार-मधुरा आनंदतात. आता बाबा येणार म्हणून. इंदू, आपली मधुरा अगदी गोड दिसते. चारूचीही तब्येत चांगली दिसते. सकाळी फिरायला मोकळा भाग चांगला आहे. मात्र मला वाटली तितकी झाडी नाही.'

'इंदू, रवी-चारूचा संसार बघून अगदी खूश झालो. त्या दोघांनी इथल्या लोकांमध्ये चांगला जम बसवला आहे. मालक बसवय्या आणि

त्यांचे कुटुंबीय मनमिळावू आहेत. रवीचे बँकेतील मित्र ठाकूर व त्यांच्या पत्नी सुस्वभावी आहेत. आपला मंदार आता सायकल छान चालवतो. अवी आल्यामुळे खूप गप्पा झाल्या. काका आल्यामुळं मुलं खुशीत होती. आज तो लागलीच परत गेला. चारूचे वडील आले आहेत. बघू या, माझा जम कसा बसतो ते.

'इंदू, ब्रह्मपुरीत येऊन एक महिनासुद्धा झाला नाही. आता फेब्रुवारीच्या अखेरीस उन्हाळ्यानं आपली चुणूक दाखवण्यास सुरुवात केली आहे. चारू उन्हाळ्याची सुट्टी लागली की एप्रिलमध्ये सांगलीला जाणार तेव्हा तिच्याबरोबर जायचं असा बेत आहे. त्रास फार वाटला तर मुक्काम आधीच हलवायची वेळ येईल. सोबतीसाठी थांबावं लागणार..... या उन्हाळ्यावरून आपल्या दिल्ली-आग्रा प्रवासाची आठवण झाली. आग्र्यास गेलो तर ताजमहाल परिसरात पादत्राणं घालून फिरण्यास बंदी. चटके खात खात आपण सर्वत्र हिंडलो. दिल्लीतील गेस्ट हाऊसमध्ये भयंकर उष्मा होत असूनही दुपारी तीन वाजता चहा घेण्याचा प्रघात आपण मोडला नाही. काश्मिरात थंड आणि दिल्ली-आग्रा इथं उष्मा अशा हवेतील प्रवास तुला झेपला. प्रवासातील त्या अडचणीही किती सुखकारक वाटत होत्या!'

'इंदू, काल उष्णतेची बाधा झाली. सनस्ट्रोक काय असतो याचा कडू अनुभव मिळाला. डोकं भयंकर तापलं. गरगर फिरू लागलं. काय होतं ते कळेना. बहुधा मूर्च्छा आली असावी. चारूने लागलीच डॉक्टरांना बोलावलं. त्यांनी तपासलं. दोन प्रकारच्या गोळ्या लिहून दिल्या. अर्ध्या-अर्ध्या तासानं लिंबाच्या सरबताचे चार चमचे घुटके घेण्यास सांगितलं. चारू घाबरली होती. पंख्यानं वारा घालत होती. मला कोणाकडून अशी शुश्रूषा करून घेणं आवडत नाही. मी तिच्या हातून पंखा काढून घेतला आणि स्वत:च वारा घेऊ लागलो. चारू आणखी घाबरली! मेंदूवरचा माझा ताबा गेला असं तिला वाटलं की काय कोण जाणे? किती माझी काळजी! अगदी असंच डोंबिवलीला झालं. घरात चालता चालता घेरी येऊन ,पडलो. सुमननं माझं डोकं मांडीवर घेतलं. वारा घातला. डोके

चेपले. डॉक्टर येईपर्यंत माहीत होते ते सगळे घरगुती उपाय ती करत बसली. अशा तुझ्या सुना. काय ही माझी पुण्याई! या जगाचा निरोप घेताना दोन्ही सुना, मुलं, मेहुणा, मेहुणी यांना जणू काही तू मूक संदेश देऊन, माझे काही हाल होणार नाहीत अशी खात्री झाल्यावरच प्राण सोडलास!'

'इंदू, रवी मला घेऊन पुण्याला आला. उन्हाळा सहन होणार नाही. ताबडतोब हलवणं उत्तम असा डॉक्टरी सल्ला पडल्यामुळे रवीला रजा काढणं भाग पडलं. एक-दीड महिन्यात चारू, मंदार-मधुरास घेऊन सांगलीत येणार आहे म्हणून पुण्यात थोडे दिवस सुशाकडे राहून मी सांगलीला जाईन. अवीला फोनवर रवीने कळवलं. तो उद्या इथं पुण्यात येईल. त्याच्याकडे डोंबिवलीत जरा काळजीचं वातावरण आहे. त्याची बदली नागपूरला झाली आहे. त्यामुळं सुमन हादरून गेली आहे. एक तर, तिचं युटरसचं ऑपरेशन करणं भाग पडणार असं दिसतं; आणि तेसुद्धा शक्य तितक्या लवकर. त्यातून मंजाची बारावीची परीक्षा सुरू होत आहे. तिच्या एकूण हुशारीवरून ती मेडिकल वा तत्सम कोर्सला जाणार हे निश्चित. त्यामुळे त्याला मुंबईतून बिऱ्हाड हलवणं अवघड. नागपूरला एकट्यानं जावं तर दोन ठिकाणी बिऱ्हाड ठेवणं खर्चाच्या दृष्टीनं परवडणारं नाही. त्यातून आता माझी जबाबदारी त्याच्यावरच. अवीची मोठी कोंडी झाली आहे. तो बदली रद्द करून घ्यायच्या प्रयत्नात आहे. तसं जमणं अवघड. प्रमोशन नाकारलं तर पुढील तीन वर्षं तो 'बी' ग्रेडच्या प्रमोशनला जाऊ शकणार नाही. पुन्हा कसला तरी अलाऊन्स कमी होऊन पगारात घट होणार म्हणून तूर्त तरी दोन-तीन महिने मी सांगलीतच काढणार. स्वयंपाकाला बाई आहे. ताई-नाना आहेतच. मात्र लाड करायला चारू नाही की सुमन नाही!'

'इंदू, अवी-रवी काय आपलीच मुलं आहेत; पण सुशा माझी काय बडदास्त ठेवते म्हणतेस. मी आलोय म्हणून माझा पुण्यातला जुना मित्र नाना पटवर्धन, आपली बिंबा-विजय, तुझ्या मैत्रिणी विजूची ताई, शांती

कोल्हटकर अशा अनेक मंडळींना घरी बोलावते, जेणेकरून माझा वेळ गप्पागोष्टींमध्ये चांगला जावा. कॅन्सरच्या ऐन आजारात तिच्या मुलीच्या, सिंधूच्या लग्नात जी विहीण (कविता) तू घाईघाईत करून अवीबरोबर पाठवली होतीस ती कविता, सुशाने तुझी आठवण म्हणून फ्रेम करून घरात लावली आहे. इतकंच नाही तर अनेक परिचितांच्या लग्नात सुशा ती विहीण स्वत: गाऊन दाखवते. सुशा सांगत होती, की अनेक जण विचारतात, ती कुणी रचली म्हणून. खूप जणींनी ती विहीण कॉपी करून नेली आहे.'

'इंदू, काल हळुहळू जवळच्या अरण्येश्वराच्या मंदिरापर्यंत गेलो. सुशाने बरोबर विकासला माझ्याबरोबर पाठवलं होतं. किती माझी काळजी! मी दमलो पण मंदिराच्या परिसरात बरं वाटलं. या ठिकाणी तू आणि मी किती वेळा गप्पा मारत बसायचो. पुणे तुला मनापासून आवडायचं. कुणा नातेवाईकांकडं न जाता आपण किती वेळा सरपोतदारांच्या 'पूना गेस्ट हाऊस'मध्ये उतरायचो. तुझी पुण्यातील प्रेक्षणीय स्थळं म्हणजे पुण्याची मंडई आणि तुळशीबाग!.....इंदू, सुशानं कमालच केली. आज सांगलीला जाण्यासाठी तिने स्पेशल टॅक्सीच ठरवली आणि पैशांच्या बाबतीत एक अक्षरही बोलू देत नाही. इंदू माझी मोठी बहीण पण आईच्या मायेनं तिनं मला सांभाळलं. तुमच्यासाठी चार पैसे खर्च झाले तर ते माझं कर्तव्यच आहे. अशी तिची भावना. इंदू, तुझ्या पुण्याईवर मी जगत आहे. किती घेण्याजोगे गुण तुझे! स्मरण झालं की तुझ्या हृदयाची विशालता व माझ्या मनाची संकुचितता यांची मी स्वत:शी तुलना करतो. किती क्षुद्र मी, किती थोर तू! तरी तू माझ्यावर प्रेम केलंस. खचित माझ्या अंगी काही गुण असले पाहिजेत!'

'इंदू, आता पुन्हा सांगलीत आलो. खरं सांगू. अगदी अवी-रवी आपली मुलं असली तरी मला आपल्या या घरातच राहायला आवडतं. इथं वस्तू-वस्तूत तुझं अस्तित्व जाणवतं. तुझा भाऊ, नाना माझी सर्वतोपरी काळजी घेतो. आता माडीवरची चढउतार झेपणार नाही, म्हणून नानानं

गड्यांकडून माझा वरचा पलंग खाली आणून ठेवला आहे. आताशा दातांची कवळी खूप त्रास देऊ लागली आहे. डोळे, नाक, कान, दात सारे जायबंदी झाले आहेत. खोकला बारमाहीचाच आहे. प्रोस्टेड ग्लँडचा त्रास फार जाणवतोय. इतक्या आधीव्याधींनी ग्रस्त आहे तरी जगतो!

'काल नानाने मला बळजबरीनं रिक्षातून डॉ. विजय शहाकडं नेलं. हा डॉक्टर माझा विद्यार्थी आणि आपल्या अवीचा मित्र. त्याने सांगितलं की जुनी कवळी सैल झाली आहे. हिरड्या झिजल्या आहेत. नवी कवळी करून घेणं इष्ट. माझी बिलकूल तयारी नाही. नसे ना का कवळी; असे कितीसे दिवस काढायचे आहेत? मऊ भात खाऊन राहावं.

'पण इंदू, रात्री मनात एक वेगळाच विचार चमकला. तुझ्या मृत्यूपूर्वी अगोदर अशीच कवळी बनवलेली होती. ती वापरण्यापूर्वीच तू या जगातून निघून गेलीस! इंदू, माझंही तसं होईल का? इतिहासाची पुनरावृत्ती होईल का? तसं झालं तर सोन्याहून पिवळं. योगही तसाच आलाय. तू शेवटचा श्वास सोडलास त्याच ठिकाणी नानानं माझा पलंग आणून ठेवलाय! करावीच मग कवळी!'

'इंदू, कालचा दिवस कमालीच्या शारीरिक आणि मानसिक यातनांत गेला. लघवीचा त्रास पुन्हा पूर्वीसारखा होऊ लागला आणि फारच जोराचा होत आहे. खोकल्याची उबळ तर विचारू नकोस. बडका पडता पडत नाही. नाना डॉक्टरांना अगदी घाईनं घेऊन आला. त्यांनी इंजेक्शन दिलं. गोळ्या आणि औषधं लिहून दिली. चारू-रवीची वाट आता पाहत आहे. डोंबिवली-ब्रह्मपुरी-पुणे असा मोठा प्रवास झाला. त्याचा त्रास झाला असेल. भेटावयास येणाऱ्या लोकांची गर्दी काल फारच झाली. आता अधिक लोक आले की त्यांचं बोलणंही सहन होत नाही. मध्येच, लघवीसाठी उठावं लागतं. होईपर्यंत जीव जातो की काय असं वाटतं. खोकला भुतासारखा मागं लागलाय. असा एकेक दिवस छळ मांडतो. नाना अवीला सारखा बोलावत आहे. सदा मरे त्याला कोण रडे अशी माझी स्थिती आहे. अवी-रवीला बोलावणं सोपं का आहे? त्यांच्या रजा, ऑफिस, प्रवास....पण नानाला पटत नाही.... चारूने मंदार-मधुराला

इथं, सांगलीतच राहावं अशी त्याची इच्छा. किती अनैसर्गिक आहे? इंदू, पूर्वी सुमन तुझ्या दुखण्याच्या वेळी सहा महिने इथं मुलांना घेऊन राहिली होती. पण तुझं दुखणंच तसं मोठं होतं. अवीला एकटं राहण्यात त्रास होता पण आता रवीला त्याहून मोठा त्रास होईल. अवीला डोंबिवलीत जेवण्याखाण्याचा त्रास नव्हता. आजुबाजूला आपली नातेवाईक मंडळी होती. रवीचं तसं नाही. ब्रह्मपुरीसारख्या दुर्गम भागात त्याला चारूखेरीज कोण आहे? या ऐन उमेदीच्या वयात त्या तरुण नवरा-बायकोनी अलग राहायचं. कशासाठी? तर एका मरू घातलेल्या जिवाची सेवा करण्यासाठी?.....नानाला काही पटत नाही. चीडचीड करतो. माझ्या जिवंत राहाण्यानं कोणाला किती उपद्रव होणार आहे देव जाणे! दोन सुखी कुटुंबांत माझं जगणं किती अशोभनीय आहे!'

'इंदू, घरात काही अप्रिय घटना घडल्या की मी मौनव्रत धारण करतो. आत्मपरीक्षण करतो. असं का व्हावं याचा खोल विचार करतो. प्रत्येक व्यक्तीला आत्मप्रतिष्ठा असते ती दुखावली की साहजिक तिला राग येतो. अशा वेळी मौनव्रत स्वीकारावं. हृदय विशाल करावं. मन उच्च सृष्टीत न्यावं. कटुता टाळावी आणि विश्वैक्य साधण्याचा प्रयत्न करावा. इंदू, तू गेल्यापासून एकाकीपणा तीव्रतेनं जाणवू लागला आणि आता तर असह्य होऊ लागला आहे. तुझ्या जीवावर मी बेफिकीर असे. कोणाला काय वाटेल याची पर्वा करत नसे. पण आताशा मन अतिशय हळवं, कमालीचं संवेदनाशील व अमर्याद विवेकी बनत चाललं आहे. हा बदल इष्ट वा अनिष्ट हे न कळे पण हे परिवर्तन निश्चितपणे घडून येत आहे व ठळकपणे दिसत आहे.'

'इंदू, सारखी अवी-रवी, सुमन-चारू आणि नातवंडं आपल्याभोवती असावीत. घर भरलेलं असावं. सारखं हास्यविनोद आणि आनंदी वातावरण असावं असं फार फार वाटतं. पण हा खुळा, व्यवहारशून्य विचार आहे. आपण एकटं जन्माला येतो व आपणास एकटं जायचं आहे हा मंत्र वृद्धांनी सतत जपावा व स्मरावा. उद्याची

चिंता न करता आजचा काल सत्कृत्य करण्यात, सदाचारानं वागण्यात आणि प्रसन्न वृत्तीनं आध्यात्मिक चिंतनात घालवावा. सांसारिक गोष्टींविषयी आत्यंतिक जिव्हाळा दाखवू नये.'

'इंदू, आज एक सुखद अनुभव आला. आपण संसाराला नुकती सुरुवात केली तेव्हाचे डिग्रजकर बंगल्यातील आपले शेजारी भोसले कुटुंब होतं, ते तुला आठवत असेलच. त्यांची बेबी आपली किती लाडकी होती! बॅडमिंटन खेळात तिनं खूप नाव कमावलं. भोसलेमास्तर तर विजय हजारे यांचे गुरूच. त्यांचा मुलगा बाबू क्रिकेटमध्ये न चमकेल तरच नवल. अनेक मोठमोठे सामने त्याने गाजवले. त्याच्या क्रिकेट सेवेचा गौरव म्हणून आपल्या सांगलीत त्याच्यासाठी परवाच गौरव-सामना खेळला गेला. त्याला पंच्याहत्तर हजार रुपयांची थैली देण्यात आली. काल, तो मला भेटायला आला. उकाड्यानं अस्वस्थ झाल्यानं मी अंगात काहीच घातलं नव्हतं. त्यामुळेच माझी तोळामासा प्रकृती पाहून त्याला भडभडून आलं असावं. त्यानं खिशातून चेकबुक काढलं. एका कोऱ्या चेकवर सही केली. मला म्हणाला, ''सर, सांगली हायस्कूलमध्ये असताना मी तुमचा विद्यार्थी होतो. मी आता मोठा झालोय ते तुमच्या आशीर्वादामुळे. या चेकवर काहीही आकडा टाका. गुरुदक्षिणा समजा.'' इंदू, माझ्या डोळ्यांत एकदम पाणीच आलं. मी शांत झाल्यावर त्याला म्हटलं, ''बाबू, तू मोठा झालास आणि तरी आपल्या गुरुजनांना विसरला नाहीस ह्याचं मला कौतुक वाटतं. माझ्या सुदैवानं माझी दोन्ही मुलं सुस्थितीत आहेत. मला काही नको.'''

'इंदू, एकेक दिवस जिकिरीचे जात आहेत. रवीच्या घरात चारूचं ऑपरेशन आणि अवीच्या घरात सुमनचं ऑपरेशन. आता यावेळी माझं काय करायचं याचा बिचाऱ्यांना प्रश्न पडतो याचं वाईट वाटतं. मी किती भारभूत होऊन राहिलो आहे. प्राण कुडीतून गेला तर सोन्याहून पिवळं होईल, पण तो मृत्युदेव आहे तरी कोठे? मला न्यायला विसरतो कसा?'

'इंदू, आता मात्र उरलेलं वास्तव्य डोंबिवलीतच करावं लागेल. अवी काल आला. त्याने आपली ट्रॅन्सफर सर्व प्रकारचं नुकसान सोसून रद्द करून घेतली. नानाचे खिलारे एक स्पेशल गाडी आणि ड्रायव्हर देत आहेत. आज पुष्कळशी आवराआवर केली. तुझ्याविषयीची सर्व कात्रणं, शाळेतील तुझ्या कामाविषयीची सन्मानपत्रं, तुझ्या 'गीतरेखा' पुस्तकावरील अभिप्राय, 'गीतरेखे'ची एकमेव उरलेली कोरी प्रत, माडीवरच्या खोलीतील तुझा तो जुना आरसा, लग्नातील आपला जुन्या पद्धतीचा- आता हास्यापद वाटावा असा फोटो अशा अनेक गोष्टी आवरल्या. मनात विचार आला. यांचा काही उपयोग आहे का? 'काही' काळानं या साऱ्या वस्तू केराच्या टोपलीत पडणार! पण आज मला त्यातील प्रत्येक वस्तू प्राणप्रिय आहे. त्या मला टाकवत नाहीत. या खोलीतून त्या हलल्या तर मी अस्वस्थ होईन. त्यांच्याशी माझं भावनिक साहचर्य आहे. त्यातील प्रत्येक वस्तू मला आपल्या सांसारिक सहजीवनाची आठवण करून देते.'

'इंदू, सांगलीच्या घराची आवराआवर पुरी केली. तेवढ्यानं थकवा आला. नानाने काल संध्याकाळी मित्राची एक गाडी आणली होती. सगळी सांगली हिंडून आलो. माझं आवडतं सांगलीवाडीचं दत्तमंदिर-गणपतिमंदिरापासून, आमराई, विश्रामबागेपर्यंत सर्वत्र हिंडून आलो. सांगलीवाडीहून दिसणाऱ्या तुझ्या शाळेला मनापासून वंदन केलं. नगरवाचनालयात, प्रतापसिंह उद्यानात जाऊन सर्व परिचितांना भेटून आलो. शेजारी निरोप घेतला. सर्वांच्या डोळ्यांतील तरळणारं पाणी मला बरंच काही सांगून गेलं!'

'इंदू, अखेरच्या क्षणी दोन्ही मुलं, सुना, नातवंडं, ताई, नाना, सुशासह माझ्याजवळ असावीत असं वाटतं आणि मला मृत्यू येईल तो तुझ्या मृत्युदिनीच यावा म्हणजे माझं वेगळं स्मरण कोणाला करायला लागू नये. इंदू, पण या सगळ्या गोष्टी आपल्या हातात थोड्याच आहेत?'

'इंदू, सांगलीतून निघालो आणि वाटेत एकसारखी नानाची आठवण येत होती. एकसारखं भाऊसाहेब चहा करू, पाण्याची गरम पिशवी देऊ, अशी माझी काळजी वाहायचा. खूप केलं त्याने माझं. ही सगळी तुझी पुण्याई. आपल्या भावाच्या बाबतीत तू जी माया दाखवलीस त्याला खरोखर तोड नाही. लहानपणी मोठ्या बहिणीच्या नात्याने त्याचं लालनपालन केलंस. जप्ती-वारंट घरावर आलं तेव्हा त्या भेदरलेल्या भावाला तू संरक्षण दिलंस. त्याच्या फसलेल्या वैवाहिक जीवनातून त्याला मोठ्या शर्थीनं बाहेर काढलंस. त्याची वैगुण्यं कधीही जगापुढे आणू दिलं नाहीस. डॉक्टरांना पूर्णपणे विश्वासात घेऊन, त्याचा पूर्वेतिहास सांगून, त्याची वर्तमानकालीन मनस्थिती, पूर्वपरिस्थिती आणि त्याच्यावर झालेले आघात त्यांना व्यवस्थितपणं समजावून सांगून त्याच्यावर उपचार करून घेतलेस. त्याच्यातील न्यूनत्व आपणा दोघांखेरीज कोणालाच कळू दिलं नाहीस. त्याचा बोभाटा होऊ दिला नाहीस. प्रसंगी, नवऱ्याचा विरोध पत्करूनही! तुला-मला दोघांना राजाराणीचा सुखाचा संसार केव्हाच मांडता आला असता! माझा तसा आग्रहही होता. पण आपल्या भावा-बहिणींच्या बाबतीतील कर्तव्यं पार पाडताना तू थोडीसुद्धा कुचराई केली नाहीस. मलासुद्धा गोड बोलून, माझी समजूत काढून तू तुझ्या माहेरच्या कुटुंबीयांसमवेत माझी गाडी जोडून घेतलीस. अशी शिकवण मुलांना दिलीस, बिंबवलीस की त्यांनी कधीही आपल्या मामासंबंधात वेडेवाकडे, अडचणीत आणू शकणारे प्रश्न विचारलेच नाहीत. काही गोष्टी अशा होत्या, की त्या शब्दांतही व्यक्त करता येत नव्हत्या. त्या फक्त तुला आणि मला माहीत होत्या. आज तुझा भाऊ समाजात मान्यताप्राप्त, प्रतिष्ठित नागरिक बनलाय, त्याच्या पाठीशी केवळ तुझी जगावेगळी सांभाळणूक आहे. अलौकिक आहे हे. पण उघडपणे सांगता येत नाही.'

'इंदू, मन:शांती मिळवण्यासाठी आजकाल किती धावपळ सुरू आहे! मी मात्र भाग्यवान. तुझं चिंतन केलं म्हणजे अनुमपेय आनंद, शांती, समाधान व सुख यांचा लाभ होतो. आणि खरं तर, अशा अवस्थेतच देहाचा नाश व्हावा व आत्म्याचं तुझ्याशी पुनर्मिलन व्हावं

असं वाटतं. असं होणं म्हणजेच माझी मुक्ती, निर्वाण असणार नाही का?

'इंदू, मरणानंतर तू भेटशील असा निर्वाळा कोणी देत नाही. त्यामुळे जगण्यात गोडी नाही आणि मरण्यातही अर्थ नाही.'

'इंदू, डोंबिवलीला स्पेशल गाडीनं आलो. वाटेत थोडा पाऊस होता. येताना फक्त पुण्यात सुशाकडे विश्रांती घेतली. निरोप देताना तिच्या डोळ्यांच्या अश्रुधारा थांबतच नव्हत्या. या सगळ्याचा अर्थ तुझ्या लक्षात येतोय ना? मी शांत आहे. खरोखरच, आपण परलोकात भेटणार असलो तर त्यापरता आनंद कुठला?

'इंदू, सुमन मात्र मला जगवायचा जोरदार प्रयत्न करत आहे. सकाळी गुलकंद किंवा मधामधून शिलाप्रवंग नंतर ब्रॉमेक्झाईन, जेवणानंतर कुमारीकल्प, मधल्या वेळी लिव्होजन, त्याआधी सिसटोनची गोळी, सायंकाळी फिरून ब्रॉमेक्झाईन, रात्री दोन चमचे कुमारीकल्प, थोड्या वेळानं लिव्होजन, नंतर बंगशीलच्या दोन गोळ्या... झोप नाही आली तर झोपेची गोळी. दर सोमवारी-शुक्रवारी इंजेक्शन... हे सगळं केवळ निष्क्रिय, निरर्थक जीव जगवण्याकरता!

'यापेक्षा डॉक्टरांनी हमखास मृत्यू आणणारं एखादं इंजेक्शन दिलं तर? कसली आलीय कायदेशीर हरकत? नाही तरी पूर्वी बेकायदेशीर गर्भपात नव्हती का करत डॉक्टरमंडळी!'

'इंदू, आता मात्र आजार आणि डॉक्टर यांचा कंटाळा आला आहे. आज आता चौथ्यांदा एक्सरे काढला. उजव्या बरगडीजवळचा पूर्वीचा न्युमोनियाचा पॅच कमी न होता, थोडा वाढला आहे असं डॉक्टरांना आढळून आलं. त्यांनी सांगितलं, की आता मात्र ऑपरेशन करून काढल्याशिवाय इलाज नाही. मी डॉक्टरांच्या रूममध्येच स्वच्छ सांगितलं की मला आता शस्त्रक्रिया करवून घेण्याइतकं मानसिक सामर्थ्य नाही आणि शारीरिक क्षमताही नाही. गोळ्या, औषधं यांचाच मारा ठेवू. आजवर पाचशेच्या वर इंजेक्शनं झाली असतील.'

'इंदू, लघुशंकेला जायचा धसकाच वाटतो. जावं तर दोन-दोन, तीन-तीन मिनिटं नुसत्या मरणप्राय वेदना होतात. प्राण गुदमरतो. हे आजारपण दोन्ही मुलांना काही सुखानं संसार करू देत नाही. इंदू, न चिडता, मनाचा तोल सांभाळून, प्रसन्न वृत्ती ठेवून मन रमवण्याचा प्रयत्न करतो, पण आता अवघड होत चाललंय सगळं. नुसतं खाली बसणं आणि उठणं या साध्या क्रियासुद्धा जिवाच्या करारावर करतो. इंदू, तुला माझी करुणा येत नाही का?'

'इंदू, हल्ली रात्री झोप कशी ती लागत नाही. बरगड्या दुखतात. ब्रॉंकाईट न्युमोनियाचा कसलासा पॅच तयार झाला आहे. तो फार त्रास देतो. काल लघवीसाठी चार वेळेला उठलो. खोकला थांबता थांबत नाही. मला कळतंय इंदू, हल्ली पानापानांतून सारखी माझी रडकथा चालू आहे, पण मी तरी काय करू? तुझ्यापासून काय लपवू? आणि तुझ्याशिवाय कोणाला माझ्या व्यथा सांगू? शक्य तो, जगापासून व्यथा लपवण्याचा प्रयत्न करतो.'

'इंदू, आता शस्त्रक्रिया करावीच लागणार. मी मनाची तयारी केली आहे. अवीला बजावलंय, की कोणालाही कळवू नकोस. मागे न्युमोनियाच्या पॅचच्या ऑपरेशनचं टाळलं, पण लघवीचा त्रास असह्य झालेला बघून अवी-सुमन पण ऑपरेशन करून टाकू या म्हणत आहेत. ती दोघं अगतिक झाली असतील का? त्या दोघांना खूप दगदग होत आहे याचं वाईट वाटतं, पण नाईलाज आहे. निदान त्यांना आर्थिक तोशीस लागू नये अशी तजवीज करून ठेवणार आहे. मृत्यूचा शेवटचा क्षण इतरांना अल्पसुद्धा त्रास न होता यावा ही मनापासूनची इच्छा आहे. पुढे जगावं असं संमोहन काही नाही. काही इच्छा नाही. माझ्याबाबत काय करावं हे मी अवी-रवीला पत्र लिहून पेटीत ठेवलं आहे. त्यांनी त्याप्रमाणं वागावं. इंदू, तुझ्यामुळे माझी इहलोकीची यात्रा सुखद व आरामदायी झाली. पुढचा सगळा अज्ञाताचा प्रवास. तू भेटशील वगैरे सगळा माझा भाबडेपणा होता. स्वर्ग, नरक, पुनर्जन्म

या साऱ्या मानवनिर्मित कविकल्पना आहेत.'

'इंदू, ही नोंद काल रात्री करून झोपलो. रात्रीचे बारा वाजले असतील. अवी माझ्या पलंगावर येऊन बसला. 'दादा, दादा' म्हणत त्यानं माझ्या छातीवर डोकं टेकलं आणि मुसमुसून रडू लागला. त्याच्या डोळ्यांतून घळघळा पाणी वाहू लागलं. मी गडबडलो. मला म्हणाला, "दादा, मला ऑपरेशनची भीती वाटते. आणखी काही महागडी इंजेक्शनं आहेत म्हणे. ती आपण डॉक्टरांना विचारू." मी त्याच्या पाठीवरून हात फिरवला आणि म्हटलं, "रडू नकोस. मी काही तुझ्या इच्छेच्या बाहेर नाही." तो स्फुंदत स्फुंदत गेला. तो गेल्यावर मात्र इंदू, मला अश्रू आवरेनात. आपला अवी फार हळवा आणि भावनाप्रधान आहे.'

'इंदू, काल रात्री दोनपासून लघवी तटली. काही केल्या होईना. मरणप्राय वेदना झाल्या. पहाटे असह्य झालं तेव्हा "अवी-सुमन" अशा हाका मारल्या. माझा क्षीण आवाज त्यांच्यापर्यंत कसा पोचणार? मग लक्षात आलं. सुमननं माझ्यासाठी उशाजवळ, ऑफिसात ठेवतो तशी एक घंटी ठेवली आहे. दोघं उठली. औषध दिलं. डॉक्टरांची गोळी दिली. त्यानं थोडी ग्लानी आली. इंदू, सुमनची किती तारांबळ होते ते मी बघतोय. पण मी तरी काय करू? त्यात सकाळपासून उचक्या सुरू झाल्या आहेत. इतिहासाची पुनरावृत्ती होते की काय कोण जाणे? इंदू, यातून सुटकेचा एकच मार्ग... मृत्यू....'

दादांची वरील नोंद आहे ती १५ जुलै १९८५ची. त्याच दिवशी संध्याकाळी जवळपास अर्धवट कोमात असल्यासारखी त्यांची अवस्था होती. त्यानंतर काही ते डायरीत नोंद करण्याच्या परिस्थितीत राहिले नव्हतेच. जीवनज्योत मंद होत होत २१ जुलै १९८५ रोजी पूर्णपणे मावळली. आमच्या आईचं निधन १७ सप्टेंबर १९७४ रोजी झाले. त्यानंतर पंधरा दिवसांनीच दादांनी हा एक विलक्षण आणि अतिशय उत्कट अशा प्रकारची जी एक स्मरणसाधना सुरू केली ती जवळजवळ

अकरा वर्षं चालली होती. मृत्यूनंतरच्या सहजीवनाविषयी दादांनी आपल्या डायऱ्यांमधून वेळोवेळी लिहिलं आहे. मृत्यूनंतर नेमकं काय झालं असेल? दादांना खरोखर आई भेटली असेल का? आम्ही सर्वसामान्य माणसं. एवढ्या उंचीवर जाऊन चिंतन करण्याची आमची पात्रता ती काय?

म्हणून इत्यलम्.

❑

# सहज लेखक - रसिक वाचक

दादा एवढ्या सातत्याने डायरी लिहू शकले याचं एकमेव कारण म्हणजे ते मुळात सिद्धहस्त लेखक होते. त्यांना लेखनकला सहजसाध्य होती. निव्वळ पत्नीवर निखळ प्रेम असणारी अनेक माणसं असतात, पण त्या भावनेला सातत्यानं शब्दरूप देणं त्यांना जमतच असं नाही. दादांना आणखी एक गोष्ट सोयीची होती. ती म्हणजे त्यांचं लेखन स्वत:साठी होतं. ते स्वयंस्फूर्त होतं. आपलं लेखन, मग ते साधं पत्रलेखन का असेना, पण ते दुसरं कोणीतरी वाचणार आहे या गोष्टीची 'जाणीव' झाली की त्या लेखनावर अनिवार्यपणे काही मर्यादा पडतात! शब्द तोलून-मापून लिहिणं गरजेचं बनतं आणि त्यामुळे स्वाभाविकपणे त्या लेखनात कृत्रिमता येते. दादांना ती भीती अजिबात नव्हती. त्यामुळेच त्यांच्या लेखनात एक प्रकारची प्रभावी सहजता आढळते. त्यांनी गमतीनं अनेक ठिकाणी म्हटलंय, 'इंदू, या संवाद-पुस्तिकांचा लेखक मी आणि वाचकही मीच.'

दादांनी प्रत्यक्षपणे लेखनाला सुरुवात केली, ती वयाची साठी जवळ आल्यावर. त्यांना लेखनप्रवण केलं ते त्यांचे मित्र व 'दक्षिण महाराष्ट्र' या साप्ताहिकाचे संपादक कै. गं. गो. बिनीवाले यांनी. दादांमधील सुप्त लेखनशक्ती त्यांच्यामधील संपादकाने हेरली आणि रिटायरमेंटनंतरचा वेळ चांगला जावा म्हणून आमच्या आईने लिहिण्याचा घोशाच मागे लावल्यामुळे दादा 'दक्षिण महाराष्ट्र' साप्ताहिकात

नियमितपणे लिहू लागले. तत्पूर्वी माझ्या आठवणीप्रमाणे त्यांनी सहकार विषयावर आणि ग्रंथालय चळवळीसंदर्भात काही लिहिलं होतं. काश्मिरला जाऊन आल्यावर एका स्थानिक वृत्तपत्रात 'मी काश्मिरमध्ये काय पाहिले?' या शीर्षकाखाली एक लेखमाला लिहिली होती. बस, इतकंच. त्यांच्यामधील सुप्तावस्थेतील लेखकाला जागं करण्याचं श्रेय नक्की बिनिवाले यांचं. दादांचे काही लेख, अग्रलेख खूप गाजले. त्यामधील निवडक अग्रलेखांची दोन-तीन पुस्तकं निघू शकली असती, पण अखेरच्या काळात दादांनी जी आवराआवर केली त्यावेळी 'दक्षिण महाराष्ट्र'चे त्यांच्याकडे असलेले सगळे अंक रद्दीत घालून टाकले! त्यांना या डायऱ्या मात्र रद्दीत टाकवल्या नाहीत. कसे टाकतील? त्यांतील पानापानावर आमची आई होती ना?

दादांनी लेखक म्हणून जे काही लिखाण केलं ते राजकीय स्वरूपाचं, स्थानिक प्रश्नासंबंधी होतं. वाङ्मयीन दृष्ट्या खुलून लिहावं, फुलून जावं असं लिखाण त्यांच्या हातून फारसं घडलं नाही. एक तर लिखाणाला सुरुवात उशीरा झाली. त्यात आई गेल्यानंतर ते मनोमनी पार खचून गेले होते. नंतर बऱ्याच व्याधींनी त्यांना त्रस्त केलं. पण खरी गोष्ट, त्यानीच कबूल केल्याप्रमाणे, अशी होती, की त्यांच्या स्वत:मध्ये जिद्द, महत्त्वाकांक्षा अजिबात नव्हती. वेळोवेळी ऊर्मी येई. काहीतरी लिहायला सुरुवात करत आणि अर्धवट सोडून देत असत. काही टिपणं मला मिळाली पण बरीचशी त्यांनी स्वत:च फाडून टाकली होती. संवाद-वह्या हेच त्यांचं लेखन. त्यांनी एका नोंदीमध्ये स्वत:विषयी लिहिलंय-

''इंदू, माझा स्वभाव थोडा तुसडा आणि स्वानंदात रमणारा. इंग्रजी वाङ्मय नि विशेषत: शेक्सपीयरची नाटकं वाचावीत. मराठीतील कथा-कादंबऱ्या व विशेषत: लघुनिबंध यांचं वाचन करावं, या माझ्या आवडी. साहित्यप्रेमी मित्रांच्या कोंडाळ्यात साहित्यविषयक गप्पा, चर्चा, थट्टा, हास्यविनोदय यांत रमून गेलो. प्रखर ध्येयवाद, खडतर तपश्चर्या, सर्वस्वाचा त्याग करण्यास उद्युक्त अशी देशभक्ती अशा जाज्वल्य भावनांनी मी कधी उत्तेजित झालो नाही. त्याचं कौतुक केलं, रसग्रहण केलं. प्रसंगी काही देशभक्तांना मदत केली, इतकंच. ध्येयवादी, शिक्षणात जीव ओतणाऱ्या

शिक्षकांच्या सहवासात मनोभावे रमून गेलो. महत्त्वाकांक्षा, उच्च ध्येयं कधी बाळगली नाहीत. आहे त्या परिस्थितीत समाधानात राहण्याची अल्पसंतुष्ट वृत्ती ठेवली. त्यामुळे जग ज्याला मोठं म्हणतं असं मोठेपण मला स्पर्शसुद्धा करून गेलं नाही. जीवनकलहापासून दूर राहण्याच्या वृत्तीमुळे मी अलिप्त राहिलो. स्वत:चं विश्व प्रतिभेच्या साहाय्यानं निर्माण करण्यात आनंद झाला. व्यवहारात स्वप्नं उतरवण्याची कधी हिंमत दाखवली नाही... म्हणूनच मागे पडत गेलो. माझ्या ठायी बुद्धिमत्ता आहे याची प्रखर जाणीव ठेवून त्याचा उपयोग केला नाही याचं मात्र राहून राहून आश्चर्य वाटतं. कस्तुरीमृगाप्रमाणे सुगंधाचा शोध करत भ्रमराप्रमाणे गुंजारव केला, पण तो सौरभ, तो सुगंध माझ्याजवळ आहे याची जाणीव फारशी झाली नाही. झाली तरी त्या जाणिवेचा आदर केला नाही.''

खरं तर भावुक होऊन ललित लेखन करण्याची क्षमता दादांच्या भाषेत होती, पण पत्रकारितेच्या नादात दादांचं त्या अंगाकडे दुर्लक्षच झालं. डोंबिवलीतील आमच्या घरातील बाल्कनीत बसून दादांनी डायरीत लिहिलंय

'इंदू, पंचाहत्तरीत पदार्पण केलं म्हणून सुमननं बाल्कनीत बसण्यासाठी एक छान आरामखुर्ची आणलीय. अंगाभोवती शाल लपेटून मी त्या खुर्चीत बसलोय. इंदू, किती प्रसन्न वाटतंय म्हणून सांगू. समोर आरशात पश्चिमेकडे शुक्राची चांदणी व चंद्राची कोर मोठी रम्य दिसतेय. हे दृश्य मोठं वेधक व गोड वाटतंय. पूर्व दिशेला तोंड करून आकाशाकडे बघू लागलो की खालच्या अंगणात एकमेकांशी उंचीच्या बाबतीत स्पर्धा करणारे सुरूच आणि माडाचं झाड दिसतं. सुरूची स्थिती उंच वाढलेल्या एरंडासारखी असते, पण माडाचा दिमाख काही अनोखा असतो. या आरामखुर्चीत बसून आकाश न्याहाळण्यात मला विलक्षण आनंद वाटतो. कधी मावळत्या सूर्याचं लालचुटूक बिंब तर कधी उगवत्या चंद्राची आकर्षक कोर. कधी लहान मुलांनी आकाशात सोडलेले पतंग, त्यांची परस्परात लागलेली चढाओढीची झुंज तर कधी गगनातून विहार करणारे व रात्रीच्या वेळी तेजस्वी ताऱ्याप्रमाणं किंवा आकाशदिव्यासारखं दिसणारं

विमान आदी दृश्यं मोठी विलोभनीय व मनोहारी दिसतात...!'

असंच लिहितालिहिता दादा पुढे म्हणतात, 'आकाश मला उंच करते, विशाल दृष्टी देते. खालची जमीन मला नम्रता, शालीनता आणि सहनशीलता शिकवते.'

खरं तर, दादांनी पूर्ववयात बरंच वाचन केलं. एरवीसुद्धा, दादा घरी आमच्याशी किंवा आईबरोबर बोलताना वाङ्‌मयीन मूल्यं असलेल्या अनेक गोष्टी, किस्से अगदी रंगून सांगत. त्यावेळी ते स्वत:च इतके तल्लीन होत असत, की त्यामुळे समोरचा माणूस हात धुण्यासाठी खोळंबलाय किंवा बाहेर जाण्यासाठी तटकळतोय अशा गोष्टी त्यांच्या गावीही नसत. सदा सर्वकाळ प्रत्येक गोष्टीचं भान ठेवणारी आमची आई, दादांना भानावर आणत गमतीनं म्हणायची, 'अहो, दत्तो वामन पोतदार, आधी उष्टे हात धुऊन घ्या, मग तुमचा किस्सा पुरा करा.' एखाद्या लेखाचा अत्यंत सुरेख किंवा उल्लेखनीय भाग 'जरा ऐक' म्हणायचे आणि संपूर्ण लेखच वाचत बसायचे! असे दादा मला परिचित असल्यानं स्वाभाविकच त्यांच्या डायऱ्यांमधून वाङ्‌मयीन संदर्भ सविस्तरपणे खुलवून येतील अशी मला अपेक्षा होती, पण निराशा झाली. एका पानातच(तेसुद्धा वहीच्या) दैनंदिनी लिहायची या स्वत:च घालून घेतलेल्या दंडकामुळे त्यांनी फार लिहिलेलं नाही. जागोजागी उल्लेख मात्र भरपूर आहेत.

त्यांपैकी काही नोंदी पुढे उद्‌धृत करत आहे.

'इंदू, काल धनंजय कीर यांचं आत्मचरित्र वाचलं. त्यांनी लिहिलेली वैशिष्ट्यपूर्ण चरित्रं यापूर्वीच वाचली आहेत. साधा मॅट्रिक माणूस. पण काय सुंदर इंग्रजीत चरित्रं लिहितो! धन्य आहे. नवल वाटतं. मनात विचार आला. मला ही कला साध्य झाली नसती का? विवेकबुद्धीनं उत्तर दिलं, अगदी सहजसाध्य होतं. बुद्धिमतेची तेवढी कुवत होती. कल्पनाशक्तीची उंच उड्डाण घेण्याची क्षमता होती. नव्हती ती निर्धारशक्ती. कोणतीही गोष्ट जिद्दीनं साध्य करण्याची तितीर्षा नव्हती. कल्पनासृष्टीत वास्तवाला विसरून स्वैर विहार

करण्याचा छंद माझ्या प्रगतीच्या आड आला. याचाच अर्थ निव्वळ आळस. प्रयत्न पराङ्मुखता... आणि इंदू, आता तू नाहीस तर काहीच करायला मन घेत नाही... आणि आता तर नित्याच्या व्याधी अधिकच आक्रमक झाल्या आहेत.'

'इंदू, काल वर्तमानपत्रात गो. शि. मंडलिक (८६) यांच्या आत्महत्येचं वृत वाचलं: मागे या व्यक्तीविषयी तुला मी सांगितलं आहेच. संसाराची इतिकर्तव्यता संपली. काही मागणं नाही. कर्तव्य नाही. संसार यशस्वी झाला आहे. आता मला मरण्याची इच्छा आहे. तरी सरकारने मला इच्छा-मरणाची परवानगी द्यावी, अशी गेले वर्षभर त्यानी सरकारकडे मागणी केली होती. पण त्याला सरकारकडून काही प्रतिसाद मिळाला नाही. त्यांची मागणी खरी तर तर्कसंगत व युक्तिवादास धरून होती. अखेर नाईलाजास्तव त्यानी विषप्राशन करून आत्महत्या केली.' (टीप : ते सांगितलं आहे असं दादांनी म्हटलंय. पण गंमत म्हणजे सांगितलं केव्हा? तर आईच्या मृत्यूनंतरच, तिच्याशी केलेल्या या हितगुजामध्येच! पण दादा अगदी आरामात सांगतात की मागे तुला याविषयी बोललो आहेच!)

'इंदू, काल 'इलस्ट्रेटेड वीकली' मध्ये Private Life of the Public Men हा विनोद मेहता यांचा लेख वाचला. राजकारण्यांच्या जीवनात मनस्तापाचे इतके प्रसंग येतात, की विरंगुळा म्हणून त्यांना स्त्रीच्या सहवासाची, सुंदर, आकर्षक, आपल्या चतुर विभ्रमानी शरीर व मन यांना उत्तेजित करणारी, पुलकित करणारी रमणी पाहिजे असते. विवाहित स्त्रीकडून ही अपेक्षा पुरी होत नाही म्हणून रात्रीचा सहवास देणारी, किंचित वारांगनेचे-नर्तिकेचे हावभाव असलेली, शृंगारचेष्टा करणारी प्रमदा या राज्यकर्त्या पुरुषांना नवा हुरूप, उत्साह व धडाडी देते असा लेखकाचा ग्रह आहे. हा विषय खळबळजनक आहे, पण तो पूर्णपणे खोडायला हवा. धुतल्या तांदळासारखं चारित्र्य असणाऱ्या आपल्याकडील मुत्सद्यांची उदाहरणं देऊन यावर खडसावून लिहायचं ठरवलं आहे. असे काही आव्हानात्मक प्रश्न डोक्यात घोळू लागले म्हणजे लेखणीला स्फुरण चढतं.'

'इंदू, रामकृष्ण परमहंस आणि विवेकानंद यांच्यावरील पुस्तक वाचलं. तसा मी काहीसा नास्तिक आणि बुद्धिप्रामाण्यवादी. पण रामकृष्णांचं चरित्र व वचनामृत वाचलं, की मनाला अपूर्व शांती मिळते. युक्तिवाद गळून पडतो. तर्क पांगळा होतो. दोन्ही हात आपोआप रामकृष्णांना वंदन करण्यास उत्सुक होतात...

'या विषयावरील दुसरी एक नोंद अशी- रामकृष्ण परमहंस हे न सुटणारं एक  कोडं आहे. केशवचंद्र सेन आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारखी तत्त्वज्ञानी आणि पश्चिमात्य शिक्षणसंपन्न मंडळी या अवलियाच्या पाठीमागे का लागतात आणि अशिक्षित असा हा पुरुष सर्व शिक्षितांना आपल्या अमृतवाणीनं धर्मतत्त्वं विशद करतो हे पाहण्याचं भाग्य लाभलं नाही हे दुर्दैव.'

'इंदू, 'पुढारी आणि पैसा' या माझ्या दिवाळी अंकातील लेखाबद्दल अभिनंदनाची खूप पत्रं आली. नेतेमंडळींवर मी बरंच काही लिहिलं. पण दुसऱ्याला नावं ठेवताना स्वत:कडंही थोडं पाहावं. आम्ही नोकरपेशे किती प्रामाणिकपणानं काम करतो, चुकवाचुकवी, फसवाफसवी, भ्रष्टाचार यांचा किती आश्रय घेतो?... तसं खोल जाऊन विचार करू लागलं म्हणजे वाटत, तळापासून वरपर्यंत आमचं जीवन गढूळ, स्वार्थी, राष्ट्रहितपराङ्मुख झालं आहे. जसजसा जीवनाचा स्तर उंचावत जातो तसातसा भ्रष्टाचार, लाचलुचपत यांना ऊत येतो. राष्ट्राचं चारित्र्य सुधारण्यासाठी प्रत्येक व्यक्तीनं आपली दानत, शील व स्वभाव सुधारला पाहिजे हेच खरं.'

'इंदू, काल 'इलस्ट्रेटेड वीकली'मध्ये एम.व्ही. कामत यांचा 'Can She Go It Alone?' हा लेख वाचला. माझ्या मनातील सारे भाव त्या लेखात व्यक्त झाले आहेत... विरोधी पक्ष बाळसं धरेल असं काही आता वाटत नाही. निवडणूकविषयक काही सुधारणा झाल्या पाहिजेत. खूप काही लिहावंसं वाटतं पण... माझीच ताकद कमी पडते. जरा श्रम केले की ताप येतो. एक, रविवारचा टाईम्स, पण बारीक अक्षर लावून वाचता

वाचता माझी दमछाक होते. आता यापुढे डोळ्यांमध्ये फारशी सुधारणा होणार नाही असं डॉक्टर म्हणतात. आहे ती दृष्टी राखून ठेवली पाहिजे. अगदीच दृष्टी गेली तर इंदू, तुझ्याशी हा संवाद पण करता येणार नाही!'

'इंदू, काल रेडिओवर वि.स. खांडेकरांचा आवाज ऐकला. त्यांची काल पहिली पुण्यतिथी. मला तुझी आठवण झाली. तुला खांडेकर फार आवडायचे. शुद्ध चारित्र्यसंपन्न लेखक म्हणून तुला त्यांच्याविषयी खूप आदर वाटे. तू स्वत: सात्त्विक आचाराची भोक्ती होतीस, म्हणून तुला तशा वृत्तीचे लेखक आवडत. मी केवळ साहित्यिक दृष्टीनं लेखकांकडे पाहतो, त्यांच्या चारित्र्याची उठाठेव करीत नाही. पण एक गोष्ट निश्चित. सानेगुरुजी, खांडेकर यांचं साहित्य वाचताना, त्यांचं चारित्र्य डोळ्यांसमोर उभं राहतं व साहजिकच त्यांच्या वाङ्मयासंबंधी अनुकूल ग्रह होण्यास उपकारक ठरतं.'

'इंदू, काल 'चीर आणि चिनार' हे रा. म. गोखले यांचं पुस्तक वाचलं. मन वाचनात रमून गेलं पण डोळे दुखायला लागले म्हणून नाईलाजानं थांबावं लागलं. सगळं वर्णन वाचत असताना आपल्या दिल्ली, जम्मू, श्रीनगर प्रवासाची आठवण झाली. श्रीनगरमधील हॉटेल लिवर्डमधला मुक्काम आठवला. गुलमर्गपासून टनमर्गपर्यंत आपण प्रवासातील लोकांना मागे टाकून दोघंच कसं चालत होतो ते आठवलं. रस्त्यात चिटपाखरू नाही. गर्द, उंच आणि विशाल वृक्षांच्या मनोहर छायेतून वाट काढत असताना भीती कशी ती मनाला शिवलीसुद्धा नाही. गप्पा छाटत छाटत आड मार्गाने मार्गक्रमणा करताना, घोड्यावरून येणाऱ्या लोकांच्याही आधी आपण कसे पोचलो ते कळलेसुद्धा नाही... त्या पुस्तकाने साऱ्या आठवणी जाग्या झाल्या.'

'इंदू, मृत्यूनंतरचं जीवन कसं असेल या संबंधात अनेक दंतकथा वाचल्या, ऐकल्या, पण त्यावर कधी विश्वास बसत नाही. डोळस श्रद्धा निर्भेळ आनंदाचा नाश करत असते.' 'काल 'इलस्ट्रेटेड वीकली'मध्ये

मरणोत्तर जीवनाविषयी पाश्चात्य शास्त्रज्ञांची मतं वाचली. मृत्यूनंतरचा अज्ञाताचा प्रवास कसा असतो याचं पाश्चात्यांनासुद्धा विलक्षण आकर्षण आहे याचा विस्मय वाटतो. मला तसा या विषयात रस नव्हता, पण आता वाटतो. एका वैज्ञानिकाने मरणोत्तर आत्म्याची काय स्थिती होते याचं वेधक वर्णन केलं आहे. तो म्हणतो, शरीराला आत्मा वा जीव ज्यावेळी सोडून जातो त्यावेळी त्याची उत्सुकतेनं वाट पाहाणारी व्यक्ती म्हणजे त्यानं जिच्यावर अनुपम प्रेम केलं ती होय. हे विधान वाचलं आणि साहजिक तुझी आठवण झाली. माझ्यात अनेक दोष असतील पण त्या साऱ्या दुर्गुणांवर मात करणारा एक दिव्य गुण आहे अन् तो म्हणजे तुझ्यावरचं निस्सीम प्रेम. मग मी हा देह सोडून जाण्याच्या वेळी माझी उत्कटत्वानं वाट पाहणारी तुझ्या व्यक्तिरिक्त कोण असणार? अन् हे जर सत्य असेल तर मरण्यात काय गोडी आहे! ...तू अन् मी एकमेकांना भेटू ती प्रथम भेट किती विलोभनीय असेल? माझ्या मृत्यूनंतरचं जीवन किती रमणीय होईल?...त्या भेटीकडे माझे डोळे लागून राहिले आहेत.

'किती तरी गोष्टी तुला सांगायच्या आहेत. किती तरी गोष्टी तुझ्याकडून ऐकायच्या आहेत. हे ऐकणं व सांगणं युगानयुगे चालत राहणार. आपण एकमेकांशी बोलत अनंतकाळ भ्रमत राहणार. निर्वाहाची चिंता नाही. जगात काय चाललं आहे याची क्षिती नाही. केवळ आपण दोघं या अफाट पोकळीत स्वैर विहार करणार. किती गोड कल्पना! मरणानंतर एवढं 'वैभव' मला प्राप्त होणार असेल तर त्याचं स्वागत करण्याची मी केवढी जय्यत तयारी केली पाहिजे.'

'इंदू, आज गडकरी स्मृतिदिन. फार वर्षांपूर्वी आम्ही राजाराम हायस्कूलमध्ये साजरा केलेला स्मृतिदिन आठवला. अत्रे आले होते. प्रास्ताविक वगैरे मी केलं होतं. त्यावेळच्या 'ज्ञानप्रकाश'मध्ये माझं कौतुक आलं होतं. तसंच एकदा कोल्हापुरातच पंचगंगेच्या तीरावर संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावावर विद्यार्थ्यांच्या समुदायासमोर मी बोललो होतो. बहुधा १९२७-२८ साल असावं. ती तडफ, तो आवेश, ते धैर्य पुढे

विगतित झालं. माझ्या पंपाताईला त्याचं फार कौतुक असायचं. अजून कधी भेटली, की त्या जुन्या आठवणी ती काढते.'

'इंदू, आज वर्तमानपत्रात विख्यात लेखक ऑर्थर कोस्लर यांच्या मृत्यूची हकीगत वाचली. ते गृहस्थ इच्छामरण असावं या विचारसरणीचे होते. आता जगण्यात काही अर्थ नाही असं वाटल्यावर त्यांनी स्वेच्छेनं आत्महत्या केली. सिंथिया ही त्यांची तिसरी बायको. त्यांचं वय मरतेसमयी सत्त्याहत्तर वर्षांचं तर या पत्नीचं छप्पन्न वर्षांचं. पण या पत्नीचं आपल्या नवऱ्यावर इतकं लोकविलक्षण खरंखुरं प्रेम की तिनं स्वत:ही पतीच्या आत्महत्येनंतर लागलीच देहत्याग केला. याला म्हणतात आत्यंतिक दृढ प्रेम! नाहीतर मी? तुझ्या मृत्यूनंतर या भिकारड्या देहाला जगवत आहे. त्याला औषधोपचार करून त्याची जीवनमर्यादा वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. माझी मला लाज वाटते जगण्याची. पण आत्मार्पण करण्यास जे विलक्षण धैर्य, पोलादी दृढनिश्चय अन बेडरवृत्ती लागते ती माझ्यात नाही. मी डरपोक व कचखाऊ आहे.'

'इंदू, 'धर्मयुग'च्या अंकात 'विनोबा का महाप्रयाण' हा रामकृष्ण बजाज यांचा लेख वाचला. खरोखर विनोबा अलौकिक पुरुष होते.उगीच त्यांच्याविषयी थोडासा गैरसमज माझ्या मनात घर करून राहिला होता. तो आता पूर्णपणे मावळला. ते म्हणत, मी रोगी होऊन मरणार नाही. योगी राहून मरेन. त्यांनी आपला शब्द खरा केला. डॉक्टरांनी ज्यावेळी त्यांना तुमची प्रकृती छान आहे असं सांगितलं त्याचवेळी त्यांनी अन्नपाण्याचा त्याग करून देह सोडून देण्याचं ठरवलं. केवढा हा मनस्वीपणा! सावरकर काय, विनोबा काय, त्यांचा मृत्यू बरंच काही सांगून जातो. अनासक्त योग देहाला खरी शांती व भक्ती देतो. असे अलौकिक अवलिया आहेत आपल्या देशात.

'इंदू, 'इलेस्ट्रेटेड वीकली'च्या अंकात 'Motilal Padre' ही गोष्ट वाचली. त्या गोष्टीवर लवकरच चित्रपट निघणार आहे असं म्हणतात. त्यांची थोडक्यात गोष्ट अशी. चर्चमध्ये एका मध्यरात्री एक स्त्री एका

मुलाला जन्म देते. पाद्रीला वाटतं, तो मुलगा म्हणजे येशू ख्रिस्ताचा अवतार. पण इतर जणांना वाटतं की तो मुलगा म्हणजे त्या पापी स्त्रीच्या पापाचा पुरावा. पाद्री सुरुवातीला या गोष्टीवर विश्वास ठेवायला तयार नसतो पण कालांतरानं त्यालाही लोकांच्या मतात तथ्य वाटू लागतं. त्या मुलाला जंगलात सोडून द्यायचं ठरतं. त्याप्रमाणे तो त्या मुलाला घेऊन जंगलात जातो. एका जागेवर ठेवतो. जाण्यापूर्वी त्या मुलाला शेवटचं बघायचं म्हणून बघतो. त्या निष्पाप, निर्मळ, निरागस बालकाला पाहून त्याचं दयाळू मन कळवळतं. आपण कोणतं अघोरी कृत्य करणार होतो या विचारानं तो अस्वस्थ होतो. तो विचार त्याला मानसिक वेदना देऊ लागतो. शेवटी त्या असहाय्य पोरक्या अर्भकाकडे पाहून तो म्हणतो, "My son, Trust me, I am really not a Christain." किती आवडलेल्या गोष्टी एकमेकांना सांगून आपण त्याचा आस्वाद घेत होतो!'

'इंदू, तुला जाऊन आता पाच वर्षं झाली. काळ कोणाची वाट पाहत नाही. तू गेलीस म्हणून जगाचे सोडाच पण आपल्या घराचे व्यवहारसुद्धा सुरळीत चालू आहेत. एके काळी या घरात तू दिमाखानं वावरत होतीस याची पुसट आठवणसुद्धा आता स्मृतीआड होऊ लागली आहे. मानवी व्यवहाराचं हे गूढ आहे अन् ते निसर्गाला धरून आहे. पण इंदू, मी मात्र आहे तसाच आहे. काळ लोटला तरी माझ्या तुजविषयींच्या तीव्रतेत, आर्ततेत, जिव्हाळ्यात काडीमात्र फरक झालेला नाही. दररोज न चुकता मी तुझी आठवण काढतो, तुझं स्मरण करतो, दु:खी होतो. स्वत:च्या अगतिकतेची कीव करतो, पण तुझ्या भेटीचा मार्ग सापडत नाही. The Holiday Omnibus नावाच्या कथासंग्रहातील रिचमन क्रॉम्पटनची The Haunting of Greenways ही कथा वाचली. मृताच्या काही आशा अतृप्त राहिल्या तर ती मृत व्यक्ती, ती आशा सुफलित होईपर्यंत आपल्या घराभोवती घुटमळते अशा आशयाची ती कथा आहे. तुझ्या शेवटच्या दिवसात तुला केवळ माझी काळजी वाटे. तसं तू जवळच्या काही लोकांजवळ बोलली होतीस. माझं कसं होईल या चिंतेत तू व्यग्र असायचीस... मग तू असशील का आपल्या घराभोवती घुटमळत?'

'इंदू, काल लायब्ररीच्या गोपाळरावांनी एक पुस्तक वाचायला दिलं. त्याचं नाव 'युवर, अटेंशन प्लीज!' लेखक- बाबा कदम. अगदी मला जसं प्रवासवर्णन लिहिणं आवडतं तसं आहे. डोळ्याला त्रास होत होता तरी पुस्तक वाचण्याचा मोह मला आवरत नव्हता. मग मनी विचार आला असं पुस्तक मला लिहिता आलं नसतं का? मुळात मला प्रवासाची आवड. तुला घेऊन सर्व जगभर प्रवास करण्याची महत्त्वाकांक्षा मी बाळगली असती तर प्रवासाचं सुंदर वर्णन करणारं एखादं पुस्तक मला नसतं का लिहिता आलं? ...पण कुठलीही महत्त्वाकांक्षा मनात बाळगून मी तिने झपाटला जात नाही, ती कार्यवाहीत आणण्याकरता मी परिश्रम करत नाही. त्यामुळेच मी मागे पडलो. नवल म्हणजे त्याचंही मला काही वाटत नाही.'

'इंदू, काल 'मधुघट-रसदर्शन' हे तांब्यांच्या कवितांचं रसग्रहण करणारं पुस्तक वाचलं. त्यातील आधी मला आवडणाऱ्या 'सहज तुझी हालचाल' या कवितेचं कविवर्य बोरकरांनी केलेलं मार्मिक समालोचन वाचलं. ही कविता माझ्या मनावर इतकी का बिंबली व तिनं माझ्या हृदयात कायमचं स्थान का पटकावलं याचा बोध झाला. उपजत काव्यशक्ती असलेल्या एका रसिक कवीने या कवितेची पार्श्वभूमी सांगितली आहे. त्यामुळे ही कविता मला आणखी आवडू लागली. माधव ज्यूलियन, कवी मायदेव, बोरकर, काळेले आदी व्यासंगी कवि-टीकाकार तांबे यांचे गुणवर्णन का करतात याचं रहस्य उमगलं. तांबे यांचे तृप्त व समाधानी सांसारिक जीवन व ते सुखी अन समृद्ध करण्यातील, त्यांच्या पत्नीचा सिंहाचा वाटा हे सर्व मनात आणून तांब्यांच्या भावस्पर्शी हृदयाचं उच्छ्वासित म्हणून ही कविता उद्‌भवली आहे. इंदू, ही कविता वाचली की मला तुझी आठवण होते. तुझी मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहते. 'ही अपूर्व शक्ती सगुण, झाडितसे मम अंगण' ही ओळ वाचली म्हणजे तर काही केल्या तुझ्या स्वरूपाचं ध्यान डोळ्यांसमोरून जात नाही...'

'इंदू, बर्ट्रांड रसेलची पत्रं गेली दोन दिवस वाचत आहे. धर्म,

विवाह, हायड्रोजन बॉम्ब, जागतिक शांतता अशा विविध विषयांवरील त्यांची विवेकनिष्ठ भाष्ये वाचली म्हणजे निरीश्वरवादाची महती पटते. आपल्या समाजजीवनात 'धर्म' या दोन शब्दांनी किती अधर्म आणला आहे याचा बोध होतो. आगरकरांनी या बाबतीत क्रांतिकारक विचार मांडले आहेत, पण बहुतेक सर्व विचारवंत मंडळीही आत्मा, पुनर्जन्म, कर्म, पापपुण्य या वादातच गुरफटून गेली आहेत. सत्याचा शोध लावण्याचा धाडसी प्रयत्न कोणी केला नाही. नाही म्हटलं तर महात्मा जोतिबा फुले हे मात्र काळाच्या फार पुढे गेले आहेत असं दिसतं. मला हे सर्व वाद आवडतात. पण इंदू, तू गेल्यापासून माझ्यात एक परिवर्तन निश्चित झालं आहे. ते म्हणजे मृत्यूनंतर का होईना, तुझी भेट व्हावी, आपण विरहावस्थेतील आपापले अनुभव पडताळून पाहावेत व एकमेकांच्या सहवासात अनंतकाळ राहावं, या साऱ्या माझ्या इच्छा विवेकनिष्ठेवर घासल्या तर त्या किती हीन आहेत हे सहज कळून येईल. पण मानवी मन किती गूढ आहे! सारं कळत का नाही? पण या स्वप्नरंजनात मन रमतं हे खरं!'

'इंदू, आज सकाळी खोकल्याची जोरदार उबळ आली. नाकातून, डोळ्यांतून पाणी वाहू लागलं. छाती दुखू लागली. घसा दुखू लागला. गॅलरीत बसलो. सरळ 'ज्ञानेश्वरी' घेतली. सहावा अध्याय वाचू लागलो. वागणुकीतील नियमितपणा, अतिरेकाचा अभाव असणारा माणूस योग सहज साध्य करून घेतो अशा अर्थाच्या ओव्या त्यामध्ये आहेत. त्या मनाला भारून टाकतात. मग बाराव्या अध्यायातील 'अद्वेष्टा सर्वभूतनाम्' या श्लोकावरील ज्ञानेश्वरांचं भाष्य वाचलं. खोकला विसरलो. मन एकाग्र झालं. एक प्रकारच्या समाधिसुखाचा लाभ झाला. त्यातून आज आषाढी एकादशी. भागवत धर्माच्या समानतेची गुढी आज उभारली जात आहे. पांडुरंगाचं दर्शन आता सर्वांना सुलभ झालं आहे. विशुद्ध धर्माच्या माध्यमातून जर आपण सामाजिक, राजकीय व आर्थिक चळवळी सुरू केल्या तर या देशातील विषमता नष्ट होईल.'

'इंदू, काल 'स्त्री'च्या अंकात सुहासिनी मुळगावकर यांचं 'मुक्तिनाथ' हे हिमालयातील शंकराच्या देवळांचं विमानप्रवास वर्णन वाचलं... इतकं प्रत्ययकारी वर्णन की क्षणभर त्या विमानात मीच बसलो आहे असा भास झाला. जुन्या इच्छा पुन्हा जाग्या झाल्या. हिमालयात प्रवास करत करत एखाद्या पर्णकुटीत राहावं. रामकृष्ण मिशनच्या आश्रमात उर्वरित काळ घालवावा असं वाटतं. पण...?

'परवा 'केसरी'मध्ये अरुण साधू यांच्या 'त्रिशंकू' कादंबरीवरील अभिप्राय वाचला, तसंच अनिल अवचट यांच्या 'माणूस'चा परिचय वाचला मनाला आनंद झाला. आपल्या देशात काहीतरी नवीन घडत आहे, निराशेचं कारण नाही असं वाटू लागलं.

'इंदू, परवा, रेडिओवर प्रभावतीदेवी आणि जयप्रकाश यांच्या वैवाहिक जीवनाची श्रुतिमनोहर कहाणी ऐकली. काल 'ऑर्गनायझर'मध्ये सुचेता कृपलानी यांच्या आत्मचरित्रावरील अभिप्राय वाचला. काही वर्षांपूर्वी सी.डी. देशमुख आणि दुर्गाबाई यांच्या कार्याची महिती वाचली. हे सारं वाचून त्या आदर्श पति-पत्नींविषयीचा आदरभाव अधिक दुणावला. दृष्टीसमोर निश्चित ध्येय ठेवून जगणाऱ्या व ते ध्येय प्रत्यक्षात उतरवण्याचा उद्योग करणाऱ्या या व्यक्तींचे आदर्श आपण आपल्या दृष्टीसमोर ठेवले पाहिजेत. आचार्य कृपालानींची पत्नीषियीची गाढ श्रद्धा, परमेश्वराच्या भक्तीपेक्षाही, त्यांना किती मोलाची वाटायची हे मागे तुला मी सांगितलं होतंच.'

'इंदू, लोकमान्य टिळकांविषयी जितकं वाचावं तेवढं थोडंच. प्रत्येक वेळी नव्यानंच आदरभाव वाढीस लागतो. आयुष्याची पन्नाशी उलटल्यावर लो. टिळक मंडालेच्या खडतर तुरुंगवासात होते. तिथली हवा अत्यंत विषम. काही एक सुखसोयी नाहीत... सुभाषबाबूंनी म्हटलंय, की मला सर्व सुखसोयी आहेत. वाचायला मिळतं. खेळायला मिळतं. बोलायला सवंगडी आहेत, पण लोकमान्यांना अत्यंत विपरीत अवस्थेत तिथं दिवस काढायला लागले. शहाण्या माणसाला वेड लागावं असं ते ठिकाण आणि

अशा ठिकाणी लोकमान्यांनी 'गीतारहस्य'सारखा विलक्षण ग्रंथ लिहिला. त्यांच्या लिखाणावरून मराठी भाषेचं सामर्थ्य, तिची अर्थवाहकता, विविध- सूक्ष्म- तरल शब्दाशब्दातील भेद दाखवण्याची त्यांची क्षमता पाहिली म्हणजे अभिमान वाटतो. टिळकांना भाषेची कुठेच अडचण वाटली नाही. हा ग्रंथ हेतुपूर्वक इंग्रजी भाषेत न लिहिता, आम्हां लोकांना कर्मयोगाची जाणीव करून देण्यासाठी, त्यांनी मराठीत लिहिला हे आम्हांवर केवढे उपकार! त्याच तुरुंगवासाच्या काळात त्यांची पत्नी गेली. तिचा मृत्यू किती धीरोदात्त वृत्तीनं त्यांनी सहन केला! तसेच सावरकर. अंदमानच्या तुरुंगात कष्टाची अपमानास्पद कामं करत आपला काळ कसा कंठत होते? हालअपेष्टा सहन करत असतानासुद्धा काव्याची उपासना कशी करत असतील? अशी विलक्षण उदाहरणं समोर असताना इंदू, मी अंथरुणावर का तळमळावं? बिछान्यावरील गादीत आराम पडून तक्रारीचा सूर लावण्यात काय अर्थ आहे?'

'इंदू, काल प्रा. ना. सी. फडके यांचं 'कमल-पत्रे'हे पुस्तक वाचत होतो. काशीपासून काश्मीरपर्यंत आणि नंतर कन्याकुमारीपर्यंत त्यांनी प्रवास केला. वर्णनांतील बारकावा, मार्मिक निरीक्षण व प्रेक्षणीय स्थळांचं चित्रमय वर्णन वाचताना कोणाही वाचकाला आपण त्यांच्याबरोबर प्रवास करत आहोत असं वाटावं. त्यांचं लिखाण वाचू लागलो की तरुणपणचे स्वप्नील दिवस आठवतात... 'कुलाब्याची दांडी' तर मला फार आवडायची.'

'इंदू, काल रात्री रेडिओवर 'विद्याहरण' नाटक ऐकत होतो. मनात विचार आला की समजा शुक्राचार्याप्रमाणे मला संजीवनी विद्या अवगत असती तर? तुझा मृत्यू मला अडवता आला असता!'

'इंदू, आज ज्ञानदेवांचा निर्वाण दिन. आपलं कार्य संपलं. यापुढे आपल्या हातून काही भरीव, चिरस्मरणीय काम होणार नाही अशी खात्री पटताच त्या महात्म्यानं जिवंत समाधी घेतली. केवढं धैर्य! केवढं

आत्मसामर्थ्य! किती उदात्त उदाहरण त्यांनी आम्हांला घालून दिलं आहे! पण ते आचरणात आणण्याचं मनोधैर्य आमच्यात नाही. माझ्यात तर नाहीच नाही. तू गेलीस, माझा अवतार संपला. आता मी केवळ निर्माल्य...

'इंदू, काल एक विषय डोक्यात घेतला आणि लिहावयास बसलो. विचार एकामागून एक सुचू लागले. फाउंटन पेन ते विचार कागदावर झरझर टिपू लागलं. तीन-साडेतीन तासांच्या अवधीत एक सुंदर लेख तयार झाला. माझा मीच स्तिमित झालो. स्फूर्ती म्हणून जिचा कविलोक गौरव करतात ती गोष्ट खरी असावी असं वाटू लागलं, पण लेख संपल्यावर उत्साह मावळला. अशक्तता वाटू लागली. कशाला नसता त्रास घेतला असं वाटू लागलं. आता लेख प्रसिद्धीसाठी कुठे पाठवावा, लोकांचं कौतुक ऐकावं अशी इच्छा आहेच कुठे? एक तुझं ऐकायची इच्छा असायची ती तुझ्याबरोबरच संपली...

'इंदू, काल विनायकराव छत्रे आले होते. त्यांनी गुलाबमहाराजांचं चरित्र सांगितलं. ऐकून अतिशय आश्चर्य वाटलं. एक अंध व्यक्ती बुद्धीचं एवढं सामर्थ्य दाखवते हे कसं शक्य आहे? खोटं म्हणावे तर त्यांना प्रत्यक्ष पाहिलेले अनेक भक्त आहेत. त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. शेगावचे गजाननमहाराज, शिर्डीचे साईबाबा, केडगावचे नारायणमहाराज यांच्याविषयीच्या आख्यायिका प्रसिद्ध आहेतच. मला या महाराजांविषयी मूलतः अनास्था आहे. पण असं काही ऐकलं व वाचलं म्हणजे माझं मतपरिवर्तन होऊ लागतं. आपल्या विचारसरणीत काहीतरी चूक असावी ही भावना जागृत होते. मानवी बुद्धीला न कळणाऱ्या कितीतरी गोष्टी आहेत. तेव्हा या बाबतीत मौन धारण करणं उचित. अशा व्यक्तींविषयी तुच्छतेचे उद्‌गार काढू नयेत. पण चमत्काराविना सत्पुरुष असू शकतो या भावनेला तडा जाऊ नये असं मनापासून वाटतं.'

'इंदू, एक विद्यार्थिनी काही शंका घेऊन आली होती. जॉन कीटस्

यांचं एक सुनीत 'I have fears that I may cease to be' तिला शिकवलं. या सुनीताच्या शेवटी कवी म्हणतो, की कीर्ती आणि प्रेम या गोष्टी निरर्थक आहेत. उगीच आपण त्याकरता धडपडत असतो. कवीचं म्हणणं किती यथार्थ आहे! माणूस आपल्या अल्प जीवनात आपला नावलौकिक व्हावा म्हणून काया शिणवतो. एखाद्या व्यक्तीवर जीवापाड प्रेम करतो, पण त्यांची फलनिष्पत्ती काय होते? मृत्यू या साऱ्या गोष्टींवर विरजण घालतो. माणसाला हे तत्त्वज्ञान कळत नाही असं नाही. हे कळूनसुद्धा जिवंत असेपर्यंत आपला नावलौकिक व्हावा याची त्याला विलक्षण महत्त्वाकांक्षा असते. खरोखर, माणूस ही मोठी अनाकलनीय, गूढ व अतर्क्य अशी चीज आहे. इंदू, आता माझंच बघ ना. तू जाऊन आठ वर्षं झाली तरी मी तुझं स्मरण करतो. संवाद करतो. या सुखदु:खाच्या गोष्टी मनमोकळेपणानं तुला सांगतो. हे मी का करतो? तुला या गोष्टी कळतात का? मग हा एक वेडेपणाच ना?'

'इंदू, संध्याकाळी गॅलरीत खुर्ची टाकून बसलो होतो. आकाशाकडे तास न तास पाहत बसण्याचा कंटाळा मला कधी येत नाही. आकाशात निरनिराळ्या रंगांचे ढग दिसत होते. त्या ढगातून एक चांदणी डोकावत होती. कुठे तरी गडकऱ्यांची एक ओळ आठवली. 'जीवांच्या जळत्या ज्योती । आकाशी तारा होती.' तसंच तर नसेल ना? ती लुकलकणारी तेजस्वी तारका म्हणजे तू तर नसशील? मला टक लावून पाहत मला खुणावत आहेस आणि म्हणत आहेस, 'पाहा मी येथे आहे. नाही का दिसत तुम्हाला?'

'इंदू, 'ललित'च्या दिवाळी अंकात 'ऐंशीच्या उंबरठ्यावर'हा कवी अनिल यांचा लेख वाचला. तुझे ते आवडते कवी. 'कुसुम' हा उल्लेख त्यांनी किती हळुवारपणे केला आहे. या कवीचं प्रणयाराधन व पुढे त्यांचं वैवाहिक जीवन यांचं मला विलक्षण आकर्षण वाटतं. तसंच, मला दुर्गाबाई आणि चिंतामणराव देशमुख यांच्या सहजीवनाविषयीही अत्यादर आहे. 'Chitaman and I' या त्यांच्या पुस्तकात दुर्गाबाईंनी सविस्तरपणे

लिहिलं आहे. एवढं उदात्त व परिणामकारक प्रियाराधन कथाकादंबऱ्यांतून सुद्धा अभावानंच आढळतं... चिंतामणराव देशमुखांनी आपल्याला मागणी कशी घातली याचं मोठं हृद्य वर्णन त्यांनी पुस्तकात केलं आहे. त्यांनी म्हटलंय, 'बोलताबोलता चिंतामणीने मला निलगिरीच्या एका झाडाजवळ नेले. त्या झाडाच्या खोडावर एक संस्कृत श्लोक कोरला. त्या श्लोकाच्या माध्यमातून ते मला मागणी घालत होते... मी रुकार दिला.'' ते श्लोक कोणते असतील ते शोधले पाहिजेत.'

'इंदू, आज 'ज्ञानेश्वरी'चा पहिला अध्याय वाचत होतो. त्यात एक बहारीचा एक प्रसंग वर्णिला आहे. पार्वती शंकराला म्हणते, ''तुम्ही नेहमी कसल्या विचारात गुंग असता?'' तेव्हा शंकर म्हणतात, ''तेथ हरू म्हणे नेणिजे। देवी जैसे का स्वरूप तुझे। तैसे हे नित्यनूतन देखिजे। गीतातत्त्व म्हणजे हे देवी, ज्याप्रमाणे तुझ्या स्वरूपाचा थांग लागत नाही त्याप्रमाणे गीतेचाही थांग लागत नाही. या गीतातत्त्वज्ञानाचा विचार करावयास जावं तेव्हा नवीनच रूप दिसतं.'' इंदू, शंकरासारख्या स्मशानवासी फटिंगास आपल्या पत्नीमध्ये अलौकिक सौदर्याचा साक्षात्कार होतो व तिची विविध रूपं भासमान होतात मग माझ्यासारख्या संसारी पुरुषास तुझ्या एकेक गुणाचा आठव नित्य नवीन आनंदाचा पुरवठा करतो यात नवल ते काय?'

'इंदू, आज महाराष्ट्रदिन सकाळच्या प्रहरी 'बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' हे गीत कानांवर पडलं. तू हे गाणं किती छान म्हणायचीस आणि विद्यार्थिनींकडून बसवून घ्यायचीस ते आठवलं. माझं फार आवडतं पद आहे हे. खरोखर, श्रीपाद कृष्णानी किती अर्थपूर्ण, मार्मिक व वास्तव चित्र त्या गीतात रेखाटलं आहे. महाराष्ट्रीयांत वसत असलेल्या गुणांचं किती यथार्थ वर्णन केलं आहे! त्या गीतावर रसग्रहणात्मक विस्तृत असं काही तरी लिहावंसं वाटतं. हे गीत कानी पडलं की साहित्य संमेलनं आठवतात. काही रम्य स्मृतींना उजाळा मिळतो. मी किती संमेलनांना जाऊन आलो!'

'इंदू, कालपासून एक विचार मनात येऊ लागला आहे. ऐवी तेवी ही इग्लोकीची यात्रा लवकर संपेल असं वाटत नाही. आता मित्रपरिवार, गप्पाष्टके, फिरण्याचे अड्डे, प्रवास यापासून दूर राहिलं पाहिजे. यातली कोणतीच गोष्ट प्रकृतीच्या दृष्टीनं साध्य होणं कठीण. बरं, घरकामात लक्ष घालावं तर तेही शक्य नाही. हातून काही धडपणे निभावेल याची खात्री वाटत नाही. मग एखादा विचारप्रवर्तक प्रबंध इंग्रजीमध्ये लिहिण्यात वेळ घालवला तर? आता कीर्तीची, प्रसिद्धीची ओढ नाही. प्रबंधासंबंधी विचार करण्यात बराच वेळ जाईल. तो इंग्रजीत लिहिला म्हणजे माझ्या आवडीच्या भाषेच्या आविष्कारात वेळ चांगला जाईल...'

'इंदू, परवा तापात 'आई ग, आई, आई' असं कण्हत होतो. मनात विचार केला. यातना भोगताना माणूस आईची आठवण का काढतो? अगदी जन्मत: ''अँ, अँऽ'' असे अस्फुट उच्चार लहान बालकाच्या मुखातून का बाहेर पडतात? त्याच्या ध्यानीमनी नसलेल्या आईच्या उपकाराचं ओझं त्याच्या शिरावर असतं. आणि या उद्गारांनी कळत-न कळत तो त्या उपकारांची फेड करत असतो का? 'अँ' या शब्दाशी 'आ' आणि 'ई' या अक्षरांचा काही संबंध असेल का? काही का असेना, माझ्या मराठी भाषेचा मला अभिमान वाटतो, कारण या भाषेने 'आई'हा सरळ, सोपा, उच्चारसुलभ व भावोत्कट शब्द दिला. इंदू, मला वाटतं, साने गुरुजीनी यासंबंधी छान मीमांसा केली आहे. वेदनांची तीव्रता 'आई, गं' या शब्दांविना कशी व्यक्त करता येणार? गेल्या चार दशकांहून अधिक काळ 'आई गं' यानंतर 'इंदू गं' असेही सहजोद्गार माझ्या मुखातून बाहेर पडतात.'

'इंदू, काल घरातील सर्वजण कोल्हापूरला चारूच्या घरातील एका कार्याच्या निमित्तानं गेले. घर कसं ओकंओकं वाटू लागलं. मी धाडस करून एकटाच बसनं विश्रामबागेच्या बाजूस गेलो. माळावरची मोकळी हवा खाल्ली. खरं तर, उल्हसित वाटायला हवं होतं. पण मनाची उदासीनता वाढली. एकाकी वाटू लागलं. आपण उगीच

जिवंत आहोत ही भावना काही केल्या मनातून जात नाही. मृत्यूनंतर आपलं काय होणार, तुझी भेट होईल का, हा विचार सतत मनात घुमत आहे. उत्तर काही सापडत नाही. नटाचा ज्याप्रमाणे रंगभूमीवरील घटनांशी सुतराम संबंध नसतो तशीच मानवाची स्थिती असते असं वाटू लागतं. पण हे तर्कसुद्धा मनाला पटत नाहीत. माझ्या अंतर्यामीची ओढ तुला भेटण्याची आहे. काही तरी अस्पष्ट, गूढ, अकथित, अवर्णनीय अशा संबंधांनी आपण जखडलेलो आहोत ही भावना उत्साह देते. मृत्यूनंतर सर्व संबंध संपले हा विचार निरुत्साही करतो. काही का असेना, कधी न उकलणारं कोडं सोडवायचा प्रयत्न करत आहे. पाहू कसं जमतं ते. एक गोष्ट सत्य आहे, की तुझ्यासंबंधी चिंतन करण्यात मन गुंतलं की अनिर्वचनीय आनंद होतो.'

'इंदू, ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंत भक्तिरसात ओथंबलेलं वाङ्मय निर्माण झालं. टिळक, जोतिबा, आगरकर, शिंदे, आंबेडकर आदींनी राजकीय व सामाजिक वाङ्मय निर्माण केलं. या सर्व लोकांच्या नावाचं आपण स्मरण करतो, पण ते या मृत विभूतींना कळतं का? मरून ते कीर्तिरूपी उरले ही गोष्ट त्या मृतात्म्यांना माहीत आहे काय? मग त्या कीर्तीचं त्यांना समाधान काय? फार तर मृत्युसमयी आपण कीर्तिरूपानं उरू एवढा भरवसा त्यांना वाटला असेल, पण त्यानं त्यांचं समाधान झालं असेल? परोपकार केला काय अन परपीडा दिली काय? एकदा मृत्यू आला म्हणजे संपलं...'

'इंदू, रेडिओवर 'पतितपावन नाम ऐकूनी आलो मी द्वारा । पतितपावन नव्हेसी म्हणुनी जातो माघारा' हे पद ऐकलं. किती गोड भाव! किती खोल अर्थ! कधी कधी विचार करतो, की माझ्या मनात इतरजनांसारखी श्रद्धा, भक्ती का निर्माण होत नाहीत? पाश्चात्य शिक्षणाचा, वाङ्मयाचा तर हा परिणाम असेल का? आता म्हातारपण आलं म्हणून देवाचं नाव घ्यायचं याला अर्थ नाही. खरं तर ज्ञानदेव, तुकाराम व नामदेव ही माझी आराध्य दैवतं आहेत. रामदासांचे 'मनाचे

श्लोक' आणि 'करुणाष्टके' यांनी मी आकर्षित होतो...'

'इंदू, सध्या गीतेच्या नवव्या अध्यायावरील शंकराचार्यांच्या टीकेचं वाचन चालू आहे. अकरावा व चौदावा श्लोक वाचत होतो. टीकेचा अर्थ नीट समजला नाही. मग 'ज्ञानेश्वरी' उघडली. नववा अध्याय काढला. या दोन श्लोकांवरील ज्ञानेश्वरांचं भाष्य वाचलं. उपमा आणि अलंकार यानी भरलेली ती सुरेख व सुबोध टीका हृदयाला भिडली. मनाला उमजली. बुद्धीला पटली. मन अनिर्वचनीय आनंदानं भरून गेलं. सारं सटरफटर वाचन सोडून द्यावं आणि केवळ 'ज्ञानेश्वरी' वाचनात वेळ घालवावा. विद्वानांनाही स्तिमित करणारी एवढी प्रतिभा ज्ञानेश्वरांनी अल्पवयात कशी मिळवली ते कळत नाही. एवढा एकच ग्रंथ मराठीची थोरवी पटवून देण्यास समर्थ आहे. मग विचार येतो आजपर्यंत भाराभर वाचलं ते सर्व व्यर्थ. केवळ ज्ञानेश्वरीच्या अध्ययनात काळ घालवला असता तर बुद्धी प्रगल्भ झाली असती. मनाची चंचलता लोप पावली असती व हृदयात एक प्रकारची विशालता, उदारता व विश्वात्मक वृत्ती यांचा संचार झाला असता. निदान यापुढे तरी जीव असेपर्यंत व दृष्टीला दिसे तोपर्यंत ज्ञानेश्वरी वाचायचीच.'

'इंदू, इथं ब्रह्मपुरीस वृत्तपत्रं कमीच मिळतात आणि उन्हाळ्याच्या तगमगीनं काहीच करायला मन घेत नाही. काल, शिळा झालेला 'नागपूर टाईम्स'चा एक अंक मिळाला. त्यामध्ये Literature and Lemon या नावाचं एक स्फुट आहे. 'अष्क' नावाच्या लेखकाची करुण कहाणी त्यात दिली आहे. हिंदीमध्ये चांगल्या दर्जाची पंचवीस पुस्तकं लिहिणाऱ्या या लेखकाला संसार चालवण्याकरता लिंबं विकावी लागतात... लेखन, पूर्ण वेळ लेखन हा व्यवसाय होऊ शकत नाही. आपल्या मराठी भाषेच्या लेखकांचीही अशीच स्थिती आहे. वाचनाची अभिरुची अल्प. पैसे खर्चून पुस्तकं विकत घेण्याची प्रवृत्ती नाही. विनोदी, सामान्य वाङ्मयीन गुण असणारी चटोर मासिकं वा साप्ताहिकं वाचण्याची उत्सुकता!... त्यामुळे लेखन हा व्यवसाय होऊ शकत नाही.'

'इंदू, अवीनं अनेक जुन्या गोष्टी चांगल्या जतन केल्या आहेत. काल प्लॅस्टिकच्या एका पिशवीत जपून ठेवलेले तुझे फोटो, चित्रं, वर्तमानपत्रांतील कात्रणं पाहत होतो. दृष्टी सहज सांगली नगरवाचनालयात तुझ्या नावानं सुरू केलेल्या गीतगायन स्पर्धेच्या उद्घाटन-समारंभाच्या वृत्तांतावर गेली. उद्घाटक शैलजा राजे यांचं भाषण वाचलं. इंदू, तुझ्या स्वभावातील बारकावे, तुझी पाक-कुशलता, आवाजातील मधुरता या सगळ्या गोष्टी त्यांनी आपल्या भाषणात अगदी अचूक टिपल्या आहेत. 'गीतरेखा'या तुझ्या काव्यसंग्रहातील काही कवितांचा त्यांनी फार सुरेख संदर्भ दिला. ॲड. बापूसाहेब देशमुखांचं भाषण अगदी वस्तुनिष्ठ आणि आपल्या कुटुबीयांवरील प्रेमाने ओतप्रोत भरलेलं आहे. तसचं 'दक्षिण महाराष्ट्र'मधील 'अशी ही इंदू' हा माझा लेख वाचला. अनेकांनी आवर्जून पारायणं केली आहेत. भारी आवडतो तो लेख मला. 'दक्षिण महाराष्ट्रा'तील माझे काही लेख खरंच किती नमुनेदार, शैलीयुक्त होते. त्यातील निवडक लेखांचा एखादा संग्रह जपून ठेवला असता तर तो मी सुमनकडून आता वाचून घेतला असता. सांगलीहून सगळं आवरून निघताना सगळ्या अंकांची रद्दी घालून टाकली. जपून ठेवले असते तर त्या लेखांचा विरंगुळा झाला असता, पण कोणतीही गोष्ट काळजीपूर्वक जपून ठेवण्याचा हव्यास नाही. अर्थात त्याचा विषाद वाटत नाही, कारण काळाच्या उदरात सगळ्या गोष्टी भस्मसात होतात.'

'इंदू, काल 'ज्ञानेश्वरी'च्या सातव्या अध्यायातील गीतेच्या शेवटच्या श्लोकाचं भाषांतर वाचत होतो. त्यावरील ज्ञानेश्वरांचं भाष्य वाचलं. आपण किती अज्ञानी आहोत, ज्ञानेश्वरीच्या एकेक ओळीचा अर्थ कळण्यास किती वेळ लागतो हे पाहिलं म्हणजे आपल्या अज्ञानाची कीव करावीशी वाटते. मराठी घेऊन मी एम.ए. झालो, पण 'ज्ञानेश्वरी'पुढे मी सूर्यापुढं खद्योतानं चमकावं तेवढासुद्धा चमकत नाही. काय आमचं हे ज्ञान आणि कोण आमची ही घमेंड!'

'इंदू, परवा असाच गॅलरीत खुर्ची टाकून बसलो होतो. आकाशाकडं

पाहिलं. केवढं अफाट विश्व. त्यात मी पाण्याच्या बुडबुड्याहून क्षुद्र. तरी या बुडबुड्याला केवढी अस्मिता? जगण्याची कोण धडपड!'

'इंदू, गीतेच्या तेराव्या अध्यायातील सातवा श्लोक वाचत होतो. 'अमानित्वम्-----स्थैर्यमात्मविनिग्रह' असा त्याचा पहिला चरण आहे. १. अमानित्वम् २. अदमित्वम् ३. अहिंसा ४. क्षान्तिः ५. आर्जवम् ६. आचार्योपासनं ७. शौचं ८. स्थैर्य ९. आत्मविनिग्रहः या नऊ शब्दांचा खोल अर्थ सांगण्याकरता ज्ञानेश्वरांनी तीनशेसत्तावीस ओव्या लिहिल्या आहेत. विषय स्पष्ट करण्याकरता उपमा, दृष्टांत, रूपकादी अलंकारांचा उपयोग ज्ञानराजांनी किती कुशलतेनं केला आहे. त्यांची ती शब्दसंपत्ती पाहून मीच गोंधळात पडलो, चकित झालो. या सातव्या श्लोकाचं, शांकरभाष्य वाचलं पण ज्ञानेश्वरांची सांगण्याची शैली काही अपूर्व आहे. विद्वत्तेचा डौल नाही. स्वत:विषयी विलक्षण नम्रता, श्रोत्यांसंबंधी आदरभाव बाळगून ज्ञानेश्वर या ओळींवर प्रकाश टाकतात.'

''महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मेघा काळे यांचा 'कौसानी-गांधीजींचे स्वित्झर्लंड' हा प्रवासवर्णनात्मक लेख वाचला. हिमालयात 'कौसानी' हे अल्मोडा जिल्ह्यातील एक चिमुकलं खेडं आहे. त्या ठिकाणी गांधी आश्रम आहे. मनात विचार आला तेथे जाऊन राहावं. मनाला खराखुर आनंद होईल. इंदु, पण ते आता कसं शक्य आहे?'

'पु.लं.चं चितळे मास्तर' वाचलं. अक्षरशः डोळ्यांत पाणी आलं. सद्भिरूचिसंपन्न असं वाङमय वाचण्यात अननुभुत आनंद होत असतो. भोवतालच्या परिस्थितीचा विसर पडतो. मानवी मनाच्या सूक्ष्म गुंतागुंती कळतात. मन पुलकित होतं. एक प्रकारच्या समाधीसुखाचा आनंद मिळतो.'

'काल मॅथ्यू अर्नोल्डची 'डोवरर बीच' ही कविता वाचत होतो. धर्म व विज्ञान यांच्या झगड्यामुळे एका जीवनाचं स्वप्न कसं विरतं याचा

उल्लेख कवीनं प्रत्ययकारी केला आहे.'

'आज (जंब्या) सोमण आला होता. त्याचं एकूण ध्यान पाहून, विचित्र मळकट पोषाख पाहून स्पीकर भाऊसाहेब सोमण यांचा हा मुलगा असेल असं कोणाला वाटेल तरी काय? डोक्यात काहीतरी भन्नाट कल्पना आणून ती साकार करण्याकरता हा सतत धडपडत असतो. मनात विचारांचं काहूर सतत माजलेलं असतं. साम्यवादानं भारून गेलेला हा गृहस्थ कविमनाचा आहे. त्यानं फार सुरेख कविता केल्या आहेत. सदानंद पेठे यांच्या पुस्तकाला मी जशी प्रस्तावना लिहिली आहे. तशी त्याच्या काव्यसंग्रहाला लिहावी असा त्याचा आग्रह आहे.'

'व्हेरिटी या लेखकाने संपादित केलेलं 'मॅक्बेथ' हे नाटक दाजीसाहेब करमरकर यांनी आवर्जून वाचायला दिलं. लायब्ररीतून गोपाळरावांनी शेक्सपिअरच्या नाटकासंबंधीचं ब्रॅडलेचं पुस्तक दिलं. शेक्सपीअर संबंधी जगात उपलब्ध असतील तेवढी सगळी पुस्तकं वाचावीशी वाटतात, पण डोळे साथ देतील का?'

'आज 'अंजली'च्या दिवाळी अंकात 'अखेरचा दिवस'हा कमलाताई फडके यांचा लेख वाचला. ना.सी. फडके यांच्यावर त्यांचं किती विलक्षण प्रेम होतं! हा लेख म्हणजे पतीविषयी त्या किती सश्रद्ध होत्या याचा पुरावाच आहे. भारतीय स्त्री कितीही शिकली-सवरली, प्राध्यापिका होऊ दे वा लेखिका, पण आपल्या पतीच्या जीवनाशी किती एकरूप झालेली असते!'

'आज 'भवन्स जर्नल'च्या अंकात 'Death Before Prayer' हा लुई फिशर यांचा लेख वाचला. न कळत डोळे पाणावले. एवढ्या थोर महात्म्याचा खून करून काय साधलं?'

'काल 'धर्मयुग'च्या अंकात 'बिहार एक आईना है' हा कुमार प्रशांत

यांचा लेख वाचला. जयप्रकाशांच्या बिहारमध्ये हिंसा व अराजकता यांचं केवढं थैमान चाललं आहे? सगळं वाचून अंग शहारलं. हळुहळू संपूर्ण भारताचा बिहार होणार की काय ही भीती वाटू लागली आहे.'

''गोरा' कादंबरी पुन्हा वाचली. या कादंबरीतील गोराचा तुरुंगवास व मॅजिस्ट्रेटची पार्टी यांची वर्णनं वाचली. मागील सर्व प्रसंग आठवले. या कादंबरीचं कथानक मी माझ्या ताईला, तुला आणि इतर मित्रांना किती वेळा सांगितलं आहे! या कादंबरीच्या पुनर्वाचनानं मागील सारा भूतकाळ जिवंत केला आणि टागोराचं श्रेष्ठत्व मनावर अधिक बिंबलं.'

''अक्षर' दिवाळी अंकात गोदावरी परुळेकर व ताराबाई मोडक यांची शब्दचित्रे वाचली. मन भारावून गेलं. या स्त्रियांनी केवढं प्रचंड कार्य केलं आहे, पण त्या मानानं, आम्ही त्यांच्या कार्याची दखल घेतली नाही. विशेषत: गोदावरीबाईंची नवीन क्षेत्रातील महनीय कामगिरी विलक्षण आहे. किती जिद्दीच्या या स्त्रिया?'

'आज 'उपरा' वाचलं. आजवर आपण आपल्या समाजाकडे सहानुभूतीनं पाहत होतो. हरिभाऊ आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबरीच्या यमूच्या दु:खानं मन विव्हल होत होते. पण कैकाडी, बैरागी, कुडमुडे, जोशी, पिंगळे आदी जातींची दु:खं, हालअपेष्टा, अपमान, मागासलेपणा, अंध समजुती यांचा विचार केला, म्हणजे आम्ही स्वराज्य मिळवल्यावर, पस्तीस-छत्तीस वर्षं या पददलित जातींची काही उन्नती केली नाही हे जाणवतं. केवळ शाब्दिक सहानुभूती व अव्यवहार्य आचरट योजना यांची खैरात केली. हा अन्याय आपण धुऊन काढावयास नको का?'

'कालपासून Adventure of Being Wife हे मिसेस नॉर्मन व्हिसेंट पील या बाईचं पुस्तक वाचत आहे. विषय आजच्या परिस्थितीला स्पर्श करणारा आहे. अमेरिकेत क्षुल्लक कारणास्तव विवाह-विच्छेद करण्याची

ठूम बोकाळलेली आहे. त्याविरुद्ध या स्त्रीची प्रतिक्रिया, स्वत:साठी तिनं पत्करलेला मार्ग उद्‌बोधक वाटतो.'

'अवंतिकाबाई गोखले यांच्याविषयी वाचत आहे. विसाव्या शतकातील पूर्वार्धात या स्त्रीने मोठं काम केलं. त्यांच्या नवऱ्याला अपघातात अपंगत्व आलं होतं. ही माऊली दोन्ही हातानी नवऱ्याला घास भरवत असे... त्याला सांभाळून त्यांनी महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली स्त्रियांच्या उन्नतीसाठी मोठं कार्य केलं. कॉर्पोरेशन (मुंबई) सदस्य म्हणून त्यांनी भरीव कामगिरी केली. हिंदी, मराठी, गुजराती व इंग्रजी भाषा त्यांना अवगत होत्या. गांधींचं मराठीतील पहिलं चरित्र त्यांनी लिहिलं. त्याला लोकमान्य टिळकांनी प्रस्तावना लिहिली. त्यात त्यांनी गांधींच्या चळवळींची व धोरणांची उत्कृष्ट मीमांसा केली आहे. अवंतिकाबाईंचं एकूण काम बघून, महाराष्ट्रातही सरोजिनी नायडू आहेत असे उद्‌गार लोकमान्यांनी काढले होते.'

'काल 'इलस्ट्रेटेड वीकली'च्या संपादकीय सदरात All Things Considered Selfish सदरात या शीर्षकाखाली यशवंतराव चव्हाण यांचा आदरपूर्वक उल्लेख आला आहे. मला तो लेख इतका आवडला की त्याचं भाषांतर करून मी तो 'विशाल सह्याद्री'कडे पाठवून दिला.

'Alberto Moravia या लेखकाचा 'Roman Tales' कथासंग्रह वाचला. लघुकथा या वाङ्मय प्रकाराची सारी वैशिष्ट्यं त्यांच्या या कथांमध्ये प्रतीत होतात. विशेषत: खालच्या थरांतील स्त्री-पुरुषांच्या भावभावनांचे आविष्कार किती नाजूकपणे आणि सूचकतेनं दाखवले आहेत.

आता आयर्व्हिंग स्टोन यांची 'Lust of life' ही कादंबरी वाचायला घेतली आहे.'

'फिरून एकदा थॉमस हार्डीचे 'Life Little Ironies' हा कथासंग्रह वाचला. हा लेखक मला फार आवडतो. एके काळी वाटायचं, की

त्यांच्या सर्व वाङ्मयाचा नीटपणे अभ्यास करावा. त्यावर प्रबंध लिहावा. पण प्रत्यक्षात काही झालं नाही... सारं जीवन नन्नाचा पाढा वाचण्यात गेलं. आयुष्यात सातत्यानं केलेली एकमेव गोष्ट म्हणजे इंदू, तुझं स्मरण!'

'मार्क ट्वेन या लेखकाचा 'My First Lie' हा लघुनिबंध वाचला. विनोदाच्या सूक्ष्म, तरल, नाजूक पण उपहासगर्भ छटा लक्षात आल्या म्हणजे निरतिशय आनंद होतो.'

'परवा Imprint च्या अंकातील पोलिस खाते, त्या खात्यातील लाचलुचपत, आरोपींना गुन्हा कबूल करावयास लावण्याचे थर्ड डिग्री प्रकार वाचले... सगळं वाचून अंगावर शहारे आले. खरं तर लोकशाहीत पोलिस हे आमचे मित्र असले पाहिजेत. इथं सारा उलटा प्रकार.'

'ऑस्कर वाईल्डची 'Happy Prince' वाचत होतो. एक प्रकारची बोधकथा आहे. पण शैली मोठी आकर्षक व हृदयस्पर्शी आहे.

Barbara Cartland ची 'Desire of Heart' ही कादंबरी वाचली. अलिकडील काळात अथपासून इतिपर्यंत संपूर्ण कादंबरी प्रथमच वाचली.'

'Sunday Review मध्ये 'Climb Every Mountain' या शीर्षकाखाली श्रीनिवास लक्ष्मण यांनी गिर्यारोहकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. इंदू, कौतुकाची गोष्ट म्हणजे त्यात बऱ्याच स्त्रिया आहेत!'

'आज सहज Gift of Magi ही ओ. हेन्रीची लघुकथा वाचली. भारी आवडते मला ही कथा. इंदू, तुला मी ती बऱ्याच वेळा सांगितली आहे. मुलांना शिकवताना मी अगदी तल्लीन होऊन जात असे. तास केव्हा संपला ते कळतही नसे. असे आनंदाचे क्षण खरे जीवनदायी, स्फूर्तिप्रद व उत्साहवर्धक होतात. अशा वेळी वाटतं, की बाकी साऱ्या गोष्टी सोडाव्यात आणि ब्रह्मानंदापेक्षा मोठ्या अशा वाङ्मयानंदात मग्न व्हावं.'

'प्रकाश गोळे यांच्या 'चक्रवाकदेशी'या पुस्तकातील लडाखच्या प्रवासवर्णनानं मन आनंदित झालं. खरंच, आपला भारत देश किती खंडप्राय आहे! जगात जे नाही ते भारतात आहे. मागे, बाबा कदमांच्या 'युवर अटेंशन प्लीज'या पुस्तकाने मी असाच भारावून गेलो होतो. इंदू, मला प्रवासाची किती आवड! मी अशी वर्णनं खूप लिहायला हवी होती.'

'इंदू, श्रीमंत आई-बापांची लाडावलेली पोरं जशी नालायक ठरतात तसं विपुल बुद्धिवैभव आणि प्रतिभा अशी श्रीमंती असूनही त्याचा व्यवहार्य उपयोग केला नाही तर तोही दोषच म्हणायचा... माझा घात मीच केला!'

'इंदू, विनोबाजी गीताप्रवचनात म्हणतात, की माणूस मरणाला विसरून जातो... मी मात्र तू गेल्यापासून मरणाच्या सावलीत आहे. त्याला विसरत नाही. उलट, त्याला येण्यास आमंत्रण देतो पण ते येतच नाही. हा काय चमत्कार आहे?'

''सत्यकथे'च्या अंकात आपल्या म.द. हातकणंगलेकर यांनी लिहिलेलं 'ढग' या कथासंग्रहाचं परीक्षण वाचलं. 'सखा कलाल' असं लेखकाचं नाव आहे. मी फारसं ऐकलेलं नाही. मराठी लेखकांची दृष्टी आता अधिक सूक्ष्म, सूचक व मर्मग्राही झालीय.'

'काल 'स्त्री' मासिकातील मेरी टायटलरच्या 'भारतीय तुरुंगवासातील काही वर्षे'या पुस्तकाचा सारांश वाचला. गांधी नेहरू यांच्या देशातील तुरुंगातील कैद्यांचं जीवन कसं असतं याची अंधुक कल्पनासुद्धा आपल्याला येत नाही.

लोकमान्य टिळकांच्या थोर कुळात आपला जन्म झाला याचा मी अभिमान बाळगतो, पण तसं अनुकरण करता आलं नाही याचा मनाला खेद वाटतो, मग उगीच टिळकांच्या कुळात जन्मलो याची शेखी मिरवण्यात काय अर्थ आहे? चुना आणि अमृत या दोन्ही शब्दांना संस्कृतमध्ये एकच

शब्द आहे. पण या नामसादृश्यामुळे चुन्याला अमृताची सर येईल का?'

(टीप - दादानी केवळ स्मरणावर भर देऊन काही पुस्तकांचे उल्लेख किंवा लेखकांचे उल्लेख चुकीचे केले असतील किंवा मी ते उतखून घेत असताना चुका झाल्या असतील तर त्याबद्दल संबंधितांनी व वाचकांनी क्षमा करावी - लेखक)

❑

## महाबळेश्वरची संगत - बीबीसीची सोबत

या चार हजार पृष्ठांच्या संवाद-वह्या जशा सहजीवन, स्वप्नं, बुद्धिवाद, वाङ्मयीन गप्पागोष्टी, सांसारिक आठवणी अशा अनेक गोष्टींनी भरून गेल्या आहेत तसाच त्यामध्ये आणखी काही गोष्टींचा समावेश आहे. त्यातील दोन प्रमुख गोष्टी म्हणजे दादांचं महाबळेश्वरप्रेम आणि बीबीसी प्रेम. या दोन बाबींच्या उल्लेखाशिवाय दादांचं व्यक्तिमत्त्व अधुरंच राहतं. दादांचा जन्म कोकणातला म्हणून त्यांना निसर्गाची आवड बालपणापासूनच लागली असावी. कोल्हापुरात असताना ते ज्योतिबाला व पन्हाळ्याला त्यांच्या गंगावेशीजवळच्या घरातून पायी जाऊन येत असत. आकाशाकडे पाहत, डोंगरदऱ्यांतून भटकत त्यांचा तासन्‌तास कसा निघून जाई हे त्यांचं त्यांनाच कळत नसे. त्यांचं निसर्गप्रेम वाढीला लागण्यास त्यांच्यावर नियतीनं लादलेली परिस्थितीही कारणीभूत झाली असावी. त्या परिस्थितीमुळे माणसांमुळे दूर राहणं, आपल्याला कोणीही ओळखत नाही अशा ठिकाणी जाणं त्यांना अधिक सोयीचं वाटू लागले असावं! त्यांची आई गेली तेव्हा ते पूर्णपणे एकाकी पडले होते. वर्षभर शाळेत मनापासून शिकवावं, भरपूर पुस्तकं आणून त्यांचं वाचन करावं आणि मे-महिन्याच्या सुट्टीत महाबळेश्वरात जाऊन मुक्काम ठोकावा, वर्षभरात जमा केलेली पुंजी संपेपर्यंत.

दादांच्या महाबळेश्वरप्रेमाला खरं खतपाणी घातलं ते महाबळेश्वरच्या 'अन्नपूर्णागृहां'चे मालक चिंतोपंत साठे यांनी. दादांचं लोकविलक्षण

महाबळेश्वरप्रेम बघून त्यांना दादांविषयी ममत्व वाटू लागलं. इतकं की दादा मे महिन्यात आले की त्यांचा 'खजिना' चिंतोपंत स्वत: तपासून पाहत. रोजच्या खर्चाचे आणि परतीच्या भाड्याची रक्कम बाजूला ठेवल्यावर मगच ते उरलेली रक्कम लॉजिंग-बोर्डिंगच्या खर्चापोटी ठेवून घेत. अर्थात त्यांच्या नेहमीच्या दराच्या तुलनेत ती रक्कम किती तरी कमी असे! पण एकदा मैत्री म्हटली, की मग तिथे हिशोब नसतो. ते आपल्या शेवटच्या पंगतीला दादांना स्वत:जवळ बसवून घेत. एखाद्या दिवशी दादा कमी जेवले असं त्यांना आढळलं की दादांना प्रेमानं म्हणत, ''मास्तर, आज पोळ्या कमी घेतल्यात. याचा अर्थ तुमचं आजचं फिरणं कमी पडलं. उद्यापासून विल्सन पॉईंटच्या पठारावरच्या फेऱ्या वाढवा.'' लग्नानंतर पूर्वीच्या तुलनेत दादांच्या महाबळेश्वर फेऱ्या स्वाभाविकपणेच कमी झाल्या, तरी मला आठवतं की आम्ही आमच्या लहानपणी रानड्यांच्या 'आराम' हॉटेलमध्ये बऱ्याचदा जात असू. वाढती महागाई, वाढता संसार यामुळे दादांना महाबळेश्वराची ओढ कमी करावी लागली.

त्यांच्या महाबळेश्वरप्रेमाला पुन्हा नव्यानं पालवी फुटली ती १९६३-६४च्या आसपास. महाराष्ट्र राज्यसरकारने कमी उत्पन्नाच्या गटांसाठी हॉलिडे कँपमध्ये जागा द्यायला सुरुवात केल्यावर. त्यामध्ये स्वयंपाकाची भांडीकुंडी मिळत. दादांना नेहमी जागा कशी मिळत असे याचं मला कोडं पडत असे. त्यांची तीव्र इच्छाशक्ती एवढंच त्याचं उत्तर होतं. मी रिझर्व्ह बँकेत नोकरीला लागल्यावर आमच्या माथेरानच्या हॉलिडे-रिसॉर्टमध्ये दादांसह सर्वांना मी एक-दोनदा नेलं होतं, पण दादांची पहिली पसंती मात्र महाबळेश्वर हीच होती. तो त्यांचा एक 'वीक पॉईंट' होता. एका मित्राला मी दादांच्या विलक्षण महाबळेश्वरप्रेमाविषयी सांगत होतो तेव्हा तो गमतीनं म्हणाला ''महाबळेश्वरच्या अनेक पॉईंटविषयी मी ऐकून होतो, पण या 'वीक' पॉईंटची कथा काही आगळीच दिसते.''

महाबळेश्वरविषयी दादांच्या डायरीमधील काही नोंदी अशा-

'एप्रिल-मेचा उन्हाचा कडाका सुरू झाला की मला महाबळेश्वरचे डोहाळे लागतात! तिथं जावं, खूप-खूप हिंडावं, डोंगर-पठारावर

भटकावं, चारी दिशांतून सुटणारा मुक्त वारा अंगावर घ्यावा, सकाळचा सूर्योदय, सायंकाळचा सूर्यास्त मनमुराद पाहावा. आकाशाकडे टक लावून मेघांचा प्रवास, ताऱ्यांचं लुकलुकणं, विविध रंगांची मोहक गुंफण पाहावी ही इच्छा अजूनही कमी होत नाही. इंदू, लग्नापूर्वी अशी भ्रमंती करण्याची मला कोण आसक्ती असायची? विल्सन पॉईंटवर त्या बुरूजावर बसून मी सूर्योदय पाही. त्या विस्तीर्ण पठाराला प्रदक्षिणा घाली. संध्याकाळी बॉम्बे पॉईंटवर जाई. समोर दिसणारा प्रतापगड डोळे भरून पाही. भान हरपून सूर्यास्त पाही. असं हिंडलं म्हणजे मनाला एक अपूर्व आनंद होई.'

'यंदा महाबळेश्वरला जाणं जमलं नाही. जणू काही आपल्या मित्राचा वियोग झाला असं वाटलं... आता, केव्हा तरी पावसाळ्यात जाऊन निसर्गाचं रौद्र भीषण स्वरूप पाहावंसं वाटतं. त्या पावसात चिंब भिजावंसं वाटतं. परवा कोणी म्हणत होतं, की हल्ली पावसाळ्यात एक-दोन हॉटेल चालू असतात म्हणून. पूर्वी पावसाळ्यात महाबळेश्वर जवळपास ओस पडत असे. सगळी रहिवासी मंडळी वाईला नाही तर पुण्याला जात.

'सूर्योदयाच्या वेळी विल्सन पॉईंटवर आणि सूर्यास्ताच्या वेळी बॉम्बेपॉईटवर कितीही वेळ टक लावून आकाशाकडे पाहत बसलं तरी कंटाळा कसा तो येतच नाही-ऑर्थर विंडोमधून पाहताना अक्राळविक्राळ स्वरूप दाखवणाऱ्या त्या खोल-खोल दऱ्यांमध्ये खुशाल स्वत:ला भिरकावून द्यावं! निसर्गाशी एकरूप व्हावंसं वाटतं.'

'महाबळेश्वरात कुठे तरी एखादं झोपडं बांधून राहावं आणि उर्वरित काळ निसर्गाच्या सान्निध्यात, इंदू, तुझं चिंतन करत राहावं वाटतं, आत्मचिंतन, आत्मनिवेदन, परमात्मा, जीव शिव यांचा तर्कशुद्ध विचार अशा गोष्टीत घालवला... तर किती मजा येईल... पण?'

'इंदू, सुमनचं पत्र आलंय. महाबळेश्वरला हॉलिडे कँपमध्ये 'ए' टाईप ब्लॉक मिळाला म्हणून ती खूश आहे, पण लगेच पत्रात म्हणते, की हा

योग आई असताना यायला हवा होता! खरचं इंदू, तुझ्या वेळी आपण नेहमी 'सी'टाईपच्या अपुऱ्या जागेत दिवस काढले. आपण घरीच स्वयंपाक करायचो. आपल्याला त्या काळी अधिकृतपणे आठवड्याचा शिधा मिळायचा. अवी-रवी आजुबाजूला हिंडून कैऱ्या आणायचे. त्याची तू छान चटणी करायचीस. कंटाळा आला की आपण तिथल्या कँटिनची भाजी आणत होतो. सुमन आपल्याबरोबर तीच-चार वेळा तरी आली; पण चारू बिचारी एकदाच आली होती. त्यांनतर तुझा आजार सुरू झाला. मग मुलांचे संसार सुरू झाले. त्यामुळे सगळ्यांचं एकत्र महाबळेश्वर हा विषयच संपला. मी मात्र जमेल तेव्हा एक-दोन दिवस का होईना, पण माझ्या स्वप्ननगरीला येऊन भेट देत असे. यंदा मात्र मी कष्टानं सर्वांचा एकत्र येण्याचा योग आणलाय.'

'आज महाबळेश्वरात आलो. अवी, रवी, चारू आणि सुमन, चारी नातवडांना घेऊन मी माझ्या लाडक्या महाबळेश्वरात राहणार. किती छान वाटतंय! खरं तर तू नाहीस याची रुखरुख आहेच. सगळ्यांना पत्रापत्री करून, आग्रह करून बोलावलं. अवी-रवीना रजा काढायला लावली. माझ्या हट्टासाठी सर्वजण आली आणि मलाच उत्साह गेल्यासारखा वाटू लागला, पण काही काळच. आता गप्पागोष्टींना ऊत आलाय. तुझ्या वेळच्या आठवणी निघत आहेत. चारूने भरपूर भडंग करून आणलेत, त्यामुळे अवी खूष आणि रवीला आवडतो तसा चिवडा सुमननं करून आणलाय म्हणून तो खूष. आज इथं आलेले दोन घोडेवाले मी ठरवले. मंजा, मंदार, मकू आणि मधुरा त्यावरून गव्हर्नमेंट हाऊसच्या परिसरात फेरफटका मारून आली. सर्वजण मजेत आहेत.'

'सुमनने माझ्यासाठी छान कॅडबरीच्या वड्या करून आणल्या आहेत. किती सुरेख झाल्या म्हणून सांगू? इंदू, नुसती जिभेवर ठेवली की विरघळते, शिवाय नारळाच्या, टोमॅटोच्या वड्या आहेतच. वड्या कसल्या? बर्फीचे तुकडेच आहेत.

'मी दोन दिवस कुठे फिरलो नाही. हॉलिडे कॅम्पच्या परिसरातच रपेट

मारतो. दमलो की एखाद्या बाकड्यावर नाहीतर हिरवळीवर बसतो. आज अवी-रवीनी आग्रहच केला म्हणून जवळच्या बॉम्बे पॉईंटपर्यंत फिरत-फिरत गेलो. मावळत्या सूर्याचे हळुहळू क्षितिजाआड जातानाचे आविष्कार अति मनोहर, लोभस दिसत होते. ढग आपली कृष्णछाया अधुन-मधून त्या बिंबावर टाकत होते. कधी कधी ते लालसर बिंब डोळ्यांसमोरून अजिबात जाई तर कधी कधी पूर्णावतार धारण करून जणू काही ढगांचा पराभव कसा केला अशा अभिमानानं आपल्याकडे पाहत आहे असा भास होई. सूर्य व ढग यांचा हा शिवाशिवीचा खेळ सायंकाळी सात वाजेपर्यंत चालला होता. बॉम्बे पॉईंटवर गर्दी करणाऱ्या शेकडो स्त्री-पुरुषांच्या नजरा त्यावर खिळून राहिल्या होत्या. सूर्यास्त झाल्यावर, सर्वांनी टाळ्या वाजवल्या. नंतर आम्ही हॉलिडे कँपकडे परतलो. इंदू, काल जवळजवळ दोन-अडीच मैल चाललो असेन. गेला महिनाभर मला सांगलीत आपल्या घरापासून गणपतीच्या देवळापर्यंतही चालवत नव्हतं. डोंगरचा वारा खाल्ला की बघ कशा माझ्या प्रसन्न वृत्ती जागृत होतात! कधी नव्हे ती गाढ झोप लागली.'

'इंदू, आज मी घरीच आराम केला. बाकी सगळी 'महाबळेश्वर दर्शन' गाडीनं सगळे पॉईंट बघायला गेली आहेत. इंदू, मी अभिमानपूर्वक सांगतो. मी पाहिलंय तसं महाबळेश्वर फार थोड्या लोकांनी पाहिलं असेल. बहुतेक सर्व पॉईंट मी पायी हिंडून बघितले आहेत. विल्सन पॉईंटचा सूर्योदय जवळजवळ रोज बघून मी तिथल्या विस्तीर्ण पठाराला फेऱ्या मारत असे. आम्हां शिक्षकांच्या एका कॅम्पच्या वेळी मी आणि आपला मा.स. मराठे पायी प्रतापगडापर्यंत थांबत थांबत गेलो. सकाळपासून चालून-चालून पायाचे तुकडेच पडले. रात्री पुजाऱ्याकडे जेवून झोपलो आणि येताना बसने आलो. त्या काळी मी एकटाच वेण्णा लेकच्या पाठीमागील शॉर्टकटने धौम महाबळेश्वरास किती वेळा गेलो असेन. कॅनाट पीक हे किती विलक्षण सुंदर ठिकाण आहे. सगळं महाबळेश्वर कवेत आल्यासारखे दिसते. हल्ली कुणी फारसे त्या पॉईंटला जात नाहीत.'

'आज अवी-रवीच्या आग्रहाने टॅक्सीतून दोन-तीन पॉईंट बघितले. सावित्री, मार्जारी पॉईंटस बघून ऑर्थर्स सीटपाशी एका हॉटेलवजा कॉटेजजवळ चहा घेत बसलोय. आता ऑर्थर्स सीटच्या परिसरातील पॉईंटपर्यंत चढउतार करायची ताकद पायात राहिली नाही. इंदू, तुला आठवतय त्या विंडो पॉईंटकडे यायला तू अजिबात तयार व्हायची नाहीस. मला महाबळेश्वरातला तो काळ आठवतोय. त्यावेळी तुझा माझ्या जीवनात प्रवेश व्हायचा होता. उद्याची चिंता नव्हती. निसर्गसान्निध्यात मी मनमुराद भटकंती करायचो. 'अन्नपूर्णागृह' नावाचं त्यावेळी महाबळेश्वरात एक हॉटेल होतं. त्याचे मालक चिंतोपंत साठे यांची माझ्यावर फारफार मर्जी होती. केवळ माझ्या महाबळेश्वरावरील निष्ठेमुळं. आपल्या पंक्तीला ते मला बसवून घेत. शाळा सुरू व्हायच्या आदल्या दिवसापर्यंत ठेवून घेत. हिशोबाची बातच काढून देत नसत. पहाटे साडेपाचच्या चहाची सवय त्यांनीच लावली म्हणेनास. सध्या जे आराम हॉटेल आहे. तिथली खिंड चढून जाताना किती थंडी वाजायची म्हणतेस. जिकडं तिकडं धुकंच धुकं पसरलेली ती महाबळेश्वर नगरी म्हणजे एक स्वप्ननगरीच वाटायची. मग धुक्यातून वाट काढत काढत मी कधीकधी मार्केटच्या टोकाला असलेल्या 'सिल्वास्टिन'या पाश्चात्य धर्तीच्या हॉटेलात जाऊन ट्रे-टी रूबाबात घ्यायचा! घुटके घेत घेत 'टाइम्स'चे जुने अंक चाळायचा. अर्धा-पाऊणतास घालवून परतायचा तरी सारी मालकमपेठ झोपलेलीच असायची.

'इंदू, असे होते ते माझ्या आठवणीतील महाबळेश्वर आणि आजचे आहे ते ऐषआरामी, खाद्यपेयांना अधिक महत्त्व देणारं महाबळेश्वर!

'इंदू, याच महाबळेश्वरात मी सहा वर्षापूर्वी आलो होतो ते इथं भरलेल्या साहित्य संमेलनासाठी. डिसेंबरचे ऐन थंडीचे दिवस. गार बोचरे वारे सुटलेले. रात्री अकरा-साडेअकराचा सुमार. स्कार्फ, स्वेटर, शाल घेऊनसुद्धा थंडी आवरत नव्हती. आणि अशा थंडीत आम्ही बॅ. नाथ पै यांचं भाषण ऐकत होतो. राजकारणी लोकांनी देशाची संस्कृती बिघडवून टाकलेली आहे. निदान आता वाङ्मयसेवकानी तरी शील, चारित्र्य, संस्कृती नि सौंदर्य यांची शान वाटेल, वाचकांचं सात्त्विक मनोरंजन करील

अशी साहित्यनिर्मिती करावी असा त्यांनी भाषणात सल्ला दिला. किती लाघवी बोलणं किती मधुर वागणं. असे ते नाथ पै माझ्या डोळ्यांसमोर उभे राहतात. आपले हिंदुराव पाटील माझ्याबरोबर होते. त्या उमद्या तरुण माणसानं महाबळेश्वरच्या त्या संमेलनात माझी सर्वतोपरी काळजी घेतली. एरवी एकट्याच्या जीवावर मला महाबळेश्वर जमलं नसतं. झेपलं नसतं.

'उद्या आम्ही हॉलिडेकॅम्प सोडणार. आता पुन्हा महाबळेश्वर दिसणं कठीण!'

आता कसलं महाबळेश्वर दिसतंय असं मला दादा हताशपणं म्हणाले ते १९८१ मध्ये, पण त्यांचं महाबळेश्वरप्रेम बहुधा परमेश्वराच्या लक्षात असावं, कारण त्यांना मृत्यूपूर्वी काही काळ आधी पुन्हा एकदा अकल्पितपणे महाबळेश्वर दर्शनाचा योग आला. ते वसंतदादांना भेटण्यासाठी. (त्याचा वृत्तांत आधी आला आहेच.)

१९८४च्या एप्रिलमध्ये त्यावेळी दादा शेवटचे महाबळेश्वरी गेले. त्यानंतर १९८५ मध्ये दादा गेले. तथापि, त्यावेळी 'महाबळेश्वरचं जे दुर्दर्शन दादांना झालं त्यामुळे ते फार व्यथित झाले. त्यांनी डायरीत लिहिलंय,

महाबळेश्वर किती बदललंय. बकाल होत चाललंय. पण म्हणून माझं प्रेम थोडंच कमी होणार आहे? Oh England, with all thy faults, I love thee असं म्हणणाऱ्या कवीसारखीच माझ्या मनाची अवस्था आहे.

महाबळेश्वरप्रेम म्हणजे दादांनी वर्षानुवर्षं जतन केलेलं त्यांचं निसर्गप्रेम होतं. त्यांची ती उपजत निसर्गप्रेमातून निर्माण झालेली आवड होती. याउलट बीबीसी हा दादांना उतारवयात गरजेपोटी लागलेला शोध होता. त्यांच्या शेवटच्या आजारपणात माझ्या पत्नीला वाटे की बीबीसी ऐकण्याने त्यांची झोप उडत असेल. पण तसे नव्हते. ते सांगायचे की त्यामुळेच रात्रीच्या साऱ्या वेदना मी विसरतो. बीबीसीवरील बातम्या, नाटकं ऐकताऐकता, चालू असलेला ट्रॅन्झिस्टर अंगावर पडलेला आहे आणि दादा गाढ झोपले आहेत, असं दृश्य कितीदा तरी दिसायचं! सांगलीच्या

घरात माडीवर दादांची स्वतंत्र खोली होती. आजुबाजूची घरं काही अंतरावर होती, म्हणून त्यांचं बीबीसी श्रवण तिथं कोणाच्या ध्यानातही येत नसे. पण डोंबिवलीत आमचा ब्लॉक लहान होता. आजुबाजूला ब्लॉकस होते. ती घरं आमच्या ब्लॉकला लागून होते. त्यावेळी माझी मुलगी मुंबईच्या युडीसीटीमध्ये शिकत होती. दादांचा बीबीसी मोठ्या आवाजात असे. आजुबाजूच्या घरांतून काय पण रस्त्यावरही रात्रीच्या वेळी त्याचा आवाज जात असे. घरी पाहुणेमंडळी आली की त्यांची झोपमोड होते हे दिसायचं. शेजाऱ्यांना आपल्यापासून कोणताही उपसर्ग होऊ नये म्हणून एरवी दक्ष असणारे आम्ही याबाबतीत थोडे संकोचून जायचो, पण दादांना काही सांगणंही आम्हाला अवघड वाटायचं. अर्थात, ही परिस्थिती त्यांच्या गावीही नसायची. नंतर त्यांच्या लक्षात आली तेव्हा ते बीबीसी त्यांच्या कल्पनेनं हळू आवाजात लावत. बीबीसी श्रवणभक्तीचा त्यांचा विशुद्ध आनंद बघून त्यांची दया यायची आणि आपल्या वेदना सुसह्य करण्यासाठी त्यांनी स्वत:साठी केलेली ही औषधयोजना आहे हे जाणवायचं.

त्यांच्या संवादवह्यांमधून बीबीसीचे उल्लेख एकसारखे आहेत. विस्तारभयास्तव तसेच पुनरुक्ती टाळण्यासाठी काही थोड्या नोंदी अद्धृत केल्या आहेत. 'इंदू, बीबीसी हा तू गेल्यापासूनचा माझा एकमेव सोबती. बिचारी रात्री-अपरात्री माझ्या सहवासात राहून तो माझी करमणूक करतो. भाषणं, चर्चा आणि सततच्या अद्ययावत बातम्या यांची रेलचेल असते. त्या आनंद देतात. विश्वाशी संवाद घडवतात. खऱ्या अर्थानं जगाचा नागरिक बनवतात. माझ्या आवडत्या इंग्रजीचे वेगवेगळे आविष्कार अनुभवता येतात.'

'इंदू, रात्री घेतलेली झोपेची गोळी फार फार तर दोन ते अडीचपर्यंत मला झोप देऊ शकते. त्यानंतर माझी काहिली सुरू होते. मग तेव्हापासून सकाळी साडेपाच ते सहापर्यंत, म्हणजे चहाला उठेपर्यंत बीबीसी ऐकत पडतो. कोणत्या वेळी कोणता कार्यक्रम असतो हे आता मला अगदी पाठ झालं आहे. या बीबीसीमुळं रात्रीची झोप आली नाही तरी वेळ आनंदात

जातो. माझी बैचेनी, अस्वस्थता, खोकला आणि वेदना यावर बीबीसी हे एक औषध आहे.'

'इंदू, खोकूनखोकून घसा सुकला. छाती दुखत होती. हॉट वॉटरबॅग द्या म्हणून कुणाला तरी उठवावं असं मनात येत होतं. थोडी कळ काढावी म्हणून बीबीसी लावलं आणि काय मेजवानी मिळाली म्हणतेस! हॅम्लेटची स्वगतं ऐकायला मिळाली. इंदू, हे हॅम्लेट मी किती वेळा वाचलंय तुला माहीत आहेच. एकांतात मोठमोठ्यानं त्यातली स्वगतं म्हटली आहेत. ब्रॅडलेची त्या नाटकावरची समीक्षा वाचली म्हणजे मन आनंदसागरात बुडून जायचं. अशा माझ्या या आवडत्या नाटकाचा काही भाग मला विनासायास ऐकायला मिळाला.

'इंदू, आज बीबीसीवर ब्रेस्ट कॅन्सर झालेल्या एका बाईची प्रदीर्घ मुलाखत ऐकली. नवीन प्रकारच्या औषधोपचारांना त्या बाईंनी किती धैर्यानं साथ दिली, खंबीर मानसिकता दाखवली याचं सुरेख वर्णन ऐकलं. तुझ्या बाबतीत आपल्याकडील उपचारपद्धत कमी पडली असेल का? काही का असेना पण असे कार्यक्रम आपल्या सर्व रेडिओ केंद्रांवरून श्रोत्यांना ऐकवले पाहिजेत. इंदू, आज, बीबीसीवरून भोपाळ दुर्घटनेच्या बातम्या ऐकल्या. चीड आली. वाईट वाटलं. या देशात कीडा-मुंग्यांसारखी माणसं मरत आहेत. कोणाला त्याची दाद ना फिर्याद. हल्ली इच्छा असून पूर्णपणे वर्तमानपत्र वाचता येत नाही, पण बीबीसी ऐकलं की सगळी वर्तमानपत्रं वाचल्याचं श्रेय मिळतं.'

'इंदू, काल Frank O'corner यांच्या Writing story या निबंधासंबंधी ऐकलं. त्यात त्यांनी सांगितलंय, ''की मी कथा तीन वेळा लिहिली.'' तिन्ही कथा प्रत्येक वेळी प्रसिद्ध झाल्या, पण तीच कथा तिसऱ्या वेळी लिहिताना आता आपल्याला कथा-लेखनाचं मर्म कळलं असं वाटलं. पण हे कळावयास पंचवीस-तीस वर्षांचा कालावधी ओलांडावा लागला. इंदू, तुझ्या बाबतीत माझं असंच होत आहे. दररोज तुझ्या विशिष्ट गुणांचा बोध होतो. पूर्वी हा गुण आपल्या ध्यानात कसा आला नाही याचं आश्चर्य

वाटतं. आता मात्र तुझ्या व्यक्तिमत्त्वाचं पूर्ण ज्ञान झालं आहे असं भासतं, तोच दुसरा दिवस उजाडतो. तुझ्या आणखी एखाद्या सुप्त गुणाचा बोध होतो. असा क्रम चालू आहे म्हणून मी जगतो, जीवन सुसह्य होतं.

'इंदू, आता डोळे अजिबातच काम देईनासे झाले आहेत. डोळ्यांची शक्ती आता पूर्णत: संपल्यासारखीच आहे. आता श्रवणशक्ती संपली की खलासच! बीबीसीपण ऐकायला मिळणार नाही.'

❐

# डायऱ्यांचा वनवास

इथवर, मी चार हजार पृष्ठांच्या 'राम'कथेचं यथाशक्ती कथन केलं. एक कर्तव्य पुरं केलं इतकचं पण मला स्वत:ला अपेक्षित असलेलं समाधान मात्र या 'रामायणाच्या' गायनात लाभलं नाही. माझ्या स्वत:च्या लेखन-मर्यादा यासंबंधी झाला. पण माझ्या त्रुटी या डायऱ्यांबाबतचे माझे प्रमाद यासंबंधी काही सांगितल्याशिवाय एका पतीने सतत अकरा वर्षे आपल्या स्वर्गस्थ पत्नीबरोबर केलेल्या अभूतपूर्व संवादाची 'सांगता' होणार नाही.

एखाद्याने डोंगरावरील उंच कड्यावरून आत्मघात करण्यासाठी जावं आणि कोणत्या तरी अदृश्य शक्तीच्या हाकेने एकदम भानावर येऊन परत फिरावं तशी माझी या डायऱ्यांबाबत स्थिती झाली होती. काय असणार मोठंसं या डायऱ्यांमध्ये? अमका, तमका फलाणा घरी आला. आज रवि असं बोलला, अवि असं बोलला अशा स्वरुपाच्या नोंदी असणार एवढीच माझी मूर्ख कल्पना! एका क्षणी सगळ्या डायऱ्या रद्दीत नेऊन घालाव्यात असाही विचार मनात आला होता....

आणि कोणत्या तरी हाकेसरशी शुद्धीवर येऊन आत्मघात करून घेता घेता मी वाचलो!

मला ज्या अदृश्य शक्तीची हाक कानावर आली तो आवाज माझ्या आईचाच असणार! बहुधा तीच सांगत असावी. ''अरे बघ तरी तुझ्या दादांनी काय लिहिलंयते. नाही आवडलं तर टाकून दे रद्दीत. पण निदान

वाचून तर बघ.'' ....लहानपणी एखाद्या भाजीविषयी उगाचच प्रतिकूल ग्रह असायचा. का ते माहित नसायचं. पण मी ती भाजी पानात पण घ्यायला तयार नसायचा. अशा वेळी आई आवर्जून समजावयाची. ''अरे निदान खाऊन तरी बघ. चव तरी चाखून पहा. नाही आवडली तर खाऊ नकोस.''

आणि ती भाजी खरोखरच छान असायची. छान लागायची आणि कायमचीच आवडीची होऊन बसायची.

अगदी तसंच झालं!

आपल्या या डायऱ्यांविषयी दादा आमच्याशी कधीच बोललेले नाहीत. या वह्या म्हणजे दादा आपली इस्टेट समजत. त्यांच्या एका काळ्या ट्रंकेत त्या डायऱ्या ठेवलेल्या असत. ते नित्यनेमानं काही तरी लिहितात एवढंच आम्हाला ठाऊक होतं पण त्याबद्दल काही विचारायचं सौजन्य वा त्यातील मजकूर चोरून वाचायची फाजील उत्सुकताही आम्ही कोणी दाखवली नाही. खरं म्हणजे त्याविषयी मायेनं, आपुलकीनं आपण बोलायला हवं होतं असं त्या डायऱ्या चाळल्यानंतर वाटून गेलं! पण खुद्द दादांना मात्र तो कप्पा आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत बंदच राहवा असं वाटत असावं. भावनेच्या भरात आणि विशेषत: मला थोडीफार साहित्यदृष्टी आली आहे असं वाटून दादांना असं जरूर वाटलं होतं, की त्यांच्या थोरल्या मुलाने (म्हणजे मी) या डायऱ्यांमधील काही भागांचं संकलन करून त्याचं वाचन इतर कुटुंबीयांसमोर करावं. अशा अनेक ठिकाणी नोंदी आहेत. त्यांनी तो विचार निग्रहानं बाजूला सारल्याचंही लिहितात. त्यांनी म्हटलं आहे, की तसं केलं तर या संवादामध्ये जी एक नि:संकोच सहजता आहे ती नाहीशी होईल.

माझ्या धाकट्या भावाची- रवीची बदली १९८३ मध्ये नागपूरजवळच्या ब्रह्मपुरी या दुर्गम भागातील स्टेट बँकेत झाली. तिकडे जाऊन तेथील विषम हवामानात त्या बिऱ्हाड करावं लागलं. त्यामुळं दादांना आपली प्रिय सांगली सोडून डोंबिवलीला माझ्याकडे येऊन राहणं भाग पडलं, ते अखेरपर्यंत. दरम्यानच्या काळात मुंज वगैरे काही कौटुंबिक कारणामुळं दादांचं पुणे, सांगली, ब्रह्मपुरी असे छोटे छोटे मुक्काम पडले.

त्यामुळं या सर्व डायऱ्या दादांना इकडून-तिकडे हलवाव्या लागत. त्यांचं ओझं होई पण त्यासाठी तडजोड नव्हती. एखाद-दुसरा कपडा सामानातून कमी झाला तरी त्यांना त्याची फिकीर नसे, पण तारीखवार लावलेल्या डायऱ्या मात्र ते काळजीपूर्वक स्वत:बरोबर वागवत. त्या डायऱ्यांमधील अखेरची नोंद आहे ती १५ जुलै १९८५ रोजीची. त्यानंतर हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्यानंतर २१ जुलै १९८५ला त्यांचं निधन होईपर्यंत ते अर्धवट बेशुद्धावस्थेत होते. एका मध्यरात्री, म्हणजे मृत्यूपूर्वीच्या एक-दोन दिवस आधी असेल, त्यांनी मला हलवून जागं केलं. ते काहीतरी सांगायचा प्रयत्न करत होते; पण शब्द उमटत नव्हते. त्यांची एक हातात धरायची काळी बॅग होती. त्यात त्यांच्या महत्त्वाच्या वस्तू, पत्ते, फोन नंबर, पैसे वगैरे असत. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झालो तेव्हा ती बॅग घरी होती. आम्ही व्यवहारी जगात वावरणारी माणसं. आमची धाव कुठवर जाणार? मला वाटलं ते त्या संबंधातच काहीतरी सांगत आहेत म्हणून मी त्यांना ती बॅग आणतो वगैरे काहीसं बोललो तेव्हा ते चिडचिडे झाले आणि पुन्हा ग्लानीत गेले. आता म्हणजे डायऱ्या वाचल्यानंतर, मला वाटतं की त्यांना डायऱ्यांसंबंधातच काही सांगायचं असावं.

या डायऱ्या दादांच्या निधनसमयी माझ्याकडे होत्या. त्यांच्या अखेरच्या आजारपणात, या डायऱ्यातील काही निवडक भागाचं वाचन मी सर्वांसमोर करावं असं ते माझ्या बायकोजवळ एक-दोन वेळा बोलले होते, पण इतक्या सहजतेनं ते बोलले की त्यातील गांभीर्य तिला फारसं जाणवलं नाही. तथापि तिने सर्व डायऱ्या काळजीपूर्वक एका खोक्यात बांधून ठेवल्या. आम्ही १९९६च्या अक्षय्य तृतीयेच्या दिवशी मुंबईतील पस्तीस वर्षांचं वास्तव्य संपवून, कायमचे सांगली निवासी बनण्यासाठी प्रस्थान ठेवलं तेव्हा त्या सगळ्या डायऱ्या आमच्या सर्व सामानाबरोबर सांगलीत आल्या.

एका अर्थानं त्या स्वत:च्याच जन्मगावी आल्या!

दरम्यानच्या काळात माझ्या हातावर साहित्यरेषा उमटली. दादा हयात असेपर्यंत दोन-तीनच लेख 'महाराष्ट्र टाइम्स', 'तरुण भारत', 'लोकसत्ता' अशा मुंबईच्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले होते. दादांना त्या

गोष्टीचा खूप आनंद झाला होता. त्यांनी तोंड भरून माझं कौतुक केलं. डायरीत त्यासंबंधात सविस्तर नोंदी आहेत.

सांगलीत आल्यावर मी काही डायऱ्या चाळल्या तेव्हा चकित झालो. साहित्यिक मूल्य असलेलं आणि मनाच्या वेगळ्याच उंचीवरून झालेलं ते लिखाण वाचून मी गलबललो. दादांची जी योग्यता होती त्याला अनुरूप वर्तन आपल्या हातून घडलं नाही या जाणिवेनं मला अपराधी वाटू लागलं. डायऱ्या वाचताना अश्रू अनावर होत होते. त्यामधून एखादी साहित्यकृती निर्माण होऊ शकते याची पुसटशी जाणीव मला झाली. तथापि, त्या डायऱ्या वाचताना मनाची जी विकल अवस्था होत होती, त्यामुळं तशा त्या 'विकारवश' अवस्थेत आपल्याला काही करता येणं अशक्य आहे, याची मला जाणीव झाली. आपण तटस्थपणे या डायऱ्यांकडे बघू शकत नाही तोवर गप्प बसावं असं मी ठरवलं. बरं, हे काम दुसऱ्या कुणा लेखक मित्रावर सोपवण्यासारखं नव्हतं आणि एक महत्त्वाचं कारण होतं. सांगली नगरीच्या स्थापनेला २००१ साली दोनशे वर्षे पुरी होत होती. त्या निमित्तानं 'सांगली आणि सांगलीकर' हा महत्त्वाकांक्षी ग्रंथ पुरा करण्याच्या खटाटोपात मी गढून गेलो होतो. त्याचं २५ मार्च २००१रोजी सुभाष भेंडे यांच्या हस्ते थाटामाटात प्रकाशन झालं. त्यापाठोपाठ माझा एक कथासंग्रहही निघाला. या धामधुमीत आणि स्वत:च लावून घेतलेल्या काही सामाजिक-सांस्कृतिक आणि मुख्यत्वे कौटुंबिक कामांमध्ये वेळ गेला. एक दुर्दैवाची गोष्ट म्हणजे दरम्यानच्या काळात माझ्या भावजयीला- चारूला कॅन्सरने गाठलं. चार वर्षांची झुंज दिल्यावर १२ ऑक्टोबर २००२ रोजी तिचं निधन झालं. विलक्षण धैर्यानं तिची मृत्यूशी चाललेली झुंज पाहत असताना आम्हांला आमच्या आईच्या आजाराची आठवण यायची.

दिवसांमागून दिवस गेले. वर्षांमागून वर्षं गेली. त्या डायऱ्या बिचाऱ्या अहिल्येसारख्या शापित अवस्थेत पडल्या होत्या!

आणि एक जुलै २००३च्या पहाटे अचानक मला साक्षात्कार झाला. आदल्या दिवशी आषाढाचा प्रथम दिवस होता. कालिदासदिन. त्या निमित्त आयोजित एक व्याख्यान ऐकताना त्या यक्षाच्या वेदना आणि दादांच्या

विरह वेदना यांची जातकुळी एकच असल्याचं जाणवलं. आणखी एक योगायोग त्या वर्षीच होता. सांगली नगरवाचनालयात आमच्या आईच्या नावे देणगी देऊन तिच्या नावानं ज्या मराठी भावगीत गायनस्पर्धा १९७८पासून भरवल्या जात आहेत त्याचं २००३ हे रौप्यमहोत्सवी वर्ष होतं. ते औचित्य साधून या डायऱ्यांविषयी काही लिहिता आलं तर? दादांच्या वृद्धापकाळात त्यांच्यावर अन्याय केल्याची जी टोचणी मनाला लागली होती त्याचं थोडं तरी परिमार्जन केल्यासारखं होईल. या विचारानंच मला आत्मिक समाधान झालं. मग मात्र मी झपाटल्यासारखा झालो. सगळ्या डायऱ्या काढल्या. एखाद्या निष्कांचन माणसाच्या अंगावरची लक्तरं शोभावीत तशी त्यांची अवस्था होती. वह्यांची कव्हरं पूर्णपणे फाटली होती. काही वह्यांची पानं पूर्णतया कोरी पडल्यासारखी झाली होती. काही काळ घरातील रंगकामाच्या निमित्तानं त्या डायऱ्यांचं खोकं गच्चीत ठेवलं गेलं होतं. त्यामुळे उन्हामुळे असेल, वह्यांवरील अक्षरे उडून गेली होती. काही ठिकाणी वाळवी लागली होती तर काही ठिकाणी वह्यांची पानं पूर्णतया निसटून गेली होती. वह्यांचे पुठ्ठे आणि कागद यांचे तुकडे पडले होते.

अठरा वर्षांच्या बंदिवासानंतर ही 'अवस्था' अटळ होती! डायऱ्यांची जी परवड झालेली बघितली तिचं दुःख त्यावेळी मला फारसं जाणवलं नाही पण बऱ्या अवस्थेतील बाकीच्या डायऱ्यांचं वाचन केलं तेव्हा आपल्याकडून केवढा मोठा प्रमाद घडलाय, अक्षम्य हलगर्जीपणा झालाय याची तीव्र जाणीव झाली, पण आता नुसतं विव्हळत बसण्यात काही अर्थ नाही. जे काही हाताशी लागलंय त्याला तरी किमान 'न्याय' देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दादांनी जी शब्दसृष्टी उभी केली होती त्याचं शक्य तितकं यथास्थित दर्शन इतरांना घडवलं पाहिजे या निश्चयानं मी कामाला लागलो.

माझ्या भावजयीची चारूची प्रथम पुण्यतिथी २ ऑक्टोबर २००३ रोजी होती. त्या दिवशी 'पुत्र सांगे' नावाचं एक छोटेखानी पुस्तक मी खाजगी वितरणासाठी म्हणून प्रकाशित केलं. ज्या नगरवाचनालयात इंदुमती टिळक गीतगायन स्पर्धा गेली पंचवीस वर्षं सुयोजितपणे घेतल्या जातात त्याच वाचनालयात प्रकाशन झालं. दादांच्या विलक्षण

डायऱ्यांची 'ओळख' प्रकटपणे सर्वांना करून देणं हा त्याचा मुख्य हेतू होता. पार्श्वभूमी समजावी म्हणून आईदादांचं मला ज्ञात असलेलं अल्पचरित्र, त्या उभयतांच्या सहजीवनाची जाणवणारी वैशिष्ट्यं, दादांचे चार अग्रलेख, आईच्या काही कविता असं काहीसं त्या पुस्तकाचं स्वरूप होतं.

आपल्या दादांचं डायरी-लेखन हे आपल्याला, केवळ ते आपलेच वडील असल्याच्या प्रेमापोटी 'महान' वाटतंय का इतरांच्या त्रयस्थ दृष्टिकोनातूनही त्यांच्या मनात याच भावनेचा प्रादुर्भाव होतोय यासाठी मी स्वत: उत्सुक होतो.

आणि माझ्या मनातील हेतूला अपेक्षेपेक्षा विलक्षण चांगला प्रतिसाद मिळाला.

ज्या जाणकार परिचितांना, आप्तेष्टांना ही पुस्तकं पाठवली होती त्यांनी फोनद्वारे, पत्राद्वारे आपल्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया कळवल्याच पण त्यांनी हस्ते-परहस्ते ज्यांना ज्याना म्हणून पुस्तक वाचण्यास दिलं, त्यांनीही आवर्जून आपल्या भावना पत्राद्वारे कळवल्या. ही सर्व माणसं मला सर्वस्वी अपरिचित होती. या सर्व प्रतिसादाचा सूर एकच होता. आमच्या कुटुंबस्नेही आणि सुप्रसिद्ध लेखिका विनिता ऐनापुरे यांच्या शब्दात सांगायचं तर ''डायऱ्यांचं काय करणार आहात? कारण हे पुस्तक़ म्हणजे फक्त 'तिळा उघड' म्हणून अलिबाबाची गुन्हा उघडलीत. आता त्यातील खजिना बघायची उत्सुकता अगदी दाटून आलीय... तेव्हा आता लवकर हालचाल करा.'' 'लोकसत्ता'चे चीफ-कोऑर्डिनेटर सुधीर जोगळेकर यांनी तर या पुस्तकातील वर्ण्य विषयाच्या अनुषंगानं एक लेखच मला लिहावयास सांगितला. 'स्वर्गस्थ पत्नीशी संवाद' या शीर्षकाखाली शनिवार, दि. ३१ जानेवारी २००४च्या 'लोकसत्ता'च्या चतुरंग पुरवणीत तो प्रसिद्ध झाल्यावर पुन्हा तसेच फोन, पत्रं यांचा सुखद वर्षाव झाला.

या साऱ्याचा सम्यक् परिणाम म्हणजे प्रस्तुत पुस्तकाची निर्मिती.

इथं मात्र मी चांगलाच गडबडून गेलो. इतक्या सर्वांच्या अपेक्षांना न्याय देणारं पुस्तक लिहिण्याचं दडपण होतंच होतं. त्यापेक्षा या पुस्तकाचं

सादरीकरण कसं करावं याची चिंता मला रात्र न् दिवस पोखरत होती. दादांनी या चार हजार पृष्ठ्यांच्या नोंदींमधून काही एक सलग कथा उभी केलेली नाही. मनाला जे जे भावलं ते ते ते आपल्या इंदूला सांगायचं, एवढीच त्यांची भावना. या साऱ्या नोंदीमधून पुस्तक जन्माला येईल याची त्यांना बिचाऱ्यांना सुतराम कल्पना तरी होती का? उलट, ते इंदूला संवादातून नेहमी सांगायचे, 'या संवाद-वह्यांचा लेखक मी आणि वाचकही मीच.'

या नोंदी जशाच्या तशा वाचकांसमोर ठेवणं योग्य झालं नसतं.

आईदादांचं सहजीवन, त्यांचा एकमेकांतील स्नेह वा मैत्री ही तशी व्यापक पायावर आधारलेली होती. अनेक विषयांवर त्यांच्यात एरवीसुद्धा संवाद होता. त्यामुळे लौकिक अर्थानं त्यांचे सहजीवन जरी अडुतीस-एकोणचाळीस वर्षांचं होतं तरी त्यांनतरही अकरा वर्षं त्यांचं 'अलौकिक' सहजीवन या संवादवह्यांच्या माध्यमामुळं जणू काही 'मागील पानावरून पुढे' चालू राहावं तसेच चालू राहिलं. विरह-वेदना हा स्वाभाविकपणं या संवादवह्यांचा स्थायिभाव असला तरी इतर अनेक विषयांचा ऊहापोह या संवादांमध्ये आहे. अशा साऱ्या नोंदींचं थोडेसे पृथक्करण करून बुद्धिवाद, स्वप्नं, वाङ्मय, दादांचं महाबळेश्वरप्रेम अशा विषयांवरील नोंदी मी वेगवेगळ्या दिल्या आहेत. त्यामुळे त्या तारीखवार किंवा एका विशिष्ट क्रमानुसार अशा नाहीत. एक गोष्ट मला करावीच लागली. संवादवह्यांची विषयवस्तू सुस्पष्ट व्हावी म्हणून माझ्या आईदादांचं अल्पचरित्र द्यावं लागलं. पुस्तक शक्य तितकं बंदिस्त व्हावं म्हणून कौटुंबिक स्वरूपाच्या नोंदी मी अजिबात काढून टाकल्या. दादा पत्रकार होते. त्यामुळे आणीबाणी, जयप्रकाशांचं आंदोलन, इंदिरा गांधीची हत्या, जनता राजवट अशा अनेक विषयांवरील राजकीय विश्लेषणात्मक त्यांच्या नोंदी भरपूर आहेत, त्यांना मी पूर्णपणे फाटा दिला आणि पुस्तक शक्य तितकं आटोपशीर बनवलं.

या डायऱ्यांचं संपूर्ण वाचन करणं हा माझ्यासाठी एक थरारक अनुभव होता. त्या चार हजार पानांमधील वाचता न येणाऱ्या, अगदीच अस्पष्ट असणाऱ्या पृष्ठांनी मला फार हुरहूर लावली, कारण त्यातून

आपण बरंच काही 'गमावलंय' याची बोच मनात खोलवर गेली. त्यासाठी मी स्वत:च्याच श्रीमुखात अनेकवार मारून घेतलं! रूढार्थानं एका सर्वसामान्य दिसणाऱ्या संसारी पुरुषाच्या मनात एवढं 'काव्य' लपलं असेल याची सुतराम कल्पना कुणालाच येणं शक्य नाही. माझ्या दादांचे निधन आणखी दहा-पंधरा वर्षं आधी झालं असतं तर त्यांच्या इतर वस्तूंसारखी या डायऱ्यांची रवानगी अडगळीत केली गेली असती आणि काही काळाने रद्दी म्हणून त्या फेकून दिल्या गेल्या असत्या. तथापि, पन्नाशीची झुळूक लागल्यानंतर का होईनापण माझ्या हातावर छोटीशी साहित्य रेषा उमटली हे खरं तर दादांचंच नशीब! त्यामुळे डॅफोडिलचं सुंदर फूल जंगलात कुठे तरी तरी उगवलं आणि जगाचं कौतुक मिळण्याआधीच मिटून गेलं! असं तरी दादांच्या या डायऱ्यांच्या बाबतीत घडलं नाही.

आपल्या मृत पत्नीशी 'संवाद' साधणारं असं अलौकिक प्रेम क्वचितच आढळेल. दादांचं लेखन त्या दृष्टीनं अजोड आहे. तो एक महायज्ञ होता. रोजच्या रोज हातात पेन घेऊन एका लिखित पानाची समिधा त्यात टाकायची. एक दिवस नाही, दोन दिवस नाही तर सतत चार हजारांहून अधिक दिवस अशी उपासना करायची ही वस्तुस्थिती थक्क करणारी आहे. बरं, यज्ञ म्हणावा तर त्यामागे काही ना काही अपेक्षा असते पण दादांच्या या यज्ञात स्वार्थाचा लवलेशही नव्हता. कितीही तटस्थपणं या डायऱ्या वाचायचा मी प्रयत्न केला तरी ठायी ठायी मला रडू कोसळत होतं. काही प्रसंग माझ्या चांगले लक्षात आहेत. निदान माझ्या संबंधातील तरी. त्या त्या वेळी डोक्यात राख घालून म्हणा वा परिस्थितीच्या रेट्यामुळं म्हणा, मी त्यांना निश्चितच दुखावलं होतं. अपमानित केलं होतं. थोड्याशा औत्सुक्यानं आणि काहीशा भीतीपोटी मी त्या त्या प्रसंगासंबंधीच्या नोंदी वाचल्या. मी थक्क झालो. दादांनी माझा थोडासुद्धा निषेध केलेला मला आढळला नाही! उलट, काही प्रसंगांत स्वत:कडेच दोष घेतलाय. उणेपणा घेतलाय. केवढी क्षमाशील वृत्ती! डायऱ्यांमधून सर्वत्र मुलांविषयी, सुनांविषयी संपूर्ण समाधान आहे. कृतकृत्यता आहे, मुलं, सुना, आपल्या पत्नीच्या बहिणी, तिचा भाऊ, इतकंच काय

पत्नीच्या मैत्रिणीसुद्धा आपल्याशी चांगल्या प्रकारे, आपुलकीने वागतात याचं सर्व श्रेय दादांनी आमच्या आईच्या चांगुलपणाला दिलं आहे. ती सर्वांशी चांगली वागली म्हणूनच सर्वांची सहानुभूती आपल्याला मिळत आहे याची कृतज्ञतापूर्वक नोंद दादांनी केली आहे. दादांकडे आपले वडील म्हणून न बघता एक 'त्रयस्थ' म्हणून बघितलं तेव्हाच त्यांच्या लिखाणाचं मोल मला उमगले. एरवी 'अतिपरिचयात् अवज्ञा' असाच प्रकार झाला असता! त्यांच्या उच्च कोटीच्या विशुद्ध प्रेमाची कशी शब्दपूजा बांधावी तेच मला समजत नाही.

अज राजाचा विलाप, यक्षानं आपल्या दुरावलेल्या प्रियेला पाठवलेले संदेश कालिदासाने अजरामर केले आहेत. मी पामर. एवढी भरारी मारण्याची ताकद माझ्या पंखांत कुठून यावी? शहाजहान बादशहा आपल्या ताजमहालाकडे बघत आपल्या परलोकवासी पत्नीचं स्मरण करत असे. माझे वडील गरीब. ते कशाला ताजमहाल बांधतील? पण 'इंदू, तुझं चिंतन, पूजन, मनन, स्मरण म्हणजेच ही स्मरणगाथा' म्हणणाऱ्या माझ्या वडिलांनी या डायऱ्यांमधून गतस्मृतींचा ताजमहालच उभा केलाय!

त्यांची निगराणी यथाशक्ती करत, कुतूहल असणाऱ्यांना तो नीट 'दाखवणे' एवढंच माझं काम.

हा सारा अभूतपूर्व प्रकार पाहून रिझर्व्ह बँकेतील माझी एक अत्यंत संवेदनाक्षम कवयित्री मैत्रीण मंजूषा गोसावी म्हणाली, "तुझ्या वडिलांच्या डायऱ्या म्हणजे कालिदासाच्या यक्षाने आपल्या प्रियेला पाठवलेले संदेशच आहेत. आपल्या 'इंदुमती'साठी केलेला हा एक अजविलापच आहे." त्या भारावलेल्या अवस्थेत तिने एक उत्स्फूर्त कविता लिहिली. या भूतलावरील वास्तव्य संपवून दादा आईला भेटायला निघाले आहेत अशी कल्पना करून, माझ्या मैत्रिणीने दादांच्या भूमिकेतून लिहिलेल्या कवितेनेच या 'राम'कथेची सांगता करतो.

अज मी शापित राजा।

गृहिणी सचिव: सखी मिथ:
प्रिय शिष्या ललिते कलाविधौ ।
ती तू इंदुमती गतजन्मीची
जरि या जन्मी रामकृष्ण मी तुझा
विलाप करण्या पुनरपि उरलो
अज मी शापित राजा ॥

एकाकी विदीर्ण विरही मी
तव अंतराय साहू कसा?
तू अशरीरी मी शरीरी मग
तुजसंगे संवाद साधू कसा?
शरीर त्यागिले आलो वेगे
पुनर्मीलना मार्ग न उरला दुसरा
पुनरपि हो तू मम इंदुमती
जरी शापित अज मी राजा ॥

□

## दादांच्या काही इंग्रजी नोंदी

दादांनी काही नोंदी इंग्रजीमध्ये केल्या आहेत. मला त्यांची एकच डायरी (एक्सरसाईज बुक) मिळाली. या नोंदींचं प्रथमदर्शनी जाणवणारं वेगळेपण म्हणजे त्यात कौटुंबिक, सामाजिक वगैरे कोणतेच उल्लेख नाहीत. ते पूर्णतया 'इंदूशी संवाद' आहेत. त्यातील तीन नोंदी येथे दिल्या आहेत. या नोंदींचं मराठी भाषांतर द्यावं असं मला सुरुवातीला वाटलं. तसा प्रयत्नही मी सुरू केला; पण का कोण जाणे, पण भाषांतर न करता किंवा कोणतीही टिप्पणी न करता, त्या नोंदी आहेत तशा मूळ स्वरूपात पुस्तकात अंतर्भूत कराव्यात असं मला वाटलं.

*You were a Goddess*
*I was a beast*
*You made me man*
*You changed into a woman*
*And then lo !*
*We became man and wife.*

Dearest, It was all darkness, stark darkness, absolute darkness and nothing else. I was groping in the dark. I know not where I was moving. I know not what I was doing. Suddenly, I saw a glittering beam of happiness, a ray of hope, What was it? Was it an apparition? Was it a phantom of delight? Nay, It was your appearance silent and smiling; beckoning me to move forward, asking me to come nearer.

*Dearest, how can I forget you?*
*Never, Never shall I forget you*
*As long as this frail body exists*
*You are alive; you are in my*
*breath, you are in my eyes*
*you are everywhere and I am*
*nowhere without you.*
*Indu, it is you who made me*
*It is you who taught me*
*How to lead this life.*
*How can I like without you then!*
*When I lie in darkness I feel*
*You are coming, stealing towards*
*me to comfort me, to give me*
*life and energy.*


No, Indu, I cannot live without you ! Can a fish live without water? Can a mother breathe without her child's existence? I cannot, I shalln't, I won't, I wouldn't live without you. You are me. I am you.


Dearest Indu, nearly ten years have gone by since your death. You died a noble death. I live a disgustful life. I hate myself because I live. Why should I live when you cease to breathe? Is there love last between us? No. They, Why, Oh God, tell me why I continue to prolong my death? I don't know the reason. But it is clear that I still show my face to the world. What shall I do to extinguish this mortal flame? So many people die or diesases, accidents and broken hearts. Unfortunately my name is not included in the list of there fortunate few. However of live I must I have to do something for the good of my family, for the welfare or my nation and for the service of mankind. All these are pious desires. But I do not fond means and ways to carry them out. This feeble body, this tried frime refuses to bring my ambition. Indu action I

have no strength remaned in me to give a concrete form to my cherished yearnings. So I hate life. So there any way at? I him for myself. That is this most ridiculous thing that I detest. I see men & women passing along the road in a hurry, struggling to achieve some thing, pining for what they are unable to do. I eat, sleep doing nothing I live on medicines to lengthen my life. It I cease to do so my sons and my relatives will have to nurse me. I do not want it. Will I not get a peaceful sudden death with no one beside me, with that unmortal name, 'Indu' on the top of my tongue? I heartily desirect. Instruct tell me that I shall recure what I see for. That's why I him. That's why I keep silence to welcome the enviable death.

❑

दादांच्या हस्ताक्षरात...





You were a Goddess,
I was a beast
You made me man
You changed into a woman,
And then lo!
We became man & wife.
20 Jan 1980

Dearest, It was all darkness shark darkness, absolute darkness & nothing else. I was groping in the dark. I know not where I was moving. I know not what I was doing. Suddenly I saw a glittering beam of happiness, a ray of hope. What was it? Was it an apparition? Was it a phantom of delight? Nay, It was your appearance silent & smiling; beckoning me to move forward, asking me to come nearer.

20 Jan 1980

Indu, Dear Indu, Dearest, 10 September 1980

I want to die. This feeble body is unable to bear the weight of life. It wants rest. I too want rest, absolute rest, nothing but rest. I am so exhausted & fatigued. I have nothing to aspire for, to care for, to look after. I have no ambition. I seek not honour, fame or ~~fate~~ fortune. I had an intense desire to join you. Will God ratify it? Why should I trouble others by leading a useless uneventful life? Is there any remedy to be away from toil & trouble? The sun when it loses its brightness hides behind the clouds, goes far far away from the horizon! Where should I go? Is there any place of refuge? Indu, Is it not possible for you to pick me up & take me under your wings? Oh how troublesome I am! Had it been in your nature would you not have deserted me.

dearest 17 September, 1980

To-day is the 6th anniversary of your most lamentable death. I am still alive! While on death-bed, I wish to repeat the Mantram 'Oh Indu, my dear Indu' & breathe my last. Will God ratify my desire? I know not. When the pains of the last moment would go on tormenting me I might forget you. I might fail to say those enchanting words in the agonies of death. Where will ~~&~~ I go then? Shall I ever meet you? Perhaps I may forget you in that land of nothingness. What will happen to me then? Will not my pathetic cries ~~and~~ & moanings arouse pity in that merciful Providence? Oh! What a heaven it would be if I got the pleasure of your company in that deathless life?



**अविनाश टिळक**

मूळ सांगलीकर. रिझर्व्ह बँकेतून असिस्टंट मॅनेजर म्हणून निवृत्त. संदर्भग्रंथ म्हणून अनेक मान्यवरांनी नावाजलेला 'सांगली आणि सांगलीकर' हा ग्रंथ लोकप्रिय. दादासाहेब ताटके या समाजसेवकाच्या जीवनावरील 'आधारवड' हा ग्रंथही अल्पावधीत सर्वमान्य झाला. 'निखळलेले मोरपीस' (कथासंग्रह) आणि 'पुत्र सांगे' (चरित्र) ही अन्य पुस्तके. अनेक कथास्पर्धांतून पारितोषिके. विविध वृत्तपत्रांतून लेखन, 'लोकमत'मधील 'सांगलीचा साहित्य-प्रवास' हे सदरलेखन पुस्तकरूपाने प्रसिद्धीच्या मार्गावर. दिवाळी अंकांमधून नियमित लेखन.

सध्या सांगली (जिल्हा) नगरवाचनालयात कार्यवाह. 'यादे सिनेसंगीत क्लब'चे माजी अध्यक्ष-शास्त्रीय संगीताची आवड. क्रिकेट-कॅरम-ब्रिज खेळांची आवड. हिमालयातील परिभ्रमणावर आधारित लेखन. मुंबईत नोकरीकाळात रिझर्व्ह बँकेच्या महाराष्ट्र वाङ्मय मंडळात पदाधिकारी. डोंबिवलीत वास्तव्य असताना रिझर्व्ह बँक कर्मचाऱ्यांची 'स्नेहवर्धिनी' ही सांस्कृतिक संघटना स्थापन करण्यात पुढाकार.

अविनाश टिळक यांची आई कर्करोगाशी झुंज देऊन १७ सप्टेंबर १९७४ रोजी कालवश झाली.

त्यांचे वडील-दादा - त्यानंतर अकरा वर्षांनी, २१ जुलै १९८५ रोजी निधन पावले.

दादांनी स्वतःचा मृत्यू होईपर्यंत आपल्या स्वर्गस्थ पत्नीशी रोजच्या रोज जो लिखित पत्रसंवाद साधला त्याचे मूर्तरूप म्हणजे हे पुस्तक.

दादांनी दोनशे पानी वह्यांचे एकूण चोवीस भाग लिहिले. त्यात चार हजार पृष्ठे भरतील एवढा मजकूर आहे.

माहिती, हकिगत, मुक्तचिंतन, व्याकुळता, विरहभाव, पश्चात्तापदग्धता अशा विविध विचार-भावनांनी भरलेल्या या संवादपुस्तिका म्हणजे पत्नीवियोगाने भारावलेल्या पतीचा स्मृतियज्ञच होय; त्यात यक्षाच्या विरहगानाची आर्तता आहे...

ग्रंथाली

